म. ग्रं. सं. ठाणे
विषय
ग्रं. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम .................. दि: ..................
क्रमांक .................. नोंद दि ..................

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

REFBK-0003600

प्रोफेसर

# विष्णु गोविंद विजापूरकर

[ चरित्र ]

REFBK-0003600

लेखक

गंगाधर देवराव खानोलकर

3600

प्रथमावृत्ति

कापडी प्रत रु. १। ]		१९२८		[ कागदी प्रत रु. १




प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर.

प्रकाशक:—
गं. दे. खानोलकर,
कुडाळदेशकर ब्राह्मणनिवास,
गिरगांव, मुंबई ४

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक:—
एम्. एन्. कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

प्रकाशकः—
गं. दे. खानोलकर,
कुडाळदेशकर ब्राह्मणनिवास,
गिरगांव, मुंबई ४

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रकः—
एम्. एन्. कुळकर्णी,
कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई २.

तीर्थरूप काका

**पांडुरंगशास्त्री खानोलकर**

यांस

**सादर अर्पण**

# अनुक्रमणिका

—:०:—

**प्रथम खण्ड**, पृष्ठें ३–७८

१ बाल्य आणि तारुण्य; २ संपादक विजापूरकर; ३ वेदोक्ताची वावटळ; ४ सेवेच्या शृंखळा तुटल्या; ५ समर्थ विद्यालयाची स्थापना; ६ छत्रपतींनीं सूड उगवला; ७ कारागृहांतील तीन वर्षे; ८ समर्थ विद्यालयावरील गंडांतर.

**द्वितीय खण्ड**, पृष्ठें ८१–१११

१ सुटकेनंतर; २ निरक्षतेवरील मोहीम; ३ अनपेक्षित आपत्तींचे नवे ढग; परिशिष्ट—प्रो. विजापूरकरांना आलेलीं निवडक पत्रें.

**तृतीय खण्ड**, पृष्ठें ११५—१५३

१ विद्यालयाच्या पुनरुज्जीवनार्थ पुनः एकदां प्रयत्न; २ नवीन समर्थ विद्यालयाची प्राणप्रतिष्ठा; ३ नवीन समर्थ विद्यालयांतील सात वर्षांची कारकीर्द; ४ अखेर. परिशिष्ट—प्रो. विजापूरकरांना आलेलीं निवडक पत्रें.

**चतुर्थ खण्ड**, पृष्ठें—१५७–१८६

१ सामाजिक मतें; २ धर्मविषयक मतें; ३ राजकीय मतें; ४ वाङ्मयविषयक विचार; ५ व्यक्तिविषयक.

१५२३ ... १५१६५.७

# प्रस्तावना

—:*:—

सन १९२० सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेचें खास अधिवेशन झालें. त्या सुमारास राष्ट्रीय शिक्षणाची जी लाट अनेक वर्षांच्या विरामानंतर पुन्हा उसळली तींत जे तरुण सांपडले त्यांपैकींच आम्हीं आहों. तदनन्तर त्यांपैकीं कित्येकांना पश्चात्ताप करावा लागला. परंतु राष्ट्रीय शिक्षणाच्या चळवळींतील अनेक दोष स्पष्ट दिसत असूनही आमचा राष्ट्रीय शिक्षणावरील विश्वास अजून ढळलेला नाहीं. अनेक राष्ट्रीय शाळांचा अनुभव आम्ही घेतला आणि सन १९२५ सालीं शिक्षक या नात्यानें आमचा नवीन समर्थ विद्यालयाशीं संबंध जडला तो वर्ष सव्वा वर्ष टिकला. या कालांत प्रो. विजापुरकर यांच्याशीं आमचा परिचय अगदीं दाट झाला आणि तो त्यांच्या मृत्यूनेंच तुटला. बाह्यतः पाहतां त्यांची राष्ट्रीय शिक्षणविषयक संस्था त्यांच्याच हयातींत अयशस्वी होत आहे, हें जसजसें उघड दिसूं लागलें तसतसें त्यांचें शुद्ध ध्येयजीवित्व आणि इतर गुण हे अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागले. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें सार्वजनिक चरित्र राजकीय पक्षभेदानें विकृत न झालेल्या दृष्टीनें पाहून यथातथ्य रेखाटावें हें आपलें कर्तव्य आहे असें आमच्या मनानें घेतलें. पण एखाद्या सार्वजनिक कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या बहुविध अनुभवांचा फायदा जर समाजास मिळावयाचा असेल तर त्या व्यक्तीचें चरित्र म्हणजे अवतार लीलासंग्रह करून भागणार नाहीं. व्यक्तीचा, संस्थेचा वा राजकीय पक्षाचा अभिनिवेश न धरितां तें काम सहानुभवी परंतु कठोर तत्वनिष्ठेनें व सत्यप्रियतेनें करावयास पाहिजे. व्यक्तीच्या असामान्य गुणाविषयीं योग्य आदर ठेवून, त्याच्या कृतीचें परिणामावरून परीक्षण करण्यास महाराष्ट्रास अजून शिकावयाचें आहे. व्यक्तिलीला-लळीत करून आम्हांस भगतही निर्माण करावयाचे नाहींत अथवा विपर्यासाचे विषफूत्कार पसरून बहुजनसमाजास मूढ निंदकही बनवावयाचें नाहीं. प्रो. विजापूरकर यांच्या सार्वजनिक कामगिरीविषयीं विश्वसनीय कागदपत्रांच्या आधारें जो इतिहास आम्हीं मांडीत आहों, त्याचें परीक्षण वाचकांनीं स्वतःच्याच बुद्धीनें करावें अशी आमची अपेक्षा आहे.

केवळ अनुकरणानें कधींही खरी प्रगति होत नाहीं. म्हणून व्यक्ति ही व्यक्तिशः कितीही स्फूर्तिदायक व आदर्शभूत असली तरी तिचा परिणाम जे थोडे लोक परिचयाच्या क्षेत्रांत येतात त्यांच्याचवर होतो; परंतु तिच्या सार्वजनिक कामगिरीचा इतिहास म्हणजे तिच्या अनुभवांचा निष्कर्ष, हा पुढील पिढ्यांना दीर्घकालपर्यंत उपयोगी पडतो. आज तर संस्थाचालनास अवश्य असणारें ज्ञान व गुण यांचा महाराष्ट्रांत अभावच आहे, असें म्हटलें तरी चालेल. स्वतंत्र तत्त्वप्रवर्तक व संस्था-स्थापक विभूति महाराष्ट्रांत निर्माण झाल्या आहेत परंतु महाराष्ट्रांतील निमसरकारी व राष्ट्रीय संस्थांचा अंतस्थ इतिहास हा अत्यंत निराशाजनक आहे. 'उडदामाजीं काळें गोरें, काय निवडावें निवडणारें?' अशीच स्थिति आहे. आरंभीं सारेच स्नेही म्हणून वाकनिशी बारनिशीचा अभाव, पुढें दप्तराचा गोंधळ आणि अंतीं सामान्य शिष्टाचारासही पारखे झालेल्या आजन्मसेवकांचे नियमपोटनियमांच्या घासाघिशीवर चाललेले डावपेंच, हा खेदजनक देखावा दृष्टीस पडतो. संस्थेसाठीं केलेले नियम कांहीं चालकांना बिनदिक्कत धुडकावून लावितां येतात, त्यांतच त्यांची अधिकारपिपासा तृप्त असते. संस्थेंत सत्ता ताब्यांत घेण्यासाठीं व ठेवण्यासाठीं सनदीगैरसनदी युक्तिप्रयुक्ति व शिक्षणेतर उठाठेवी करणारे आणि स्वतःच्या कार्यबाहुल्याचा नगारा पिटणारे कांहीं कार्यवाह असतात. तात्विक दृष्ट्या त्यांच्याशीं मतभेद असणारे परंतु स्वतःच्या नालायकीची जाणीव असणारे कांहीं-जण डोळ्यांवर कांतडें ओढून ऐहिक शांतीसाठीं पहिल्या वर्गातच सामील होतात. सनदी विरोध करणारे परंतु भांडखोरपणाचा कंटाळा असणारे कालांतरानें मूग गिळितात; आणि जे चुकले माकले तत्त्वनिष्ट जहाल असतात त्यांना अल्प-संख्यतेच्या दौर्बल्यामुळें निघून जावें लागतें. अशा रीतीनें संस्था ही आजन्म-सेवकब्रुवांची मिरास होऊं पहाते; आणि द्रव्यदातृमंडळास झुकविण्यासाठीं जरी प्रशासक मंडळें असतात, तरी त्यांच्यांत जरूर पडल्यास जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन आजन्म सेवकांचे धमकीवजा राजीनामे स्वीकारून नव्या नोकरांकरवीं जुनें कार्य निश्चित तत्वांनुसार चालू ठेवण्याचें सामर्थ्य नसतें. जे प्रशासक असा-वयाचे तेच आजन्मसेवकांच्या दबकावणीला भीत भीत आपलीं आसनें अलंकृत करीत असतात. ही स्थिति महाराष्ट्रांतील किती तरी शिक्षणसंस्थांची आहे. यामुळें उपयुक्त कार्य फार थोडें होतें. तथापि बहुजनसमाज हा उदासीन व अज्ञान असतो. तो तसा राहूं नये, घटनाचिकित्सेकडे त्याची प्रवृत्ति वळावी,

निश्चित ध्येयास धरून वाढत्या भरभराटीनें संस्था वर्षानुवर्षे चालविण्यास लागणारी जी सहकारी संघटनापर शक्ति तिचा विकास व्हावा, या हेतूनें प्रो. विजापूरकरांच्या सार्वजनिक कामगिरीचा इतिहास प्रस्तुत ग्रंथांत आम्हीं अधिक विस्तारानें लिहिला आहे.

प्रो. विजापूरकरांच्या खासगी चरित्राविषयीं अधिक लिहिण्यास जास्त लायक असे प्रो. वामनराव जोशी यांच्यासारखे लोक आहेतच. शिवाय नवीन समर्थ विद्यालयांतील एक आजन्मसेवक व प्रो. विजापूरकर यांच्या चांगल्या परिचयाचे रा. दिनकर विनायक काळे, एम्. ए. हे आठवणी मागवून चरित्र लिहिण्याचे खटपटींत आहेत. तेव्हां त्या खासगी भागावर दोघांनीं आपली शक्ति खर्च करणें बरें नव्हे म्हणून त्या भागाला प्रस्तुत ग्रंथांत आम्हीं गौणत्व दिलें आहे.

विजापूरकरांचें हें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति आम्हांस स्वतंत्रपणें झाली असली तरी तिला मूर्तस्वरूप देण्यास जे विशेष कारणीभूत झाले, ते स्नेही असले तरी, त्यांचे आभार मानणें जरूर आहे. रा. वासुदेव गोविंद विजापूरकर, एम. ए. एलएल्. बी. यांनीं विजापूरकरांचा सर्व पत्रव्यवहार, त्यांच्या रोजनिशा व त्यांचें वाङ्मय आमचे स्वाधीन करून व वेळोवेळीं द्रव्याचीही मदत करून आम्हांस जें उत्तेजन दिलें, त्याबद्दल त्यांचा उतराई होण्याचा एकच मार्ग म्हणजे न्यायनिष्ठुर सत्यनिष्ठा हा जो त्यांच्या पूज्य बंधूंचा विशेष गुण त्याच गुणाला धरून त्यांचें चरित्र लिहिणें हें होय. प्रस्तुत ग्रंथांत यामुळेंच ऐकींव माहितीला फारसा वाव दिलेला नाहीं.

प्रस्तुत चरित्रांत कित्येक थोर गृहस्थांचीं पत्रें आम्ही परिशिष्टांत दिलेलीं आहेत. या पत्रांत कोणाही व्यक्तीचें कोणत्याहि प्रकारचें नुकसान होण्याचा संभव नसल्यामुळें, तीं प्रसिद्ध करण्यास त्या त्या गृहस्थांच्या परवानगीची जरूर आहे असें आम्हांस न वाटल्यामुळें तीं आम्हीं छापून काढिलीं. परंतु मागाहून सहज एकदोन स्नेह्यांशीं या चरित्रासंबंधानें आम्हीं बोलत असतां, त्यांनीं त्या पत्रांच्या मालकांची परवानगी घेणें हें कायद्याच्या दृष्टीनें तरी जरूर आणि इष्ट आहे, असें आम्हांस सांगितलें. तेव्हां आम्ही ताबडतोब त्या त्या सद्गृहस्थांस वरील हकीगत कळवून त्यांची परवानगी मागितली. परंतु तत्पूर्वीच तीं पत्रें छापून निघालेलीं असल्यामुळें, आतां या गोष्टीचा व्यवहारदृष्ट्या कांहींच उपयोग होणार नाहीं, हें उघड आहे.

तरी कोणाचेंहि नुकसान होणार नाहीं अशी खात्री वाटल्यावरच आम्ही हीं पत्रें छापलेलीं असल्यामुळें, आमच्या सद्धेतूकडे लक्ष देऊन वरील सद्गृहस्थांनीं कायद्याच्या अज्ञानामुळें आमच्या हातून झालेल्या या चुकीची क्षमा करावी, अशी त्यांस विनंति आहे. अजाणतां झालेल्या या प्रमादाबद्दल आम्ही दिलगीर आहोंत.

शेवटीं, मामुली पद्धत म्हणून नव्हे तर खरोखरच अंतःकरणापासून, या ग्रंथाचे मुद्रक रा. कुळकर्णी यांचे आभार मानणें जरूर आहे. पुस्तक द्रुतगतीनें छापून देण्याच्या कामीं त्यांनीं दाखविलेल्या तत्परतेमुळेंच चरित्र इतक्या लवकर पण सुंदर वेषांत आम्ही वाचकांस देऊं शकत आहोंत.

गिरगांव, मुंबई,
२६ आक्टोबर १९२८

गं. दे. खानोलकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: .........
क्रमांक ....१५२३.... नों: दि: १५।६।५०

# प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

## प्रथम खण्ड.

दा. क्र. ३६००

# १ बाल्य आणि तारुण्य.

महाराष्ट्र संस्कृती, महाराष्ट्र धर्म आणि महाराष्ट्र भाषा हीं जिवंत रहावीं, त्यांचा सर्वत्र प्रसार व्हावा, त्यांचें श्रेष्ठत्व सर्वांना पटावें एतदर्थ ज्यांनीं आपलें सारें आयुष्य खर्च केलें; धनाची, मानाची किंवा कोणत्याही ऐहिक वैभवाची पर्वा न करतां आपलें शरीर तत्कारणीं चंदनासारखें झिजविलें, अशा थोर विभूतींत प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. आशेचें शीतलत्व आणि प्रयत्नाची प्रखरता यांचा सुंदर मिलाफ झालेला ज्यांच्या ध्येयवादित्वांत दिसून येत असे अशा, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील क्रांतियुगांत जन्म पावलेल्या, कांहीं महापुरुषांपैकीं ते एक होते. ध्येयालाच त्यांनीं देव मानिलें आणि त्याच्या पूजनांत, चिंतनांत व कीर्तनांत आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण वेंचिला. सभोंवतीं निराशेचा अंधार पसरला होता, मार्गांत असंख्य खांचखळगे होते, औदासिन्याच्या सुरांनीं भरलेला वारा जोरानें घोंघावत होता, परंतु समोरच्या ध्येयाच्या तेजस्वी ताऱ्यावरून त्यांची दृष्टी यत्किंचितही चळली नाहीं. खऱ्या ध्येयवाद्याचें ध्येयवादित्व राजदंड किंवा प्रतिकूल परिस्थिती हीं केव्हांही नष्ट करूं शकत नाहींत; उलट त्यांनांच त्याच्यापुढें नम्र व्हावें लागतें, याची प्रचीती त्यांनीं महाराष्ट्राला आणून दिली.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

विष्णु शास्त्री चिपळूणकरांनंतर खरें लोकशिक्षणाचें कार्य, पुढें तितक्याच धडाडीनें जर कोणी चालविलें असेल, तर तें विजापूरकरांनींच. स्वधर्म, स्वदेश आणि स्वभाषा यांचा जाज्वल्य अभिमान प्रत्येक महाराष्ट्रीय हृदयांत कायमचा प्रस्थापित व्हावा, ही जी शास्त्रीबुवांची आत्यंतिक इच्छा ती त्यांनींच बव्हंशीं पूर्ण केली.

विजापूरकर ज्या कालांत जन्मले तो काल आधुनिक महाराष्ट्रेतिहासाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा काल होय. या कालांत महाराष्ट्र आपल्या कांहीं कालाच्या गाढ निद्रेंतून हळू हळू जागा होऊं लागला होता. आपल्या भूत व वर्तमानकालीन परिस्थितीचा तो विचार करूं लागला होता. आपल्या निद्रित स्थितींत आपण स्थानभ्रष्ट होऊन कुठल्या कुठेंच वाहवून जाऊन आपली कींव करण्याजोगी स्थिती झाली आहे, याची त्याला जाणीव होऊं लागली होती. त्याच्या मृतवत् शरीरांत नवचैतन्य उत्पन्न होऊं लागलें होतें. निराशेच्या अंधारानें व्याप्त असलेल्या त्याच्या हृदयांत आशेचे नवनवे किरण डोकावूं लागले होते. महाराष्ट्रनभोमण्डळाच्या क्षितिजावर एक तेजस्वी तारा उदयाला येत होता. आपल्याला सभोंवतालच्या अंधारांतून निश्चित मार्ग दाखविण्यास समर्थ असा हा एकच तारा आहे, असा विश्वास महाराष्ट्राला वाटूं लागला होता. हा तारा कोण बरें? हा तारा दुसरा कोण असणार? थंड गोळ्याप्रमाणें एका बाजूला पडलेल्या महाराष्ट्राला कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुन्हां सजीव होईल, पुन्हां हात पाय हालवूं लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुन्हां जिवंत करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां आयुष्याच्या अखेरीपर्यंत ज्यानें जीवापाड मेहनत केली त्या महर्षि माधवराव रानड्यांखेरीज दुसरा कोण असणार? एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धाला आम्हीं क्रांतियुग म्हटलें आहे. या क्रांतियुगाचे प्रवर्तक महर्षि रानडेच होत. त्यांनीं समाजाला नवी दृष्टि दिली. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक औद्योगिक, धार्मिक, या सर्व बाबतींत पायाशुद्ध प्रगति करून घेतल्याविना आपली उन्नति होणें शक्य नाहीं, याची जाणीव त्यांनीं सुशिक्षितांच्या हृदयांत तीव्रतेनें उत्पन्न केली. सरकारी उच्चतम मानमरातब मिळविण्यापलिकडे आपली इतिकर्तव्यता नाहीं, असें मानणाऱ्या सुशिक्षितांत नव्या दिशेनें विचार करावयाला लावणारी अशांतता त्यांनीं उत्पन्न केली. विद्यालयांतून उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या सुशिक्षितांस सरकारी कचेऱ्यांखेरीज आपली कर्तबगारी दाखवावयाला अनेक क्षेत्रें आहेत, ही

गोष्ट त्यांनींच स्वकृतीनें पटवून दिली. तत्कालीन सुशिक्षित समाजावर रानड्यांच्या विचारांची विलक्षण छाप पडलेली होती. प्रो. विजापूरकर तरी त्याला अपवाद कसे ठरावे ? त्यांचें आत्मिक व लौकिक चरित्र बारकाईनें पाहिलें म्हणजे तें इतकें पवित्र व तेजस्वी बनावयाला रानड्यांचें चरित्रच कारणीभूत झालें असलें पाहिजे, असें वाटूं लागतें. रानड्यांच्या विशाल बुद्धिमतेची गोष्ट एका बाजूला ठेवल्यास, त्यांचें चरित्र आदर्शवत् वाटावयास लावणारे इतर गुण विजापूरकरांमध्यें जितक्या उत्कटत्वानें वसत असलेले दिसत होते, तितक्या उत्कटत्वानें रानड्यांच्या पश्चात् कोणाहि पुढाऱ्यामध्यें दिसून आले नाहींत. "गेल्या पंचवीस वर्षांत अनेक लहान-थोर देशभक्त व पुढारी यांचा व माझा थोडाबहुत संबंध आलेला आहे; पण कै. विजापूरकरांइतका कार्यनिष्ठ, कार्यासाठीं स्वतःचें व्यक्तित्व बाजूस सारणारा, साधा, निरलस व प्रपंचांत राहून विरागपूर्ण अशा साधु वृत्तीनें राहणारा, धिम्या वृत्तीचा, सच्छील, उत्कट देशभक्त व परम स्वार्थत्यागी पुरुष क्वचितच सांपडेल असें म्हणावें लागतें. लो. टिळक व महात्मा गांधी या दोन व्यक्ति सोडून दिल्या तर महाराष्ट्रांत त्यांच्या तोडीचा ( वरील सर्व गुणांनीं युक्त असा ) दुसरा माणूस सांपडणार नाहीं असें वाटतें. त्यांच्यापेक्षां अधिक बुद्धिमान, कर्तबगार व लौकिकास चढलेले अनेक पुरुष दाखवितां येतील, पण बुद्धि, कर्तबगारी व लौकिक एवढ्याच गुणां-वर कांहीं मनुष्याचें थोरपण अवलंबून नाहीं. त्याखेरीज आणखी कित्येक उच्च गुणांची अपेक्षा असते आणि ते विजापूरकरांच्या अंगीं होते म्हणूनच त्यांचें चरित्र व चारित्र्य आदर्शभूत झालेलें आहे," असे त्यांच्या निधनोत्तर एका प्रसिद्ध लेखकानें काढलेले उद्गार कांहीं जणांना अतिशयोक्तिपूर्ण वाटतील पण ज्यांना त्यांचा प्रत्यक्ष सहवास घडला त्यांना ते सत्य वाटल्यावांचून राहणार नाहींत.

विजापूरकर यांच्या पूर्वजांचें मूळ वसतिस्थान विजापूर. आदिलशाहींतील शेवटच्या उलाढालीच्या काळांत विजापूरकर घराण्यांतील लोक कोल्हापुरास येऊन स्थायिक झाले असावेत. या घराण्याकडे कोल्हापुरांतील अंबाबाईच्या जामदार-खान्यावरील कारकुनाची कामगिरी परंपरेनें कायम सोंपविण्यांत आली होती. ही परंपरागत नोकरी विजापूरकरांचे वडील कांहीं काळ करीतहि होते.

प्रो. विष्णु गोविंद ऊर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचा जन्म कोल्हापुरास त्यांच्या आजोळीं मंगळवारपेठेंतील दिवाणांच्या वाड्यांत श्रावण शु॥१२ शके

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

१७८५ (ता. २६ ऑगस्ट १८६३) रोजीं झाला. अण्णांच्या मातोश्रीचें नांव रुक्मिणीबाई असें होतें.

अण्णांचे वडील हे एक उत्तम प्रतीचे शिक्षक होते. यांचें बहुतेक आयुष्य कोल्हापूर संस्थानांतील प्राथमिक शाळांवरील शिक्षकाच्या धंद्यांत गेलें. यांना लेखनाची फार हौस असे. संस्थानांतील तत्कालीन अधिकारी वर्गावरील त्यांचे अनेक चुरचुरीत लेख कोल्हापूरच्या ज्ञानसागर साप्ताहिकांत प्रसिद्ध झाले आहेत. या लेखांमुळें अधिकारी वर्गाची त्यांच्यावर फारशी मर्जी नसे. त्यांची शहराशीं विशेष दळणवळण नसलेल्या दूरच्या खेडेगांवीं बदली करून, अधिकारीवर्ग त्यांच्या वृत्तपत्रांतील टीकेचें अनेकदां उट्टें काढीत असे. पण यायोगें अण्णांच्या वडिलांची निर्भीडवृत्ती यत्किंचितही न दबतां ती अधिक प्रखर टीकेच्या रूपानें उसळी मारीत असे. हीच निर्भीडवृत्ती अण्णांमध्येंही पूर्णपणें विकसित झालेली होती. सत्य, मग तें कितीही कटु असो, स्पष्टपणें जाहिर करण्यास अण्णा कधींही कचरले नाहींत. कोल्हापूर सरकारचा राजदंड मस्तकावर आदळो, टिळकांसारख्यांची मर्जी खप्पा होवो किंवा स्वतःच्या मुलाप्रमाणें मानलेले अनुयायी आपल्याशीं असहकारिता पुकारोत; सत्य तें सत्यच ! तें स्पष्टपणें बोलून दाखविण्यास ते भ्याले नाहींत. अखेरच्या घटकेपर्यंत ते या बाण्यानें वागले.

अण्णांचें प्राथमिक व दुय्यम शिक्षण कोल्हापुरास व कागलास झालें. धुळपाटी-वरील श्रीगणेशाचा पहिला धडा त्यांनीं कोल्हापुरास उपाध्येबुवांच्या वाड्यांत एक गांवठी शाळा होती तींत गिरविला. पुढें वडिलांची ज्या ज्या गांवीं बदली होईल त्या त्या गांवच्या शाळेंत पुढील प्राथमिक शिक्षण घेणें त्यांस भाग पडलें. वयाचे नवव्या वर्षीं त्यांची मराठी चौथी इयत्ता पूर्ण झाली व ते कोल्हापूर येथील सिटी-स्कुलांत इंग्रजी अभ्यासाकरितां दाखल झाले. इंग्रजीशाळेंत असतां त्यांची अभ्यासाकडे दुर्लक्ष करणाऱ्या विद्यार्थ्यांतच गणना होत असे. हरि रघुनाथ कोटबागे नांवाच्या त्यांच्या बालपणापासूनच्या स्नेह्याच्या या काळांतील कांहीं आठवणी प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत ते म्हणतात, "लहानपणीं अण्णा अतिशय द्वाड असत. आपल्या बरोबरीच्या स्नेह्यांशीं कारणाशिवाय मारामारी करावी, त्यांस अभ्यास करूं देऊं नये, कधीं कधीं ते सोबती बुद्धिबळानें अगर गंजीफांनीं खेळत असतां त्यांचा खेळ उधळून द्यावा असा त्यांचा क्रम असे. स्वतः त्यांना मारा-

मारीशिवाय कोणताच खेळ येत नव्हता. स्वतः अभ्यास तर करावयाचा नाहींच पण शेजाऱ्यास मात्र कांहींतरी प्रश्न वरचेवर विचारून भंडावून सोडीत. त्यांचीं द्वाडपणाचीं तीन चार कृत्यें जीं मला माहीत आहेत तीं पुढीलप्रमाणें:—त्या वेळच्या एका मोठ्या अंमलदाराच्या मुलास त्यांनीं येथील (कोल्हापुरांतील) अंबाबाईच्या देवळांत गांठून खूप मारिलें. तेव्हां त्या अंमलदारानें अण्णांच्या वडिलांस बोलावून सदर हकिकत सांगितली, व म्हणाले कीं जर तुमच्या मुलाची या मारा-मारींत चूक असेल तर त्याचा बंदोबस्त तुम्हीं करा व माझ्या मुलाची चूक असेल तर मीही त्याला योग्य ती शिक्षा करतों. हें ऐकून घेऊन त्यांचे वडील घरीं आले व आपल्या चिरंजीवास या बाबतींत खडसून विचारतां त्यांनीं आपला अपराध कबूल केला; त्याबरोबर रागाचे सपाट्यांत आपल्या हातांत धरण्याचे काठीनें इतकें मारलें कीं त्यांस पुढें कित्येक दिवस सरळ चालतां येत नव्हतें. (२) एकदां त्यांचे एका जिवलग मित्रानें एक नवीन धोतरजोडा नेसण्यास विकत घेतला होता. तेव्हां त्यानें त्यांपैकीं एक धोतराचें पान मळविण्याकरतां म्हणून अण्णांस दिलें, तें त्यांनीं अर्ध्या तासाचे आंतच इतकें घाण करून आणलें कीं लागलेंच तें परटा-कडे धुण्यास देणें मालकाला भाग पडलें. (३) स्वतः अभ्यास करावयाचा नाहीं व दुसऱ्यांस करूं द्यावयाचा नाहीं यामुळें त्यांचे स्नेही वर्गांतील नोटस् (त्यांनीं लिहिलेल्या) त्यांना दाखविण्यास नाखुष असत. पूर्वी आमच्या वेळीं राजाराम हायस्कुलांतील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यास सदर्न डिव्हिजनचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर दरसाल येत असत. त्या वेळीं विद्यार्थ्यांस वर्गशिक्ष-कानें इंग्लिश टेक्स्टसवर ज्या नोटस् सांगितल्या असतील त्या त्यांनीं फेअर नोट-बुकांत लिहून तीं बुकें इन्स्पेक्टर यांना दाखवावीं लागत. अण्णा हे वडिलांच्या धाकानें शाळेला नियमित जात, पण शाळेंतील अभ्यासाकडे मात्र दुर्लक्ष करीत; अर्थात् वर्गांत मास्तरांनीं सांगितलेल्या नोटस् कधींही लिहून घेत नसत. याचा परिणाम असा होई कीं ज्या ज्या इसमांजवळ त्यांनीं नोटबुक मागावें त्या त्या इसमानें त्यांस तें देऊं नये. असें जेव्हां एकदां इंग्रजी सहावे इयत्तेंत असतांना झालें, तेव्हां त्यांनीं आपले मनानेंच टेक्स्टबुकांतील कांहीं वाक्यें काढून आपले मना-नेंच त्यांवर फाटके तुटके भाषेंत नोटस् काढून, तें नोटबुक त्यावेळचे इंग्लिश शिकविणारे मास्तर मि. दामोदरपंत धुळेकर यांना दाखविलें. ते मास्तर थट्टेखोर असत. त्यांनीं त्या नोटस् वाचून म्हटलें कीं "अहो विजापूरकर, ह्या विजापूर-

करांच्या नोटस् इतक्या उत्तम साधल्या आहेत कीं त्या आपणासही प्राप्त झाल्याच पाहिजेत अशी शिफारस परीक्षेचे वेळीं मी तुमच्याबद्दल इन्स्पेक्टर साहेबांस करीन. ( ४ ) एकदां एक कुडबुड्या जोशी दारावर भीक मागण्याकरितां आला होता. त्यावेळीं अण्णांची सहाध्यायी मंडळी एकाच ठिकाणीं अभ्यास करीत होती. अशा जोशांजवळ चित्रांची एक वही असते व त्यांत सुटीं पानें असतात. त्या पानांतील चित्रांवरूनच ते भविष्य सांगत असतात. त्या जोशानें ही इतकी मंडळी पाहून तुमचें प्रत्येकाचें भविष्य मी सांगतों असें म्हणून त्यानें आपली पोथी काढली, व प्रत्येक इसमाकडून त्या बुकांत काडी घालवून जें चित्र निघेल त्यावरून त्या इसमाचें तो भविष्य वर्तवूं लागला. उदाहरणार्थ, धान्याच्या राशीचें चित्र निघाल्यास ' तुम्हांस धान्याचा तोटा पडणार नाहीं, ' असें तो म्हणे. नंतर तो प्रत्येकाकडे एक एक पैसा मागूं लागला. तो सर्वांनीं दिला. शेवटीं पाळी आली अण्णांची. त्यांना त्यानें काडी घालण्यास सांगितलें. त्यांनीं ती घातल्यावर एका साधूचें चित्र आलें. त्यावरून त्यानें सांगितलें कीं हा मुलगा पुढें साधु होईल. हें ऐकतांच त्या वेळच्या त्यांच्या उच्छृंखळपणास अनुसरून अण्णांनीं त्यास पैसा न देतां धक्के मारून घराबाहेर घालविलें. परंतु त्यांच्या अलीकडील वर्तनावरून त्या जोशाचेंच भविष्य खरें ठरलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अण्णांची ही उच्छृंखलवृत्ति मॅट्रीक परीक्षेचे सुमारास लुप्त होण्याच्या मार्गास लागली. घरच्या गरिबीची व कौटुंबिक जबाबदारीची जाणीव त्यांना आतां हळुहळू होऊं लागली होती. आपण परीक्षेंत पास झालों नाहीं तर आपल्या महत्वाकांक्षी वडिलांना वाईट वाटेल, बरोबरीचीं मुलें पास होऊन पुढें गेलीं, लोक त्यांचें कौतुक करूं लागले, आपला मुलगा मात्र मागें राहिला आणि 'तो तसाच मागें राहणार' असें लोक म्हणत आहेत, हें पाहून आपल्या मानी आईला चारचौघांसमोर खालीं मान घालावी लागेल, तिच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहतील, या विचारानें त्यांच्या मागील वर्तनाची त्यांना लाज वाटूं लागली. आपण परीक्षेंत यश मिळविलेंच पाहिजे, असा त्यांनीं मनांत निश्चय केला. हायस्कुलांतील सहा वर्षे उनाडण्यांत घालविल्यामुळें त्यांचे बरेच विषय कच्चे राहिले होते. पास होण्याची इच्छा जबर होती, पण अभ्यासाची तयारी जबर नव्हती. पहिल्या वर्षी ते नापास झाले. ज्याचें चिन्ह आपल्या भालप्रदेशीं चिकटूं नये म्हणून ते एवढा खटाटोप करीत होते, तें अपयशाचें चिन्ह या वर्षी चिकटलें गेलें. पण यायोगें ते निरुत्साही बनले नाहींत. इतरांप्रमाणें डोक्यावर हात मारून निराशेनें त्यांनीं पुस्तकें

कोंपऱ्यांत भिरकावून दिलीं नाहींत. ते पुनः उद्योगाला लागले. मनाशीं दृढनिश्चय केला कीं या वर्षी पास व्हावयाचेंच. शेजारी नाकें मुरडीत आहेत, मुरडोत ! बरोबरीचे सहाध्यायी 'काय हो विजापूरकर, यंदां शंकरशेट स्कॉलर यायचं, नाहीं ?' असें उपहासानें बोलोत ! आपण त्याकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, त्याकडे कानाडोळा करावयाचा. कान द्यावयाचे असतील ते वर्गांतील शिक्षकांच्या शिकवण्याकडे, डोळे लावावयाचे ते आपल्या परीक्षेच्या पुस्तकांकडे, लक्ष द्यावयाचें असेल तें आपल्या कच्च्या राहिलेल्या विषयांकडे ! अमुक एक करावयाचें असें मनांत एकदां ठरविलें म्हणजे त्याचा पिच्छा पुरवावयाचा हा त्यांचा स्वभावच होता. या स्वभावामुळेंच पुढील आयुष्यांत प्रतिकूल परिस्थितीचे झंझावात त्यांनीं उभारलेला ध्येयाचा मनोरा ढांसळून टाकूं शकले नाहींत. संकटांनीं त्यांचा पिच्छा पुरविला, परंतु त्या संकटांनाही ते पुरून उरले. कष्टालाहि त्यांनीं 'कष्ट, कष्ट' म्हणावयाला लावलें. अण्णा दुसऱ्यांदां परीक्षेला बसले. या परीक्षेंत ते पास झाले, इतकेंच नव्हे तर लोकांच्या अपेक्षेपलीकडे त्यांनीं तींत यश मिळविलें. हायस्कुलांतून परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांत संस्कृतांत पहिला व युनिव्हर्सिटींत एकंदर चौथा नंबर त्यांनीं पटकाविला. दुसरी जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती तीन गुणांनीं ( मार्क्स ) चुकली. ही शिष्यवृत्ती जरी थोड्या गुणांनीं चुकली तरी त्यांना, त्यांनीं संस्कृत विषयांत मिळविलेल्या प्राविण्याबद्दल, हायस्कुलकडून दरमहा दहा रुपयांची शिष्यवृत्ती मंजूर करण्यांत आली. हें साल १८८० हें होय. या सालापासून त्यांच्या आयुष्याला नवें वळण लागलें.

हायस्कुलांतून शिष्यवृत्ती मिळाल्यामुळें व लोकांनीं आपल्याविषयींचें वर्तवून ठेविलेलें प्रतिकूल भविष्य आपण आपल्या प्रयत्नांच्या योगें खोटें ठरविलें या विचारामुळें, त्यांच्यांत दुप्पट उत्साह संचारला. महाविद्यालयांत उच्च शिक्षण घेण्याकडे त्यांचा कल जाऊं लागला. पदवीधर होऊन आपण मान्यतेला चढावें या महत्वाकांक्षेचें बीज त्यांच्या मनोभूमिकेंत पेरलें गेलें. त्यांनीं महाविद्यालयांत प्रवेश केला. प्रिव्हियसच्या वर्गांत त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. दुर्दैवानें प्रीव्हियसच्या परीक्षेंत ते पहिल्या खेपेस नापास झाले. परीक्षेंत नापास झाल्यामुळें दरमहा वीस रुपये पगारावर शिक्षकाच्या नोकरीचा आश्रय त्यांना करावा लागला. नोकरी संभाळून अभ्यासाची तयारी करणें कठीण जाऊं लागलें. त्यामुळें प्रिव्हियस पास होण्यास त्यांना चार वर्षें लागलीं. जी परीक्षा ते १८८१ सालीं पास

व्हावयास पाहिजे होते ती परीक्षा पास होण्यास त्यांना १८८४ साल पहावें लागलें. याच वेळीं एका महत्त्वाच्या गोष्टीचा येथें निर्देश करणें जरूर आहे. ही महत्त्वाची गोष्ट म्हणजे १८८२ सालीं टिळक आगरकर कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणीं डोंगरीचा १०१ दिवसांचा तुरुंगवास भोगून आल्यावर त्यांस अर्पण करण्याकरितां जो फंड जमा करण्यांत आला, त्या फंडाकरितां राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं जाहीररीत्या 'भ्रांतीकृत चमत्कार' या नाटकाच्या केलेल्या प्रयोगांत त्यांनीं घेतलेला प्रमुख भाग होय. या नाटकांत स्वतः भूमिका अशी त्यांनीं कोणतीच घेतली नव्हती.* परंतु प्रयोग यशस्वी रीतीनें घडवून आणण्याचें महत्त्वाचें कार्य त्यांच्याच शिरावर पडलें होतें. वस्तुतः अण्णांना नाटकें करणें आवडत नसे. विशेषतः स्त्रीभूमिका घेणाऱ्या नटांचा तर ते अतिशय तिटकारा करीत. पुढें पुढें नटांविषयींचा हा तिटकारा त्यांच्यांत इतका बळावला होता कीं ज्या मासिकांत नटांचीं स्त्रीभूमिका घेतलेलीं छायाचित्रें प्रसिद्ध होत, त्या मासिकांस स्पर्श करण्यासही ते तयार नसत. 'चित्रमयजगता'सारखें मासीकही, केवळ त्यांत 'नटांचीं स्त्रीवेषांतील चित्रें असतात' म्हणून कित्येक वर्षें ते वाचीत नसत. याविषयीं १९१३ सालीं त्यांनीं पुण्यांतील एका प्रसिद्ध गृहस्थास लिहिलेलें पुढील पत्र वाचण्याजोगें आहे. "आजच्या टपालानें 'चित्रमय जगत्‌चीं' दोन पुडकीं आलीं. तीं कशीं आलीं याचा उमज पडेना. मी मागविलीं नव्हतीं. आगाऊ पत्र वगैरे कांहीं नव्हतें. आज आलेलीं पुडकीं हातीं आल्यावर चौकशी करतां कळलें कीं मागें एक वेळ असेंच पुडकें आलें होतें. तो जानेवारीचा दरबारचा अंक होता. माझ्या गैरहजेरींत कोणी तरी घेऊन वर्तमानपत्रें वगैरे असल्यास फोडतात. त्याप्रमाणें रा.—यांनीं फोडला. मला खबर मिळाली नाहीं. माझ्या पहाण्यांतही तो अंक आला नाहीं. **ज्या तत्त्वानें मी थिएटरांत नाटक पहाण्यास जात नाहीं त्याच तत्त्वानें मी 'चित्रमय जगत्' प्रायः वाचीत नाहीं. त्यांत नटांचीं स्त्रीवेषांतील चित्रें असतात.** माझा चित्रशाळेवर व एकंदरीनें तुमच्या मंडळीवर

---

* समर्थ विद्यालयांतील एक तहाहयात शिक्षक रा. रानडे यांनीं 'अण्णांनीं सदर नाटकांत दंवडी पिटणाऱ्या महाराची व नामदार गोखले यांनीं 'जोगिणी'ची भूमिका घेतली होती' अशी एक आठवण विद्यालयातर्फे निघणाऱ्या विद्यार्थ्यांच्या 'प्रयोग' नांवाच्या हस्तलिखित मासिकांत लिहिली आहे.

किती लोभ आहे हें तुम्हीं जाणत आहां, म्हणून मी विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. परंतु आगाऊ पत्र पाठविलें नाहीं तरी प्रेमानें मला एक अंक नजर करावा म्हणून आपण पाठवितां असें मी अनुमान करितों. त्यांत चुकी असण्याचा संभव नाहीं. **तथापि वर निर्दिष्ट केल्या कारणानें मला ह्या पुस्तकाची नजर करूं नये.** कोणत्याही प्रकारचा गैरसमज होऊं देऊं नये इतकी प्रार्थना आहे." नट व नाटकें यांजविषयींचीं अशा तऱ्हेचीं मतें असतांही अण्णांनीं, टिळक आगरकरांबद्दल तत्कालीन तरुण वर्गांत जो एक प्रकारचा आदर व अभिमान उत्पन्न झाला होता, त्या अभिमाना-मुळेंच नाटकाचा प्रयोग घडवून आणण्याचे कामीं मोठ्या उत्साहानें भाग घेतला. या प्रयोगाला बरेंच उत्पन्न आलें. परंतु कोल्हापुर सरकारनें हरकत घेतल्यामुळें तें पाठवितां आलें नाहीं. या हरकतीमुळें कोल्हापुरांतील या तरुण टिळक आगरकर भक्तांचा निरुत्साह झाला. तरी पण गुपचुपपणें मंडळींतल्या मंडळींत चाळीस रुपयांपर्यंत रक्कम जमवून, ती त्यांनीं फण्डाकडे रवाना केली. अण्णांचा सार्वजनिक कार्यांत भाग घेण्याचा हा पहिलाच प्रसंग होय.

प्रिव्हियस पास झाल्यानंतर बी. ए. ची परीक्षा मात्र ते योग्य वेळीं पास झाले. १८८५त फर्स्ट बी.ए. ची व १८८६त डेक्कन कॉलेजमधून सेकंड बी. ए. ची त्यांनीं परिक्षा दिली. या परीक्षेंत त्यांनीं चांगल्या प्रकारचें यश मिळविल्यामुळें त्यांस डेक्कन कॉलेजांत दोन वर्षें दक्षिणा फेलो नेमण्यांत आलें.

प्रिव्हियसची परीक्षा जरी ते तीन वेळां नापास झाले होते, तरी त्यांचा संस्कृत भाषेचा व वाङ्मयाचा अभ्यास त्यांच्या वयाच्या मानानें पुष्कळच झाला होता. या अभ्यासामुळेंच डेक्कन कॉलेजांत असतांना डॉ. भांडारकरांचा त्यांजवर लोभ जडला. अण्णा डेक्कन कॉलेजचे मूळचे विद्यार्थी नसतां केवळ डॉ. भांडारकरांनीं उचलून धरल्यामुळें त्यांस बी. ए.चे वर्गांत असतां नादारी (फ्रीशिप) मिळाली होती. अण्णांचीही डॉक्टरमहाशयांवर अखेरपर्यंत विलक्षण भक्ति होती. १९१२ सालीं गणेशोत्सवाचे प्रसंगीं पुण्यास गायकवाड वाड्यांत त्यांचें एक व्याख्यान झालें होतें. या व्याख्यानाचे आरंभीं त्यांनीं तीन नमनाचे श्लोक म्हटले होते. एक परमेश्वरास अनुलक्षून, दुसरा मातापितरांस अनुलक्षून व तिसरा डॉ. भांडारकरांस अनुलक्षून होता. हा शेवटचा श्लोक पुढीलप्रमाणें होता:—

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

" गोपालजं गुरुवरं मम रामकृष्णं
भाण्डारपूर्वकर इत्यभिधानवन्तम् ।
चेतांसि शिष्यनिकरस्यवचोऽमृतेन
सम्पूरयन्तमहमस्मिनतो दयालुम् ॥ "

१८८८ चे अखेरीस डेक्कन कॉलेजांतील दक्षिणा फेलोशिपची मुदत संपतांच डॉ. भांडारकरांनीं त्यांची युनिव्हर्सिटीकडे शिफारस करून त्यांस अहमदाबादच्या कॉलेजांत फेलो म्हणून नेमविलें. या कॉलेजांत ते जुलै १८८९ पासून जून १८९० पर्यंत होते. पुढें राजाराम कॉलेजांत त्यांना घोरपडे लेक्चरर नेमण्यांत आलें. या काळांत त्यांचा एम. ए. चा अभ्यास जोरानें सुरू होता. ते एम्. ए. च्या परीक्षेस प्रिव्हियसप्रमाणेंच तीनदां नापास झाले व चौथ्या खेपेस म्हणजे १८९३ सालीं तींत उत्तीर्ण झाले.

एम्. ए. झाल्यावर त्यांच्या महत्त्वाच्या आयुष्यक्रमास सुरुवात झाली. अण्णा ज्या कालांत वावरत होते तो काल मानसिक अशांततेचा होता. महाराष्ट्रांत निरनिराळ्या विचारांचीं आंदोलनें सारखीं सुरू होतीं. तरुणांना स्वस्थ बसूं देणारा तो काल नव्हता. स्वदेशासाठीं, स्वधर्मासाठीं, स्वभाषेसाठीं, स्वसंस्कृतीसाठीं कांहीं तरी केलें पाहिजे, तसें 'कांहीं तरी' केलें नाहीं तर जीवन व्यर्थ, अशा तऱ्हेच्या भावना तत्कालीन तरुणांच्या हृदयांत सारख्या उचंबळत होत्या. अण्णा त्याला अपवाद कसे ठरतील ? रानडे, चिपळूणकर, टिळक, आगरकर या व्यक्ती त्यांच्या डोळ्यांपुढें होत्या. आपल्या बुद्धीचा आणि वित्ताचा विनियोग नवसंक्रमण घडवून आणण्याचे कामीं ह्या व्यक्ती कशा करीत आहेत हें त्यांनीं पाहिलें होतें व ते पहात होते. 'देशांत चारही बाजूंनीं जागृती झाल्याशिवाय अभ्युदय होणें शक्य नाहीं,' ही गोष्ट त्यांना पटली होती. लोक सुशिक्षित झाले पाहिजेत, सुसंस्कृत झाले पाहिजेत, चौकस बुद्धीचे झाले पाहिजेत, त्यांच्यांत नव्या विद्या, नव्या कला, नवीं शास्त्रें समजून घेण्याची आतुरता उत्पन्न झाली पाहिजे, असें त्यांना वाटत होतें. नुस्तें वाटतच नव्हतें, तर तशी परिस्थिति उत्पन्न करण्यास काय करावें यासंबंधींचे विचार त्यांचे मनांत अहोरात्र चालले होते. या अहोरात्र चाललेल्या विचारांच्या खळबळींतूनच '**ग्रंथमाला**' जन्माला आली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या

मृत्यूमुळें अर्धवट राहिलेलें लोकशिक्षणाचें कार्य या मालेनें धडाडीनें पुढें चालविलें. निबंधमालेहूनहि अधिक व्यापक असें हिचें कार्य होतें. निबंधमालेनें महाराष्ट्रीयांत स्वभाषेबद्दल, स्वेतिहासाबद्दल व स्वधर्माबद्दल अभिमान जागृत केला; परंतु या जागृतीनेंच केवळ कार्य होणारें नव्हतें. हिंदुस्थानाबाहेरील जगाच्या निरनिराळ्या उलाढालींकडे त्याचें लक्ष खेंचून, आपला उत्कर्ष साधून घ्यावयाचा असेल तर काय केलें पाहिजे तें सांगणारें कोणी तरी पाहिजे होतें. तें सांगण्याचें काम ग्रंथमालेनें केलें. या कामाची स्पष्ट कल्पना अण्णांना आली होती, ही गोष्ट त्यांनीं ग्रंथ-मालेच्या तेविसाव्या अंकांत 'सालअखेर' या सदराखालीं प्रगट केलेल्या पुढील विचारांवरून कळून येईल. ते म्हणतात, "पाश्चात्य देशांतील विचारसरणी, त्यांची राजकीय, औद्योगिक व सामाजिक उन्नतीची कल्पना, आमच्या लोकांस जितक्या अल्प आयासानें कळतील तितकें आपलें कल्याण आहे. हें काम कालावधीवर पडेल, तर आपला उत्कर्षकालही कालावधीवर पडला, असें आपण खास समजलें पाहिजे. एकंदर समाज घोर अंधकारांत चाचपडत राहून, केवळ त्याचा अत्यल्प अंश ज्ञानवान् झाला, तर कांहीं उपयोगी नाहीं. ही सामान्य स्थिति; पण जगांतील सांप्रत कालच्या भयंकर जीवनकलहांत, आमच्या लोकांचे अज्ञानापासून आमचा सर्वस्वी घात होत आहे. आमच्यांतील धंदेवाईक लोकांस युरोपियन धंदेवाईक लोकांशीं चढाओढ करण्याचें सामर्थ्य नाहीं. ब्राह्मण-वर्ग, ज्यानें आजवर उदीम धंदा केला नाहीं, त्यास तो करणें कमीपणाचें वाटत आहे. तेली, माळी, साळी, कोष्टी, सुतार, लोहार, चांभार इत्यादिकांस युरोपांतील कलाकौशल्याची कल्पना जर आली, तर त्यांच्या हाडामासांत खिळलेल्या कला-कौशल्याचा प्रादुर्भाव झाल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांना उदार शिक्षण फारसें नको; पण धंदेशिक्षणच फार पाहिजे; पण तेंच येण्यास त्यांचा पश्चिम जगांतील कल्पनांशीं थोडा तरी परिचय झाला पाहिजे. आमच्या राज्यकर्त्यांविषयीं त्यांची कल्पना, केवळ ते ईश्वरतुल्य आहेत, अशी आहे. आमचे लोकांतील म्हण कोणास माहीत नाहीं बरें ? 'ईश्वराची करणी नारळांत पाणी,' आणि 'इंग्रजांची करणी बंबांत पाणी' तर अशा प्रकारें ज्या समाजांतील महाजनसमूहाचा समज आहे, त्या समाजास स्वावलंबनशक्ति कशी येईल ? आपण दुबळे, नामर्द आणि सर्वथा पंगु, आपल्यावर राज्य करणारे सर्वशक्तिमान् असा जेथें ग्रह, तेथें थोडेंसें वाचून आंधळे झालेले शिक्षित लोक काय करणार ? शिक्षणाचे योगें अशक्त न होतां,

शिक्षण प्राप्त करून घेण्याचें असल्यास तें देशभाषेशिवाय होणें अशक्य आहे. एक शिक्षण किंवा शिक्षणपद्धति एवढयानेंच आम्ही अशक्त झालों असें नाहीं; त्याला दुसरीं अनेक व सबळ कारणें आहेत. त्या सर्वांचें आदिकारण मात्र एकच आहे; पण हा विषयच वेगळा आहे. प्रस्तुत आमचा रोंख इतका आहे कीं, आपल्या लोकांत ज्ञानाचा अत्यंत सुलभ रीतीनें प्रसार करण्यासाठीं सर्वांनीं झटलें पाहिजे, आणि हें काम देशी भाषेंत नानाविध ग्रंथसंग्रह निर्माण झाल्याशिवाय होण्याची बिलकुल आशा नाहीं. "

ग्रंथमालेच्या प्रकाशनाला एप्रिल १८९४ पासून सुरुवात झाली. याच्या पुढील वर्षी (१८९५) त्यांनीं एम. ए. च्या विद्यार्थ्यांकरितां ऋग्वेदांतील निवडक उताऱ्यांचें ' ऋग्वेद ऋक् संग्रह ' या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध केलें. याच वर्षी राजाराम कॉलेजांतील संस्कृतचे अध्यापक प्रो. शिवराम बापूजी परांजपे यांनीं पेन्शन घेतल्यामुळें त्यांचे रिकाम्या झालेल्या जागीं अण्णांची नेमणूक झाली. या नेमणुकीमुळें त्यांच्या आयुष्यास एक प्रकारचें स्थैर्य प्राप्त झालें व आरंभिलेले उद्योग व्यवस्थितपणें पार पाडण्यास त्यांस अधिक उत्साह वाटूं लागला.

## २ संपादक विजापूरकर

विजापूरकरांना महाराष्ट्र आज संपादक या नात्यापेक्षां अध्यापक या नात्यानें अधिक ओळखतो. किंबहुना संपादक विजापूरकर त्यांच्या स्मृतींतून जवळ जवळ नष्ट होत चालले आहेत, असें म्हटलें तरी चालेल. विजापूरकरांचें नांव घेतांच त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांचें 'समर्थविद्यालय' जसें उभें राहतें तसें त्यांची ग्रंथमाला, विश्ववृत्त, किंवा समर्थ हीं उभीं रहात नाहींत. नवशिक्षणाच्या बाबतींत जितके महत्त्वाचे उद्योग त्यांनीं केले तितकेच त्यांनीं नववाङ्मयाच्या बाबतींत केलेले आहेत, असें कोणी म्हटलें तर तें कित्येकांना यामुळेंच अतिशयोक्तीचें वाटूं लागतें. परंतु जो कोणी ग्रंथमालेचे बारा वर्षांचे अंक चाळील, त्यांतील सारसंग्रह काळजीपूर्वक वाचील, त्यांतून बाहेर पडलेल्या उत्तमोत्तम आंग्ल पण्डितांच्या ग्रंथांचीं भाषांतरें पाहील, त्याला विजापूरकर यांनीं संपादक या नात्यानें केलेल्या कामगिरीचें महत्त्व पटल्यावांचून राहणार नाहीं.

विद्यार्थिदशेंत असल्यावेळेपासून 'आपण एक आदर्श मासिक पुस्तक काढून मराठी भाषेच्या द्वारा इंग्रजी न शिकलेल्या लोकांस युरोप, अमेरिका व आशिया ह्या खंडांत चांगलें म्हणून जेवढें आहे त्याचा परिचय केवळ मराठी जाणणाऱ्या देशबांधवांस करून द्यावा' अशी त्यांची तीव्र इच्छा होती. यासंबंधीं आपल्या

स्नेह्यांत ते वारंवार चर्चाही करीत. परंतु अनुकूल सामग्रीच्या अभावीं चिंतिलेल्या योजना लांबणीवर पडत. कोल्हापुरास सुशिक्षित मंडळींच्या त्यांनीं अनेकदां सभाहि भरविल्या. चर्चा सुरू होऊन कांहीं ठरूं नये असें एक दोन वेळां झालें. एकदां तर कोण किती दरमहा पृष्ठें लिहितो याच्या याद्याहि झाल्या. परंतु पुनः तें काम मागें पडलें. यासंबंधींची हकीगत विजापूरकरांनीं ग्रंथमालेच्या ७२ व्या अंकांत विस्तारानें लिहिली आहे. ते म्हणतात " मग सन १८९३ सालीं दिसेंबर महिन्यांत पुण्याच्या पदवीधर मंडळीनें '**भाषांतर**' मासिक पुस्तकाचें प्रसिद्धिपत्र काढलें. तेव्हां मात्र आम्हांस वाटलें कीं, आपण हजार बेत करीत आहोंत, तोंपर्यंत पुणें-करांनीं आमच्यापुढें दौड मारली हें कांहीं बरोबर नाहीं. मग मात्र काम जोरास लागून आम्हीं आठ दहा असामींनीं जानेवारीच्या आरंभीं एकत्र जमून ठरविलें कीं, आतां एप्रिलपासून आपलें मासिक पुस्तक काढावयाचें. त्याला प्रथम द्रव्याचें सहाय्य प्रो. रघुनाथ नारायण आपटे, एम. ए., एल्‌एल्. बी., यांनीं पांचशें रुपये उसनवार देऊन कामाच्या सुरुवातीची एक महत्त्वाची नड दूर केली. करारमदार होऊन येथील विद्याविलास छापखान्यांत **ग्रंथमाला** छापण्याचें ठरलें. आमच्यासाठीं नवे ठसे ( टाईप ) आणले. मजकुराची कधींही वाण पडावयाची नाहींच, तेव्हां कांहीं उणेपणा दिसला नाहीं. झालें, प्रसिद्धिपत्रक काढलें. आश्रयदात्यांकडून पत्रें व कार्डें येऊं लागलीं. या कामास सुरुवात झाली, तेव्हां प्रस्तुत लेखकास जो आनंद झाला होता त्याचें वर्णन करणें अशक्य आहे. तितका आनंद पुस्तक छापून पुढें आल्यावर खचित झाला नाहीं. जुळवाजुळव करीत असतांना एकेक गोष्ट जमत चालली म्हणजे जी मनाची उत्कंठा व चळवळ असते, तो प्रकार साक्षात् यशःसिद्धीच्या वेळीं नसतो. मध्यंतरीं '**भाषांतराचे**' संपादक मित्र रा. रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, बी. ए., यांचें पत्र आलें कीं, तुम्हीं निराळें मासिक पुस्तक कशास काढितां, दोन्ही प्रयत्न एकच करून दुप्पट पृष्ठांचें पुस्तक एके ठिकाणीं काढून मोठ्या थाटानें चालवूं. एका पक्षीं तो विचार आम्हांस मानवला; परंतु आपल्यावर जबाबदारी आहे, असें वाट-ण्यास व त्याप्रमाणें काम वठण्यास आमच्या मंडळीस येथल्या येथेंच सर्व होणें जरूर वाटलें. त्याप्रमाणें रा. रा. राजवाडे यांस लिहिलें कीं, दोहोंचाही हेतु जवळ जवळ तोच आहे. येथील मंडळीचा मासिक पुस्तकें एक करण्याचा मानस नाहीं, तरीपण एकाच मासिक पुस्तकाचीं दोन अंगें अशा प्रेमानें चालण्यास हरकत नाहीं.

इकडे मजकूर कमी आला तर तिकडचा आणूं, तिकडे कमी आला तर इकडचा देऊं, अशा सलोख्यानें चालण्याचा निश्चय झाला. पुढें प्लेगचा भयंकर प्रादुर्भाव झाल्यानें, तें मासिक पुस्तक बंद पडल्यामुळें रा. रा. राजवाडे यांस निराळा आवडीचा उद्योग हातीं घेणें भाग पडलें व त्यांत त्यांनीं हाल सोसून, पैशांच्याही पेंचीं येऊन देशसेवा कशी बजाविली, हें गेल्या सालअखेरच्या लेखांत दाखविलें आहे. त्यांच्या ऐतिहासिक लेखांचा सांठा अतोनात झाला व तो छापण्यास स्थळ नाहीं, तेव्हां त्यांच्या आमच्या विचारानें ग्रंथमालेंतच कांहीं ऐतिहासिक लेखांचा समावेश करण्याचा निश्चय झाला. एवंच पुनः रा. रा. राजवाडे यांनीं संपादकत्वाचें जूं मानेवर घेतलें व एक प्रकारें दोन मासिक पुस्तकें जरी एकत्र झालीं नाहींत, तरी दोहोंचे संपादक एकत्र होऊन सहकार्यकारी बनले आहेत. आपल्या देशाच्या इतिहासाचें अध्ययन, मनन व निदिध्यास करणारे रा. रा. राजवाडे यांच्यासारखे निरपेक्ष श्रम करणारे व ते श्रम करण्यासाठीं परमहंस परिव्राजकवृत्तीचा अंगीकार करणारे पुरुष आमच्यामध्यें ते एकटेच आहेत, याहून अधिक लिहिणें नलगे.”

ग्रंथमालेंतून पहिल्या पांच वर्षांत बरेचसे विविध शाखांतील भाषांतरित ग्रंथच बाहेर पडले. या मालेचा दर अंक जरी प्रत्येक महिन्यास बाहेर पडत असे तरी तिला मासिकाचें असें स्वरूप आलेलें नव्हतें. संपादकांस जे कांहीं विचार प्रदर्शित करावयाचे असतील ते वर्ष अखेरीस ‘ साल अखेर ’ या सदराखालीं ते करीत. हें सदर अनेक दृष्टींनीं उपयुक्त असें असे. या सदरांत ‘ माले ’ चे तिच्या प्रगतीसंबंधींचे बरेवाईट अनुभव तर लिहिले जातच असत, परंतु त्याबरोबरच त्या वर्षांत प्रसिद्ध झालेल्या एकंदर मराठी वाङ्मयाच्या प्रगतीचें निःपक्षपात बुद्धीनें मापनही केलें जाई. सहाव्या वर्षापासून मात्र ही स्थिति बदलली. पूर्वीच्या डेमी आकाराच्या ऐशीं पृष्ठांचीं १७२ पृष्ठें करण्यांत आलीं व दरमहा इंग्रजी मासिकांतील ‘ मंथली टॉपिक्स ’ किंवा ‘ अवर पॉइंट ऑफ व्ह्यू ’ या सदरांच्या धर्तीवर जगांतील निरनिराळ्या घडामोडींची चर्चा करणारें असें ‘ सारसंग्रह ’ या नांवाचें सदर सुरू करण्यांत आलें. या सदराची कल्पना विजापूरकरांनींच मालेच्या सहाव्या वर्षाच्या प्रारंभीं केलेल्या खालील विवेचनावरून पूर्णपणें येईल:—

“ पूर्वी अभिवचन दिल्याप्रमाणें चालू अंकापासून दरमहा १७२ पृष्ठें प्रसिद्ध करण्याचा क्रम सुरू केला आहे. ८० पृष्ठें पूर्वीप्रमाणें मजकूर येत जाईल.

८० पृष्ठें मजकूर ऐतिहासिक लेख येतील. सालांतून एकंदर २४०० पृष्ठें प्रसिद्ध होतील; पैकीं ९६० पृष्ठें मजकूर ऐतिहासिक, ९६० विविधविषयक, व बाकी राहिलेल्या ४८० पृष्ठांचा विनियोग जगामध्यें प्रस्तुत काय चाललें आहे, याचा आमच्या प्रिय वाचकांना परिचय करून देण्याकडे करावा, असा संकल्प केला आहे. या कामीं ज्याचा कित्ता आम्हीं पुढें ठेवणार आहों, त्याचा नामनिर्देश केला म्हणजेच कित्येकांस आमच्या म्हणण्याची कल्पना चद्दिशीं लक्षांत येईल. दीर्घोद्योगी मि. स्टेड यांनीं चालविलेलें 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यू' म्हणून एक इंग्रजी मासिक पुस्तक आहे. त्यांत सर्व जगांतील हालहवाल असते. परंतु वर्तमानपत्रांतील लेखांचा सारांश किंवा त्यावर टीकात्मक लेख त्यांत येत नाहींत. हें पुस्तक आपल्या नांवाप्रमाणें मासिक त्रैमासिकादि पुस्तकांचा आदर्श आहे असें म्हटलें तरी चालेल. परंतु केवळ दुसऱ्यांच्या लेखांचा सारांशच देऊन किंवा त्यावर चर्चा करूनच हें पुस्तक आपलें मासिक कार्य भागवितें असें नाहीं. त्यांतील विषयक्रमाचें सामान्य धोरणच येथें दिलें म्हणजे त्याची कल्पना आमच्या वाचकांस चांगली होईल. प्रथमतः एक चित्र असतें; तें सद्यःकालीन कोणत्या तरी अत्यंत महत्त्वाच्या विषयास अनुलक्षून असतें. नंतर 'जगाची प्रगति' या सदराखालीं कांहीं स्फुट सूचना असतात. त्या महिनाभर चर्चेंत असलेल्या विषयासंबंधाच्या अगर संपादकाच्या मतानें महत्त्व देण्यास योग्य अशा दुसऱ्या कोणत्याही विषयांवर असतात. त्यांत मधून मधून विषयपरिज्ञान चांगलें व्हावें म्हणूनच चित्रें व नकाशे दिलेले असतात. हा पहिला भाग ८।१०।१२ इतकीं पृष्ठें असतो. यानंतर ज्या महिन्याचा अंक असेल त्याच्या पूर्वीच्या महिन्याची रोजनिशी असते. ह्या प्रकरणांत सामान्यतः महिन्यांत घडलेलीं सर्व महत्त्वाचीं वर्तमानें तारीखवार दिलीं जातात. तसेंच कोठें महत्त्वाचीं व्याख्यानें झालीं असलीं तर त्यांची तारीखवार नोंद असते. जेव्हां पार्लमेंटची बैठक असेल, तेव्हां दोन्ही म्हणजे बड्या लोकांच्या व सामान्य लोकांच्या सभांतील प्रमुख भाषणांची नोंद वेगळी तारीखवार दिलेली असते. याचप्रमाणें कांहीं विशेष मुद्दाम नेमलेली मंडळी किंवा एखाद्या प्रश्नाचा ऊहापोह करण्यासाठीं बसलेलें सहकारीमंडळ (Commission) किंवा एखाद्या संस्थेचा वार्षिक समारंभ, यासंबंधानें झालेल्या व्याख्यानमालेंतील भाषणांची क्रमवार यादी दिलेली असते. यानंतर शेवटीं थोर व विख्यात लोकांच्या निधनाची नोंद. अशा प्रकारचें 'महिन्याची रोजनिशी' हें प्रकरण

असतें. तिसरें प्रकरण कोणा तरी विख्यात स्त्रीचें अगर पुरुषाचें चरित्र, चवथें प्रकरण महिन्यांतील सर्वतोमुखीं असलेल्या विषयावर एक लेख. त्याचें सामान्य नांव ' महिन्याचा विषय ' ( Topic of the Month ). यानंतर एखाद्या बातमीदाराकडून अगर लेखक मित्राकडून आलेला लेख. इतकीं पांच स्वतंत्र प्रकरणें बहुशः प्रत्येक अंकांत असतात. यानंतरचीं पुढील प्रकरणें म्हणजे जगांत दुसऱ्यांनीं काय केलें आहे, तें वाचकांस कळविण्यासाठीं असतात. हीं मुख्यत्वें करून पांच आहेत. १ मासिक त्रैमासिकांतून प्रसिद्ध झालेले प्रमुख लेख. २ प्रत्येक मासिकाचा ठोकळ गोषवारा. ३ ' महिन्याचें पुस्तक ' म्हणजे त्या महिन्यांत प्रसिद्ध झालेलें, अत्यंत चांगलें, सर्व लोकांना अवश्य, महत्वाचें असें एक पुस्तक घेऊन त्याचें परीक्षण. ४ दुसरीं कांहीं लक्षणीय पुस्तकें. ५ प्रमुख मासिक पुस्तकांच्या अनुक्रमणिका. हें असें दशप्रकरणी अत्यंत उपयुक्त व व्यापक असें मासिक पुस्तक सालीना ८ शिलींग ६ पेन्सला म्हणजे हिंदुस्थानांत रु. ६–८ ला मिळतें. याचीं मोठ्या सांच्याचीं दोन रकान्यांत लिहिलेलीं सुमारें ११० पृष्ठें असतात. याच्या प्रती किती खपतात हें नक्की माहीत नाहीं. पण एक लक्ष खपतात म्हटलें तर अजमास कमीच केला असें होईल. "

" इतकें व्यापक मासिक पुस्तक मराठींत होणें अशक्यच, पण त्या धर्तीवर कांहीं आरंभ करावा म्हणून, आमच्या मासिक पुस्तकाचा कांहीं भाग या कामीं अडविण्याचा विचार केला आहे. इंग्रजी मराठी किंवा इतर कोणत्याही भाषेंतील ग्रंथ वाचून त्यांत काय आहे, त्यांतील ग्राह्यांश कोणता, व त्याज्यांश कोणता, आपल्या सांप्रतच्या स्थितीस त्यांतील किती भाग लागू पडतो, त्याचा उपयोग कसा करून घेतां येईल, कोणता भाग मुख्यत्वेंकरून सर्वांस कळणें अगत्याचें आहे, अशी अनेक पुस्तकांसंबंधानें थोडक्यांत माहिती देतां यावी अशी इच्छा आहे. यासाठीं मोठेंच लेखकबल पाहिजे. तें जमविण्याची खटपट होणें जरूर आहे. महिन्यांतून निदान एक एक पुस्तक वाचून त्यावर असा एक त्रोटक लेख लिहिण्याचें मनांत आणणाऱ्या कोणास व त्यांत आमच्या पदवीधर किंवा उच्च शिक्षणाच्या कांहीं पायऱ्या चढलेल्या लोकांस कठीण नाहीं. त्यांच्या दारावर ठोठावयाचें काम आमचें आहे. कित्येक मित्रांच्या समाधानकारक स्वागतामुळें विशेष उत्तेजन येत आहे. युरोपांत विविध भाषांच्या वाङ्मयांची प्रगति झपाट्यानें होत आहे, तशी आमच्या भाषांची नाहीं. यासाठीं आम्हांस नेहमीं

नवीनच पुस्तकांवर लिहितां येईल, असें सांगतां येणार नाहीं. ' महिन्याचें पुस्तक " म्हणून मि. स्टेड यांस निवडतां येतें. आमच्याकडे सहा सहामहिने वर्ष वर्ष लोटलें तरी एखादा ग्रंथ मननपूर्वक चर्चाविषय करण्याजोगा निपजण्याची मारामार. आतां येथून पुढें काय स्थिति सुधारेल ती सुधारो. पण आजवरचा अनुभव असा आहे. तथापि वाचून पुस्तकाचा सारांश व त्याचें परीक्षण मुख्यत्वेंकरून गुणाविष्करण करण्यास मराठी व इंग्रजी पुष्कळ ग्रंथसंचय आहे. हें काम एकाचें नव्हे. एकानें करूं म्हटल्यास होणार नाहीं. साध्य झालें तरी इष्ट नाहीं. केव्हां केव्हां 'नाइन्टीन्थ सेंचरी' नामक मासिक पुस्तकांत ' वाचनीय पुस्तकें' अशा सदराखालीं लेख येतात. ते अनेक गुणज्ञ, मार्मिक, प्रसिद्ध विद्वानांच्या लेखणींतून उतरलेले असतात. एखादा सर्वमान्य अगर सर्वांच्या वाचनांत येऊन गेलेला ग्रंथ असला तर त्यावर अनेक अभिप्राय येतात. अशा प्रकारें सामान्य जनसमूहाच्या वाचनाच्या प्रवृत्तीस व अभिरुचीस चांगलें वळण लावण्याचें काम मासिक पुस्तकाच्या द्वारें होतें. ग्रंथकर्त्यांस थोडेंबहुत उत्तेजन अगर उपदेशही मिळण्याचा संभव आहे. हा भाग ग्रंथमालेंतील इतर भागांप्रमाणें विविध लेखकांनीं लिहिण्याचा आहे. परंतु यांत व इतर भागांत अंतर इतकेंच कीं, त्या भागांतील विषय प्रचलित असल्याकारणानें प्रसंगविशेषीं लेखक पक्षांध होऊन जाण्याचा संभव आहे. त्यासाठीं लेखकाच्या म्हणण्याचा आशय किंवा जोरही कायम ठेवून सुविचारप्रसारास जेणेंकरून मदत होणार नाहीं असें वाटेल, तो भाग गाळून टाकण्यांत येईल. कित्येक वेळां संपादकाच्या टीपांच्या रूपानें दुसरी बाजू दाखविण्यांत येईल. राष्ट्राची जागृति होण्यास व ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एका सूत्रानें हालवावीं, तशाप्रमाणें सर्व लोकांचीं मनें हालून जाण्यास राष्ट्रीय वाङ्मयासारखें साधन नाहीं. त्यांत अमक्याच प्रकारचें वाङ्मय असलें पाहिजे असें नाहीं. शास्त्रीय, ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, औद्योगिक, प्रासादिक, नैतिक असें अनेक प्रकारचें वाङ्मय लोकांत पसरलें पाहिजे. शरीर जड आहे, मन चेतन आहे. मनास प्रेरणा झाली म्हणजे शरीर हलणार. शरीराच्या पोषणाच्या, रक्षणाच्या गोष्टी मनावर अवलंबून आहेत. मन हें मूळ आहे. त्याचें पोषण व अभिवृद्धि केली नाहीं, तर शरीर कृश होईल. ' शरीर अच्छा तो मन अच्छा ' असें इंग्रज म्हणतात. हें तरी समजावयाचें मनासच. म्हणून मनाकडे प्रथम लक्ष पुरविलें पाहिजे. असो. हा वाद तुटावयाचा नाहीं. मन आणि शरीर ह्या दोहोंची जरूरी आहे. या दोहोंसाठीं

पढविलें पाहिजे मनाला, यांत मात्र वाद नाहीं. म्हणून सर्व राष्ट्रें शिक्षणाच्या खटपटीस लागलेलीं आहेत. ह्या खटपटीपैकींच वाङ्मयवृद्धि ही एक होय. त्यांत कसकसे लोक उद्योग करीत आहेत, एका महिन्यांत कोणकोणचे विचार पुढें आले आहेत, त्यांत गुण दोष कोणते आहेत, याचा वाचकांस थोडक्यांत परिचय व्हावा म्हणून मुद्दाम "सारसंग्रह" देण्याचा आम्ही संकल्प केला आहे. हें कार्य एकट्याचें नव्हे. एका ठिकाणच्या लोकांचें नव्हे. निरनिराळ्या ठिकाणीं असणाऱ्या आमच्या वाचकांनीं आपल्या गांवीं झालेलीं व्याख्यानें, अर्थात् महत्वाचीं असल्यास, आमच्याकडे त्यांची खबर द्यावी. जमल्यास सारांशरूपानें तीं पाठवावीं. कोठें कांहीं नवीन पदार्थ, चमत्कारिक झाड, विलक्षण प्राणी इत्यादि पाहिलें तर त्याचें वर्णन वगैरे लिहून पाठवावें. हें कार्य सर्वांचें आहे म्हणून ग्रंथमालेच्या सर्व वाचकांस ही अत्यादरपूर्वक आग्रहाची प्रार्थना आज आम्हीं करून ठेवतों."

"ग्रंथमालेच्या या भागास पुढें मागें अधिक जागा द्यावी लागेल तरी त्याची फिकीर नाहीं. पृथक् पृथक् ठशांची योजना करून किंवा कांहीं पत्रें वाढवून ह्या भाग सर्वांगसुंदर करण्याचा आमचा इरादा आहे. इंग्रज लोकांप्रमाणें आम्ही ग्लोबट्रॉटिंग म्हणजे 'सर्व जग फिरणारे' नाहीं आहों. आमचें राज्य पृथ्वीवरील पंचमांशाहून अधिक भागावर नाहीं. तरी हिंदुस्तानच्या प्राचीन गुणांचें साम्राज्य सर्व पृथ्वीवर आहे, आणि त्यास अनुरूप वर्तन आज आम्हीं ठेवलें तर इंग्रजी छत्राखालीं आम्हांस कांहीं उणें पडणार नाहीं. आम्हींही जग फिरणारे होऊं व मि. स्टेड यांच्या 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज' सारखें निराळें मासिक पुस्तक काढावें लागेल. त्यांतील सर्व विषयांची आम्हांस गोडी लागण्यास आमचें कूपमंडूकी वर्तन व यादवी प्रवृत्ति सर्वथा निदान बहुंशीं नष्ट झाली पाहिजे. सर्व राष्ट्राचा उदय परदेशनिरीक्षणानेंच झाला आहे. संकुचित दृष्टीनें व आपल्याहून श्रेष्ठ कोणी नाहीं असें म्हणून झाला नाहीं. आपली पात्रता जाणून आपल्या विशिष्ट सद्गुणांचें योग्य अभिमानपूर्वक संरक्षण व दुसऱ्याच्या अनुकरणानें आपल्या न्यूनतांचें परिपूरण याशिवाय जगतीतलावरील कोणताच देश पुढें आला नाहीं व यापुढेंही येणार नाहीं. असो. हा एक वेगळा मनोहर विषय आहे. याचें येथें दिग्दर्शन करण्याचें कारण, मि. स्टेडच्या मासिक पुस्तकाच्या आंवाक्याची कल्पना करून देण्यास साहाय्य व्हावें इतकेंच आहे. त्यांच्या पुस्तकास विश्वादर्श हें नांव उत्तम साजेल, असें प्रस्तुत लेखकास वाटतें व तसें विश्वदर्शन महाराष्ट्रभाषेच्या द्वारा आपल्या

प्रिय वाचकांस होत आहे, असें पाहिल्याशिवाय त्याच्या नेत्रांचें पारणें फिटावयाचें नाहीं. लक्षावधि इंग्रजी पुस्तकांच्या भाषांतरानें हें कार्य सिद्ध होणार नाहीं. मि. स्टेडच्या पुस्तकास मराठी पेहराव दिल्यानें तर होणार नाहींच नाहीं. हें काम निराळेंच आहे, तितकी राष्ट्रांत पात्रताच आली पाहिजे. लोकांचे डोळे ज्ञानरवीच्या तेजानें चक्क उघडले पाहिजेत. तो काल पहाण्यास जगतील ते परमेश्वराच्या घरचे लाल खरे. आर्यभूमीच्या ललाटप्रदेशावरील सौभाग्यकुंकुमाचा मळवट ज्यांच्या दृष्टीस पडेल त्यांचें सुदैव काय वर्णावें ? परंतु त्या कालाच्या भव्य इमारतीच्या पायाचे दगड बसविण्याचें तर नव्हेच, पण उगीच कपऱ्या टाकून भर घालण्याचें कामही ज्यांच्या हातून आज होईल, त्यांनासुद्धां कांहीं समाधान वाटलेंच पाहिजे."

वरील उताऱ्यावरून विजापूरकरांनीं ग्रंथमालेपुढें केवढें उच्च व व्यापक ध्येय ठेविलें होतें हें दिसून येईल. हें ध्येय त्यांनीं केवळ कल्पनेच्या साम्राज्यांतच ठेविलें नाहीं तर तें प्रत्यक्षांत आणण्याचेही क्रमशः खटाटोप केले हें 'माले'चे पुढील सहा वर्षांचे अंक वाचल्यास कळून येईल. केवळ पुस्तकप्रकाशन हें त्यांचें ध्येय नव्हतें. महाराष्ट्रांतील लोक जगांतील नानाविध घडामोडींकडे पाहून स्वतंत्रपणें विचार करण्यास शिकावे ही त्यांची आत्यंतिक इच्छा. पाश्चात्य वाङ्मया-प्रमाणेंच आपलेंही वाङ्मय वृद्धिंगत होऊन श्रेष्ठत्व पावावें ही तर आकांक्षा होतीच पण त्याप्रमाणेंच लोकमत जागृत व्हावें, तें सुशिक्षित व्हावें, सुसंस्कृत व्हावें ही त्याहूनही बलवत्तर अशी इच्छा होती. आठव्या वर्षाच्या सालअखेरच्या सदरांत ते म्हणतात, "**कोणत्याही राष्ट्राचा उत्कर्ष व्हावयाचा असल्यास त्या राष्ट्रांत विद्याव्यासंगी व विचारशील लोकांची संख्या अधिक झाली पाहिजे. देशाची भरभराट अशा लोकांवरच अवलंबून असते. राष्ट्रीय महत्वाच्या गोष्टींनीं ज्यांचें मस्तक भरलेलें असतें किंवा निदान त्या गोष्टीकडे ज्यांचें वारंवार लक्ष वेधतें अशा लोकां-साठीं गंभीर वाङ्मय मराठी भाषेंत वाढावें या दृष्टीनें आमचा प्रयत्न आहे. त्याची पूर्तता होण्यास अजून पुष्कळ अवधि आहे हें आम्हीं जाणून आहों. पण आमची दिशा ही खरी व तिकडे आमचे डोळे लागले आहेत.**" अशा तऱ्हेचें वाङ्मय तयार होण्यास व्यासंगी लेखकांच्या साहाय्याची जरूरी होती. हें साहाय्य मिळविण्यासाठीं त्यांनीं सारख्या धडपडी चालविल्या होत्या. तत्कालीं व्यासंगी वर्ग अर्थातच पदवीधरां-

त्व सांपडावयाचा. परंतु या पदवीधरांना इंग्रजींत लिहिण्याची आणि बोलण्याची हौस फार. मराठींत लिहिणें किंवा बोलणें त्यांना कमीपणाचें वाटे. इंग्रजी लुसलुशीत लिहितां यावें म्हणून जीवाचा कोण आटापिटा! अशा परिस्थितींत पदवीधरांकडून लेखनसाहाय्य मिळणें हें गोठलेल्या बर्फानें तहानेनें व्याकुल झालेल्या मनुष्याची तृप्ति करण्याइतकेंच शक्य होतें; पण या बर्फाला तळमळीची आंच लावून त्यांतून सुंदर जलप्रवाह आपण वाहावयाला लावूं असा विजापुरकरांना आत्मविश्वास वाटत होता. जो जो पदवीधर भेटेल त्याला त्याला ते हात जोडून विचारीत कीं, बाबारे, तूं सुविद्य झालास, ज्ञानी झालास, पण या संपादन केलेल्या विद्येचा, या ज्ञानाचा तूं काय उपयोग करीत आहेस? तुझी मायबोली बोलण्याऱ्या तुझ्या इतर बांधवांस तूं संपादिलेल्या या विद्येचा, मिळविलेल्या ज्ञानाचा कांहीं लाभ करून देत आहेस का? तुझ्याप्रमाणेंच त्यांचींही मनें सुसंस्कृत करण्यासाठीं तूं कांहींतरी करीत आहेस का? करीत नसशील तर तसें करणें हें तुझें कर्तव्य आहे. तुझ्यावर तुझ्या बांधवांचा यासंबंधींचा हक्क आहे. या कामांत कसूर करणें म्हणजे कृतघ्नपणा प्रकट करणें होय. सालोसाल पदवीधरांकडे एकच मागणें ते पदर पसरून मागत आणि तें म्हणजे नियमित वाचनाचें व लेखनाचें होय. "राष्ट्राच्या उत्कर्षकार्यास साहाय्य करावयाचें आहे तें सुशिक्षितांशिवाय कोणी करावें हेंच समजत नाहीं. आपल्या शिक्षणांत जीं व्यंगें दृष्टोत्पत्तीस आलीं असतील तीं काढून टाकून पुढील पिढी जोमदार निष्पन्न होईल अशी तजवीज करण्याचें काम कोणाचें? ज्यांना समजतें त्यांनींच लोकमत जागृत करून तदनुरूप कृति घडवून आणण्यासाठीं झटलें पाहिजे. हें सोडून देऊन '**क्षुद्राः सन्ति सहस्रशः स्वभरणव्यापारमात्रोद्यताः**' या भर्तृहरीच्या निंदोक्तीस पात्र व्हावें, याहून लाजिरवाणें दुसरें कांहीं नाहीं," असें त्यांचें स्पष्ट म्हणणें असे. स्वतःची भर करण्यांतच सर्वस्वीं दंग झालेल्या हजारों लोकांपैकीं तुम्हीं एक होऊं नका, तर कांहींतरी—स्वतःचें पोट संभाळून—स्वभाषोन्नतीचा, स्वदेशोन्नतीचा उद्योग करा असें त्यांचें सांगणें असे. या उद्योगाप्रीत्यर्थ त्यांनीं अनेक पदवीधरांचीं दारें सारखीं ठोठावलीं व नाइलाज किंवा भीड मोडवत नाहीं म्हणून कां होईना, त्यांना त्यांचीं दारें उघडायला लावून आपले विचार ऐकावयाला लावले व आपण निर्माण केलेल्या नव्या उद्योगक्षेत्रांत त्यांना त्यांनीं ओढलें. पहिल्यानें भिडेखातर दार उघडून वाङ्मयाच्या क्षेत्रांत पाऊल टाकलेल्या पदवीधरांतूनच आजचे कित्येक प्रौढ नामांकित लेखक निर्माण झालेले

आहेत. त्यांच्या हातून झालेल्या व होणाऱ्या महत्त्वाच्या वाङ्मयसेवेचें बरेंचसें श्रेय संपादक विजापूरकरांना व त्यांच्या ग्रंथमालेलाच द्यावें लागेल.

ग्रंथमाला विजापूरकरांनीं सतत बारा वर्षें चालविली व तींतून इतिहास, थोर पुरुषांचीं चरित्रें, प्रसिद्ध वक्त्यांचीं भाषणें, अनेक धर्मांतील व अनेक देशांतील सत्पुरुषांचीं वाक्यें, भाषाशास्त्रीय टीपा, प्राचीन कालविषयक शोध, राजनीति, तत्त्वशास्त्र, अर्थशास्त्र, पदार्थविज्ञानादि सृष्टिशास्त्रें, कृषिशास्त्र, वैद्यक, पशुवैद्यक, या व इतर विषयांवर लोकोपयोगी व सामान्य माणसास समजण्याजोगे ग्रंथ व निबंध विद्वान् पदवीधरांकडून भाषांतरित करवून किंवा स्वतंत्रपणें लिहून घेऊन प्रसिद्ध केले. कै. वि. का. राजवाड्यांनीं अत्यंत कष्ट सोसून जमा केलेलीं व संशोधिलेलीं ऐतिहासिक पत्रें प्रसिद्ध करून व त्यांविषयीं चर्चा करणाऱ्या विस्तृत व महत्त्वाच्या प्रस्तावना लिहवून घेऊन, महाराष्ट्रीयांत संशोधनाची व संशोधनात्मक वाङ्मयाची आवड त्यांनीं उत्पन्न केली. कै. राजवाड्यांच्या परिश्रमांचें महत्त्व ओळखून त्यांना हाताशीं धरून काम करून घेणारी पहिली व्यक्ति विजापूरकर हीच होय.

मालेची आर्थिक परिस्थिति केव्हांही समाधानकारक नव्हती. वर्गणीदारांची संख्या पांचशें–साडेपांचशेंच्या वर कधीं गेली नाहीं. पहिलीं सात वर्षें कोल्हापूर दरबाराकडून सालीना पांचशें रुपयांची मदत मिळत असे; परंतु वेदोक्तप्रकरणीं विजापूरकरांकडून सडेतोड टीका झाल्यामुळें महाराजांची मर्जी खप्पा झाली व मदतीचा ओघ थांबला. मालेवरील ही एक मोठी आपत्तीच होती. विजापूरकरांनीं, अशी अवकृपा न करण्याबद्दल महाराजांस नाना तऱ्हांनीं विनवून पाहिलें व ता. २५ जून १९०१ रोजीं एक तासभर सर्व हकिकत निवेदन करून त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. 'फेर विचार लवकरच करूं' असें महाराजांनीं आश्वासन दिलें, पण तें कृतींत कधींही उतरलें नाहीं. महाराजांच्या या अवकृपेमुळें विजापूरकरांनीं आपला धीर मुळींच खचूं दिला नाहीं; उलट मालेचें काम दुप्पट उत्साहानें चालविलें; इतकेंच नव्हे तर मालेच्या जोडीला प्रत्येक विषयावर स्वतंत्र विचार प्रदर्शित करणारें 'विश्ववृत्त' नांवाचें एक मासिक प्रसिद्ध साहित्यसेवक प्रो. वामन मल्हार जोशी यांच्या सहकारितेनें १९०६ च्या एप्रिलांत सुरू केलें.*

* 'आक्रोश' नांवाचें एक नवें साप्ताहिक काढण्याचे व इंग्रजी ज्ञानकोशाचें मराठींत भाषांतर करून तें खंडशः प्रसिद्ध करण्याचे विचार त्यांचे डोक्यांत या वेळीं घोळत होते. पण पुढें ते विचार वाढत्या व्यापांमुळें तसेच राहिले.

## संपादक विजापूरकर

या मासिकाच्या पहिल्या अंकांतील पहिला लेख लो. टिळक यांच्या लेखणींतून उतरलेला, ‘आशेची निराशा आणि निराशेची आशा’ असा मथळा असलेला, प्रसिद्ध करण्यांत आला होता. हें मासिक २॥ वर्षें चाललें. १९०९ च्या जानेवारींत संपादकद्वयावर रा. सातवळेकर यांचा **‘वैदिक प्रार्थनांची तेजस्विता’** हा लेख प्रसिद्ध केल्यामुळें कोल्हापूर दरबारकडून खटला भरण्यांत आला व त्यांस तीन वर्षांची सजा ठोठावण्यांत आली. संपादकद्वयाच्या तुरुंगवासामुळें मासिक बंद पडलें. हें मासिक सुरू करण्यांत सुशिक्षित महाराष्ट्रीयांत विविध विषयांची अभ्यासपूर्वक चर्चा करण्याकडे प्रवृत्ती वळवावी असा हेतु होता. इंग्रजींतील ‘रिव्ह्यूज’ च्या धर्तीवर सदर मासिक चालविलें जात असे. यांत अनेक विषयांवर महाराष्ट्रांतील अनेक विद्वानांचे लेख येत असत. देशांतील महत्वाच्या घडामोडींवर सूक्ष्म व गंभीर चर्चा करणारें मासिक ‘विश्ववृत्ता’नंतर मराठींत एकही निघालें नाहीं.

‘ग्रंथमाले’ बरोबरच ‘समर्थ’ नांवाचा छापखाना उभारून **‘समर्थ’** नांवाचें प्रचलित विषयांच्या चर्चेला वाहिलेलें एक इंग्रजी–मराठी साप्ताहिक त्यांनीं १८९८ मध्यें सुरू केलें होतें. हें साप्ताहिक दहा वर्षें चाललें. यांतील दरबारच्या राजकारणावरील सडेतोड व निर्भीड टीकांमुळें कोल्हापूरचे संस्थानांत तें अत्यंत लोकप्रिय झालें होतें. कोल्हापूरचे तत्कालीन महाराज कै. शाहु छत्रपति यांचा त्याच्यावर विशेष दांत असे. ते त्याला ‘कोल्हापुरांतील भटांचें मुखपत्र’ असें समजत. वेदोक्तप्रकरणीं त्यानें चालविलेल्या अटीतटीच्या मोहिमेमुळें तर ही त्यांची समजूत दृढमूल होऊन, तें त्यांच्या डोळ्यांत चांगलेंच—वेदना होईपर्यंत—सलूं लागलें. कोल्हापूर सरकारचे सध्यांचे दिवाण रा. ब. लठ्ठे यांनीं लिहिलेल्या कै. शाहूमहाराजांच्या चरित्रांत या पत्राबद्दल जे जागोजाग कुत्सित असे उद्गार काढले आहेत त्यावरून तर स्पष्टपणें असें वाटतें कीं, ‘समर्थ’ पत्र हें ‘आपण आंखलेल्या व आंखीत असलेल्या मार्गांतील एक तापदायक ब्राह्मणी कांटा आहे’ असें महाराजांना वाटूं लागलें होतें खास. १९०९ सालीं, संस्थानाच्या वृत्तपत्रांच्या कायद्याखालीं समर्थ पत्र बंद करण्यांत आलें. कोल्हापूर दरबारच्या मार्गांतील ब्राह्मणी कांटा नाहींसा झाला. कोल्हापूर दरबारला त्यामुळें हायसें वाटलें.

## ३ वेदोक्ताची वावटळ

विजापूरकरांच्या आयुष्यांत अनपेक्षित अशीं स्थित्यंतरें घडवून आणण्याला जे कांहीं प्रसंग कारण झाले त्यांपैकीं १९०१ सालच्या सुमारास उद्भूत झालेलें कोल्हापूरचें वेदोक्त प्रकरण हें होय. हें प्रकरण चांगलीं पांच सहा वर्षें धुमसत होतें. बाब अगदीं क्षुल्लक. मराठे हे क्षत्रिय आहेत व त्यांना ब्राह्मणांप्रमाणेंच वेदोक्ताचा अधिकार आहे. या अधिकाराप्रमाणें क्षत्रियांच्या घरचे सर्व विधी—आजपर्यंत पुराणोक्त पद्धतीनें होत—वेदोक्त पद्धतीनें झाले पाहिजेत असा आग्रह कोल्हापूरचे महाराज कै. शाहुछत्रपति व त्यांचे इतर अनुयायी यांनीं पुरोहित वर्गापाशीं सुरू केला. या आग्रहाला हट्टाचें स्वरूप आलें नसतें तर या प्रकरणाचें जें भीषण व गर्हणीय अशा शेवटांत पर्यवसान झालें तें झालें नसतें. कोल्हापुरांतील सुशिक्षित ब्रह्मवृंद महाराजांचें किंवा त्यांच्या अनुयायांचें क्षत्रियत्व नाकबूल करीत नव्हता. त्यांचें म्हणणें एवढेंच होतें कीं, कांहीं कारणामुळें का असेना, जी पद्धती बंद पडली ती पुनः सुरू करावयाची झाल्यास शंकराचार्यांसारख्या अधिकारी माणसांशीं किंवा काशीसारख्या धर्मविद्येच्या माहेरघरीं वास करणाऱ्या शास्त्री पंडितांशीं तद्विषयीं खल करून अनुज्ञा घ्यावी. ब्रह्मवृंदांचें हें म्हणणें रास्त होतें. पण तें रास्त आहे कीं चुकीचें आहे याचा विचार करण्याएवढी महाराजांची

स्थिति राहिली नव्हती. त्यांच्या सभोवतीं जमा झालेल्या मतलबी लोकांनीं ब्राह्मणांविरुद्ध त्यांचें मन अत्यंत कलुषित करून ठेविलें होतें. 'ब्राह्मणांना तुमची चांगली स्थिती पाहवत नाहीं. तुमच्या आधींच्या दोन पुरुषांची जी अनुकंपनीय स्थिती होती तशीच स्थिती तुमचीही करण्याचा त्यांचा विचार आहे; दरबारांतील आपलें वर्चस्व कायम ठेवून तुम्हांला व तुमच्या ज्ञातिबांधवांना यांना नीच स्थितींत ठेवावयाचें आहे' अशा व अशातऱ्हेच्या द्वेषोत्पादक विचारांची संथा महाराजांना हरघडी पढवली जावूं लागली. शाहूमहाराजांची मूळचीच फाजील महत्त्वाकांक्षी व अहंकारी वृत्ती आणि त्यांत या दैनिक संथेची भर, मग प्रकरण बेताल व्हावें यांत आश्चर्य तें कोणतें? महाराजांनीं आपल्या हातांतील सत्तेचा सोटा पुढें सरसावला. वेदोक्त पद्धतीला कबूल नसलेल्या पुरोहितांचीं परंपरागत वतनें भराभर जप्त करण्यास सुरुवात झाली. राजोपाध्यायांपासून तों देवळांतील गरीब भिक्षुकांपर्यंत सर्वांच्या डोक्यावर या सोट्याचे प्रहार सुरू झाले. या सोटे-शाहीनें ब्राह्मण पुरोहित वर्ग भिऊन जाऊन, आपल्या म्हणण्याला कबुली देईल अशी महाराजांना खात्री वाटत होती. पण ही खात्री सपशेल चुकीची ठरली. कोल्हा-पुरांतील ब्रह्मवृंदानें या प्रकरणीं अपूर्व धैर्य दाखविलें. जमिनी गेल्यातरी बेहत्तर, परंतु आपल्याला जें तत्त्व पटत नाहीं किंवा पटवून दिलें जात नाहीं तें कालत्रयीं मान्य करावयाचें नाहीं, असा त्यांनीं निर्धार केला. या निर्धारानें त्यांनीं हा लढा अखेरपर्यंत लढविला. राजोपाध्ये कीं ज्यांचें हजारों रुपयांचें वार्षिक उत्पन्न, पण तेसुद्धां महाराजांच्या सोट्याला भ्याले नाहींत. परंपरागत वतन जप्त होऊं दिलें पण त्यांनीं तत्त्व सोडलें नाहीं. कोल्हापुरांतील ब्राह्मणांची ही आग्रही वृत्ती तीव्र करावयाला विजापूरकरच कारण झाले अशी महाराजांची समजूत होती व ती बव्हंशीं खरीही होती. या वादापासून पहिल्या पहिल्यानें शक्य तों दूर राहण्याची वृत्ती विजापूरकरांनीं स्वीकारिली होती. परंतु या चळवळीच्या मुळाशीं तत्त्वसंशो-धनाच्या हेतूऐवजीं कांहीं राजकीय हेतू आहेत असें त्यांस आढळून येतांच त्यांनीं या वादांत उडी घेतली. आपल्या अभिप्रायाप्रमाणें कांहीं लोक वागावयाला तयार नाहींत म्हणून, दैवयोगानें हातीं आलेल्या सत्तेचा उपयोग, त्यांचे हक्क हिरावून घेऊन त्यांना देशोधडीस लावण्याकडे करावयाचा हा त्यांना शुद्ध अन्याय वाटला. हा अन्याय वेशीवर मांडल्याशिवाय गत्यंतरच नाहीं असें दिसून येतांच त्यांनीं पुरोहित वर्गाच्या बाजूनें आपली लेखणी सरसावली.

या वेदोक्त प्रकरणांत त्यांनीं स्वीकारलेली वृत्ती कोणत्या तऱ्हेची होती हें त्यांनीं 'सारसंग्रहांत' प्रदर्शित केलेल्या खालील विचारांवरून कळून येईल.

"वेदोक्त पुराणोक्ताचा वाद आम्हांस तर वृथा वाटतो. कालच जें कार्य करीत आहे, त्याबद्दल इतका अट्टाहास कशास? आमच्या नगरींत पूर्वी वेदोक्त कर्मे होत होतीं. पुढें श्री. बाबासाहेब महाराजांचे वेळीं बंद करून गायत्रीचे ऐवजीं तदर्थक अनुष्टुप् श्लोकांचा उपदेश सुरू झाला, अशी वृद्धपरंपरागत हकीगत आहे. शककर्ते शिवाजीमहाराजांस ज्यांनीं रायगडीं राज्याभिषेक केला व 'क्षत्रियकुलावतंस' म्हटलें त्याचें निधन शौचकूपांत पतन पावून झालें अशी दंतकथा आहे. एकंदरींत काय बीज असेल तें असो. 'परमेश्वरो वै वेत्ति.' मूळ अस्सल क्षत्रिय कुळी असेल, परंतु सहवास व शरीरसंबंधाचा परिणाम देवास आवडला नसेल, परंतु **सांप्रत-काळीं म्हणज छापखाना व शाळा व पाठशाला यांच्या काळीं वेद वाचण्याचा मला अधिकार आहे व तुला नाहीं हें म्हणणें म्हणजे म्हातारीच्या कोंबडें दडविण्याच्या प्रकारापैकीं आहे. युरोपखंडांत हल्लीं खंडोगणती ऋषि बनले आहेत, मग आमच्या सुभानजी, ताना-जींनीं वेद वाचला व पाठ केला व आपल्या घरीं यज्ञ केला म्हणून आम्हीं अस्सल ब्राह्मणांनीं त्यांस नांवें कां ठेवावीं?** विचार जो करा-वयाचा, तो एतद्देशीय संस्थानांतील पुरातन वृत्ति धारण करणाऱ्या ब्राह्मणांचा. वृत्तिच्छेद पतकरावा कीं पुराण प्रवृत्तिच्छेद पतकरावा? म्हणजे आपलें वतन किंवा वेतन यावर पाणी सोडण्यास तयार व्हावें, कीं परंपरागत चाललेली रीति सोडावी? हा प्रश्न महत्वाचा आहे. दीर्घ कालापासून चालत आलेले, आपल्या प्रजेपैकीं कांहीं लोकांचे हक्क आपल्या अभिप्रायाप्रमाणें ते वागण्यास तयार नसल्यामुळें, काढून घेण्यास तयार होणाऱ्या राजास कोणी शहाणा म्हणणार नाहीं. परंतु जोंपर्यंत तो कर्तुमकर्तुमन्यथा कर्तुं समर्थ असेल म्हणजे त्याच्या स्वैर भासणाऱ्या वर्तनास प्रतिरोध करण्याचें सामर्थ्य हक्कदारांस नसेल, तोंपर्यंत इतर निरुपायाच्या गोष्टींप्रमाणें वृत्तिच्छेदापेक्षां स्वमताभिमान श्रेष्ठ असेल, तर उपजीविकेसाटीं अन्य साधनांचा इलाज पहावा. याशिवाय गत्यंतर नाहीं. राजाधिकाराच्या बलावर अमलांत आणलेल्या सुधारणेचा परिणाम इष्ट होतो कीं अनिष्ट होतो हें ठरविण्याचें काम पुढील पिढीचें आहे. राजानें सद्बुद्धिप्रेरित होऊन सुजाण व सुविचारी लोकांचा सल्ला घेऊन जर असें आचरण केलें, तर त्याची

मनोदेवताही त्यास शापणार नाहीं. **परंतु या सर्व सुधारणांचा राष्ट्रीय उन्नतीशीं संबंध जुळवून आज आपल्या लोकांत अगोदरच असलेला द्वैधीभाव वृद्धिंगत करणें हें अविचाराचें काम आहे.** एकच गोष्ट दोन प्रकारांनीं सांगतां येते. सौम्यपणानें सांगितल्यास तिचा परिणाम चांगला होईल असा आमचा भरवंसा आहे. आमच्या समाजांतील लोक कविवर भवभूति याचा **सूनृता वाणीचा** उपयोग करावा म्हणून केलेला उपदेश विसरून गेले आहेत. आज तीस चाळीस वर्षें एका विद्वद्वर्यांखेरीज या सूनृतावाणीचा उपयोग कोणी केला आहे असें आम्हांस दिसत नाहीं. ज्यानें त्यानें **राक्षसी वाणीचा** उपयोग करून दुही माजवावी असा प्रकार आहे. **जातिभेदानें आम्हीं बुडालों नाहीं, सूनृता वाणीच्या अभावानें आम्हीं बुडत आहों.**"

लो. टिळकांनींही आपल्या केसरी पत्रांतून या प्रकरणीं शाहुमहाराज व त्यांचे हस्तक यांवर जोरानें कोरडे ओढण्यास सुरवात केली.

वेदोक्ताची चळवळ ज्यांनीं सुरू केली त्यांनीं आंखलेले मार्ग व वेळोवेळीं प्रदर्शित केलेले विचार पाहिले म्हणजे या चळवळ्यांपुढें ब्राह्मणांचें वर्चस्व नाहींसें करून त्यांचा संधी सांपडेल तेव्हां तेजोभंग करावयाचा यापलीकडे कोणतेंही उच्च ध्येय होतें, असें वाटत नाहीं. रा. ब. लट्ठे यांनीं शाहु छत्रपतीच्या लिहिलेल्या चरित्रांत, ही चळवळ सुरू करण्यांत महाराजांचा व त्यांच्या अनुयायांचा हेतु समाजांतील विषमता नाहींशी करून समता प्रस्थापित करण्याचा होता, असें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु या चळवळीचा इतिहास जो शांतपणें अभ्यासील त्याला हें स्पष्टपणें दिसून येईल कीं 'या चळवळीनें विषमतेचें उच्चाटन तर केलें नाहींच उलट ती अधिक दृढ केली.' प्रसिद्ध इतिहाससंशोधक व समाजशास्त्रज्ञ कै. वि. का. राजवाडे यांनीं 'विश्ववृत्त' मासिकांत या चळवळीसंबंधीं काढलेले पुढील उद्गार लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. ते म्हणतात:—
" ह्या अनियमित चळवळीचा परिणाम पुढील दहा पांच वर्षांत करवीर इलाख्याबाहेरील महाराष्ट्रांत काय होईल ह्याचें चित्र काढणें मोठेंसें प्रयासाचें नाहीं. ह्या चळवळीकडे जर कानाडोळा केला व हिला वेळींच जर हटविली नाहीं, तर शिष्यपक्ष गुरुपक्ष असे दोन तट देशभर निष्कारण पडतील. **वेदोक्त कर्माची विशेष आस्था नसतां, तें करण्याचा आव घालणाऱ्या क्षत्रियांचा**

**एक पक्ष होईल, व क्षत्रियांच्या वेदोक्तभक्तीनें वजन व द्रव्यलाभ वाढण्याचा संभव असतां, तो विसरून वेदोक्तविरोधी ब्राह्मणांचा दुसरा पक्ष होईल.** ब्राह्मणांना हाणून पाडणें, हेंच ज्यांचें ब्रीद असा बेजबाबदार व अव्यवस्थाप्रिय जो सुधारकांचा एक वर्ग आहे तो नाचूं लागेल व त्यांना किरिस्तावांचें व किरिस्तांवतुल्य हिंदूंचें पाठबळ मिळेल. **मिळून सर्वत्र सामाजिक बेबंदशाही माजेल व जीं नवीन राष्ट्रकार्यें आपण आरंभिलेलीं आहेत किंवा आरंभूं इच्छित आहों त्यांची अंगेजणी एकजुटीनें करणें दुरापास्त होईल.** सारांश, कोल्हापुरांत जो प्रकार आज दृष्ट्युत्पत्तीस येत आहे तोच पुढें मागें सर्व महाराष्ट्रांत येईल."

के. राजवाड्यांनीं वर्तविलेलें भविष्य आज तंतोतंत खरें ठरलेलें आहे. सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्ष व त्यांविरुद्ध झगडणारा अभिमानी ब्राह्मणपक्ष यांच्या चळवळींच्यायोगें महाराष्ट्रांतील वातावरण कसें दूषित झालें आहे व त्यामुळें राष्ट्रीय प्रगतीला तें कसें मारक झालें आहे, तें आज आम्ही पहातच आहोंत.

विजापूरकरांचें म्हणणें कीं, बदलत्या कालानुसार जे धर्मविधी खुद्द सुशिक्षित ब्राह्मणसमाजांतच निर्माल्यतुल्य समजले जाऊं लागले आहेत, तेच धर्मविधी किंवा वेदमंत्रप्रयोग सुरू करण्यांत व अर्थ न समजतां त्यांच्या कवायती करण्यांत कालाचा व वित्ताचा वृथा विनियोग करण्यासारखें आहे. जें वेदोक्त कर्मपद्धतीचें जड जूं सुशिक्षित ब्राह्मण मंडळी आपल्या मानेवरून झुगारून देऊं पहात आहे, तेंच जूं आपल्यावर लादून घेण्यांत मराठे मंडळी कोणता पुरुषार्थ साधणार ? "वेदोक्त कर्में केल्यानें आपणांत पवित्रता अधिक येते व आपण श्रेष्ठ होतों असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं आपआपल्या घरीं वेदोक्त कर्में खुशाल सुरू करावीं. इतर शिक्षण चाललें आहे, असेंच चालल्यास त्यांना हें सर्व प्राचीन कालचें अवजड चिलखत टाकून द्यावें असें वाटल्यावांचून राहणार नाहीं. आजच तीं कर्में करितां करितां उपाध्यायास 'आटपा, किती वेळ लावतां' असें म्हणण्याची पाळी येईल अशी आम्हांस खात्री आहे. ज्यास अर्थ समजतो, त्याचें त्यांत लक्ष कांहीं दिवस लागेल. परंतु इतरांस त्याचा अव्वलपासून कंटाळाच येईल, **ब्राह्मणांत पिढ्यानपिढ्या जो तरतरीतपणा आला आहे, तो कर्मांमुळें नव्हे तर त्यांच्या अध्ययनामुळें आला आहे.** तो विद्या शिकण्याचा अधि-

कार व विद्या शिकविण्याचाही अधिकार हल्लीं सर्वांस सारखाच मिळाला आहे. त्या दृष्टीनें आपल्या जातीचा उत्कर्ष करण्यासाठीं ज्या ज्या संस्था आमचे मराठे बांधव उभारतील त्यांचें आम्हीं अभिनंदनच करतों. यासाठीं व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगसारख्या संस्थेबद्दल आम्हीं त्यांची तारीफ करतों. **मराठे लोकांनीं ब्राह्मणांप्रमाणें किंवा त्याहून अधिक तयार व्हावें यासाठीं होतील तितके परिश्रम केल्यास त्यात राष्ट्राचें हितच आहे. परंतु ब्राह्मण मंडळीचा देवभोळेपणा घेऊन त्यांतही त्यांच्यावर कडी करण्याची हाव धरण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची कींव केल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं.** दहाव्या किंवा अकराव्या वर्षी बोर्डिंगांत विद्यार्थी आणून त्यास तेथें २२ व्या वर्षांपर्यंत ठेऊन घेऊन त्याचा विद्याभ्यास पूर्ण केला तर मौजीबंधन व समावर्तन म्हणजे मुंज व सोडमुंज चार दिवसांच्या अवधींत करणाऱ्या ब्राह्मण मंडळीवर त्यांनीं खरोखर ताण केली असेंच होईल."

किती समतोल व समंजस विचारसरणी ही! परंतु बुद्धिव्यामोह उत्पन्न झालेल्या लोकांना त्याचें काय होय. असले विचार विजापूरकर ज्यांच्यापुढें मांडीत होते त्यांची वृत्ती पाहिली म्हणजे त्यांचें मांडणें 'डुकरांपुढें मोत्यांचे दाणे फेंकण्यासारखें' होत होतें. महाराजांसभोंवतीं असलेली रा. भास्करराव जाधव, इंजिनिअर विचारे, रा. सी. सावंत किंवा बाळासाहेब गायकवाड यांसारखी सुशिक्षित पदवीधर मंडळी तरी 'ब्राह्मण करतात त्या वेदोक्तांत देवभोळेपणा व निरर्थक कवाइत किती आहे हें जाणून,' वेदोक्त श्रावणी वगैरे करण्याच्या खोट्या नादापासून महाराजांस परावृत्त करतील अशी विजापूरकरांस फार आशा वाटत असे. परंतु ही आशा केवळ आशाच ठरली. या मंडळीनें महाराजांस चळवळीपासून परावृत्त तर केलें नाहींच, उलट, त्यांनीं ब्राह्मणांच्या व त्यांच्या पुढाऱ्यांच्याविरुद्ध त्यांस अधिकाधिक चेतविलें. विजापूरकरांसारख्या निःपक्षपाती वृत्तीच्या माणसाचा उपदेश महाराजांस विषासारखा वाटूं लागला. शेवटीं विजापूरकरांनीं ज्याच्यापुढें सर्व पक्षांना कागदपत्र किंवा इतर प्रमाणसिद्ध पुराव्यासह आपापलें म्हणणें मांडतां येईल असें न्यायाधीशमंडळ (Tribunal) नेमून या गोष्टीचा निकाल लावावा, अशीही विनंति केली. या न्यायाधीशमंडळांत पुढीलप्रमाणें सभासद असावे अशी त्यांची सूचना होती. 'दोन श्रुतिस्मृतिपुराणज्ञ शास्त्री, डॉ. भांडारकर, प्रो. काथवटे, प्रो. पाठक,

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

प्रो. वै. का. राजवाडे, रा. ब. बाबासाहेब पेंडशे, रा. ब. का. बा. मराठे, रा. सा. ग. ज. आगाशे, प्रो. आर्ते, प्रो. भडकमकर, अशा तिऱ्हाईत संस्कृतज्ञ मंडळीपैकीं दोन; दोन युरोपीयन ( संस्कृतज्ञ मिळाले तर ठीक ) मिळून सहा' या मंडळीनें दिलेला निर्णय श्रीजगद्गुरूंपुढें ठेवून त्यांचें आज्ञापत्र घ्यावें असा त्यांचा अभिप्राय होता. हा अभिप्रायही महाराजांकडून धुडकावून लावण्यांत आला.

विजापूरकरच कोल्हापुरांतील ब्राह्मणांना व राजोपाध्ये यांना खाजगीरीत्या व ग्रंथमाला व समर्थ यांच्याद्वारा उघडपणें बदसल्ला देऊन या प्रकरणीं चेतवीत आहेत असें महाराज म्हणत. वास्तविक स्थिति उलट होती. महाराजांची प्रभावळच महाराजांना बदसल्ला देऊन समंजसपणानें मिटूं शकणारें प्रकरण जास्ती चिघळवीत होती. परंतु सत्तेच्या वारुणीनें धुंद झालेल्या नृपदृष्टीला हें दिसावें कसें ? कल्याण चिंतणारे लोक आपलें अकल्याण चिंतीत आहेत व अकल्याणाचा मार्ग दाखविणारे लोक आपल्याला कल्याणाचा मार्ग दाखवीत आहेत असें त्यांस वाटूं लागतें. अशा परिस्थितींत 'वड्याचें तेल वांग्यावर' अशी स्थिति प्राप्त होते. विजापूरकरांच्या बाबतींत तेंच झालें. त्यांना अध्यापकाच्या जागेवरून दूर करण्यांत आलें. आम्हीं तत्त्वाकरितां भांडत आहों, व्यक्तीशीं आमचें भांडण नाहीं अशी शेखी मिरवणारे महाराज व त्यांचे सल्लागार शेवटीं व्यक्तीवरच घसरले. विजापूरकरांना राजाराम कॉलेजांतील अध्यापकाच्या जागेवरून दूर करण्याचें कारण निराळेंच दाखविण्यांत आलें होतें हें खरें. पण तें कारण इतकें पोरकट होतें कीं त्या कारणावर कोणाचाहि विश्वास बसणें शक्य नव्हतें. विजापूरकरांसारख्या सच्छील, पापभिरु, कर्तव्यनिष्ठ माणसाला नोकरीवरून दूर करणें ही साधी गोष्ट नव्हती. तसाच कांहीं तरी मोठा टपका त्यांच्यावर आणल्याशिवाय ती गोष्ट साध्य होणारी नव्हती. या बाबतींत दयाळु इंग्रज सरकार छत्रपतींच्या सहाय्यास योग्य वेळीं धांवून आलें. छत्रपतींची बहुत दिवसांनीं मनःकामना पूर्ण झाली.

या वेदोक्ताच्या वावटळीनें कोल्हापुरांत अनेक बरीं वाईट स्थित्यंतरें घडवून आणलींच पण खुद्द विजापूरकरांच्या आयुष्यालाहि तिनें नवी कलाटणी दिली.

---

[library stamp]

## ४ सेवेच्या शृंखळा तुटल्या.

" होती जागा गुरूची करविर नगरीं काढिलें ती वरूनी ।
राजानें ' बाळ चित्तें बिघडवि अजि हा ' दोष माथीं टिपूनी ॥ "

[ विजापूरकरांनीं स्वतःविषयीं
रचिलेल्या श्लोकावलींतून. ]

१९०५–६ साल हें हिंदुस्थानच्या राजकीय इतिहासांतील एक महत्वाचें साल होय. बंगालची फाळणी करण्याचा कायदा निश्चित केल्याचें सरकारनें या सालीं जाहीर केलें. या जाहीरनाम्यानें बंगाली लोकांत एकच हलकल्लोळ उडाला. या जाहीरनाम्याचा निषेध करण्याकरितां बंगाल्यांत व बंगाल्याबाहेर हजारों सभा भरल्या. ' बंगाल प्रांताची विभागणी करून बंगाली भाषा बोलणारें राष्ट्र जरासंधाप्रमाणें विभागून टाकल्याचें श्रेय बलभीम कर्झन घेण्यास उद्युक्त झाले आहेत. या बलभीम व्हाइसरायास सर्व हिंदुस्थानभर रावणाप्रमाणें एकटेंच अनियंत्रित नाचावयास पाहिजे आहे,' अशा तऱ्हेचे जळजळीत उद्गार वृत्तपत्रांतून निघूं लागले. स्वतःला मुत्सद्दी समजणाऱ्या शांत डोक्याच्या पुढाऱ्यांनीं अर्ज, मुलाखती यांद्वारा सरकारचें मन या निश्चयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं.

सरकार आपला हेका सोडीत नाहीं, हें पाहून बंगाली समाज खवळला. तो खवळला, इतकेंच नव्हे तर इतर प्रांतांना त्यानें खवळायाला लावलें. 'सरकारावर बहिष्कार घाला,' 'ब्रिटिश मालावर बहिष्कार घाला,' 'स्वदेशी आचरा,' सरकारची सेवा सोडून स्वदेशाची सेवा करा,' या वाक्यांच्या गर्जनेनें सबंध देश निनादून गेला. स्वदेशीचीं जोरानें आंदोलनें सुरू झालीं. महाराष्ट्रांत 'केसरी' ही 'आणिबाणीची वेळ' आहे; बहिष्काराचें व्रत स्वीकारून, सरकारला झोंबेल व त्याचा दर्प उतरेल असें कांहीं तरी करा; स्वस्थ बसूं नका; लोकमताची बिसतंतूप्रमाणें किंवा तृणाप्रमाणें सरकार आज उपेक्षा करीत आहे; परंतु या बिसतंतूंची किंवा तृणाची एकजूट झाली तर ती जूट मदोन्मत्त हत्तीलाही जागच्याजागीं जखडून टाकूं शकेल, हें तत्व लक्षांत ठेवा, अशी गर्जना करीत होता. या गर्जनेचे प्रतिध्वनि महाराष्ट्रांतील इतर राष्ट्रीय पत्रांतूनही निघूं लागले. विजापूरकरांची 'ग्रंथमाला' केवळ वाङ्मयप्रसाराला वाहिलेली पण त्यांतूनही 'स्वदेशी'वर जळजळीत लेख प्रसिद्ध होऊं लागले. "आजकाल प्रत्येक बाल, युवा व वृद्ध यानें या स्वदेशी चळवळीचा स्वदेशी मालापुरताच नव्हे तर प्रत्येक स्वदेशी गोष्टीचा ध्यास घेतला पाहिजे. स्वदेशी भूताचा अंगांत संचार झाला पाहिजे. राष्ट्रास असें वेड लागल्याशिवाय उत्कर्ष होत नसतो. या गोष्टींत अतिरेक होणें शक्य नाहीं. ज्ञानाची आवड, विद्येचा व्यासंग, तत्त्वचिंतेचा हव्यास, शास्त्रीय परिज्ञानाचा पाठलाग या गोष्टीस सर्व विश्व आपलें आहे. त्या संबंधांत स्वदेशी, परदेशी विचार कर्तव्य नाहीं. **स्वदेशी परदेशी हा सांग्रामिक विचार जेथें जेथें कायावाचामनेंकरून दुसरा आपलें नुकसान करण्यास प्रवृत्त झाला आहे असें दिसेल तेथें तेथें आदरून केला पाहिजे. आम्हांवर जुलूम करून किंवा आम्हांस भुरळ घालून आमच्या डोकीचें पागोटें लुबाडण्याची इच्छा ज्याची ज्याची दृष्टीस पडेल त्याचा त्याचा खरपूस समाचार घेण्याची आपण पराकाष्ठा केली नाहीं, तर देशकार्यास आपण अंतरलों असें समजलें पाहिजे.** यासाठीं उघड उघड आमच्या घातासाठीं नागव्या तरवारी हातांत घेऊन अगर पांढऱ्या स्वच्छ पोशाखाखालीं वाघनखें छपवून आम्हांस वेष्टिणाऱ्या लोकांमधून आम्हांस संचार करावा लागत आहे, असें मानलें पाहिजे. प्रत्येक परका माणूस म्हटला म्हणजे त्याविषयीं ही बुद्धि आलीच. प्रायः या देशांत वावरणारा व साक्षात् किंवा परंपरेनें या देशावर चरणारा परका माणूस अशा संशयबुद्धीच्या

निरीक्षणास पात्र आहे." अशा तऱ्हेचे विचार खुद्द विजापूरकर आपल्या संपादकीय लेखांतून प्रगट करूं लागले. 'सर्व प्रबुद्ध विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं आपल्या विद्यालयांस व महाविद्यालयांस एक वर्ष रजा देऊन केवळ स्वदेशी प्रसाराचे कामीं लागावें,' असा उपदेश ते करूं लागले. याचा परिणाम कोल्हापुरांतील बहुजन समाजावर तर झालाच, पण विजापूरकरांच्या विद्यार्थ्यांवर त्याहूनही अधिक झाला. स्वदेशी व्रताचें कडकडीत आचरण करणाऱ्या गुरूपुढें परदेशी कपड्यांत जाण्याची त्यांना लाज वाटूं लागली. गुरूच्या स्वदेशीव्रताचें अनुकरण विद्यार्थ्यांकडून भराभर केलें जाऊं लागलें. 'स्वदेशी कागद परीक्षेचे वेळीं दिले नाहींत तर आम्ही प्रश्नांचीं उत्तरें लिहिणार नाहीं, उठून निघून जाऊं,' इतका निर्धार होण्याइतकीं विद्यार्थ्यांचीं मनें तयार झालीं. हा निर्धार, वेळ आली तेव्हां त्यांनीं कृतींत उतरूनही दाखविला. राजाराम कॉलेजांतील व हायस्कुलांतील विद्यार्थी स्वदेशी कागदाची मागणी केली असतां तो पुरविला गेला नाहीं, म्हणून परीक्षेंतून उठून गेले. विद्यार्थ्यांनीं दाखविलेल्या या बाणेदारपणाचें लोकांनीं कौतुक केलें. या कौतुकाचा परिणाम कोल्हापूरचे महाराजांवर मात्र उलटा झाला. विजापूरकरांचें वजन प्रमाणाबाहेर वाढत आहे, असें त्यांस वाटलें. त्यांचा कोप अनावर झाला. या कोपानलांत वेळीं अवेळीं 'राजद्रोह', 'गुप्त कारस्थानें', म्हणून ओरडणाऱ्या ब्रिटिश सरकारनें अधिक भर घातली. मग काय ? विजापूरकरांची उचलबांगडी व्हावयाला कितीसा वेळ लागणार ? ताबडतोब हुकुम सुटला कीं, 'तुम्हीं विद्यार्थ्यांवरील वजनाचा उपयोग यथायोग्य रितीनें करीत नाहीं, सबब तुम्हांस अध्यापकाच्या जागेवरून दूर करण्यांत येत आहे.'* विजापूरकरांचा व्हाइस प्रिन्सिपॉलचा हक्क बाजूस सारून त्या जागेवर नेमले गेलेल्या प्रो. दस्तुरसाहेबांनींही विजापूरकरांना दूर करण्याचे कामीं बराच हातभार लावला होता असें म्हणतात। विजापूरकरांच्या हक्काची पायमल्ली करून महाराजांनीं प्रो. दस्तुर यांस व्हाइस प्रिन्सिपॉल नेमलें त्याच वेळीं नोकरी सोडून देण्याचा विजापूरकरांचा विचार होता. न्यायमूर्ति रानडे यांचा या बाबतींत त्यांनीं सल्लाही घेतला होता. न्यायमूर्तींनीं त्यांस डेक्कन एज्यु-

---

* महाराज पुण्याच्या स्वदेशी कागदाच्या गिरणीचे एक मोठे आश्रयदाते होते. ते स्वतः स्वदेशी कागदच वापरीत. असें असतां पोलिटिकल एजंटच्या सांगण्यावरून त्यांना 'शिस्तीच्या नांवाखालीं' हा मार्ग अवलंबावा लागला असें म्हणतात.

केशन सोसायटीस येऊन मिळण्याचा सल्ला दिला. परंतु सदर संस्थेंत काम करण्याची त्यांची इच्छा नसल्यामुळें राजीनामा देण्याचा विचार त्यांनीं रद्द केला व 'ग्रंथमाले' च्या उद्योगास आपणास सर्वस्वीं जुंपून घेतलें. 'समर्थ' पत्र व 'समर्थ' छापखाना हीं सुरू केलीं. पण हे उद्योग सुरू करणें म्हणजे, त्यांचेच शब्दांत सांगावयाचें तर, ' इट वॉज डिगिंग धि ग्रेव्ह ऑफ सर्व्हिस, ' नोकरीस मूठमाती देण्यासारखें होतें. शेवटीं तेंच खरें ठरलें! ता. २२ सप्टेंबर १९०५ पासून त्यांचा कोल्हापूरसरकारचा नोकर हा संबंध सुटला. ग्रंथमालेच्या सप्टेंबर १९०५ च्या अंकांत ' खासगी स्थित्यंतर ' या मथळयाखालीं या प्रकरणीं त्यांनी पुढील प्रमाणें मजकूर प्रसिद्ध केला आहे.

" करवीर सरकारच्या सेवाछत्राखालीं गेलीं पंधरा वर्षे राजाराम कॉलेजांत शिक्षकाचा अत्यंत पवित्र धंदा करावयास मिळाल्यानें भर उमेदीचें वय सुखांत गेलें व फुरसतीचे वेळीं दुसरे आवडीचे स्वदेशहितसाधक उद्योग करावयास सांपडलें. तें सेवाछत्र एकाएकीं कडकडून मोडून पडल्यामुळें मूळपासून योजिलेल्या हेतूंप्रमाणें वाडवडिलांपासून वसति केलेल्या करवीर शहरींच राहून तेथील लोकांच्या उन्नतीच्या द्वारें स्वदेशसेवा यापुढें कशी घडेल ही विवंचनेचीच गोष्ट आहे. सर्व देशाच्या मानानें पाहतां कोल्हापूर संस्थानचा टापू अगदीं लहान आहे, तरी आपलेपणा वाटत असल्यामुळें त्यास महत्व आहे. परंतु या गोष्टी पुढील विचारावर व श्रीहरीच्या प्रेरणेवरच तूर्त ठेवणें प्राप्त आहे. सालमजकुरीं राष्ट्रीय सभा, सामाजिक परिषद व औद्योगिक प्रदर्शन वगैरे राष्ट्रीय कार्यें श्रीक्षेत्र काशी येथें होणार असल्यानें तिकडून जाऊन आल्यावर संथपणें उत्तरचरितक्रम ठरविण्याचा विचार केला आहे. "

" आज दिसून आलेल्या करवीर सरकारच्या सुविचारपराङ्मुखतेचा अनुभव आमच्या ग्रंथमालेस ४ वर्षापूर्वींच मिळाला आहे. दरबारचा १०० प्रतींचा म्हणजे ५०० रुपयांचा आश्रय ८७ व्या अंकापासून एकदम काढून घेण्यांत आला. त्यांत उपकार एवढाच कीं भलताच व सकृद्दर्शनींहि वेडगळ दिसणारा असा कांहीं आक्षेप न ठेवतां यापुढें ग्रंथमालेची एकही प्रत घेऊं नये असा एज्युकेशनल इन्स्पेक्टर यांस हुकूम सुटला. तेवढी सुधारणा, आमच्या सेवेची दरबारास यापुढें जरूर नाहीं, हें कळवितेवेळीं करण्यांत आली. ती ही कीं, ' तुम्हीं विद्यार्थ्यांवरील आपल्या

वजनाचा उपयोग यथायोग्य रीतीनें करीत नाहीं ' अर्थात् अस्पृहणीय अशा तऱ्हेनें त्याचा उपयोग करतां, असा दाखला १५ वर्षांच्या इमानेंइतबारें केलेल्या नोकरीचा मोबदला म्हणून देण्यांत आला आहे. ग्रॅचुइटी शब्द उपयोजून खुषी-दाखल महाराज सरकार यांनीं सहा महिन्यांचा पगार देण्याचें कलमी केलें आहे. सामान्यतः नोकरीच्या अटीमध्यें उभयपक्षांनीं सहा महिन्यांची आगाऊ सूचना द्यावी अशी सभ्यपणाची रीत आहे. कोठेंकोठें अशी अटही ठरविलेली असते. तेव्हां या सामान्य संप्रदायाच्या आचरणास एवढें गौरवाचें नांव दिलें आहे. आणखी पुनः आमचा नाइलाज झाला, आमच्या मनांत असें करावयाचें नव्हतें, असें भेटेल त्याजवळ बोलण्याची सरकारची व सरकारांच्या दिवाणाची तयारी असा-वयाचीच. बडोद्यास स्वदेशी चळवळीस केवढें उत्तेजन आणि साक्षात् महाराष्ट्रांत श्री शिवाजी महाराजांच्या वंशांत धैर्याचा इतका दुष्काळ ! नोकरीच्या नियमान्वयें आमरण चतुर्थांश बैठी नेमणूक मिळण्याचा ज्याचा हक्क झाला आहे, त्यास कोण-ताही आरोप ठेवून त्याचें निराकरण करण्यास एका मिनिटाचीही सूचना न देतां, आमची खात्री झाली आहे म्हणून तुमच्या नोकरीची याउपर जरूर नाहीं असें सांगतांना सहा महिन्यांचा पगार शिष्टाचाराप्रमाणें देण्यांत तुमच्यावर मेहेरनजर केली म्हणणें म्हणजे मेहेरनजर म्हणजे काय, याचें अज्ञान प्रकट करणें आहे. ज्या आरोपाचें सत्यदेवतेस स्मरून समर्थन करणें शक्य नाहीं किंवा आरोपीस त्या आरोपपंकप्रक्षालनास संधि द्यावयाची नाहीं, तसला आरोप पोटांतच ठेऊन, केवळ स्वैराचाराचा एकच दोष माथीं घेऊन आपल्या दरबारच्या सेवाक्षेत्रांत आपलें अनियंत्रित स्वामित्व आहे, त्याअन्वयें वाटेल त्या सेवकास वाटेल तेव्हां काढून टाकूं इतकाच मुग्ध जाहिरनामा प्रकट करावयाचा होता. नसता आरोप करण्याची अधिक अवकृपा करावयाची नव्हती, इतकेंच म्हणणें आहे. ज्याचें बरें करण्यास झटावें, त्यानेंच उलटून पडावें असा कलिमहिमा आहे. मोठें समाधान इतकें आहे कीं, ज्या पूज्य गुरूंपाशीं अध्ययन केलें त्या प्रिन्सिपाल सेल्बी, मि. कँडी, डॉक्टर भांडारकर, प्रो. शिवराम बापूजी परांजपे, प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक, रा. रा. गंगाधर पांडुरंग गद्रे वगैरे यांच्या कृपेंत अंतर पडलें नाहीं; तसेंच नांवें लिहिण्यास बहुत जागा लागेल असे वर्गबंधु व इष्टमित्र यांच्या स्नेहाचा व सहानुभूतीचा लाभ कायम आहे; त्याचप्रमाणें ज्या शेंकडों विद्यार्थ्यांशीं संबंध घडला, व पुढील उद्योगांत त्यांपैकीं कित्येकांचें साहाय्य होण्याचा संभव आहे, त्यांच्या अंतःकरणांत

प्रेम व आदर वसत आहे. या सर्वांचें सहानुभूतिबल सामान्य नाहीं. यांपैकीं कित्येकांनीं उत्तेजनपर पत्रें पाठविलीं, कित्येकांनीं द्रव्यद्वारा कुमक करण्याचें आश्वासन दिलें.........कित्येकांनीं सेवाकारागृहांतून मुक्त झाल्याबद्दल अभिनंदनही केलें आहे. त्यांच्या अपेक्षेप्रमाणें काय कामगिरी हातून होईल याची कल्पना होत नाहीं. आपल्या राष्ट्रास सरकारी किंवा संस्थानी नोकरींत प्रामाणिक व आस्थेवाईक सेवक मिळणें जरूर आहे. किंबहुना सात्विकपणानें देशहितासाठीं झटणाऱ्या राजसेवकांकडून लोकसेवकांइतकी तरी उपयुक्त कामगिरी खचित होईल. म्हणून रौप्यशृंखलांनीं बद्ध म्हणून सरकारी नोकरांची केलेली विटंबना आम्हांस आवडत नाहीं. प्रत्येक प्रापंचिक मनुष्य रौप्यशृंखलाबद्ध असणारच. साऱ्या जगांत, राजराज्यांत असो किंवा लोकराज्यांत असो, रौप्य किंवा कांचन नाणें हें थोडें तरीं प्राप्त करून घेतल्याशिवाय चालावयाचें नाहीं. आजवर राजराज्यांतून वेतन मिळत असल्यानें लोकराज्याची केलेली सेवा मोफत केली व पदरमोडही केली. **परंतु इतउत्तर लोकराज्यांतील सेवक बनण्याचा** संकल्प केला आहे. उद्यांचा विचार मनांत आणून संचय करण्याची बुद्धि आजवर मनाला शिवली नाहीं व यापुढेंही हा प्रापंचिक दूरदर्शीपणा येईल हें तर कठीणच. परंतु या बाबतींत काडीमात्र काळजी वाटत नाहीं. **राष्ट्रांत विशेषतः सर्वप्रकारच्या स्वदेशी चळवळींच्या वेळीं अत्यंत कामगिरी करावयाची आहे. अनेक अंगांनीं राष्ट्राचें पाऊल पुढें पडण्यास किती तरी लोक पाहिजे आहेत. त्यांपैकीं एका जाग्यावर आपली नेमणूक करून घेऊन जीवांत जीव आहे तोंपर्यंत झटण्याची बुद्धि व सामर्थ्य परमेश्वराजवळ भाकून कार्यास जुंपून घेणें एवढेंच आमचें काम आहे.''**

नोकरीचे पाश तुटून, विजापूरकर आतां स्वतंत्र झाले. सांसारिक पाशही जवळजवळ तुटल्यासारखेच झाले होते. १८९९ त मातोश्री व १९०० सालीं एकाच महिन्यांत लागोपाठ पत्नी व वडील हीं निवर्तलीं. लहान मुलगा होता त्याचें १९०१ सालीं मौंजीबंधन करून व १९०२ सालीं धाकट्या अल्पवयी बहिणीचें लग्न करून, ते या जबाबदारींतून मोकळे झाले होते. अशा स्थितींत राष्ट्रसेवेसाठीं आधींच आतुर असलेलें त्यांचें मन अधिक आतुर झालें. पुढें काय करावयाचें याची योजना त्यांनीं जवळजवळ मनाशीं ठरवूनही टाकिली होती. नामदार गोखले यांनीं याच सुमारास पुणें येथें 'भारतसेवक-समाजाची' स्थापना केलीं

होती. या संस्थेस विजापूरकरांनीं येऊन मिळावें अशी त्यांची फार इच्छा होती. गोखले विजापूरकरांचे लहानपणापासूनचे स्नेही, एकमेकांना एकमेकांविषयीं विलक्षण आदर वाटत असलेला; परंतु दोघांची विचारसरणी भिन्न. शिवाय विजापूरकरांची स्वतंत्रपणें उद्योग करण्याकडे मूळपासून अधिक प्रवृत्ति. त्यामुळें विजापूरकरांनीं 'भारत सेवक समाजास' येऊन मिळण्याचें साभार नाकारलें. जें शिक्षणाचें कार्य आपण पंधरा वर्षें करीत आलों तेंच कार्य स्वतंत्रपणें यावज्जीव करीत राहावयाचें असें त्यांनीं मनाशीं ठरविलें होतें.

१९०५ च्या नाताळांत ना. गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीयसभेचें अधिवेशन भरलें. या अधिवेशनास विजापूरकर मुद्दाम हजर राहिले व त्यापुढें आलेल्या 'राष्ट्रीय शिक्षणा' च्या ठरावाला त्यांनीं महाराष्ट्रातर्फे पाठिंबा दिला. याच वेळीं पं० मालवीयांच्या डोक्यांत 'हिंदु विश्वविद्यालया' च्या स्थापनेची योजना घोळत होती. हें विश्वविद्यालय स्थापन झाल्यास आपण त्यांत तीन वर्षेंपर्यंत काम करूं असें पंडितजींस त्यांनीं अभिवचन दिलें होतें. पुढें अपेक्षिल्याप्रमाणें हें विश्वविद्यालय लवकर सुरू होण्याचा रंग न दिसल्यामुळें ते आपल्या पूर्वयोजित राष्ट्रीय शिक्षणप्रसाराच्या कार्याला लागले.

# ५ समर्थ विद्यालयाची स्थापना

"स्वावलंबी राष्ट्रहितसाधकांच्या पक्षाचे विचार आम्हांस अधिक मान्य असल्यानें व त्या तत्त्वास अनुसरून जे यत्न असतील त्यांकडे आमचा विशेष ओढा असल्यानें, नेहमींच्या व्यवसायास अनुरूप अशा त्या मार्गातील एका गोष्टीचा रात्रंदिवस मनास चटका लागून राहिला आहे. ती गोष्ट म्हणजे अर्थात् **राष्ट्रीय शिक्षण** ही होय."

—प्रो. विजापूरकर.

एकोणिसशें पांच–सहाच्या स्वदेशी चळवळींतून 'बहिष्कारा'बरोबरच दुसरी जी एक महत्वाची चळवळ उत्पन्न झाली ती राष्ट्रीय शिक्षणाची होय. राष्ट्राचा विनाशकाल अति समीप आणावयाला जर कोणती गोष्ट कारण झाली असेल तर ती सरकारनें सुरू केलेली शिक्षणपद्धतीच होय असें लोकांना वाटूं लागलें. राष्ट्राला निःशस्त्र करून व त्याला शुष्क अशा शिक्षणाच्या नादीं लावून त्याचें आपल्या वीर्यकालाचें स्मरण बुजवून त्याला पराक्रमहीन बनविणें हाच सरकारचा हेतू आहे, असे ध्वनी निघूं लागले. ज्या शिक्षणानें शंभर वर्षांत राष्ट्र स्वावलंबी बनलें नाहीं, सधन बनलें नाहीं, सशक्त बनलें नाहीं, सुखी झालें नाहीं, तें शिक्षण शिक्षण तरी कसलें? राष्ट्राला मृत्युपंथाला लावणारेंच तें विष आहे. शिक्षणप्रसाराच्या योगें पन्नास वर्षांच्या अवधींत जपान व जर्मनी, अमेरिका इंग्लंडसारख्या राष्ट्रांशीं सर्व

बाबतींत टक्कर देण्यास तयार होतात व या कालाच्या दुपटीनें काल खर्च होऊनही हिंदुस्थान दुर्बल व दरिद्री बनतो, ही स्थिति काय दर्शविते ? ही स्थिति हेंच दर्शविते कीं ब्रिटिश सरकारची, आम्ही स्वावलंबी न बनतां कायमचें परावलंबी रहावें अशी इच्छा आहे. हिंदुस्थानास असें परावलंबी करण्यांत सरकारचें निश्चित असें एक धोरण आहे. हें धोरण म्हणजे, 'हिंदुस्थान देश इंग्लंड देशाच्या शेपटाप्रमाणें कायमचा विलायतेच्या अंकित रहावा, हिंदुस्थानांतील उद्योगधंदे विलायतेंत करतां येतील तितके विलायतेस न्यावे, आणि हिंदुस्थानांतील प्रजा सुशिक्षित झाली तरी तिच्या अंगांत स्वाभिमान, स्वावलंबन इत्यादि गुण फारसे उत्पन्न होऊं नयेत,' हें होय. अशा तऱ्हेचे विचार जनतेंत उत्पन्न होऊं लागले होते. त्यांत आणखी पुढें पुढें रिस्ले सर्क्युलरसारखीं सर्क्युलरें बाहेर पडल्यामुळें तर या विचारांना अधिक जोर मिळाला. "सबंध राष्ट्रांत सरकारी धोरणाप्रमाणेंच नवीन पिढींतील माणसें तयार व्हावीं, दुसऱ्या प्रकारचें वळण दाखविणारा कोणीच असूं नये, ही मोठ्या दुर्दैवाची आणि भयंकर गोष्ट होय. हा बंडुनाना किंवा लाँगमनी अगर मॅकमिलनी कित्ता आतां नको आहे; व दुसरा कित्ता घालून देण्याचें काम व जबाबदारी सर्वस्वी खासगी शाळांची; इतकेंच नव्हे तर खासगी शाळा याप्रमाणें वागण्यास तयार नसतील तर लोकांनीं या खासगी शाळांस दिलेली मदत काढून घेऊन नव्या खासगी शाळा काढल्या पाहिजेत. **नवीन पिढीस बायकी बनविण्याचा क्रम सरकारानें पतकरला आहे तेवढा बस्स आहे.** ज्या गृहस्थांस आपलीं मुलें याच क्रमांत वाढलेलीं पाहिजे आहेत त्यांनीं सदर मुलें पाहिजे तर सरकारी शाळेंत खुशाल पाठवावीं; पण ज्यांना या गोष्टीचा आतां वीट आला आहे किंवा येत चालला आहे त्यांनीं नवीन खासगी शाळा काढण्याची खटपट चालू ठेविली पाहिजे," अशा तऱ्हेचीं मतें वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागलीं. बंगाल्यांत राष्ट्रीय शिक्षणप्रसारासाठीं 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन' या नांवाची संस्था सर गुरुदास बानर्जी यांचे अध्यक्षतेखालीं स्थापन झाली. या संस्थेनें कलकत्त्यांत श्रीयुत अरविंद घोस यांच्या नेतृत्वाखालीं एक महाविद्यालय व बंगाल्यांत निरनिराळ्या ठिकाणीं स्वतंत्र विद्यालयें स्थापन केलीं. संस्थेकरितां दहा–बारा लक्षांचा निधीही जमविण्यांत आला. महाराष्ट्रांतही अशाच तऱ्हेचा उद्योग प्रोफेसर विजापूरकरांच्या मार्गदर्शकत्वाखालीं सुरू झाला. १९०६ च्या जून महिन्यांत कोल्हापूरास 'समर्थ

विद्यालय ' उघडण्यांत आलें व याच वर्षीच्या ऑगस्ट महिन्यांत ' महाराष्ट्र विद्या-प्रसारक मंडळ ' नांवाचें राष्ट्रीय शिक्षणप्रसाराचें कार्य करणारें मंडळ स्थापिलें गेलें व विद्यालय त्याच्या ताब्यांत देण्यांत आलें. मंडळाच्या उद्देशासंबंधीं कै. दाजी आबाजी खरे, रा. चिंतामण विनायक वैद्य, कै. डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, कै. लो. बाळ गंगाधर टिळक व स्वतः विजापूरकर यांच्या सहीचें खालीलप्रमाणें जाहीरपत्रक काढण्यांत आलें: —

" राष्ट्रहिताच्या सर्व उद्योगाचा पाया राष्ट्रीय शिक्षणावर आहे, हें आजकाल कोणास सिद्ध करून दाखविण्याचें कारण उरलें नाहीं. राष्ट्रीय बुद्धिशिक्षणाबरोबर कलाकौशल्य व उदीम धंद्यांचें शिक्षण दिल्याशिवाय हिंदुस्थानची सांपत्तिक स्थिति सुधारण्याची आशा नाहीं. सरकारदरबारीं तसेंच लोकांच्या वतीनें राष्ट्रसेवा करणारे लोक शुद्धशील, सामर्थ्यवान् व प्रगतिप्रिय असेच पाहिजे आहेत. पुढील पिढीस असें वळण लावण्यासाठीं व शारीरिक व नैतिक सामर्थ्यानें साऱ्या जगांतील कोणत्याहि सन्मान्य राष्ट्रांतील लोकांची बरोबरी करतील असे त्या पिढींतील तरुण निपजावेत यासाठीं आज जोरानें प्रयत्न करणें हें राष्ट्रांतील प्रत्येक समंजस माणसास इष्ट वाटत आहेच. परंतु विचार करण्यांत काल घालविण्यापेक्षां एकदम कार्यास प्रारंभ करणें हेंच योग्य असें जाणून श्रीक्षेत्र करवीर येथें स्थापन झालेल्या ' समर्थ विद्यालय ' नांवाच्या शाळेचा फायदा घेऊन तीच आपल्या प्रयत्नांची मुहूर्तमेढ कल्पून आम्हीं खालीं सही करणारांनीं अशा प्रकारच्या शाळा सर्व महाराष्ट्रांत प्रमुख ठिकाणीं स्थापण्याचा विचार केला आहे. या प्रकारच्या शाळांमध्यें हातकाम पुष्कळ व्हावयाचें आहे. शास्त्रीय शिक्षणही द्यावयाचें आहे. तेव्हां हें मोठ्या खर्चाचें काम आहे. शारीरशिक्षणाच्याही हरएक सोयी केलेल्या आहेत. निवळ बुद्धिशिक्षणाच्या हल्लींच्या शाळा चालवितां चालवितां खुद्द सरकार कसें टेकीस आलें आहे हें आपण पहात आहों. कोणतीही सुधारणा सुचविली तरी तिच्या इष्टतेविषयीं वाद नाहीं, पण द्रव्याचा पुरवठा नाहीं ही सबब सरकार पुढें करतें. पण अशा सबबीवर आपल्या मुलांची झालेली आबाळ पाहून आपण स्वस्थ बसणें सर्वथा अनुचित आहे. ह्या प्रचंड राष्ट्रकार्यास स्वार्थत्यागहि प्रचंड पाहिजे. तसा करण्यास राष्ट्रांतील सर्व संपन्न व समंजस लोक तयार असतील तर इतर उदयेच्छु राष्ट्रांप्रमाणें वागण्यास महाराष्ट्रीय जनही सिद्ध आहेत असें ठरेल. एरवीं बोलघेवडेपणाचा आरोप आपल्या माथीं कायम राहील असे विचार मनांत

आणून ज्या कोणाचा खालीं सही करणारांवर निस्सीम विश्वास असेल त्यांनीं आपल्या हातून होईल तेवढें द्रव्यसाहाय्य या महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळास द्यावें. सर्व प्रकारचा शिक्षणक्रम देशांतल्या देशांत पुरा होऊन अवलोकनानें प्राप्त होणारा अनुभव मिळविण्यास विश्वपर्यटन करणारे शोधकही कांहीं निपजावेत अशासाठीं सर्व शिष्यवर्ग कडकडीत ब्रह्मचर्याच्या व स्वधर्माचरणाच्या शिस्तींतून बाहेर पडला पाहिजे. अशा निकरानें सर्व व्यवस्था व अर्थात् त्याबरोबर सर्व जबाबदारी खालीं सही करणारे आपल्या शिरावर घेण्यास तयार आहेत. × × याहून या राष्ट्र-कार्याच्या उपक्रम प्रसंगीं कांहीं अधिक लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं."

पहिल्या सहा महिन्यांत डॉ. परांडेकर, सखाराम रामचंद्र भागवत यांनीं आपापले व्यवसाय संभाळून विद्यालयांत शिकविण्याचें काम केलें. प्रसिद्ध शास्त्रज्ञ कै. प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक हेही मधूनमधून येऊन विद्यार्थ्यांस प्राणिशास्त्राची थोडथोडी माहिती देत असत. रा. राजाराम दामोदर देसाई ('सुलभ संस्कृतप्रवेश'कर्ते) हे कायम शिक्षक म्हणून येऊन मिळाले होते. पुढें लवकरच १९०७ च्या जानेवारींत रा. जनार्दन सखाराम करंदीकर व एप्रिल महिन्यांत रा. नरहर बाळकृष्ण जोशी व प्रो. वामन मल्हार जोशी हे आजीव शिक्षक म्हणून येऊन मिळाले. हे चार तरुण विद्वान गृहस्थ, विशेषतः देसाई, करंदीकर व वामनराव जोशी हे संस्थेस आजीव शिक्षक लाभल्यामुळें संस्थेला विशेष महत्व आलें व समाजाचें लक्ष तिजकडे खेंचलें गेलें. अखिल महाराष्ट्र या संस्थेकडे नव्या आशेनें पाहूं लागला. शिक्षणक्षेत्रांतील हा नवा प्रयोग यशस्वी ठरो असें सर्वजण चिंतूं लागले. कोल्हापूरच्या महाराजांस मात्र या संस्थेमुळें नवी धास्ती उत्पन्न झाली. ता. ५ आक्टोबर १९०६ रोजीं ते लिहितातः—"ज्या *शिवाजी चळवळीच्या नांवानें कित्येक दरोडे घालण्यांत येत आहेत व तरुण लोक अराजक व राजद्रोही बनविले जात आहेत, ती चळवळ येथें सुरू झाल्यामुळें व नवीनच येथें एक राष्ट्रीय विद्यालय अस्तित्वांत आल्यामुळें मला मोठी चिंता उत्पन्न झाली आहे." महाराजांस समर्थविद्यालय हें एक बॉम्ब-गोळे तयार करणाऱ्या कारखान्यांचें स्थान वाटत होतें कीं काय कोण जाणे! राईचा पर्वत करण्याची मूळचीच खोड ती जावी कशी?

विद्यालय कोल्हापुरास जवळ जवळ चौदा महिने होतें. संस्थानांतील दूषित हवा समर्थ विद्यालयासारख्या विद्यालयाला घातक होण्याचा फार संभव

* रा. ब. लठ्ठेकृत श्रीमच्छत्रपति शाहुमहाराज यांचें चरित्र, पृष्ठ २४९.

असल्यामुळें जितक्या लवकर तेथून मुक्काम हालवितां येईल तितक्या लवकर तो हालवावा, असें बऱ्याच जणांचें मत पडल्यामुळें, तळेगांवच्या माळावरील ६४ एकर जमीन खरेदी करण्यांत येऊन विद्यालयाचा मुक्काम हालविण्याचें ठरलें. त्याप्रमाणें १९०७ च्या ऑगष्टांत कोल्हापुराहून निघून तळेगांवास येण्याकरितां मिरजेस तेथील अधिपतींच्या कृष्णाकांठच्या वाड्यांत प्रस्थान ठेविलें; चार महिने तेथें राहून १९०८ मध्यें विद्यालय तळेगांवास गांवांत राहण्यास गेलें. व नंतर लवकरच आपल्या जागेंत राहण्यास गेलें. यावेळीं इमारतीचें काम पुरें झालें नव्हतें. तरी पण विद्यार्थी व शिक्षक, परक्याच्या प्रासादापेक्षां स्वतःच्या मालकीची झोंपडी बरी असें समजून कित्येक महिने त्या उघड्या माळावर झोंपड्यांत राहिले. या वेळीं विद्यार्थ्यांची संख्या वाढत होती व लोकांकडून द्रव्यही मिळत होतें. परंतु हें द्रव्य, विजापूरकरांची महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याची जी कल्पना होती ती कल्पना प्रत्यक्षांत आणावयाला पुरेल इतकें नव्हतें. तेवढें द्रव्य मिळवावयाला तेवढाच जोराचा प्रचार व कार्यकर्त्यांचा संचार व्हावयास पाहिजे होता. या वेळीं लो. टिळकांनीं राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न मोठ्या निश्चयानें हातीं घेतला होता. समर्थ विद्यालय आपलें असें ते समजत होते. विजापूरकरांची महाराष्ट्र विद्यापिठाची कल्पना त्यांना मान्य होती. विद्यालयाला चिरस्थायित्व येण्याकरितां शक्य तेवढे खटाटोप करण्याचें त्यांनीं ठरविलें. १९०८ च्या फेब्रुवारी व मार्च या महिन्यांत कै. डॉ. देशमुख, रा. चिंतामणराव वैद्य व चित्रशाळेचे रा. वासुदेवराव जोशी यांना बरोबर घेऊन सोलापूर, बार्शी, कल्याण या बाजूला त्यांनीं दौरा काढला. या दौऱ्यांत विद्यालयाकरितां त्यांनीं बरेंच द्रव्य जमा केलें. या दौऱ्यानंतर आणखी एक दुसरा दौरा काढून विद्यालयाच्या कायम निधीची व्यवस्था करण्याचा त्यांचा विचार होता. परंतु १९०८ च्या अखेरीस खटल्यांचें सत्र सुरू झालें. लो. टिळकांवर खटला भरण्यांत येऊन त्यांस तुरुंगांत धाडण्यांत आलें. त्यामुळें निधी जमविण्याचा बेत अर्थात् जेथल्या तेथेंच राहिला. या सुमारास एका कार्यकर्त्या तरुण विद्वान् गृहस्थाची विद्यालयाला आजीव शिक्षक म्हणून जोड मिळाली. हे गृहस्थ म्हणजे 'गीर्वाण लघुकोशाचे' व 'लोकशिक्षण' मासिकाचे संपादक कै. जनार्दन विनायक ओक हे होत. विद्यालयाला येऊन मिळण्यांत यांनीं दाखविलेला स्वार्थत्याग अपूर्व होता. नागपूरच्या नील सिटी हायस्कूलचे हे सुपरिंटेंडेंट असून त्यांस या ठिकाणीं दरमहा चारशें रुपये पगार मिळत असे. परंतु लो. टिळकांनीं एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें

'बाल्ये राजगुरुर्यंता यौवने भृतिदो नृपः । तथा पेन्शनदाताच न हिंदुः प्रभुरात्मनः' या राजनीतीच्या तत्त्वांत चिरडून जाऊन जन्मल्यापासून मरेपर्यंत सर्व लोक एकसारखे दास्यत्वांत मुरले जावे, आणि एक पिढी अशी मुरली म्हणजे तिचे आनुवंशिक संस्कार दुसऱ्या पिढीस मिळून अशा रीतीनें राष्ट्र-भक्तिशून्य पुरुषांची सरकारी नोकरीकरितां परंपरा तयार व्हावी, या हेतूनें निघालेलीं रिस्ले सक्युंलरसारखीं सर्क्युलरें हायस्कूलचा मुख्याधिकारी म्हणून तरुण विद्यार्थ्यांवर बजावण्याचें पाप आपल्या हातून होऊं नये, या हेतूनें त्यांनीं या जागेचा दहा-बारा महिन्यांच्या आंतच राजिनामा दिला. १९०८ च्या एप्रिलांत ओक तळेगांवास आले व त्यानीं समर्थ विद्यालयाची समक्ष पाहणी व तेथील मंडळीशीं ओळख करून घेतली. ओकांसारखे स्वातंत्र्याभिमानी व राष्ट्रीय शिक्ष-णाचे भक्त आणि समर्थ विद्यालयासारखी संस्था यांची एकदां दृष्टादृष्ट होतांच त्यांच्यांत प्रेमाकर्षण व्हावें यांत नवल तें काय ? वास्तविक पाहतां समर्थ विद्या-लयाचे सुरुवातीपासूनच त्यांचा संबंध जडावयाचा. विद्यालयाचें पहिलें हस्तपत्रक निघालें त्यांत त्यांचाच बराचसा हात होता. पण त्या वेळीं ते डेक्कन एज्युकेशन सोसायटींत असल्यामुळें व ती सोडण्याचा हेतु नसल्यामुळें ते विद्यालयाच्या कामांत प्रत्यक्ष भाग घेऊं शकले नाहींत. शिवाय विद्यालय कोल्हापूरच्या संस्थानी हवेंत जन्मल्यामुळें पुण्यांतील बऱ्याच मंडळीप्रमाणें त्यांजकडूनही त्या बाबतींत हेळसांडच झाली.

ओक विद्यालयांत आल्यापासून विजापूरकरांनीं चिटणिशीचें काम त्यांजकडेच सोंपवून आपणास प्रचाराच्या कामास सर्वस्वी वाहून घेतलें. ओक हे शिस्त व टापटीप यांबद्दल गाजलेले होते. विद्यालयाचें प्रत्यक्ष चालकत्व त्यांच्या हातांत येतांच त्यांनीं विद्यालयाला सर्व बाजूंनीं व्यवस्थित स्वरूप आणण्याचे आटोकाट प्रयत्न चालविले. दुर्दैवानें १९१० सालीं 'समिती कायद्याची' जी गदा विद्यालया-वर कोसळली ती जर कोसळली नसती तर त्यांनीं समर्थ विद्यालयाला एक प्रमुख आदर्श विद्यालय बनविलें असतें. 'स्वदेशी चळवळीच्या' व पुढें 'असहकारितेच्या' काळांत बऱ्याच राष्ट्रीय शाळा निघाल्या पण त्यांपैकीं कोणासमोर 'सरकारशीं संबंध ठेवावयाचा नाहीं' यापलीकडे, समर्थ विद्यालयाप्रमाणें विशिष्ट अशीं कांहीं शैक्षणिक ध्येयें होतीं असें दिसत नाहीं; आणि त्यामुळेंच त्यांची पावसाळी वनस्पतींप्रमाणें स्थिती झाली. समर्थ विद्यालय हें शिक्षणाचें नवें क्षेत्र म्हणून सुरू

करण्यांत आलें होतें. त्याच्या चालकांपुढें राजकीय हेतूंपेक्षां शैक्षणिक हेतूच प्रामुख्यानें होते. या हेतूंची कल्पना, महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळानें १९०९ च्या सप्टेंबर महिन्यामध्यें प्रसिद्ध केलेल्या हस्तपत्रकांतील पुढील मजकुरावरून येईलः—

"देशांतील तरुण पिढीस व्यापक आणि सर्वांगपूर्ण अशा प्रकारचें शिक्षण सर्वसंमत पद्धतीनें देणें, उच्च पूर्वपरंपरा आणि राष्ट्राच्या सांप्रतच्या व भविष्यकालीन श्रेष्ठ गरजा यांस अनुरूप अशा प्रकारचें—योग्य शिस्त ठेवून—त्यांच्या मनास वळण देणें व त्यांचें शील बनविणें आणि तद्द्वारा राष्ट्रकार्यांतील आपापला योग्य वांटा उचलण्याची त्यांचे अंगीं पात्रता आणणें, राष्ट्रानें ठरविलेले सदाचाराचे नियम कायम ठेवून त्यांस वरच्या पायरीस नेणें, हाच राष्ट्रीय शिक्षणाचा कोणत्याही निर्दोष योजनेचा मुख्य व नियामक हेतु असला पाहिजे. अशा प्रकारें जें शिक्षण द्यावयाचें तें जसें औपपत्तिक तसेंच व्यावहारिक आणि वाङ्मयात्मक, शास्त्रीय व औद्योगिकही असलें पाहिजे. याच शिक्षणाचे अभ्यासक्रमांत धार्मिक व नैतिक शिक्षणाचाही अंतर्भाव अवश्य केला पाहिजे. शारीरिक शिक्षणाकडेही काळजीपूर्वक लक्ष देऊन सर्वच शिक्षणसंस्थांस मूलभूत असलेल्या अशा योग्य शिस्तीकडेही पूर्ण लक्ष दिलें पाहिजे. शिवाय हें सर्व शिक्षण विद्यार्थ्यांस त्यांच्या मातृभाषेचेच द्वारें देणें अगत्याचें आहे."

वरील ध्येयास अनुसरून विद्यालयांतील शिक्षणपद्धतीही निश्चित केली गेली होती. प्रत्येक विषय शिकवितांना व्यावहारिक दृष्टि ठेवून अनवश्यक भाग गाळला जात असे. शक्य तितकें मूर्त वस्तूंचे द्वारें व निरनिराळीं उदाहरणें देऊन स्पष्ट ज्ञान देण्याची योजना केली होती. परीक्षांचा काळ नाहींसा करून घोकंपट्टीला अजीबात फांटा दिला होता. शास्त्रीय विषय शिकवितांना वरील इयत्तांतील विद्यार्थ्यांनीं स्वतः प्रयोग करावे अशी तजवीज केलेली असे व हस्तकौशल्य, बिनचूकपणा व कल्पनाशक्ति यांची वाढ व्हावी म्हणून शिल्पशाळेंत त्यांचेकडून हातकाम करून घेतलें जाई. इंग्रजीमध्यें प्रवेश करून देतांना व पुढेंही, संभाषणपद्धतीचा उपयोग केला जात असे. संस्कृत व्याकरणाचा निरर्थक बोजा कमी करून वाङ्मयाची ओळख सुलभ रीतीनें करून दिली जाई. भूगोलांतील नुसत्या याद्या पाठ करणें नीरस व निरुपयोगी असतें, त्यामुळें विद्यार्थ्यांच्या मेंदूला अकारण ताण बसतो हें लक्षांत ठेवून, कोणत्याही देशाचा भूगोल त्या देशाच्या इतिहासासह शिकविला जात असे. एकंदरीनें शिक्षणशास्त्रांतील नवीन नवीन सर्वमान्य पद्धतींचा अवलंब करून

विद्यार्थ्यांना शिक्षण दिलें जात असे. या शिक्षणपद्धतीला सहाय्यक असें वाङ्मयही निर्माण करण्याचें काम कै. ओक, रा. देसाई वगैरे गृहस्थांनीं हातीं घेतलें होतें.

विद्यालयांत पहिल्या वर्षी ३३ विद्यार्थी होते; चौथ्या वर्षी ही संख्या १५० झाली. या विद्यार्थ्यांपैकीं १२७ ब्राह्मण (द्रवीड); ४।१५ सारस्वत ब्राह्मण; ३ सवाशे, १ गुजर व ४ मराठे होते. विद्यालयांत असणाऱ्या ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या मानानें ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प किंबहुना ' दर्यामें खसखस ' अशी कां असावी याचा नीट बोध होत नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाचें तत्त्व द्रवीड ब्राह्मणांखेरीज इत . ब्राह्मणांना किंवा बहुसंख्याक अशा ब्राह्मणेतरांना मान्य नव्हतें काय ? स्वदेश, स्वधर्म, स्वभाषा, व स्वसंस्कृती यांचें ज्ञान करून देऊन त्यासंबंधींचा जाज्वल्य अभिमान उत्पन्न करणारें शिक्षण त्यांना नको होतें काय ? सरकारी शाळांतील विघातक शिक्षणापासून आपल्या मुलांचा बचाव करावा, ही कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरत नव्हती काय ? नव्हती असें कसें म्हणवेल. महाराष्ट्रांत त्यावेळीं स्वदेशी चळवळीला एवढा रंग चढला तो केवळ एकट्या द्रविड ब्राह्मणांमुळेंच काय ? खास नाहीं. सर्वांच्याच चळवळीमुळें तो चढला. असें जर आहे तर समर्थ विद्यालयांत द्रविड ब्राह्मणांहून इतर लोक आपलीं मुलें स्वदेशी चळवळीचेंच एक अंग असलेलें जें राष्ट्रीय शिक्षण तें देणाऱ्या ' समर्थ विद्यालयांत ' धाडण्यांत उदासीन कां ? याला कारण, समर्थ विद्यालयांत आचरिला जाणारा वर्णभेद, जातिभेद व कर्मठपणा, हेंच असावें असें वाटतें. विद्यालयांत कडक रीतीनें पाळण्यांत येणारा वर्णानुसार आचारधर्म, एकदेशीयत्वाचें, एक राष्ट्रीयत्वाचें तत्त्व उपदेशिलें जात होतें अशा काळांत पटण्याजोगा नव्हता. हा ब्राह्मण, हा क्षत्रिय, हा प्रभु, हा वैश्य, हा शूद्र; अमुक अमुकांपेक्षां श्रेष्ठ, अमुक अमुकांपेक्षां कनिष्ट, अशा तऱ्हेच्या भावना लहानपणापासूनच उत्पन्न करणारा आचारधर्म कोणाही स्वाभिमानी गौड ब्राह्मणाला, सारस्वत ब्राह्मणाला, प्रभूला, मराठ्याला किंवा वैश्याला पटणारा नव्हता. मुलांना धार्मिक शिक्षण हवें खरें, परंतु तें भिक्षुकी स्वरूपाचें नव्हे. परस्परांच्या मनोभावना दुखविणारा जातिभेद व स्पृश्यास्पृश्यभेद राष्ट्रीय शिक्षण देऊं इच्छिणाऱ्या संस्थांनीं कायम ठेवणें, हें राष्ट्रहितवर्धक कार्य नसून राष्ट्रहितविघातक कार्य आहे. एके बाजूस ' तुम्हीं आम्हीं हिंदु हिंदु, बंधु बंधु ' असें मुलांना एकतानता गीत शिकवावयाचें व दुसऱ्या बाजूस पंक्तिभेद, स्पृश्यास्पृश्यभेद कडक रीतीनें अमलांत आणून त्याविरुद्ध अशी कृति

करावयाची, याला राष्ट्रीय बाणा कोण म्हणेल ? असल्या शाळेंत आपलीं मुलें जर लोकांनीं धाडलीं नाहींत तर त्यांना दोष कोण देईल ? अशा स्थितींत 'समर्थ विद्यालया'चें नांव बदलून 'द्राविड ब्राह्मण विद्यालय' असें नांव ठेवावें, असें जर कोणी म्हटलें असतें तर त्या गृहस्थाला नांव ठेवतां आलें असतें काय ? समर्थ विद्यालयांतील शिक्षणपद्धति आदर्शवत् होती, शिस्त वाखाणण्याजोगी होती, शिक्षकांचें आचरण कौतुकार्ह होतें यांत मुळींच संशय नाहीं. परंतु संस्थेच्या धोरणांतील वरील दोष मुळींच अभिनंदनीय नव्हता व नाहीं. हा दोष त्या वेळच्या या 'समर्थ विद्यालयांतून' बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनाही आज पटत आहे. विजापूरकरांचे एक शिष्य व जुन्या समर्थ विद्यालयांतील एक विद्यार्थी रा. दिनकर शास्त्री कानडे यांनीं अमेरिकेंतून विजापूरकरांस ता. १ आक्टोबर १९२१ रोजीं लिहिलेल्या पत्रांत प्रदर्शित केलेले खालील विचार पहा. रा. कानडे शास्त्री लिहितातः—

"व्यवहारदृष्टया कोणी कमी दर्जाचा नाहीं. **मी माझ्या गांवांतील माणसास कमी दर्जाचा मानीन तर मलाच गुलाम मानणारें जग त्यास गुलामाचा गुलाम मानील**—यांत काय आश्चर्य. धर्म, शक्ति व वृत्ति हृदयांत आहे. हृदयशुद्धीला व भक्तीला कांदाभाकर जर तुकारामाचे व विठ्ठलभक्तांचे आडकाठीस येत नाहीं, तर इतर वर्गांचे कां यावी. मराठा, ब्राह्मण एका पंक्तीला जेवण्यानें अपवित्र होतो तर त्याच भावनेचा बदल करून ते एका पंक्तींत न बसण्यानें अपवित्रता उत्पन्न होते."

"बेटीव्यवहार सोडून तेथपर्यंतचे सर्व आचार व्यावहारिक इष्ट शुद्धतेचे तत्त्वावर—भावनेची शुद्धता सोडून—निदान राष्ट्रीय विद्यालयांत जरूर अमलांत आणावे **व सर्व जाति, सर्व वर्ण, सर्व धर्मांचे मुलांस समान शिक्षण द्यावें, समानतेनें सर्व व्यवहारांत वागवावें. उच्चनीच या कल्पनेस मुळींच जागा ठेवूं नये.** असें सर्व विद्यार्थ्यांस देतां न येणारें जें शिक्षण असेल तें राष्ट्रीय विद्यालयांत मुळींच देऊं नये. त्याची जरुरी नाहीं."

रा. कानडेशास्त्री विद्यालयांतून बाहेर पडल्यावर शास्त्री पद्धतीनें शिकलेले. कर्मठ आचारविचारांत त्यांचे दिवस गेलेले. परंतु अमेरिकेस गेल्यावर, तेथील लोकांच्या शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय उलाढाली पाहून 'आपण व आपला देश कोठें आहे ?' हा विचार त्यांच्यापुढें उभा राहिला. राष्ट्राला दुर्गती कां प्राप्त झाली व

या दुर्गतींतून सुटका कां होत नाहीं यासंबंधींचे विचार त्यांच्या डोक्यांत सुरू झाले. विचाराअंतीं त्यांची आजवरची संकुचित दृष्टी बदलून व्यापक झाली. ही दृष्टी व्यापक झाल्यामुळेंच देशाच्या स्वातंत्र्यासाठीं तळमळणाऱ्या त्यांच्या तरुण हृदयांतून कर्मनिष्ठांस ( फाजील ) कटु वाटणारे परंतु सत्य असे वरील बोल बाहेर पडले.

रा. कानडेशास्त्री यांच्या या स्पष्ट बोलांचा विजापूरकरांवर कांहीं परिणाम झाला असेल असें वाटत नाहीं. तसा झाला असता तर तो पुनरुज्जीवित ' नवीन समर्थ विद्यालयाच्या ' आचारांत स्पष्ट दिसला असता.

विद्यालयाची आर्थिक स्थिति चांगल्या प्रकारची होती. चार वर्षांच्या अवधींत ७५००० चा निधि विद्यालयानें संपादिला. या निधींतील जवळ जवळ ४२००० रुपये इमारती बांधण्यांत खर्च झाले होते.

विद्यालयांतील जवळ जवळ सर्व शिक्षक पदवीधर होते व ते अति अल्प वेतनावर म्हणजे दरमहा रुपये ४० वर काम करीत असत. या शिक्षकांमध्यें एक वैशिष्ट्य होतें. कोणताही नवा शिक्षक—प्रो. जोशी, करंदीकर, ओक, देसाई वगळून—शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात करण्याच्या आधीं त्याला, मुद्दाम सुरू केलेल्या शिक्षकवर्गांत, शिक्षण घ्यावें लागे. या वर्गामुळें विद्यालयास ज्या नमुन्याचा शिक्षक हवा तसा मिळे.

विजापूरकरांनीं विद्यालयाकरितां मोठ्या मार्मिकतेनें जागा शोधून काढली होती. मोकळी व आरोग्यदायी हवा, विपुल पाणी, इंद्रायणीसारखी नदी शेजारीं, देहु, आळंदी, चिंचवडसारखीं क्षेत्रें सभोंवतीं असलेलीं, पुण्यासारखें—विद्वानांचें माहेरघर म्हणून गाजलेलें—शहर पंचेचाळीस मिनिटांच्या—आगगाडीनें—अंतरावर असलेलें, असें सर्व दृष्टीनें महत्त्वाचें व सोयीचें असें हें स्थळ होतें. महाराष्ट्र संस्कृतीचें तळेगांव हें एक केंद्र बनावें अशी विजापूरकरांची इच्छा होती. भगवदिच्छा वेगळी नसती तर ती लवकरच पुरीही झाली असती.

---

# ६ छत्रपतींनीं सूड उगवला

कोल्हापूरचा आणि विजापूरकरांचा संबंध आतां (१९०८) जवळजवळ सुटल्यासारखा झाला होता. ‘ समर्थ ’ छापखाना कोल्हापुराला होता व ग्रंथमाला, विश्ववृत्त व समर्थ तेथेंच छापून प्रकाशिलीं जात होतीं हें खरें. परंतु त्यांची त्यांनीं रा. विनायकराव जोशीराव व प्रो. वामन मल्हार जोशी व इतर कांहीं मंडळी यांच्यावरच प्रत्यक्ष जबाबदारी सोंपवून, आपल्याला केवळ ‘ राष्ट्रीय शिक्षण प्रसारा’च्या कार्याला सर्वस्वी जुंपून घेतलें होतें. त्यांनीं आतां सर्व चळवळींतून आपलें अंग काढून घेतलें होतें. समर्थ विद्यालयाची भरभराट होऊन त्याच्या ध्येयाचा प्रसार सर्व महाराष्ट्रांत कसा होईल, आपली महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करण्याची योजना प्रत्यक्ष स्वरूपांत आणतां यावी, याकरितां कोणकोणत्या दिशांनीं काय काय काम करावें लागेल, याची अहोरात्र चिंता ते करीत होते. विजापूरकर एकीकडे आपल्या भावी योजना तयार करीत होते खरे पण दुसरीकडे त्यांच्या संबंधींच्या निराळ्याच योजना सुरू होत्या. विजापूरकर आपल्या कार्यांची दिवसेंदिवस प्रगति कशी होईल याचे विचार करीत होते, तर दुसरीकडे एक व्यक्ती त्यांच्या कार्यांची प्रगति खुंटवून त्यांना नेस्तनाबूद कसें करतां येईल याचे विचार करीत होती. या व्यक्तीला विजापूरकर विसरून गेले होते; पण ही व्यक्ती त्यांना विसरली नव्हती. विजापूर-

करांच्या मनांतील या व्यक्तीसंबंधींच्या बऱ्यावाईट भावना केव्हांच नाहींशा झाल्या होत्या. परंतु या व्यक्तीच्या मनांतील विजापूरकरांविषयींच्या भावना नाहींशा झाल्या नव्हत्या; उलट अधिकाधिक त्या बळावत चालल्या होत्या. या बळावलेल्या भावनांचा स्फोट होण्याचा काल अति समीप आला होता. सौम्य धक्का का होईना, पण तो बसण्याची वाट ही व्यक्ति पहात होती. हा धक्का एक दिवस बसला—नव्हे बसल्यासारखा वाटला. विजापूरकरांवर डोळा ठेऊन असलेली ही व्यक्ति कोण हें स्पष्ट करून सांगितल्याखेरीजच लक्षांत येण्याजोगी आहे. ही व्यक्ति म्हणजे म्लेंच्छांचें निर्दालन करून हिंदुपदपातशाहीचा पाया रचणाऱ्या पुण्यश्लोक शिवछत्रपतींचा वंशज म्हणविणारे कोल्हापूरचे शाहु छत्रपति ही होय. विजापूरकरांविरुद्ध यांनीं सरकारशीं सारखीं कारस्थानें चालविलीं होतीं. त्या वेळचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क (पुढें लॉर्ड सिडनहॅम) व इतर इंग्रज अधिकारी यांना विजापूरकरांविरुद्ध खोट्यानाट्या गोष्टी लिहून त्यांचें मन दूषित करण्याचा यांनीं पद्धतशीर प्रयत्न चालविला होता. या कारस्थानांची कल्पना, 'केसरी'नें ता. १७ मे १९२१ च्या अंकांत 'छत्रपति व इंग्रज यांचें हितगुज' या मथळ्याखालीं प्रसिद्ध केलेल्या महाराजांच्या पत्रव्यवहारापैकीं खालील पत्रें स्पष्टपणें आणून देतील:—

**महाराजांचें सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र** ( ११ आगष्ट १९०८ )—

"विजापूरकर हे येथील फारां दिवसांचे प्रोफेसर, त्यांच्यावर खटला केला तर फार खळबळ उडेल म्हणून मी कांहीं दिवस विचार करीत होतों, व पूर्ण विचाराअंतीं त्यांच्यावर खटला करण्याचें ठरविलें आहे. पण कैदी इकडे देण्याबाबत थोडी अडचण दिसते. फर्नांडीस ह्यांस सल्ला घेण्याकरितां लीगल रिमेंब्रन्सर ह्याजकडे पाठविलें आहे. 'विजापूरकरांचें आर्टिकल फारच द्वाडपणाचें आहे' असें जें तुमचें मत आहे तसेंच माझेंही आहे."

**सर जॉर्ज क्लार्क ह्यांचें महाराजांस पत्र** ( १६ ऑगष्ट १९०८ )—

"विजापूरकरासंबंधीं कायदेपंडितांचा अभिप्राय पाठविला आहे तो पोंचला असेलच. कोल्हापूरच्या राजद्रोहाच्या कायद्याप्रमाणें हा खटला करण्यास अडचण असेल तर मी आग्रह धरणार नाहीं. पण '**विजापूरकर हा वाईट मनुष्य आहे, तो राजद्रोह शिकवितो व त्याचें वजन मोठें घातुक आहे.**' याच्या खटल्यानें खळबळ उडेल खरी, पण तुमच्याविरुद्ध खटपट करणाऱ्या लोकांच्यावर त्याचा चांगलाच परिणाम होईल.'



३५०

सर जॉर्ज क्लार्कच्या या पडत्या फळाची आज्ञा मिळतांच महाराजांनीं विजापूरकरांचा सूड उगविण्याचा चंग बांधला. एका दगडानें दोन फळें त्यांच्या हातांत पडणार होतीं. एक सरकारला खुश करण्याचें व दुसरें विजापूरकरांवरील वैयक्तिक सूड उगविण्याचें. असली सुवर्णसंधी ( ! ) महाराजांसारख्या धूर्त व्यक्तीनें दवडणें शक्य नव्हतें. हें पत्र हातीं पडतांच त्यांनीं विजापूरकर, त्यांचे सहकारी प्रो. वामन मल्हार जोशी व 'समर्थ' छापखान्याचे व्यवस्थापक जोशीराव यांचे-विरुद्ध लगेच ' राजद्रोह व खुनास उत्तेजन ' या आरोपाखालीं खटला भरून वारंटें काढावयाला लाविलीं व त्यांची बातमी हर्षनिर्भर होऊन सर जॉर्ज क्लार्क यांस खालीलप्रमाणें लिहून कळविली.

महाराजांचें **सर जॉर्ज क्लार्क यांस पत्र.** ( २३ आगष्ट १९०८ )—

" विजापूरकर व त्यांचे स्नेही ह्यांस पकडल्याचें कळलें असेलच. शंका असल्यास आग्रह नाहीं असें आपण लिहिलें त्याबद्दल फार आभारी आहें. पण मला शंकाच नाहीं, म्हणून खटला आरंभिला आहे. ' आपल्यासारखेंच माझें म्हणणें नसतें तर मी तें आपणास आदबशीर रीतीनें कळविलें असतें. **या खटल्यानें लोक चिडल्यामुळें शिवाजी सांप्रदायांतील लोकांनीं हत्यारें जमविण्याचें काम सुरू** केलें आहे. म्हणून मी कांहीं दिवस इकडेच राहणार आहें. **येथल्या सुशिक्षितब्रुव लोकांची टीका कानीं पडूं नये व मजकडे येऊन कोणी भीड घालूं नये म्हणून मी बाहेर तालुक्यांतच फिरत असतों.** "

खटला भरल्याची हकिगत कानांवर येतांच विजापूरकर व प्रो. वामनराव जोशी आपण होऊन ता. २० आगष्ट रोजीं तळेगांवाहून निघून कोल्हापुरांत दाखल झाले व त्यांनीं वारंटें लावून घेतलीं. रा. जोशीराव यांस कोल्हापुरासच पकडण्यांत आलें.

विजापूरकर व प्रो. जोशी यांस कोल्हापुरांत पकडण्यांत आल्यावर तळेगांवास समर्थ विद्यालयांतील त्यांच्या खोल्यांची ता. २१ आगष्ट १९०८ रोजीं संध्याकाळीं ५॥ पासून रात्रीं १२॥ पर्यंत पुण्याचे डे. पो. सुपरिंटेंडंट व कोल्हापूरचे सिटी मॅजिस्ट्रेट यांनीं कसून झडती घेतली. खोल्यांतील सर्व कागदपत्र इतकेंच काय पण केराच्या टोपल्यांत फाडून टाकलेलीं चिटोरींही जप्त करून नेलीं.

खटला पहिल्यानें डि. मॅ. जाधवराव ( कांहीं काळ मुंबई सरकारनें नेमलेले शिक्षणमंत्री ) यांचेपुढें चालला. विश्ववृत्ताच्या दुसऱ्या वर्षाच्या नवव्या अंकांत

रा. श्री. दा. सातवळेकर यांचा 'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख प्रसिद्ध करण्यांत आला होता. यांत '**जे क्षत्रिय शत्रूंच्या सैन्याचा व दुनयेंतील गुलामीचा बीमोड करीत नाहींत त्यांच्या छत्रपतित्वाचा व समशेर-बहाद्दरत्वाचा त्यांच्या राष्ट्राला काय उपयोग आहे?**' असें एक वाक्य होतें. या वाक्यांतील '**छत्रपति**' हा शब्द कोल्हापूरच्या महाराजांस उद्देशून लिहिला असून तो त्यांची बेअब्रु करणारा आहे, इतकेंच नव्हे तर सबंध लेखच '**राजद्रोहात्मक व खुनास** उत्तेजन देणारा आहे' असा आक्षेप घेण्यांत आला. या आक्षेपानुसार विजापूरकर, प्रो. जोशी व जोशीराव यांवर इं. पि. कोडाच्या ३०२, ११५ व १२४ (अ) कलमांखालीं आरोप ठेवण्यांत आले. आरोपीतर्फे रा. आपटे वकील यांनीं काम चालविलें. रा. सा. जाधवरावांनीं खटला सेशनकमिट केला व आरोपींस पुढील चौकशीपर्यंत तुरुंगांत अडकवून ठेवण्याचा हुकूम केला. रा. आपटे वकील यांनीं आरोपींस जामिनावर सोडण्याकरितां त्यांज-कडे प्रार्थना केली, पण ती जाधवरावांकडून फेटाळून लावण्यांत आली. पुढें सेशन-जज्जाकडे अर्ज करून वकिलांनीं जामिनावर व जातमुचलक्यावर आरोपींची सोडवणूक करून घेतली.

'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' हा लेख वाचला म्हणजे असल्या लेखावर आक्षेप घेऊन महाराजांनीं व त्यांच्या पाठिराख्या सरकारनें साप म्हणून दोरीला बडविण्या-पलिकडे कांहीं केलें नाहीं असेंच वाटूं लागतें. संशयपिशाच्चानें ग्रासलेल्या सरकारला या काळांत, कंसाला प्रत्येक ठिकाणीं जसा कृष्ण दिसे तसा राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या प्रत्येक कृतींत 'राजद्रोह' 'खून' हीं दिसत होतीं, एवढेंच अनुमान यावरून काढतां येईल. केसरीकारांनीं यासंबंधीं आपल्या ता. २५ आगष्ट १९०८ च्या अंकांत एक त्वेषपूर्ण व झणझणीत असें खालील स्फुट लिहून सर जॉर्ज क्लार्क यांस या अन्यायाचा जाब विचारला.

"मालकाची चारचाकी गाडी घोडे जोरानें ओढीत असतात, आणि ह्या गाडीचे खालीं कुत्रें पळत असतें. मालकाला वाटतें कीं सावलीच्या आश्रयानें कुत्रें येत आहे; पण कुत्र्याला भ्रम होतो कीं, गाडीला गति आपल्यामुळेंच प्राप्त झाली आहे. अशा प्रकारच्या भ्रमामुळें निंद्य अरेरावीचीं कृत्यें करण्यास तयार होणाऱ्या नोकरां-प्रमाणें कोल्हापूरच्या दरबारचे सल्लागार आपलें हंसें करून घेत आहेत. ×××× येथें मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क ह्यांना असें विचारणें भाग आहे कीं

'वैदिक प्रार्थनांची तेजस्विता' असल्या लेखांवर केलेल्या फिर्यादीच्या स्वरूपाची हांजी हांजी त्यांना खपते काय? असल्या खटल्यांनीं आपण प्रसन्न होतों, असा दुर्लौकिक मुंबई सरकारचा ह्या प्रसंगीं होणें इष्ट आहे काय? इंग्लंडांत ह्या लेखांचीं भाषांतरें जाऊन पोंचल्यावर इंग्लंडच्या इतिहासाच्या चार चौघां प्रतिष्ठित अभिमान्यांत सर जॉर्ज क्लार्क ह्यांना वर तोंड काढतां येईल काय? × × × × अदूरदर्शीपणाबद्दल व बुद्धिहीनत्वाबद्दल ज्या दरबारचे सल्लामसलतगार नांवाजलेले आहेत त्या दरबारचे आड उभें राहून राष्ट्रीय पक्षाचे पुढाऱ्यांना कोठें तरी अडकवून ठेवण्यांत काय पुरुषार्थ आहे? शिखंडीला पुढें करण्यानें अर्जुनाचें काम झालें खरें पण वीरमंडळांत अपकीर्तीच झाली."

'केसरी'कर्त्यांनीं वरील जाब मोठ्या राष्ट्राभिनिवेशानें व आंतड्याला पीळ पाडून विचारला होता. परंतु या अभिनिवेशाची व या पीळ पडण्याची फिकिर सर जॉर्ज क्लार्कसारख्या 'औरंगजेबी' वृत्तीच्या माणसाला कसली? त्याचें किंवा त्याच्या पाठीशीं असलेल्या एकंदर राज्ययंत्राचेंच धोरण जेथें अरेरावीचें, तेथें अमका अन्याय झाला आणि तमका न्याय झाला म्हणणेंच मुळीं चुकीचें. आपल्या कारभारावर, आपल्या हालचालींवर, आपल्या योजनांवर टीका करणारा, स्वतंत्र वृत्तीनें वागणारा व इतरांना तसें वागा म्हणून सांगणारा अभिमानी माणूस सरकारच्या डोळ्यांत नेहमींच सलत असतो. मग विजापूरकरांसारखा गृहस्थ कीं ज्यानें अशा वृत्तीचीं माणसें निर्माण व्हावीं अशा हेतूनें राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें, तो गृहस्थ दुर्वांकुरांप्रमाणें सरकारच्या डोळ्यांत तीक्ष्ण वेदना देत सलला नाहीं, तरचआश्चर्य! असो!

विजापूरकरांना पकडल्याची वार्ता ऐकून सरकारच्या युरोपियन व अँग्लोइंडियन बगलबच्चांना पुत्रजन्मानें जितका आनंद झाला नसेल तितका आनंद झाला. याचें प्रत्यंतर **कर्नल फेरीस** यांनीं महाराजांस ता. २३ सप्टेंबर १९०८ रोजीं लिहिलेल्या खालील पत्रांत पहावयास मिळेल. सदर साहेबमजकूर लिहितातः—

"**विजापूरकरांचा गळा फांसांत सांपडला व 'समर्थ' (छापखाना) जप्त करण्यांत आला हें वाचून अत्यानंद झाला.** पण खरेंच नुसत्या इंग्रजांचे खून करण्याला त्यांनीं चिथावणी दिली होती कीं, तुमच्या सुद्धां (खासगी)? पंडितरावांकडे (कोल्हापूरचे सरन्यायाधिश) मात्र

विजापूरकरांचा खटला देऊं नका. तसें केलेंत कीं तो सुटलाच. आणि एकदां दोषमुक्त झालेल्या मनुष्यावर फिरून दोषारोप करणें फार कठीण असतें.''

विजापूरकरांचा सेशनकमीट झालेला खटला त्या वेळचे न्यायाधीश रा. पंडितराव किंवा रा. गोखले यांच्यापुढें रीतसर चालावयाचा. परंतु दोघेही विजापूरकरांचे स्नेही असल्यामुळें व त्यांच्याविषयीं त्यांना अत्यंत आदर वाटत असल्यामुळें ते त्यांची चौकशी करण्यास तयार होईनात. महाराजांना तरी तेंच पाहिजे होतें. त्यांनीं तावडतोब ब्रिटिश सरकाराकडून त्या वेळेचे पुण्याचे जिल्हा न्यायाधीश (डि. मॅ.) मि. किंकेड यांस या खटल्यापुरतें मागून घेतलें. ता. ११ जानेवारी १९०९ रोजीं दुपारीं किंकेड समोरील हा खटला सुरू झाला. न्यायालयांत लोकांची अतोनात गर्दी जमली होती. विजापूरकरांचें कोल्हापुरांतील लोकांवर वजन विलक्षण! कै. टिळकांचें पुण्यांत जसें वजन होतें, तसेंच किंबहुना त्याहूनही जास्त विजापूरकरांचें वजन कोल्हापुरांत होतें. कोल्हापुरांतील सर्व चळवळींचीं सूत्रें विजापूरकरांकडूनच हालविलीं जात. कोल्हापुरांतील त्या वेळच्या 'राजारामियन क्लब,' 'सदर्न मराठा बँक,' 'लोकसभा' वगैरे संस्था त्यांच्याच प्रेरणेनें निघालेल्या. त्यांच्या साधुवृत्तीबद्दल व त्यांच्या अत्युत्कट देशभक्तीबद्दल सर्वांना त्यांच्याबद्दल सारखा आदर वाटत असे. अशा स्थितींत लोकांचें खटल्या-संबंधींचें औत्सुक्य दांडगें दिसावें यांत नवल तें काय? महाराजांतर्फे बॅ. ब्रॅन्सन व बॅ. बिनिंग व विजापूरकरप्रभृतींतर्फे ना. दाजीसाहेब खरे व रा. पुरुषोत्तमपंत खरे हे काम चालवीत होते. बॅ. ब्रॅन्सन यांनीं आक्षिप्त लेखांत कोल्हापूरच्या महाराजांचा उल्लेख केला असून तो लेख राजद्रोहात्मक व खुनास उत्तेजन देणारा आहे; त्यांत कोल्हापूरचे महाराज विश्वासास पात्र नाहींत असें महाराजांचें वर्णन करण्यांत आलें असून त्यावरून आरोपी नंबर दोनचा (विजापूरकरांचा) वाईट हेतू सिद्ध होण्या-सारखा आहे, असें प्रतिपादिलें. ना. खरे यांनीं बॅ. ब्रॅन्सन ह्यांनीं या लेखाचा दाखविलेला उद्देश चुकीचा आहे, इतकेंच काय पण लेखांत महाराजांसंबंधीं एक शब्दही नाहीं, असें उलट प्रतिपादिलें. 'वैदिक प्रार्थनांत उन्नति करून घेऊं इच्छि-णाऱ्या व्यक्तीसाठीं किंवा राष्ट्रासाठीं केवढी तेजस्वी शिकवण भरलेली आहे' हें दाखविणें यापलिकडे या लेखाचा अन्य उद्देश नव्हता, असें नामदारसाहेब पुढें म्हणाले. उभयपक्षांचे बॅरिस्टर व वकील यांचीं उत्तर प्रत्युत्तरें झाल्यावर कांहीं-जणांच्या 'छत्रपति' या शब्दाच्या अर्थासंबंधीं साक्षी घेण्यांत आल्या. यांतील

महत्त्वाची साक्ष कोल्हापूरचे सध्यांचे दिवाण व त्या वेळचे राजाराम महाविद्यालयांतील अध्यापक रा. लट्ठे यांची होय. यांनीं या आक्षेपित लेखाचें इंग्रजींत भाषांतर करून दिलें होतें. त्यांनीं ' छत्रपति ' हा शब्द कोल्हापूरच्या महाराजांस व ' समशेरबहाद्दर ' हा शब्द गायकवाडसरकारांस अनुलक्षून आहे असें सांगितलें. हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांत या दोन पदव्या वरील दोन महाराजांखेरीज दुसऱ्या कोणालाही नसल्यामुळें वरील शब्द हे त्यांनाच अनुलक्षून आहेत असें त्यांनीं सांगितलें. यानंतर आरोपींचे जबाब घेण्यांत आले. विजापूरकरांनीं पुढीलप्रमाणें जबाब दिला. " २५ सप्टेंबर १९०५ पावेतों मी राजाराम कॉलेजांत संस्कृतचा प्रोफेसर होतों. मुलांना योग्य मार्गाला लावण्याकडे मी आपल्या वजनाचा उपयोग करीत नाहीं, अशा आरोपावरून प्रोफेसरचे जागेवरून दूर केल्याचा हुकूम या वेळीं मला मिळाला. त्यानंतर सहा महिन्यांनीं १९०६ सालीं मी विश्ववृत्त सुरू केलें. चाकरीवर असतांना मी ' ग्रंथमाला ' नांवाचें मासिक काढीत असें. पहिल्या वर्षी मी एकटाच ' विश्ववृत्ता 'चा संपादक होतों. मागाहून तिसरे आरोपी ( प्रो. वामनराव जोशी ) यांची मदत मला मिळाली. १९०७ च्या एप्रिलानंतर ' विश्ववृत्ता 'शीं असलेला माझा संबंध तोडून सगळें काम रा. जोशी यांजकडे मी सोपविलें. समर्थ विद्यालयाच्या शाळेच्या कामामुळें मी असें केलें. मासिकाचे संपादकांत बदल झाला तेव्हां प्रतिज्ञालेखांत मी बदल केला नाहीं. मला ज्या रोजनिशा दाखविल्या—( खटल्याचे वेळीं तळेगांवीं जप्त केलेल्या रोजनिशा कोर्टापुढें ठेवण्यांत आल्या होत्या. ) त्या माझ्या आहेत. विश्ववृत्ताशीं संबंध सोडल्यावरही मी त्यांत लेख लिहीत असें. वही मला दाखविली तीही माझ्या हस्ताक्षरांत आहे. रा. जोशी यांच्या खोलींत सांपडलेला लेख मी लिहिलेला नाहीं. ' वैदिक प्रार्थनांची तेजस्विता ' या मथळ्याखालील लेखाची मूळ लेखी प्रत तो लेख प्रसिद्ध होण्यापूर्वी मी पाहिली नव्हती. हा लेख मीं गेल्या आगष्टमध्यें वाचला. रा. जोशी यांचेबरोबर मी केव्हांही संपादक नव्हतों. माझ्याशीं पत्रव्यवहार न करतां रा. जोशी यांच्याशीं मासिकासंबंधींचा पत्रव्यवहार करावा अशी जाहिरात मीं मासिक पुस्तकाच्या मागल्या पानावर दिली होती. मासिकांत प्रसिद्ध होणारीं स्फुटें मीं कधीं लिहिलीं नाहींत; पण माझे लेख संपादकानें या मथळ्याखालीं घातले असतील. मी हें मासिक पुढें चालविणार नाहीं अशा अर्थाचें पत्र कोल्हापूरच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटांना मी आगष्ट महिन्यांत लिहिलें होतें. "

यानंतर प्रो. जोशी यांची जबानी झाली. मासिकासंबंधींची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे असें त्यांनीं सांगितलें व ते पुढें म्हणाले, "आक्षिप्त स्फुटें मी लिहिलेलीं नाहींत. तीं कोणी लिहिलीं हें 'संपादकाची गुप्त गोष्ट' म्हणून मी सांगूं शकत नाहीं. **आरोपित लेख फक्त विद्वान लोकच वाचतील, अशी माझी समजूत होती. या लेखानें खुनास चिथावणी होते असें फक्त मूर्ख असेल त्यासच वाटेल. आपल्या शत्रूंशीं नम्रपणानें व कितीही नुकसान सोसावें लागलें तरी तें सोसून त्यांस क्षमा करीत राहावयाचें, असें कोणी वागूं नये, एवढाच या लेखाचा अर्थ आहे."**

जबान्यांनंतर 'खुनाचा' मुद्दा मि. किंकेड यांनीं उपस्थित केला. त्यांनीं बॅ. ब्रॅन्सन यांना विचारलें, "तुमचें म्हणणें सगळें खरें धरलें, तरी कोणाचा प्रत्यक्ष खून झालेला नाहीं; इतकेंच नव्हे तर खून करण्याचा प्रयत्नही झालेला नाहीं, तेव्हां 'खुनाला मदत' देण्याचा आरोप कसा लागू पडणार? खून न होतां, किंवा प्रयत्नही नसतां, खुनाच्या उत्तेजनाचें कलम कसें लावावयाचें?" यावर बॅ. ब्रॅन्सन यांनीं अशी कोटी लढविली, "समजा कीं, एखादा मनुष्य एखाद्या जनसमूहावर गोळीबार करण्याची इच्छा करतो आहे. तो अर्थात समूहांतील कोणाला तरी गोळी लागावी अशी इच्छा करणार. अमक्या मनुष्यालाच लागावी असा त्याचा हेतु असेलच असें नाहीं. कोणाचें नांवगांवही त्याला ठाऊक नसेल. पोलिसांनाही कदाचित् नांवगांव मिळणार नाहीं. त्या मनुष्याची गोळी कोणास लागली नाहीं, किंवा गोळी उडालीच नाहीं किंवा त्यानें बंदूक झाडलीच नाहीं. तथापि खुनाची इच्छा सिद्ध झाल्यास तो गुन्हेगार होईल,—मग खून होवो किंवा न होवो, कोणाचा खून करावयाचा हें ठाऊक असो वा नसो."

किंकेड साहेबांना हा बॅरिस्टरी दाखला पटला किंवा नाहीं हें समजण्यास मार्ग नाहीं. एवढें मात्र म्हणतां येईल कीं तेही चांगले डोकेबाज होते. कारण मूळ लेख वैदिक प्रार्थनांविषयींचा असून त्याचाच तेवढा विचार केला तर तो सोंवळा आहे हें त्यांनीं जरी आपल्या निकालांत कबूल केलें; तथापि "हा असा लेख विशिष्ट परिस्थितींत छापला हा दोषच समजला पाहिजे" अशा आशयाचा शेरा त्यांनीं मारलाच!

झालें. खटल्याचा निकाल जाहीर करण्यांत आला. विजापूरकरांना तीन वर्षे साधी, प्रो. जोशी यांस तीन वर्षें सक्त मजुरी व विनायकराव जोशीराव यांस दीड वर्ष सक्त मजुरी अशी शिक्षा ठोठावण्यांत आली.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

खटल्याचें निरीक्षण कितीही सूक्ष्मपणें केलें तरी त्यांत दिलेला न्याय कोणालाही पटण्याजोगा नव्हता. खुद्द न्यायाधिशालाहि प्रत्यक्ष असा आरोप सिद्ध करतां आला नाहीं. या खटल्याच्या निकालाच्या न्याय्यान्याय्यतेची मार्मिक चिकित्सा ' आजन्म जिज्ञासु ' हें टोपण नांव धारण केलेल्या एका लेखकानें ' मनोरंजन ' मासिकाच्या आक्टोबर १९२६ च्या अंकांत खालीलप्रमाणें केली आहे.

" आधीं मुख्य आक्षेपविषयक लेख श्रीपाद दामोदर सातवळेकरांनीं लिहिलेला. ते कधीं राजकारणांत पडले नव्हते. विषय " वैदिक प्रार्थनांची तेजस्विता. " वेदाचा प्रचलित राजकारणाशीं संबंध काय ? बरें, प्रतिपादनांत तरी राजकारण भरलें होतें काय ? फक्त एक वाक्य प्रचलित राजकारणाशीं साक्षात् रीतीनें संबद्ध असें खुद्द फिर्यादीपक्षाचें म्हणणें. न्यायाधीश आपल्या जजमेंटमध्येंच कबूल करतात कीं हा लेख या काळीं—या विशिष्ट परिस्थितींत, या राजकीय चळवळीच्या प्रसंगीं—लिहिला गेला म्हणून दूषणीय; इतर परिस्थितींत लिहिला गेला असता तर त्यांत दूषणीय कांहीं नाहीं. म्हणजे राजकीय वातावरण खवळलेलें असल्यामुळें अनाक्षेपणीय लेख आक्षेपार्ह झाला ! राजकीय वातावरण खवळविण्याचें पाप लेखकानें किंवा विश्ववृत्ताच्या संपादकांनीं केलें होतें काय ? नाहीं. सौम्य, शुद्ध लेख का असेना, तो भलत्या वेळीं प्रसिद्ध केला हा एवढा फार तर गुन्हा. बरें, अशा परिस्थितींतच लेख मुद्दाम प्रसिद्ध करावा असा लेखकाचा किंवा संपादकाचा हेतू होता काय ? नाहीं. फिर्यादीतर्फे पुरावा याबाबत मुळींच नाहीं. उलट अण्णा विजापूरकरांनीं हा लेख पाहिलाहि नव्हता हें वामनराव जोशी यांच्या कबूली जबाबावरून स्पष्ट झालेलें. मग अमक्या वेळींच अमक्या दुष्ट बुद्धीनें तो प्रसिद्ध करावा अशी अण्णांची इच्छा होती या म्हणण्यांत अर्थ काय ? आतां, कायदेशीर रीतीनें ते जबाबदार होते व चुकून का होईना, शुद्ध स्वरूपाचा लेख भलत्या वेळीं त्यांच्या मासिकांत प्रसिद्ध झाला, याबद्दल ते कायदेशीर रीत्या जबाबदार धरले पाहिजेत. ' कायदा ' असा आहे हें कबूल. पण ' The law is an ass ' असें जें म्हणण्यांत येतें तेंच येथें म्हणावेंसें वाटतें. आणि ' भलत्या काळीं प्रसिद्ध झालें ' याविषयींसुद्धां असें म्हणावेंसें वाटतें कीं, बाबांनो ' भलत्या काळीं प्रसिद्ध झाला हें तुमचें म्हणणें अक्षरशः खरें आहे, कारण त्या तशाच काळीं अशा शुद्ध स्वरूपाच्या ' वैदिक ' लेखाबद्दल तीन वर्षांची सजा मिळणें शक्य होतें. "

खटल्याच्या निकालाच्या दिवशीं कोर्ट टाऊन हॉलमध्यें बसलें होतें. तिकडे जाण्याच्या रस्त्यावर अंतरा अंतरानें पोलीस उभे केले होते. टाऊन हॉलच्या रस्त्यावर लोकांनीं एकत्र जमून उभें राहूं नये, अशा आशयाचा जाहिरनामा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें काढला होता; हॉलच्या बागेंत व दिवाणखान्यांत पोलीस ठेवले होते. हॉलमध्यें फक्त शंभर लोकांनाच येऊं दिलें. जज्जाच्या दोन्ही बाजूंस पोलीस व पट्टेवाले उभे केले होते; छत्र्या, काठ्या, व जोडे यांसही हॉलमध्यें मज्जाव केला होता. जणूंकाय एखाद्या दरोडेखोरावरीलच तो खटला होता ! असा बंदोबस्त केला नाहीं तर हॉलमध्यें व हॉलच्या बाहेर बंड उभें राहील अशी सरकारास भीति वाटली कीं काय कोण जाणे !

तिघांही आरोपींची तुरुंगांत रवानगी झाली. सर्व मोहांचे पाश तोडून टाकून देशाचा वैभवकेतू उंचावण्याकरितां सरसावलेले विजापूरकरांचे हात लोहशृंखळांनीं बद्ध करण्यांत आले. पारतंत्र्याच्या खोड्यांत अडकलेल्या देशाला त्यांतून मुक्त करण्याकरितां धडपडणाऱ्या विजापूरकरांचे पाय तुरुंगांतील खोड्यांत अडकविले गेले. महाराजांनीं कित्येक दिवसपर्यंत योजिलेला सूड मनाजोगता साधून घेतला.

आरोपींना पहिले एक दोन महिने कोल्हापूच्या तुरुंगांत व नंतर पन्हाळ्यास पाठविण्यांत आलें. या ठिकाणीं त्रिवर्गास बऱ्याच सवलती दिल्या होत्या. त्यांनीं खुशाल पुस्तकें वाचावीं किंवा त्यांवर वादविवाद करावे, जेलच्या अधिकाऱ्यांनीं त्यासंबंधीं फारसें लक्ष घालूं नये, असें चाले. पण एक दिवस या सर्व सवलती काढून घेण्यांत येऊन त्यांस अत्यंत कडक शिस्तीच्या अशा फाजी पहाऱ्यांत ठेवण्यांत येऊं लागलें. याला कारण बऱ्याच अंशीं कर्नल फेरीस—त्या वेळचे कोल्हापूरचे पोलिटिकल एजंट—हे असावेत अशी समजूत आहे.

## ७ कारागृहांतील तीन वर्षे

"होवो शेवटचा हाच माझा श्वास। " बोलणें ना विश्वा(सा)स पात्र जरी ॥
कोणाचाही खून कधीं नाहीं केला। मार्गही दाविला नाहीं कोणा॥
राजद्रोह नाहीं केला म्यां कधींही। परी करागेहीं आलों देखा ॥
अहितांत हीत म्हणतात तें हें। संधी खाशी लाधे भजनाला ॥
विश्रांती एकांत बाहेर न मिळे। दोनीही आढळे सुखें येथें ॥
किती उपकार मानावे रायाचे। भजन देवाचें घडविलें ॥
दास दास म्हणे भक्तावरीं कृपा। सकळांच्या बापा करीं सदा ॥"

[ विजापूरकरांनीं अहमदाबादच्या तुरुंगांत रचलेला अभंग. ]
तुरुंगांतील टिप्पण वहीवरून.

श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं थोर पुरुषाचें वर्णन करतांना एके ठिकाणीं म्हटलें आहे, 'आकाश हें वोसरो। पृथ्वी वरी विरो। परी नेणें मोहरों। चित्तवृत्ति ॥'

विजापूरकरांची वृत्तीहि या तेजस्वी उक्तीप्रमाणेंच होती. आपत्तीनें डगमगून जाणाऱ्यांपैकीं ते नव्हते. स्वतःच्या सुखदुःखांविषयीं त्यांच्या मनाला हर्षविषाद कधींच शिवला नाहीं. कशीही परिस्थिति आली तरी मन शांत ठेऊन, जें कांहीं कार्य करावेंसें वाटेल तें करीत राहावयाचें हाच त्यांचा आमरण बाणा होता. सरकारनें तुरुंगांत डांबलें, हातीं घेतलेल्या कार्यांची हानी झाली, तरी त्यांना त्याबद्दल विषाद वाटला नाहीं. आपल्याला तुरुंगांत अडकविण्यांत इंग्रज सरकारचा जरी वाईट. हेतु असला तरी सर्व सरकारांचा सरकार जो परमेश्वर त्याचा त्यांत चांगलाच हेतु आहे, असें त्यांनीं मानलें. बाहेर विश्रांति, एकांत मिळत नाहीं तो परमेश्वरानें मिळवून दिला, व आपलें भजन करण्याची सोन्याची संधि आणून दिली, अशी त्यांनीं आपली समजूत करून घेतली.

विजापूरकरांना पन्हाळ्याच्या तुरुंगांतून पुन्हां कोल्हापूरच्या तुरुंगांत आणलें. या ठिकाणीं त्यांचे फारच हाल झाले. जी खोली रहावयाला दिली होती, त्या खोलींत जिकडे तिकडे ओलच ओल होती; निजण्यापुरतीदेखील पुरतीशी कोरडी जागा नव्हती ! यावेळची एक आठवण प्रो. वामनराव जोशी यांनीं ' टिळक महाविद्यालय त्रैमासिकाच्या ' खास विजापूरकर अंकांत प्रसिद्ध केली आहे. ते म्हणतात, " मानसिक त्रासही कमी नव्हता. शिक्षेच्या न्याय्यान्याय्यतेचा विचार सोडून दिला तरी दुसऱ्या किती तरी जाचक गोष्टी त्यांच्या मनाला शीण आणत होत्या. उदाहरणार्थ, एके दिवशीं आमची तिघांची झडती झाल्यावर ' तीं जानवीं काढून ठेवा ' असें शिपाई आम्हांला सांगूं लागले. आम्हीं पुष्कळ हुजत घातली, पण तें शिपाई ऐकेनात. अखेर कंटाळून व वैतागून विनायकरावांनीं व मीं विचार केला कीं, पुढें काय प्रायश्चित्त घ्यायचें तें घेऊं, आतां या मूर्खांच्या अंगावर जानवें फेंकून द्यावें झालें. असा विचार करून आम्हीं दोघांनीं तर वेणीसंहारांतील अश्वत्थाम्यानें ' इयं सा जातिः परित्यक्ता ' असें म्हणून जसें जानवें फेंकून दिलें तशाच प्रकारें केवळ नाहीं, तरी पण तशाच थोड्याबहुत आविर्भावानें जानवीं काढून टाकलीं. पण अण्णांनीं दोन–चार घटकाच नव्हे तर दोनचार तास त्या अडाण्यांशीं वाद घातला. ' जेल मॅन्युअलमध्यें अमुक नियम आहे, तुम्हीं आपल्या वरिष्ठांना विचारून या, ते तुम्हांवर रागावणार नाहींत ' इत्यादि प्रकारचा वेदान्त ते त्या मूर्खांना हरतऱ्हेनें सांगूं लागले. पण त्यांचें एकच सडेतोड व उद्धटपणाचें उत्तर होतें. ' हम ए कुच जानता नहीं. ' गाढवांपुढें गीता वाचण्याचा हा प्रकार इतका

वेळ चालला कीं शेवटीं अण्णांना आम्हीं दोघांनीं सांगितलें कीं, 'अण्णा, यांच्या नादीं लागण्यांत अर्थ नाहीं. आपण मागाहून प्रायश्चित्त घेऊं. उगाच हे अडाणी लोक अंगाला हात लावतील व आपली भलतीच शोभा करतील. वगैरे वगैरे' अखेर अण्णांनीं जानवें काढून दिलें, पण देतांना त्यांना जें वाईट वाटलें तें वर्णन करून सांगतां येणार नाहीं. हल्लींच्या माझ्या दृष्टीनें जानव्याबद्दल इतका आग्रह मला आवश्यक वाटत नाहीं. पण मी कितीही सुधारक झालों, तरी अण्णांसारख्यांच्या प्रामाणिक श्रद्धेंतील व आग्रहांतील दिव्यत्व मला केव्हांही आदरणीयच वाटणार. अस्तु. असल्या या सात्विक ब्राह्मणावर 'खुनाचा' आरोप ठेवणारानें ठेवला कसा व जज्जानें तो आरोप सिद्ध मानला कसा हें गूढच आहे. अथवा, गूढ तरी कसलें ? जगांत असले विपरीत प्रकार काय थोडे होत आहेत ? सॉक्रेटीस, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी इत्यादिकांवर नाहीं नाहीं ते आरोप येतात व सिद्ध होतात, मग प्रो. विजापूरकरांना तरी अपवाद कोटींत कोण कां घालणार ? जगांत भौतिक वादळानें किती तरी झाडें फळांफुलांसुद्धां उन्मळून खालीं पडतात, त्यांतलाच हा मानवी जगांतला प्रकार मानवा झालें."

कोल्हापूरच्या तुरुंगांतून पुनः या तिघांची लवकरच उचलबांगडी करून संस्थानाबाहेरील तीन तुरुंगांत त्यांस वेगवेगळें ठेवण्यांत आलें. विजापूरकरांची रवानगी अहमदाबादच्या सेंट्रल जेलमध्यें झाली. येथील पहिले कित्येक दिवस त्यांचे हालअपेष्टेंत गेले. कोल्हापुरांतील तुरुंगांत जाणून बुजून अव्यवस्था केली गेल्यामुळें त्यांची प्रकृति ढांसळली. त्यांचें पोट वारंवार बिघडूं लागलें. ताप येऊं लागला, शरीराला सूज आली. तोंडांत घांस घालण्याची सोय राहिली नाहीं. सारी रात्र आणि दिवस डोकें ठणकावें. पन्हाळ्याला प्रकृती चांगली झाली होती व वजनही वाढलें होतें, तें एकदम कमी झालें. मृत्यु येईल तर बरें असें वाटूं लागलें. तशांत तुरुंगांतील अधिकाऱ्यांची, कोल्हापूर तुरुंगाच्या अधिकाऱ्यानें त्यांच्या वर्तनाबद्दल वाईट मजकुर लिहिल्यामुळें, मर्जी खप्पा झालेली. पुढें हळु-हळू सदर अधिकाऱ्यांचीं मनें त्यांनीं आपल्याकडे वळवून घेतलीं व त्यांची पुढें नीट व्यवस्थाही ठेवण्यांत आली.

या तुरुंगांतील आपले सारे दिवस त्यांनीं स्वाध्यायांत, आत्मचिंतनांत व तत्वचिंतनांत घालविले. त्यांनीं फारच थोडे ग्रंथ वाचले पण जे वाचले ते

चिंतनपूर्वक वाचले; याशिवाय त्यांनीं [illegible] व रामदासी वाङ्मय यांचें पाठांतरही बरेंच केलें होतें. या ग्रंथांपैकीं वाल्मिकीरामायण, व बायबल या दोन ग्रंथांचें तर त्यांनीं फार मार्मिक अध्ययन केलें होतें, असें त्यांच्या तुरुंगांतील टिप्पणवह्यां-वरून वाटतें. रामायणांतील श्लोक किंवा बायबलांतील परिच्छेद वाचला म्हणजे त्यावर स्वतःच स्वतःशीं चर्चा करावयाची व त्या चर्चेतील मुद्दा किंवा विचार हीं निश्चित झालीं म्हणजे तीं टिप्पणवहींत लिहून ठेवावयाचीं, असा त्यांचा क्रम चाले. पुढील दोन तीन टिप्पणांवरून या चर्चेची कल्पना येण्यासारखी आहे.

> " This is the condemnation, that light is come into the world & men loved darkness rather than light, because their deeds were evil. "

' **जघन्य गुणवृत्तिस्था अधोगच्छन्ति तामसाः ।** तामस लोकांस सर्व विपरीत दिसतें. त्यांच्या बुद्धीचें वर्णन असें आहे. **अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता । सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥** अशा लोकांपुढें कितीही ज्ञान सांगितलें तरी उपयोगी नाहीं. प्रकाश म्हणजे ज्ञान जेव्हां होऊं लागेल तेव्हां सत्ववृद्धि होऊं लागली असें समजावें. **सर्व द्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते । ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥** त्याच्या उलट **अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एवच । तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनंदन ॥** ' **तमः सृष्टि** ' बदलून सत्वस्वरूपी होते असें दिसत नाहीं. उलट दोन प्रकारची सृष्टि आहे असें स्पष्ट सांगितलें आहे. ज्यांस कधींही मुक्ति नाहीं, सदा सर्वदा आसुरी योनींत रहावें लागेल अशा लोकांचा वर्ग निराळा आहे. हेंच मत ' Called ' या शब्दावरून ख्रिस्त-शास्त्राचें दिसतें. वरचेवर म्हटलें आहे, ' **आहूत** ' म्हणजे ज्यांना मुक्ती स्वीकारण्यास पूर्वीच पसंत केले आहेत, त्यांसच देवावर श्रद्धा ठेवण्याची बुद्धि होईल, इतरांस होणार नाहीं. येथेंही कर्मानुसार बुद्धि होते हा विचार स्पष्ट आहे. **दुर्वृत्त प्रकाशाचा द्वेष करतात** आणि **सत्याचार-वानास ज्ञान प्रिय असतें** हा विचार आहे. मग परमेश्वर पतितपावन आहे व ' **अपिचेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥** आणि त्याचा परिणामही वर्णिला

आहे. '**क्षिप्रं भवति धर्मात्मा**' वगैरे. या दोन्ही विचारांची एक वाक्यता करण्यास एकच मार्ग दिसतो कीं, **उद्धार्य** लोक मूळचे '**दैव**' भूत सर्गापैकीं किंवा 'आहूत' वर्गापैकीं असून पातकी झालेले. **अदृष्ट** (अर्थात् मानवाला अदृष्ट) ज्याचें चांगलें म्हणजे जो मूळचा 'आसुर' नव्हे तो उद्धरेल, त्यासच भगवदुपासनेची किंवा अनुतापाची प्रवृत्ति होईल. मनुष्यास अगम्य अशा स्वरूपाची गोष्ट आहे. सर्वांस सारखा उपदेश करून **उद्धार्थे** ते उद्धारावेत अशी मानवी गुरूची प्रवृत्ती. ईश्वरी कृपा होऊन ज्यांस अंतर्ज्ञान मिळालें असेल असे गुरू यासाठींच श्रेष्ठ मानावयाचे. ते '**आसुर**' वर्गावर मेहनत करणार नाहींतच. कालिदास, गुरूच्या दोषांपैकीं **अद्रव्यपरिग्रह** म्हणजे ज्यावर कार्य घडणार नाहीं अशा शिष्यास शिकवूं लागणें हा एक दोष मानतो. '**पात्रविशेषन्यस्त**' गुण परिणाम करतो. **क्रियाहि वस्तूपहिता प्रसीदति**' या लौकिक उदाहरणावरून वरील **मुक्तिपात्र** व **मुक्तिबाह्य** किंवा '**आहूत**' व 'तदितर' कल्पना उपपन्न म्हणजे चांगली जुळणारी आहे असें दिसतें. बाकी परमेश्वर सर्व शक्तिमान असल्याकारणानें अमकी गोष्ट अशक्य आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. पण आगम ग्रंथांत आपलें राज्य अमक्या धोरणानें चाललें आहे अशी फोड दिसते. त्यावरून मानव पामरांनीं थोडाबहुत विचार करावयाचा आहे. ज्याला त्याला आपण देवाचे लाडके आम्हीं, आपण 'आहूतां'पैकीं आम्हीं, असें वाटून देवपरायणता उत्पन्न व्हावी इतकीच इच्छा करणें शक्य आहे. आपलें राष्ट्र ईश्वरास प्रिय, आपण त्याचे वेंचक किंवा निवडक दास, भक्त, पुत्र, भृत्य, सेवक आम्हीं आणि आपणांस तो कधीं अंतर देणार नाहीं असें पृथ्वींतील सर्व राष्ट्रांस वाटेल व तदनुरूप वर्तन घडेल तो सुदिन."

बायबलांतील अध्यायांतील परिच्छेदांमागून परिच्छेदांवर त्यांनीं अशा तऱ्हेची चर्चा केली आहे. इतकी मार्मिक व विद्वत्ताप्रचूर व साक्षेपी चर्चा हिंदु पंडितानें तर सोडाच पण अनन्य अशा एखाद्या हिंदी ख्रिस्तभक्तानेंहि केली नसेल. विजापूरकर हे कडवे हिंदु होते, कर्मनिष्ठ ब्राह्मण होते. पण त्यांचे विचार संकुचित नव्हते. तुकाराम, रामदास, एकनाथ, कबीर, ज्ञानदेव या वंदनीय साधुश्रेष्ठांप्रमाणेंच ख्रिस्त हीही एक वंदनीय, अनुकरणीय विभूति होऊन गेली असें त्यांचें मत होतें. यामुळें दासबोध, ज्ञानेश्वरी व रामायण हे ग्रंथ जसे त्यांना अत्यंत प्रिय वाटत त्याप्रमाणें बायबलही त्यांना वाटे.

रामायणांतील कित्येक श्लोकांवरही त्यांनीं अशीच चर्चा केली आहे. ही चर्चा आध्यात्मिक स्वरूपाची नसून व्यावहारिक स्वरूपाची—सद्यःस्थिती समोर ठेऊन केलेली—अशी आहे. नलसेतुबंधनाचें वर्णन वाचून त्यांना सुचलेले पुढील विचार पहा:—

" जें काम माणसांनीं हातानें केलें असतां सहज होणार नाहीं किंवा थोडें होईल, तें सुखानें व मोठ्या प्रमाणावर करणारीं यन्त्रें आतां निर्माण झालीं आहेत व तीं पाश्चात्यांच्या बुद्धिपराक्रमांचीं फलें आहेत; पौरस्त्य अशा कामांत बुद्धिहीन व कर्तृत्वशून्य आहेत, असे स्वदेशावमानक विचार फैलावले म्हणजे मनुष्य मंदोत्साह होतो. **फाजील व मिथ्या अभिमान जसा घातक तसाच फाजील व मिथ्या अवमानही** आहे. मोठमोठीं स्थापत्यनैपुण्यदर्शक कामें भूजलप्रदेशावर ज्या देशांत झालीं ( कित्येकांचे अवशेष व कित्येकांचें समग्र स्वरूप अद्यापि दृश्यमान आहे ) त्या देशांतील लोक हताशत्व सोडून कार्यकर बनतील तर अजून तशीं कामें होतील. 'पर्वतांश्च समुत्पाट्य यन्त्रैः परिवहन्ती च' ही पंक्ति लक्षणीय आहे."

तुरुंगांतील टिप्पण वह्यांत अशा तऱ्हेचे अनेक विचार त्यांनीं लिहून ठेविले आहेत. त्यांपैकीं कांहीं मार्मिकपणें निवडून काढून प्रकाशित केल्यास त्यायोगें विचारप्रवर्तक वाङ्मयांत एक उत्तमप्रकारची भर पडेल.

या टिप्पण वह्यांच्या आरंभींच्या पानांवर 'मूकं करोति वाचालं' हा नमनाचा श्लोक व त्याखालीं 'काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम् । व्यसनेन तु मूर्खाणां निद्रया कलहेन वा ॥" हा श्लोक लिहिलेला असे. हा श्लोक त्यांच्या तुरुंगांतील आयुष्याची नीट कल्पना आणून देणारा आहे. तुरुंगांतील दिवस त्यांनीं इतरांप्रमाणें निद्रेंत, कलहांत किंवा व्यर्थ चिंता करण्यांत घालविले नाहींत. काव्यशास्त्रविनोदांत व हरिचिंतनांत त्यांनीं ते दिवस घालविले. आपल्याला मिळालेल्या एकांताचा उपयोग आपलें मन शुद्ध, सुविचारी, खंबीर व निश्चयी करण्याकडे त्यांनीं केला. त्यांनींच रचिलेल्या एका श्लोकांत त्यांनीं म्हटलें आहे कीं,

" तैसा आला पुन्हां हा सुखकर करुणायोग दुःखासुखाचा ।
तीन्ही संपूर्ण वर्षें सुखकर घडला वास कारागृहाचा ॥
चित्ता आराम झाला फुरसत भजना ईश्वराच्या मिळाली ।
चिंताया शांतचित्तें निजजन सुदिना संधि ही ठीक आली ॥ "

कारागृहांत असतां त्यांना आपल्या गतवर्तनाबद्दल खेद वाटून सरकारची माफी मागण्यास किंवा आपली सोडवणूक करून घेण्यासाठीं विनंतीअर्ज करण्यास त्यांनीं तयार व्हावें, एतदर्थ कारागृहाधिकाऱ्यांकडून अप्रत्यक्ष प्रयत्न होत. एकदां एका अधिकाऱ्यानें तर, एके काळीं 'बंगालचा वाघ' म्हणून प्रसिद्ध असलेले बाबू बिपिनचंद्र पाल यांस राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा झाली असल्याची बातमी कळविण्याचे मिषानें, विजापूरकरांस 'राजनिष्ठे' वर एक लांबलचक व्याख्यानही दिलें. विजापूरकरांनीं हें व्याख्यान शांतपणें ऐकून घेतलें. कांहीं उत्तर दिलें नाहीं. ओंठावर फक्त स्मित आणून ते स्वस्थ बसले.

कारागृहांतील शेवटचे दिवस त्यांना अतिशय कंटाळवाणे गेले. आपली मुक्तता केव्हां एकदां होते असें त्यांस झालें होतें. शेवटीं तो दिवस उजाडला. ता. १८ डिसेंबर १९११ रोजीं त्यांची तुरुंगांतून सुटका झाली. तुरुंगाच्या कोंदट हवेंतून मोकळ्या हवेनें भरलेल्या प्रदेशांत त्यांनीं पाऊल टाकलें. पण हें पाऊल टाकतांच त्यांना काय दिसलें? सर्वत्र नैराश्य! १९०७–८–९ सालचें तें उष्ण वातावरण आतां थंड झालें होतें. तें इतकें थंड दिसत होतें कीं, सबंध देशावर प्रेतकळा पसरली आहे कीं काय असें वाटत होतें. आणि अण्णा विजापूरकरांचें मूल—जें समर्थ विद्यालय? त्याच्यावरही प्रेतकळा पसरली होती. युद्धाचे ऐन प्रसंगीं गदा-प्रहार होऊन मूर्च्छित पडलेल्या अभिमन्यूप्रमाणें अण्णांचें तें लाडकें मूल मूर्च्छित होऊन पडलें होतें.

---

# ८ समर्थ विद्यालयावरील गंडांतर

दडपशाहीच्या बकासुराचें थैमान १९०८-९-१० या सालांत अनियंत्रितपणें सुरू होतें. राष्ट्रकार्याला खीळ घालणारे, राष्ट्रांत उत्पन्न झालेलें नवचैतन्य दडपून टाकणारे, नवे नवे कायदे अस्तित्वांत येत होते. हात, पाय आणि जिव्हा यांना जखडून टाकणारीं कलमें सरकारी कारखान्यांतून बाहेर पडत होतीं. अशा कलमांपैकींच 'क्रिमिनल लॉ ॲमेंडमेंट ॲक्ट'चें १६ वें कलम होय. या कलमान्वयें 'बेकायदा समित्या-सभा' वगैरे बंद करण्याचा अधिकार सरकारनें स्वतःस घेऊन ठेविला. या अधिकाराच्या जोरावर बंगालमधील व इतर प्रांतांतील कित्येक संस्था लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं सरकारनें कायमच्या बंद करून टाकल्या. हेंच कलम समर्थविद्यालयाच्या मुळावर आलें. गुन्हा कोणता व केव्हां केला याची गंधवार्ताही न लागूं देतां, शुक्रवार ता. १० जून १९१० रोजीं हिंदुस्थान सरकारनें गॅझेटचा जादा अंक काढून या १६ व्या कलमाखालीं 'समर्थ विद्यालय' ही एक बेकायदा मंडळी ( Unlawful Association ) आहे असें जाहिर केलें. लष्करी कायद्यावरही या कलमानें ताण केली! विद्यालयावर या कलमामुळें आकाशींची कुऱ्हाडच कोसळली. अनेक कष्ट सोसून, रक्ताचें पाणी करून मुलाला नांवारूपाला आणतो आहे तोंच त्या मुलावर मृत्यूचा घाला यावा, तशी स्थिती

विद्यालयाची झाली. ज्या विद्यालयासाठीं विजापूरकरांनीं जीवाचें रान केलें, तहान भूक पाहिली नाहीं; कांहीं दिवस टिळकांनीं राजकारण एका बाजूस ठेऊन जें विद्यालय स्वावलंबी व्हावें म्हणून कंबर कसली, त्या विद्यालयाला कायमचें कुलूप लावण्याचा प्रसंग यावा, याहून दैवदुर्विलसित तें कोणतें? गॅझेटमध्यें सरकारचा हा ठराव प्रसिद्ध होतांच विद्यालयाच्या चिटणिसाकडून सरकारकडे निषेधदर्शक तार गेली. ही तार जातांच मुंबई सरकारचे सेक्रेटरी यांनीं विद्यालयाचे चिटणीस ओक यांस भेटीस बोलाविलें. ओक त्याप्रमाणें सेक्रेटरी मि. जे. डी. डुबोले यांस भेटले. त्या वेळीं सरकारतर्फें ओक यांस कोणताही प्रश्न न विचारतां, आरोप कोणता हें न कळवितां व चौकशीही न करतां सेक्रेटरींनीं त्यांचें म्हणणें मात्र ऐकून घेतलें; व त्यांनीं दिलेला खुलासा सरकाराकडे पाठविण्याचें कबूल केलें. हा लेखी खुलासा अतिशय महत्वाचा असल्यामुळें तो जशाचा तसा खालीं देत आहोंः—

मि. जे. डी. डुबोले,

मुंबई सरकारचे सेक्रेटरी, यांसः—

" तळेगांव दाभाडें येथील समर्थ विद्यालयाच्या कामासंबंधानें व हेतूसंबंधानें खालीं दिलेले मुद्दे आपल्यापुढें मांडले आहेत; त्यांचा न्यायाला धरून विचार व्हावा अशी विनंति आहे.

१ " सरकारनें ठरावाच्या रूपानें ' समर्थ विद्यालय ' ही एक बेकायदा मंडळी आहे असें जाहीर केलें आहे. ' समर्थ विद्यालय ' नांवाची मंडळी नाहीं. ' समर्थ विद्यालय ' दहापासून सोळा सतरा वर्षांच्या वयाच्या लहान मुलांना शिक्षण देणारी एक खासगी शाळा आहे. हिचीं उद्देशपत्रकें व अहवाल नियमानें प्रसिद्ध होत आले आहेत. हिला ' बेकायदा मंडळी ' म्हणणें म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास करणें आहे. देशाच्या सध्यांच्या गरजा व पूर्वपरंपरा पाहून, आणि आधुनिक सर्वमान्य शिक्षणक्रमाच्या सुधारलेल्या पद्धतीस अनुसरून महाराष्ट्रांतील मुलांना होईल तितकें उत्तम शिक्षण देण्याचा उपक्रम या शाळेनें केला आहे. या शाळेला ' बेकायदा मंडळी ' असें म्हणून ती बंद करणें हा निवळ अन्याय आहे. ' जर एखाद्या कुत्र्याला मारावयाचें असेल तर तो पिसाळला आहे असें म्हणावें व मग त्याला मारावें ' अशा अर्थाची इंग्रजींत एक म्हण आहे; व आमच्या-संबंधानें सरकारचें वर्तन असेंच होत आहे. "

२ " विद्यालयाचा हेतु ' कायदा व व्यवस्था कायम ठेवण्याच्या कामांत व्यत्यय आणण्याचा आहे, ' असेंही सरकारनें जाहीर केलें आहे. ह्यापेक्षां सत्याला सोडून दुसरी कोणतीच गोष्ट नसेल. ह्या शिक्षणसंस्थेचा उद्देश अशा प्रकारचा मुळींच नाहीं. वर सांगितलें आहे, त्याप्रमाणें ह्या संस्थेचा उद्देश केवळ शिक्षणविषयकच आहे; व ह्यासोबत जोडलेल्या उद्देशपत्रकांतही त्याची दिशा दर्शविली आहे." ( या उद्देशपत्रकांतील उतारा गेल्या प्रकरणांत विषयानुरोधानें दिला आहे.—लेखक )

३ " आम्हांस कायद्याचें कांहीं ज्ञान आहे; त्यावरून ह्या संस्थेनें कायदा व व्यवस्था ह्यांच्या कामांत केव्हांही व्यत्यय आणलेला नाहीं, असें आम्हांस वाटतें. खरोखर कधींही अशा प्रकारचा व्यत्यय आणल्याचें उदाहरणही घडलेलें नाहीं. नाहींतर संस्थेवर कायदेशीर आरोप ठेवून तिची कायद्याचे कोर्टात योग्य ती चौकशी झाली असती."

४ "सरकारनें आणखी असें जाहीर केलें आहे कीं, ' समर्थ विद्यालय ' ही संस्था शांततेस धोका आणणारी आहे. अशा प्रकारचा भयंकर आरोप या संस्थेवर कसा लादला गेला हेंच आम्हांस कळत नाहीं ! अशा प्रकारचें उदाहरण घडून आल्याचें कधींही सिद्ध झालेलें नाहीं. आम्हांला व लोकांना अशा प्रकारच्या भयंकर आरोपाचीं कारणें काय आहेत तीं मुळींच दाखविण्यांत आलीं नाहींत. म्हणून सरकारची ही कृति म्हणजे आमच्या संस्थेचा गुपचुप गळा दाबून जीव घेणें आहे. मुलांच्या शाळेविरुद्ध असा आरोप कसा ठेवतां येतो, हें सांगणें कठीण आहे."

५ " १९०९ च्या मार्च महिन्यांत जेव्हां नेक नामदार गव्हर्नरसाहेबांची मुलाखत आम्हीं घेतली होती, तेव्हां ' जोंपर्यंत तुम्ही निवळ शिक्षणविषयक काम करतां आहां व कोणतेंही आक्षेपार्ह शिक्षण देत नाहीं, तोंपर्यंत तुमच्या वाटेस कोणत्याही प्रकारें जाण्याची आमची इच्छा नाहीं ' असें आश्वासन गव्हर्नरसाहेबां-कडून आम्हांस मिळालें होतें. आमच्या शाळेंत कोणत्याही प्रकारचें आक्षेपार्ह शिक्षण दिलें जात नाहीं, ही गोष्ट मुलांच्या पालकांनीं व इतर सुशिक्षित लोकांनीं त्याचप्रमाणें कांहीं सरकारी अधिकाऱ्यांनींसुद्धां येथील शिक्षणासंबंधीं दिलेल्या अभिप्रायांवरून स्पष्ट सिद्ध होतें. सरकारचा ठराव जाहीर झाल्यावर आमच्या शाळेंतील एका मुलाच्या पालकानें धाडलेल्या पत्रांत आमच्या शिक्षणपद्धतीसंबं-धानें व एकंदर कामासंबंधानें त्यांचें जें मत झालेलें आहे तें स्पष्ट व जोरदार

शब्दांत व्यक्त केलें आहे. या पत्राचें भाषांतर पुढें जोडलेलें आहे. आमची संस्था पाहण्यास दोन डेप्युटी कलेक्टर येऊन गेले. एक गेल्या वर्षी आणि एक ह्या वर्षी. त्यांनीं आमच्या संस्थेच्या कामासंबंधानें व एकंदर व्यवस्थेसंबंधानें आपला अनुकूल ग्रह व्यक्त केला आहे. असिस्टंट डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर ही शाळा पाहण्यास आले होते, तेव्हां त्यांना शाळेंतील निरनिराळे वर्ग चालू असतांना दाखविले आहेत. त्यांनीं वर्ग पूर्ण व्यवस्थेशीर चालू असल्याचें व मुलांची प्रकृति निरोगी असल्याचें आढळून आल्याचा शेरा दिलेला आहे. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांतील व निरनिराळ्या मतांच्या लोकांनीं शाळा पाहून शाळेच्या कामासंबंधानें झालेला आपापला ग्रह वेळोवेळीं व्यक्त केला आहे; व शाळेला पैशाची पाहिजे तशी मदत नसल्यामुळें तिच्या उद्देशाप्रमाणें तिला पूर्णपणें यशःप्राप्ति झाली नसल्याचें पाहून त्यांना फार वाईट वाटल्याचेंही बोलून दाखविलें आहे."

६ "आमची शाळा उघड्यावर असून ती वाटेल तेव्हां पाहण्याची मोकळीक आहे. ती पाहण्यास नेहमीं प्रेक्षक येतात, आणि आम्हीं लाविलेलीं पुस्तकें व आमचा अभ्यासक्रम वगैरेसंबंधानें चौकशी करतात. आमच्या शाळेचीं माहितीपत्रकें व अहवाल हीं वेळच्या वेळीं प्रसिद्ध होतात व आम्हीं तीं फुकट वांटतों. यामुळें आमचें काम गुप्तपणें चाललें आहे असें मानण्यास मुळींच जागा नाहीं. आमच्या तालुक्याचे मामलेदार शाळा पाहण्यास ५-६ महिन्यांनीं एकदां येतात व शाळेंतील प्रत्येक गोष्टीसंबंधानें चौकशी करतात. तरी त्यांनीं आमच्याविरुद्ध कोणतीही तक्रार केली नाहीं."

७ "आमच्या शाळेच्या एकंदर चार झडत्या झाल्या; पण त्यांत गुन्ह्यांस पात्र असें कांहीं सांपडलें नाहीं. डेप्युटी सुपरिंटेंडेंट मि. पॉवर यांनीं तर आमच्या येथें कोणतीही संशयास्पद वस्तु न सांपडल्याबद्दल आपलें समाधान व्यक्त केलें."

८ "हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक नव्या चळवळीचा प्रसार करण्याकरितां व ती चळवळ लोकप्रिय व्हावी म्हणून प्रो. विजापूरकर यांनीं 'समर्थ विद्यालय'-सारख्या संस्थेनें कोणत्या दिशेनें काम करावें व कोणत्या पद्धती अमलांत आणाव्या, याविषयींचा एक निबंध विश्ववृत्त मासिक पुस्तकाच्या १९०६ सालाच्या एका अंकांत प्रसिद्ध केला. पुढें तो निराळा छापला व आमच्या शाळेची माहिती कळवून घेण्याची जे लोक इच्छा दर्शवितात त्यांस हें आम्हीं निराळें छापलेलें पुस्तकच देत होतों.

गव्हर्नरसाहेबांना तें आमच्या शाळेचें माहितीपत्रकच आहे असें वाटलें व त्यांतल्या कांहीं भागासंबंधानें हरकती घेतल्या. हें पुस्तक म्हणजे एका व्यक्तीनें लिहिलेल्या निबंधाची दुसरी आवृत्ति आहे व शाळेनें किंवा मंडळीनें काढलेलें तें माहिती-पत्रक नव्हे, असें आम्हीं गव्हर्नरसाहेबांस त्यावेळीं कळविलें होतें. आमच्या शाळेचें ध्येय व पद्धती हीं दोन्ही स्पष्ट करणारें माहितीपत्रक त्या वेळेस तयार होत होतें व तें तयार झाल्यावर गव्हर्नरसाहेबांस त्याची एक प्रत आम्ही पाठविली; पण तें पोंचल्याचें उत्तर आम्हांस आलें नाहीं. तरी पण सरकारचा गैरसमज दूर झाला असें मानण्यास सबळ कारणें होतीं; अर्थात् गॅझेटमधील ठराव पाहून आम्हांस अतिशय आश्चर्य वाटलें.''

९ "अमक्या अमक्या गोष्टी हरकत घेण्यासारख्या आहेत, अशा तऱ्हेची पूर्व-सूचना आम्हांस मुळींच देण्यांत आली नाहीं; कोणत्याही तऱ्हेचा खुलासा आम्हांस विचारण्यांत आला नाहीं; इतकेंच नव्हे तर हा ठराव करण्यास कोणतें आकस्मिक कारण झालें, तेंही आम्हांस अजून कळविण्यांत आलेलें नाहीं. कोणताही निर्वाणीचा ठराव करण्यापूर्वी ज्यांच्यासंबंधानें तो ठराव करावयाचा त्यांना आपल्या तर्फेनें कांहीं बोलूं देणें हें दोन्ही बाजूंच्या हिताचें असतें व असें करणें हें सरळ न्यायास धरून आहे. परंतु दुर्दैवानें प्रस्तुत प्रकरणांत अशा तऱ्हेचें वर्तन झालेलें नाहीं. असा विलक्षण ठराव करण्यास आमच्या हातून असा कोणता भयंकर गुन्हा झाला, याची आम्हांस तर कल्पनाच करवत नाहीं.''

१० "आमच्या शाळेंत आम्हीं जें शिक्षणविषयक काम करीत आहोंत त्या-संबंधानें मला जें सांगावयाचें आहे तें विस्तारानें व स्पष्ट रीतीनें आतां सांगतों. आमच्या देशाची पूर्वपरंपरा राखण्याकरितां व त्याच्या हल्लींच्या गरजा भागविण्या-करितां येथें राष्ट्रीय शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे. राष्ट्रीय शिक्षण देण्या-करितां आमची शाळा काढली आहे. ब्रह्मचर्य, आवश्यक गुरुगृहवास, आमच्या धर्मांतील तत्त्वांची माहिती, त्याप्रमाणें प्रत्यक्ष आचरण, व व्यास, वाल्मीकि वसिष्ठ, मनु, इत्यादि ऋषींनीं आम्हांकरितां लिहून ठेविलेलीं नैतिक व बौद्धिक विषयांवरचीं पुस्तकें यांचा अभ्यास, इत्यादि आमच्या शाळेंतील अंगें आमच्या पूर्वपरंपरेस धरून आहेत. सर्व राष्ट्रांतून जें शिक्षण देण्यांत येतें तें विद्यार्थ्यांच्या मातृभाषेंतून दिलें जातें. आणि ही सुधारणा आम्हीं केली आहे, ती अत्यंत

महत्त्वाची होय. धंदे व कला यांच्याही शिक्षणाकडे आमचें लक्ष आहे. **आमच्या शाळेंत तयार झालेले विद्यार्थी कोणत्याही संकटाच्या किंवा आणीबाणीच्या प्रसंगीं न डगमगणारे, जोमाचे व स्वतंत्र बाण्याचे निपजतील, अशी आम्हांस आशा आहे. ते केवळ नोकर किंवा विद्येंत गढून गेलेले व पुस्तकांतून जगासंबंधीं ज्ञान मिळविणारे व म्हणून जगांतील व्यवहारांत कुचकामाचे असे न होतां व्यवहारनिपुण व जोमाचे निघतील अशा तऱ्हेचें शिक्षण त्यांस द्यावें, यासाठीं आमची ही खटपट आहे. सामाजिक प्रगतीला ज्या तऱ्हेचीं माणसें अत्यंत जरूर असतात, तशा तऱ्हेचीं माणसें आमच्या शाळेंत तयार व्हावींत यासाठींच आमचे प्रयत्न आहेत.** शिक्षणविषयक सुधारणा आमच्या शाळेंतून होण्यास मोठी अडचण म्हणजे त्या विश्वविद्यालयाच्या अंकित आहेत, व कांहीं मुलें दर वर्षी त्याकरितां आमच्या शाळांस तयार करावयाचीं असतात. घोकंपट्टीच्या व परीक्षांच्या घातकी धोरणास बळी पडल्याचें आमचें स्वतःचेंच उदाहरण आमच्यासमोर असल्यामुळें मुलांच्या शारीरशिक्षणाची आम्ही विशेषच काळजी घेतों."

११ "शिक्षणपद्धती होईल तितकी अलीकडच्या सुधारलेल्या पद्धतीला अनुसरून पूर्णावस्थेस पोंचलेली अशी ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे. इंग्लंड, जर्मनी व अमेरिका इत्यादि सुधारलेल्या राष्ट्रांत अभ्यासक्रम, शिक्षणपद्धत व क्रमिक पुस्तकें यासंबंधानें होत असलेल्या नव्या नव्या सुधारणा अमलांत आणण्याचा आमचा उद्योग आहे; व तिकडील पद्धतीचें सरसहा अनुकरण न करतां त्यांतील उत्तमोत्तम गोष्टी पूर्णपणें आपल्याशा करून घेण्याची आमची खटपट सारखी चालू आहे."

१२ "आमचे उद्देश व आमच्या गरजा ह्यांस पूर्णपणें योग्य अशीं पुस्तकें नसल्यामुळें आमच्या शाळेंतील मुलांच्या व बाहेरील विद्यार्थीवर्गाच्या हातीं देण्यास उपयोगी पडतील अशीं पुस्तकें लिहिण्याचा प्रथमपासून आमचा उपक्रम आहे. आमच्या प्रयत्नांचें फळ 'संस्कृतप्रवेश' या नांवाचें जें पुस्तक आम्हीं नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे तें होय. या पुस्तकाची प्रत आम्हीं ने. ना. गव्हर्नरसाहेबांस थोड्याच दिवसांपूर्वी पाठविली आहे. त्याचप्रमाणें संभाषणपद्धतीनें इंग्रजी भाषा शिकविण्यापासून मुलांचा वेळ व शक्ति पुष्कळच वांचतात व

इंग्रजी चांगलें येतें; असें आढळून आल्यावरून आम्हीं या सुधारलेल्या पद्धतीनें इंग्रजी शिकविण्याकरितां एक पुस्तक लिहून काढलेलें आमच्याजवळ तयार आहे. चार वर्षें अनुभव घेऊन व विचार करून आम्हीं तयार केलेला दुय्यम प्रतीच्या शाळेचा सविस्तर अभ्यासक्रमही तयार आहे. आमच्या उद्देशाला व पद्धतीला अनुरूप अशीं इंग्रजी व मराठी वाचनपुस्तकें व त्याचप्रमाणें इतर विषयांवरील पुस्तकें तयार करून लवकरच प्रसिद्ध करण्याचा आमचा बेत आहे.''

१३ "यावरून आमचा प्रयत्न म्हणजे अद्वितीय, आम्हीं आपल्या मनापासून केलेला, अस्तित्वांत असलेल्या दुसऱ्या शिक्षणसंस्थांना अनुकरणीय असा एक शिक्षणविषयक प्रयोग आहे, हें आपल्याला स्पष्ट कळेल. अर्थात् अशा प्रकारचा प्रयोग यशस्वी होण्यास आम्हांस पूर्णपणें स्वातंत्र्य असणें, हें अतिशय आवश्यक आहे. हुकमत, पुस्तकें, अभ्यासक्रम व शिस्त या सर्व बाबतींत आम्हांला पूर्णपणें स्वातंत्र्य पाहिजे आहे; व म्हणूनच आम्हीं प्रथमपासून तें कायम राखण्याची डोळ्यांत तेल घालून खटपट केली आहे.

१४. "पालकांना त्रास देऊन ते आमच्या शाळेंत आपलीं मुलें न धाडतील, व लोकांना त्रास देऊन ते आमच्या शाळेला वर्गणी न देतील, अशा प्रकारची खटपट पोलिसांनीं आमच्या कामांत आडून आडून व्यत्यय आणण्याच्या उद्देशानें केली असल्याचें दिसतें. म्हणूनच आम्ही सुरू केलेल्या शिक्षणविषयक कामांत लवकर लवकर सुधारणा करून आमच्या हेतूप्रमाणें परिणामकारक काम दाखवितां आलें नाहीं. जर पोलिसांच्या दृष्टीनें आम्ही कांहीं चुका करीत आहों असें होतें, तर त्यांनीं आमच्यावर उघड खटला करावयाचा होता. पण असें करतांनासुद्धां आम्हांला अगोदर सूचना द्यावयाची होती, असें आमच्यासारख्या शिक्षणविषयक कामांत पडलेल्या माणसांना वाटणें साहजिक आहे. परंतु सरळ मार्गाला सोडून आम्हांला त्रास देण्याचे पोलिसांचे हे प्रयत्न त्यांची अनुदार व विकारवश अशी मानसिक स्थिति दर्शवितात. पोलिसांसंबंधानें आम्ही जी अशा प्रकारची भाषा वापरली आहे त्याला सबळ कारणें आहेत. गेल्या एप्रिलमध्यें जेव्हां पुणें जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट सरकारांनीं मना केलेलीं कांहीं पुस्तकें जप्त करण्याकरितां वारंट बजाविण्यास आले होते तेव्हां आमच्या शाळेंतील दोन हजिरीपुस्तकें गहाळ झालेलीं आढळलीं व त्यांपैकीं एक पुस्तक दोन दिवसांनंतर डि. पो. सु. यांनीं आमच्याकडे परत

पाठविलें. ही गोष्ट डि. पो. सु. यांच्या नजरेस आम्हीं आणली; नंतर डि. मॅजिस्ट्रेट यांच्याही नजरेस आणिली. पण दोघांपैकीं एकाकडूनही आम्हांला त्यासंबंधानें कांहींच जबाब मिळाला नाहीं! म्हणून पोलिसांच्या या कृत्यासंबंधानें चौकशी करण्यास ने. ना. गव्हर्नरसाहेबांकडे आम्हीं अर्ज केला. पोलिसांचें हें कृत्य फारच दूषणास्पद होतें. आमचीं हीं तीन पत्रें सरकारला पावल्याचेंसुद्धां सरकाराकडून आम्हांला कळविण्यांत आलेलें नाहीं, याबद्दल आम्हांला खेद वाटतो. आम्हांला पोलिसांची जी आज इतके दिवस सतत आडून आडून त्रास देण्याची खटपट चालू आहे, ती खरोखरच अस्थानीं आहे. वर थोडक्यांत ज्याचें दिग्दर्शन केलें आहे असें बिकट शिक्षणविषयक काम आम्हीं हातीं घेतलें आहे; अशा कामास आम्हांला सरकार व लोक या दोघांच्याही सहानुभूतीची अत्यंत अपेक्षा आहे, व अशी अपेक्षा आम्ही करणें अगदीं साहजिक आहे.

१५. “ आमच्या शाळेच्या उद्देशासंबंधानें व कामासंबंधानें वर जो खुलासा केला आहे, त्याचा आपण शांतपणें विचार करावा अशी आपल्याला व ने. ना. गव्हर्नर साहेबांना आमची नम्र विनंती आहे. आमच्या शाळेची सर्व व्यवस्था उघड आहे व आमची शाळा येऊन पाहण्यास कोणालाही पूर्णपणें मोकळीक आहे. या कारणांमुळें आणि तरुण पिढीला आम्ही जें नैतिक वळण व जी शिस्त लावीत आहों, तिच्यावर समाजाचा पूर्णपणें भरंवसा आहे. म्हणून आमच्या शाळेंतील मुलांच्या पालकांना व इतर सुशिक्षित लोकांना आमच्या शाळेसंबंधानें सरकारनें जाहीर केलेला हुकूम पाहून अंतःकरणापासून दुःख झालें आहे. सर्व गोष्टींचा शांतपणें व निःपक्षपातानें विचार करून न्यायाला योग्य दिसेल असेंच वर्तन सरकार नेहमीं करतें, असा आजपर्यंत लोकांचा सरकारावर भरंवसा आहे. पण एकाएकीं काढलेल्या या जाहीर ठरावानें लोकांच्या वरील प्रकारच्या विश्वासास जबर धक्का बसला आहे. म्हणून सरकारानें आपला ठराव रद्द करावा, अशी आमची त्यांस विनंति आहे. असें केल्यानें लोकांचा सरकारावरील विश्वास व त्यांची कृतज्ञता द्विगुणित होईल अशी आम्हांस खात्री वाटते. ”

विद्यालयाच्या चिटणिसांनीं सादर केलेला हा खुलासा सरकारनें विचारांत घेतला असावा असें दिसत नाहीं. यासंबंधीं चिटणिसांस साधें ‘पोंची’चेंही उत्तर आलें नाहीं. वास्तविक या बाबतींत सरकारनें अधिक खुलासा करून घेऊन

किंवा 'अमुक अमुक गोष्टी करा, नाहीं तर अमुक अमुक रीतीनें सरकार तजवीज करील' असा निर्वाणीचा इषारा तरी द्यावयास पाहिजे होता. लष्करी कायदा तडकाफडकीनें अमलांत आणतात, परंतु तो अमलांत आणण्यापूर्वी—घाईनें का होईना—लष्करी कोर्ट भरून गुन्हेगाराचा जाब तरी घेण्यांत येतो; असा जाब विद्यालयाकडून घेण्याचीही सरकारास आवश्यकता वाटली नाहीं. विद्यालयास जाब देण्यास अवसर दिला तर तेवढ्या वेळांत राष्ट्रांत अनेक भयंकर उत्पात घडून येतील अशी सरकारास भीति वाटली कीं काय कोण जाणे! विद्यालयांतील चिटणिसांनीं आपल्या खुलाशांत म्हटल्याप्रमाणें एकाद्या कुत्र्याला मारावयाचें असेल तर 'तो पिसाळला आहे असें म्हणावें व त्याला मारावें,' हेंच खरें. सरकारला अप्रिय असलेल्या व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या बाबतींत न्यायमन्सुबा, चौकशी कांहीं लागत नाहीं. त्याला तिची उचलबांगडी करावीशी वाटली किंवा तिला रसातळास न्यावेंसें वाटलें तर तें चुटकीसरशी तें करूं शकतें. 'अस्मानी सुल्तानी' ती याहून दुसरी कोणती? कित्येकदां 'मोंगलाई पुरवली पण आंग्लाई नको' असे उद्वेगपूर्ण उद्गार लोकांच्या तोंडून बाहेर पडतात ते अशा या प्रसंगांमुळेंच. 'सार्वजनिक शांततेला विघातक असें वर्तन विद्यालयाकडून होत आहे,' असें सरकारचें म्हणणें, पण तें कोणत्या प्रकारें तें दाखवून देण्याची मात्र इच्छा नाहीं. असल्या नीतीला म्हणावें तरी काय? विद्यालयांतील मुलें सशक्त होऊं इच्छितात, स्वभाषेचें, स्ववाङ्मयाचें, स्वसंस्कृतीचें, स्वधर्माचें अभिमानपूर्वक अध्ययन करूं इच्छितात; गतवैभवाचे पोवाडे गातात, याला सरकार गुन्हा समजत होतें काय? पूर्वपरंपरा, विद्यमान परिस्थिति व भावी सदाकांक्षा या सर्वांस योग्य असे व स्वतंत्र धंद्यावर उपजीविका करणारे नागरिक निपजावे, हा हेतु डोळ्यांपुढें ठेवून त्यास अनुसरून प्रामाणिकपणें शिक्षण देणारी संस्था सरकारास राजद्रोही वाटली काय? देशभक्तीचें दिलें जाणारें शिक्षण हें बंड उभारण्यासाठीं दिलें जात आहे, असें सरकारास वाटत होतें काय? वास्तविक सरकाराला या गोष्टींबद्दल विद्यालयासंबंधीं कौतुक वाटावयास पाहिजे होतें. पण सरकार बोलून चालून पडलें परकें. एखादी कजाग, मत्सरग्रस्त बाई आपल्या सवतीच्या मुलांकडे ज्या दृष्टीनें पहाते त्या दृष्टीनेंच सरकार राष्ट्रोद्धारक संस्थांकडे पहात असलेलें. त्याच्याकडून स्नेहाची कौतुकाची अपेक्षा करणेंच मुळीं चुकीचें.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

सरकारच्या या अरेरावी वर्तनाची हजिरी केसरीकर्त्यांनीं **'समर्थ विद्यालयावर गदा'** * या मथळ्याखालीं एक अग्रलेख लिहून घेतली. सरकारच्या वर्तनाचा सर्व बाजूंनीं विचार केल्यानंतर अग्रलेखाच्या शेवटीं केसरीकार म्हणतातः—"सरकारच्या दृष्टीनेंही पाहतां, विद्यालयांत शिकविलीं जाणारीं कित्येक पुस्तकें अगर दिले जाणारे कित्येक पाठ नापसंत असतील; तथापि एवढ्यामुळें तें अशा रीतीनें वज्राघातानें रसातळास पोंचवावयास पाहिजे होतें, असें आम्हांस वाटत नाहीं. शिक्षणसंस्थांनीं होतां होईतों इतर व्यवसायांत, विशेषतः उलाढालीच्या राजकीय चळवळींत तरी होतां होईतों न पडणें बरें, व हें तत्व विसरून विद्यालयाच्या चालकांच्या हातून प्रथम प्रथम कदाचित् वर्तन घडलें असण्याचा संभव आहे. तथापि, विद्यार्थी काय व शिक्षक काय यांचें गेल्या सालांतील वर्तन पाहिलें असतां तें वरील तत्त्वास सहसा सोडून गेलें नव्हतें, अशीच कबुली कोणासही द्यावी लागेल. विद्यालयांत शिकविलीं जाणारीं विशिष्ट पुस्तकें सरकारास अप्रिय असल्यास नवीन कायद्यानें त्यांस तीं सरकारजमा करतां आलीं असतीं, व विद्यालयांतील शिक्षण जर खरोखर बेकायदेशीर असतें तर नेहमींचा फौजदारी कायदा लावून खटले वगैरे करून व अद्दल घडवून तें त्यांस बंद पाडतां आलें असतें. परंतु कोणच्याही प्रकारचा स्पष्ट दोषारोप न करतां, खुलासा न मागतां, पुरावा न घेतां, चौकशी न चालवितां, एकदम समर्थ विद्यालय कायमचें बंद करण्यांत आलें हें भावी पिढ्या 'अस्मानी सुलतानी' या म्हणीपैकीं दुसऱ्या आपत्तीचें समर्पक उदाहरण म्हणून देऊं लागतील यांत संशय नाहीं. ग्रँट न घेतां, किंबहुना विद्यमान विश्वविद्यालयाशीं संबंध न ठेवतां स्वतंत्र रीतीनें चालण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या शिक्षणसंस्थेबद्दल सरकारास थोडासा संशय येणें हें जरी स्वाभाविक असलें तरी तो संशय एकदम असा दारुण परिणामी करणें हें खचित न्याय्य नाहीं. विद्यालयाच्या चालकांवर रोष झाला असला तरी त्यांस तडजोड करण्याची संधी देणें हेंच सरकारचें कर्तव्य होतें; व तें त्यांनीं केल्यावर जर विद्यालयाचे चालक आपला हट्टच चालविते तर मग या वज्राघाताबद्दल सरकारास कोणाला फारशीं नांवें ठेवतां आलीं नसतीं. परंतु झाला हा प्रकार मात्र सर्वस्वीं अन्यायाचा झाला, असें म्हटल्याशिवाय गत्यंतर नाहीं."

---

* केसरी—ता. १४ जून १९१०.

विद्यालयाकडून सरकारकडे अर्ज, विनंत्या, तारा, खुलासे, सर्व कांहीं पाठविण्यांत आलें, पण सरकारनें या बाबतींत इतकें गंभीर मौन स्वीकारलें कीं, शेवटीं विद्यालयाच्या चालकांना हताश होऊन विद्यालयाला कायमचें कुलुप लावावें लागलें. चार वर्षांचे परिश्रम फुकट गेले, भावी आशा धुळीला मिळाल्या, कार्यकर्त्यां माणसांची पांगापांग झाली, पुनरपि डोकें वर काढतां येईल ही आशाही नष्ट झाली. बालगोपाळांनीं गजबजलेलें विद्यालयाचें आवार स्मशानवत् भासूं लागलें. ज्या इमारतींत संध्यासमयीं आपल्या सुस्वर कंठावर बालगोपाळ श्लोक म्हणतांना ऐकूं येत त्या इमारतींतून रातकिड्यांचे कर्णकटु आवाज ऐकण्याचें नशिबीं आलें.

सरकारचा विद्यालयावर एवढा रोष होण्यास विद्यालयांत काम करणारे एक दोन शिक्षकच कारण झाले असें म्हणतात. यांनीं 'टाइम्स ऑफ इंडिआ' व 'अॅडव्होकेट ऑफ इंडिया' या पत्रांत विद्यालयासंबंधीं खोडसाळ मजकूर—व्यक्तिद्वेषानें प्रेरित होऊन—प्रसिद्ध केला. एकानें तर एक बारा पानांचें चोपडें लिहून ज्ञानप्रकाशकडे प्रसिद्धीकरितां पाठविलें, परंतु त्यानें तें न स्वीकारल्यामुळें सरकारचे जानी दोस्त कै. शाहुछत्रपति यांजकडे तें पाठवून दिलें. हे गृहस्थ समर्थ विद्यालयाच्या प्राणप्रतिष्ठेपासून शिक्षक म्हणून काम करीत आले होते. हे एक विद्वान पदवीधर असून विजापूरकरांच्या स्नेह्यांत मोडणाऱ्यांपैकीं होते. विद्यालयाची प्राणप्रतिष्ठा करण्यांत ज्यानें भाग घेतला तोच त्याचा प्राण घेऊन अंत्यविधीही करण्यास पुढें सरसावावा याहून दैवदुर्विपाक तो आणखी कोणता ?

समर्थविद्यालयावर असा एकाएकीं दुर्दैवाचा कडा कोसळल्यामुळें महाराष्ट्राला एक प्रकारचा धक्का बसला. विद्यालयाच्या धोरणांत जरी कित्येक दोष होते तरी अशा तऱ्हेची स्वतंत्र बाण्याची संस्था महाराष्ट्राला पाहिजे होती. तिच्या धोरणांत असलेले दोष बदलत्या कालानुसार नाहींसे झाले असते व तिच्यांत असलेल्या गुणांची अभिवृद्धि होऊन, तिचें एका राष्ट्रहितपरायण अशा आदर्श विश्वविद्यालयांत रूपांतर झालें असतें. विद्यालयानें आरंभिलेले प्रयोग महाराष्ट्राला मननीय वाटत असून प्रियही होत होते. पण काल विपरीत आला होता. संशयपिशाच्चिकेनें पछाडलेल्या नोकरशाहीनें तांडवनृत्य आरंभिलें होतें. संशय येईल त्याला पायांखालीं तुडवून कायमचें गाडून टाकावयाचें हेंच धोरण त्यानें स्वीकारलें होतें. त्या वेळची सत्तेनें अंध झालेली नोकरशाही 'समर्थ विद्यालयाला' नुसतें पायांखालीं तुडवून शांत

झाली नाहीं, तर तिनें विद्यालयांतील अजाण बालकांचेंही सोन्यासारखें आयुष्य मातीला मिळविण्याचा चंग बांधला. समर्थविद्यालयांतील कोणत्याही विद्यार्थ्यास सरकारी शाळेंत किंवा सरकारी ग्रँट घेणाऱ्या खासगी शाळेंत घेऊं नये, असें तिनें फर्मान काढलें. याशिवाय पोलिसांचा जाच ह्या होताच. बिचाऱ्या बालकांची 'अतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी स्थिति झाली.

---

प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

द्वितीय खण्ड.

## १ सुटकेनंतर—

कारागृहांतून मुक्तता होऊन बाहेरची हवा लागल्यावर विजापूरकरांच्या डोक्यांत पहिले विचार जर कोणते घोळूं लागले असतील तर ते विद्यालयासंबंधींचे होत. आपलें एकुलतें एक मूल सरकारच्या गदाघातानें जरी मूर्छित पडलें असलें तरी आपल्या प्रयत्नांच्या योगें त्याला सावध करून कार्यक्षम करूं, असा निर्धार त्यांनीं मनाशीं केला. भगवंत आपला पाठीराखा आहे, तो आपल्याला कधींही अंतराय देणार नाहीं, असा त्यांचा दृढ विश्वास होता. ‘ एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः । कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैःपूर्वतरं कृतम् ॥ ’ हें भगवंताचें वचन डोळ्यांपुढें ठेवून त्यांनीं कंबर कसली.

अहमदाबादेहून निघून ते पहिल्यानें मुंबईस आले. सर्वंट ऑफ इंडिया सोसायटींत उतरण्याचा त्यांचा विचार होता. परंतु तेथील लोकांना पोलीसांचा वगैरे त्रास होऊं नये म्हणून ते आपले स्नेही कै. डॉ. रुईकर ( स्वामी लवणानंद ) यांचे घरीं उतरले. या ठिकाणीं चार दिवस राहून, महिनाभर विश्रांति घेण्याच्या हेतूनें ते आपल्या बहिणीचे गांवीं—सातारा जिल्ह्यांतील असनगांव–कुमठ्यास–जाऊन राहिले. येथूनच त्यांनीं सरकारचा विद्यालयासंबंधींचा गैरसमज दूर करण्याच्या हेतूनें त्याच्याशीं पत्रव्यवहार सुरू केला. ता. ११ जानेवारी १९१२ रोजीं ने. ना. गव्हर्नरसाहेबांस त्यांनीं खालील आशयाचें विज्ञापनापत्र लिहिलें:—

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

" माझ्या शहरांतील (कोल्हापूर) पक्षभेदामुळें नामदारसाहेबांच्या सरकारचे मनांत गैरसमज झाल्यानें आलेल्या साडेतीन वर्षांच्या कष्टद अनुभवानंतर, सुमारें एक महिना झाला, मी परत आलों आहें. माझ्या विरुद्ध असणाऱ्या लोकांचेंच म्हणणें सरकारचे कानावर आलें व माझें म्हणणें पुढें ठेवण्यास मुळीं संधि मिळाली नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. असो; हें ईशयोजनेप्रमाणें व्हावयाचें तसें झालें. शिक्षण-विषयक प्रश्नासंबंधानें माझीं कांहीं ठाम मतें आहेत यांत संदेह नाहीं आणि त्यांना व्यावहारिक स्वरूप देण्यासाठीं मी प्रयत्न केले व सतत करीत राहीन. हिंदुस्थानाशीं जडलेल्या ब्रिटनच्या संबंधाविषयींची निष्ठा सदैव माझ्या चित्तांत वसत आहे आणि ती प्रदर्शित करण्याची संधि आल्यास मी कधींही दवडली नाहीं. माझे लेख व भाषणें या गोष्टीची साक्ष देतील आणि माझे पूज्य शिक्षकही यासंबंधीं खात्री पटवतील. आमची पतित स्थिति कोणत्याही बाह्य कारणामुळें झाली नाहीं तर ती आमच्या लोकांच्या धर्महीनतेमुळें व शीलाभावामुळें प्राप्त झाली आहे आणि आज आम्हास पाहिजे तें हेंच (दुसरें कांहीं नाहीं) कीं फार पुरातन काळीं आमच्यांत असलेलें धार्मिकतेचें व नीतिमत्तेचें मान फिरून येईल अशी जागृती व्हावी, अशी माझी दृढ मनोभावना आहे. ह्या मानसिक उन्नतीबरोबरच पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानाचा झालेला विकास सामील करून घेण्याचें कामही आम्हांस करावयाचें आहे. एकतर्फी सुनावणीनें माझें मोठें नुकसान झालें आहे अशी माझी समजूत झाली आहे, म्हणून नामदारसाहेबांनीं एकवार मुलाखत देण्याची मेहेरबानी करून आपलें म्हणणें पुढें मांडण्याची संधि मला द्यावी अशी माझी उत्कट प्रार्थना आहे. असें झालें म्हणजे माझा पुढील उद्योग निश्चित करण्यास मदत होईल."

गव्हर्नरसाहेबांकडून वरील पत्रास कोणत्याही प्रकारचा जबाब मिळाला नाहीं. या पत्रांत व्हावा तसा नीट खुलासा झाला नसेल अशा समजुतीनें विजापूरकरांनीं पुनः विस्तृत असें पुढील मजकुराचें पत्र लिहिलें. " माझे जुने तरुण सहकारी अनुभवानें कमी असले तरी बुद्धिमान व उत्साहशाली असल्यानें त्यांच्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. मी ज्या विद्यापीठांतून बाहेर पडलों त्याच मुंबई विद्यापीठाचे ते पदवीधर आहेत. असें असूनही त्यांच्या वर्तनांत सरकारानें नाखूष होण्याजोगा कांहीं प्रकार झाला असेल, नाहींच असें कोणीं म्हणावें ? पण आतां दीड वर्ष त्यांच्या चरित्राचें पूर्ण अवलोकन केल्यानें जर आपण केलेला ठराव फिरवावा असें सरकारला वाटत असेल, तर आम्हांस आपलें काम पूर्ववत्

चालू करण्यास सरकार कृपाळूपणें परवानगी देईल अशी मला आशा आहे. या सद्‌गृहस्थांचा मला अनुभव आहे त्यावरून माझी खात्री आहे कीं, त्यांना जर कोणी चांगली सल्ला दिली किंवा मार्ग दाखविला तर ते त्याचा सदुपयोग करून घेणारे आहेत. या गोष्टी त्यांच्या ठिकाणीं कधींही वांया जावयाच्या नाहींत, अजूनही त्यांच्यापैकीं कोणासही कोठें चूक झाली आहे हें दाखविलें तरी शक्य असेल तर ते आपलें व्यंग सुधारतील आणि सरकारास पूर्ण समाधानकारक वाटेल अशा रीतीनें आपल्या वर्तनास वळण देतील. इतक्यांतूनही सरकारास असें अपरिहार्य वाटत असेल कीं, त्यांच्यापैकीं कोणी एकानें किंवा अनेकांनीं विद्यालयाचे कामापासून अलग रहावें व नवीन माणसें त्यांच्या जागीं यावीं, तरी त्यांची तयारी आहे. खुद्द माझ्यासंबंधानें सरकारची तशी इच्छा असेल तर माझ्या मनास काय वेदना होतील त्या सोसूनही माझा संबंध या संस्थेशीं तोडून टाकण्यासही मी सिद्ध होईन. आमची संस्था यशस्वी होण्यासाठीं सरकारांनीं केलेल्या सूचना कृतज्ञताबुद्धीनें स्वीकारूं व त्या अमलांत आणण्याचा प्रयत्न करूं. माझा म्हणण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, सर्व विद्यार्थिदशेच्या कालांत अविवाहित राहणाऱ्या तरुणांस स्वभाषेच्या द्वारा धार्मिक, व्यावसायिक व बौद्धिक शिक्षण देण्याच्या आमच्या प्रयोगांत खळ पडूं नये. या संबंधांस माझी उत्कंठा इतकी आहे कीं समर्थविद्यालयाचें कार्य आपण स्वतः करण्यास सरकार सिद्ध असेल तर—म्हणजे आमच्या योजना आपण स्वतःच नेमलेल्या शिक्षकांच्या हातून पार पाडण्यास तयार असेल तर—सालिना पांच हजार रुपये लोकांकडून जमवून सरकारचे पदरांत घालण्यास, ईश्वर आयुर्दाय व सामर्थ्य देईल, तोंपर्यंत मी तत्पर राहीन. ”

विजापूरकरांनीं विद्यालयाचे बाबतींत सरकारचें मन वळविण्याची—वरील दोन पत्रें लिहून—पराकाष्ठा केली. आपणास व आपल्या सहकाऱ्यांस विद्यालयाच्या आवारांत पाऊल न टाकूं दिलें तरी चालेल परंतु विद्यालय पूर्ववत् चालू होऊन आपण घालून दिलेला मार्ग तें चोखाळो एवढीच त्यांची इच्छा. मूल कोणाच्याही हातीं द्या परंतु त्याला जगूं द्या, पुष्ट होऊं द्या, वैभवाला चढूं द्या अशी सदिच्छा बाळगणाऱ्या मातेप्रमाणें विजापूरकरांनीं सरकारला कळवळून विनंती केली. मनुष्य कितीही निष्ठुर असला तरी त्याच्या हृदयाला पाझर फोडील, अशी ही विनंती होती. परंतु या विनंतीचा सरकारवर कांहींच परिणाम झाला नाहीं. हृदयाचा अभावच असेल तर पाझर तरी कुठून फुटणार !

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

विजापूरकरांच्या या दोन पत्रांना ता. २६ जानेवारी रोजीं सरकारकडून उत्तर आलें कीं, 'सरकारची भेट देण्याची तयारी नाहीं. ता. २० चें पत्र शिक्षणखात्याच्या चिटणिसाकडे विचारास व विल्हेवाटीस गेलें आहे.' यावर शिक्षणखात्याचे चिटणीसांकडे चौकशी करतां त्यांनीं 'समर्थविद्यालयासंबंधीं तुमची कोणतीही सूचना मान्य नाहीं,' असें लिहून कळविलें. विजापूरकरांची विद्यालयाच्या पुनरुज्जीवनाची आशा आतां नष्ट झाली. मगरीच्या दाढेंत गडप झालेला हिरा शक्तीचा कडेलोट करून बाहेर काढतां येईल, अरण्य पायाखालीं तुडवून सशाचें शिंगही एक वेळ मिळवितां येईल. परंतु हेकेखोर ब्रिटिशसरकारचें मन वळविणें मात्र कधींही शक्य नाहीं, असें त्यांना वाटूं लागलें.

विद्यालय कायमचें बंद झालें. आतां पुढें काय ? हा प्रश्न एका क्षणांत सुटणारा नव्हता. उभ्या आयुष्याचा विचार त्यांना आतां करावयाचा होता.

दोन महिने महाराष्ट्राबाहेर स्वस्थपणें हिंडून मग काय तो विचार कायम करावा असें विजापूरकरांनीं ठरविलें व त्याप्रमाणें विद्यालयांतील एक प्रौढ विद्यार्थी रा. दिनकरशास्त्री कानडे यांना बरोबर घेऊन काशीयात्रा करण्याचा बेत त्यांनीं निश्चित केला. या बेताप्रमाणें त्यांनीं १९१२ चे फेब्रुवारी व मार्च हे दोन महिने काशी, हरिद्वार व अयोध्या या नगरांत घालविले. या नगरांची यात्रा करण्यांत धार्मिक हेतूं-पेक्षां शैक्षणिक हेतूच प्रमुख होता. काशी येथील सेंट्रल हिंदु कॉलेज व निरनिराळ्या संस्कृत पाठशाळा, हरिद्वार येथील गुरुकुल व ऋषिकुल, या संस्था कशा काय चालल्या आहेत, त्यांनीं आपल्यापुढें ठेविलेलें ध्येय कितपत साध्य करून घेतलें आहे, त्यांच्या शिक्षणविषयक हालचालींत त्यांना कोणकोणत्या अडचणी येत आहेत व त्या निवारण्याकरितां त्यांनीं कोणकोणते उपाय योजिले आहेत, या आणि अशाच तऱ्हेच्या अनेक शैक्षणिक बाबी त्यांना बारकाईनें अभ्यासावयाच्या होत्या.

काशीयात्रेहून परत आल्यावर सरकारला पुन्हां एकदां लिहून प्रयत्न करून पहावा म्हणून ता. १८ मे रोजीं सरकारांत पुढील आशयाचें त्यांनीं एक पत्र धाडलें. "आतां थोडक्यांत माझें म्हणणें मांडावयाचें तर तें असें आहेः—हा दुःखद वृत्तांत तरी कसा घडला असावा याचीही मीमांसा करणें जरूर वाटलें. उघड उघड दाखवावयास एक कार्यक्रम ठेवून संस्थेमध्यें गुप्त रीतीनें आक्षेपार्ह स्वरूपाचें कांहीं शिक्षण दिलें जात आहे, असें सरकाराच्या नजरेस आल्याशिवाय

ह्या दुःखद परिणाम घडून येणें अशक्य आहे. वरती ईश्वर व अंतर्यामीं सदसद्विवेक-बुद्धि यांस साक्षी ठेवून मी म्हणूं शकतों कीं संस्थेंत काम करणाऱ्या मंडळींकडून असें कांहीं खरोखर घडणें व त्या योगानें सरकारच्या दुर्ग्रहास कारण मिळणें अशक्य आहे. तथापि कुबुद्धिप्रेरित लोकांच्या मुखांतून सरकारापर्यंत खोट्यानाट्या गोष्टी पोंचून, त्या वेळच्या स्थितींत, सरकारास कडक हुकूम सोडणें राजनीतिदृष्ट्या युक्त वाटलें असेलच; त्यासंबंधीं केलेल्या तक्रारी ऐकून आपला निकाल फिरविणें किंवा त्या गोष्टींची चर्चाही करणें बरें वाटलें नसेल. कांहींही असो, झालें तें झालें; आतां नेक नामदार गव्हर्नर साहेबांपुढें मला इतकीच विज्ञापना करावयाची आहे कीं, जोंपर्यंत आमचे हेतु स्पष्टपणें पुढें ठेवले जातील व त्यांकडे दुर्लक्ष न होईल तोंपर्यंत कोणीही जबाबदार अधिकाऱ्यांनीं तपासणी केली तरी तिला आमची हरकत असणार नाहीं आक्षेपार्ह कांहीं शिकविलें जात आहे कीं काय हें कळेल आणि संस्था यशस्वी होण्यास सूचना मिळतील, त्यांचा कृतज्ञताबुद्धीनें स्वीकार होईल. येथवर लिहिलें आहे यावरून कळून येईल कीं माझ्या मनांतून पुनः प्रारंभापासूनच सर्व कार्य करावयाचें आहे. सरकारांशीं ( ने. ना. गव्हर्नरसाहेबांशीं स्वतः अगर ज्यांच्या साक्षात् अमलांतील प्रांतांत मला काम करावयाचें आहे त्या कमिशनर अगर कले-क्टराशीं ) सल्लामसलतीनें सर्व गोष्टी ठरल्यानें हितच होईल असा माझा भरंवसा आहे.'' या पत्राला सरकारकडून ता. ७ जून १९१२ रोजीं पुढील उत्तर आलें:—
" रा. रा. विष्णु गोविंद विजापूरकर यांस कळविण्यांत येतें कीं, कायदा मोडला नाहीं तर कोणाही इसमास कोणतीही शिक्षणसंस्था आपल्या मर्जीप्रमाणें काढण्यास मोकळीक आहे. तथापि रा. विजापूरकर यांच्या पूर्वइतिवृत्ताचा विचार करतां सरकारानें आपणास कोणत्याही प्रकारें ओळखावें अशी त्यांनीं अपेक्षा धरणें शक्य नाहीं." यानंतर कै. ओक यांनीं ना. गव्हर्नरसाहेबांस एक सविस्तर पत्र लिहिलें. सुमारें तीन आठवडे उत्तराची वाट पाहून पुनः एक पत्र स्मरणार्थ लिहून, त्यांत चौकशी अंतीं बंगाल्यांतील एका* सजातीय संस्थेवरील ठराव तेथील सरकारनें फिरविल्याचाही उल्लेख केला. या पत्राला सरकारकडून पुढील प्रमाणें उत्तर आलें:—" २१ आगष्ट व १३ मिनहूचीं पत्रें पावलीं. नामदार गव्हर्नरसाहेबांस वाटतें कीं तळेगांव येथील समर्थ विद्यालय बंद करण्यास कारणी-

---

* डॉ. रविंद्रनाथ टागोर यांचा बोलपुर शांतिनिकेतन मधील ब्रह्मचारी आश्रम.

भूत झालेल्या परिस्थितीचा तुम्हांस विसर पडला आहे. ती संस्था योग्य वळणावर ( Lines ) चालली असती तर आज हयात असती. कायद्याचा भंग केला नाहीं तर कोणासही शिक्षणाच्या कामाचा उपक्रम करण्याचा मार्ग खुला आहे. परंतु तुमच्या संस्थेचा गतवृत्तांत ध्यानीं घेतां गव्हर्नरसाहेब किंवा सरकार यांनीं तुम्हांस कोणत्याही प्रकारें ओळखावें अशी तुम्ही अपेक्षा करूं नये." असा जबाब आला तरी कै. ओक यांनीं एक वेळ लिहिलेंच. आपल्या ता. २१।९।१२ च्या पत्रांत ते लिहितात—"आसाहेबांचें आज असें म्हणणें आहे कीं 'कायदा मोडला नाहीं तर' शिक्षणाचें कार्य करण्यास हरकत नाहीं. परंतु आमच्या संस्थेचा झालेला इतिहास लक्षांत घेतां कोणीं कोणतीही संस्था काढली तर तिनें ही शर्थ पुरी केली नाहीं असें केव्हां जाहीर केलें जाईल याचा कांहीं अजमास लागणें शक्य नाहीं. म्हणून माझें मागणें असें आहे कीं माझ्या अर्जांत वर्णिलेल्या स्वरूपाच्या संस्था कोणत्या योग्य वळणानें चालाव्या याचें सरकारनीं दिग्दर्शन करावें. पुनश्च आसाहेबांस माझी अशी विज्ञापना आहे कीं समर्थविद्यालय चालविण्यांत माझ्याकडून काय चुका झाल्या त्या मेहेरबानीनें दाखवाव्या म्हणजे मला स्वतःस पुढील काळीं त्याचा उपयोग होईल. स्वदेशगमनाचे वेळीं आसाहेबांस केलेली विनंति फुकट न जाईल, अशी मी आशा धरून आहें." पण ही आशा व्यर्थ होती. या पत्राला "यापुढें तुमच्याशीं समर्थविद्यालयाच्या प्रश्नाची चर्चा करण्याची गव्हर्नरसाहेबांची मर्जी नाहीं; कारण समर्थविद्यालय बंद होण्यास झालेलीं कारणें तुम्ही पूर्ण जाणत आहां असें त्यांस वाटत आहे," असा लगेच जबाब आला. विद्यालयासंबंधींची थोडीबहूत वाटणारी आशा आतां समूल नाहींशी झाली. यापुढें सरकाराकडे—निदान कांहीं वर्षें—यासंबंधीं प्रश्न काढणें अशक्य होऊन बसलें. विजापूरकरांचें हृदय या दुःखानें शतशः विदीर्ण झालें. या दुःखांत—तें कमीच आहे असें विधीस वाटून कीं काय—पुत्रनिधनाच्या दुःखाची भर पडली. विजापूरकरांचा एकुलता एक मुलगा बंडू ऊर्फ माधव जून महिन्यांत एकाएकीं वारला. माणसावर आपत्ति कोसळूं लागल्या म्हणजे त्या सर्व दिशांनीं कोसळूं लागतात. कमकुवत मनांचीं, सामान्य महत्त्वाकांक्षांचीं माणसें य आपत्तींखालीं तत्काल चिरडून जातात. परंतु विजापूरकरांसारखीं जबरदस्त आशावादी माणसें असल्या आपत्तींना डगमगत नाहींतच, उलट अधिकाधिक निश्चयी होऊन, त्याच्या जोरावर त्यांना पदतलीं चुरडून आपला ध्येयमार्ग उत्साहानें

आक्रमीत असतात. पुत्रवियोगाचें दुःख शांतपणें गिळून, प्रतिकूल परिस्थितीशीं झुंजण्यांत गुंतलेल्या आपल्या हातांस डोळ्यांत आलेलीं आंसवेंही पुसण्यास अवसर न देतां, ते पुढील उद्योगाला लागले.

---

## २ निरक्षरतेवरील मोहिमेचे बेत.

विद्यालयाच्या बाबतींत सरकार आपला दुराग्रह सोडण्यास तयार नाहीं हें पाहून, अनुकूल वेळ येईल तेव्हां सरकारचें मन पुनः एकदां वळवूं असा विचार करून, कोणती तरी निराळी शिक्षणविषयक चळवळ आपणास सुरू करतां येईल किंवा काय याचा ते विचार करूं लागले. पुण्यांतील रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूटला जोडून एखादी औद्योगिक शाळा काढावी व तद्द्वारा थोड्या वेळांत व थोड्या खर्चांत हिंदी तरुणांना पायाशुद्ध शिक्षण मिळण्याची व्यवस्था करावी, असा त्यांचा हेतु होता. या उद्योगाला लागणारा निधी कसा जमवावा, या शाळेंतील शिक्षणक्रम कसा असावा यासंबंधींची निश्चित योजनाही त्यांनीं तयार केली होती. युनिव्हर्सिटीनें स्थापिलेल्या व सरकारी किंवा सरकारच्या धोरणानें चालणाऱ्या कॉलेजांस जोडलेल्या प्रयोगशाळांवर त्यांचा विश्वास नव्हता. या शाळांत जसें शिक्षण मिळावें तसें मिळत नाहीं, खर्च मात्र बेसुमार होतो, असें त्यांचें म्हणणें होतें. या बाबतींत फर्ग्युसन कॉलेजांतील शास्त्रीय विषयाचे अध्यापक प्रि. के. रा. कानिटकर व अण्णा विजापूरकर यांमध्यें १९१४ सालीं जाहीर रीतीनें बराच मोठा वाद माजला होता. प्रि. कानिटकरांचें म्हणणें कीं, " स्वतंत्र शाळा काढूं नये.

युनिव्हर्सिटीकडून शास्त्रीय अभ्यासाची मुबलक सोय केली गेली असल्यामुळें आतां अशा स्वतंत्र शाळांची आवश्यकता राहिलेली नाहीं. युनिव्हर्सिटीनें आपला अभ्यासक्रम सुधारला आहे. या अभ्यासक्रमावरच काम भागवून घ्यावें. स्वतंत्र निधी, स्वतंत्र माणसें जमा करण्याच्या फंदांत पडूं नये." विजापूरकरांना हें म्हणणें पसंत नव्हतें. त्यांचें या बाबतींत खालीलप्रमाणें म्हणणें होतें:—

"हा क्रम ( शास्त्रीय अभ्यासाचा ) सुधारला तरी आपल्यास म्हणजे आपल्या दृष्टीनें ज्या विषयांचें अध्ययन झालें पाहिजे व तें ज्या पद्धतीनें झालें पाहिजे तें साधणें शक्य नाहीं. इंटरमीजिएट[1] पूर्वीचीं शृंगारपूर्ण संस्कृत नाटकें व इंग्रजी भाषेंतील जुनें शिळें कादंबरीकर्त्यांचें वाङ्मय याची आम्हांस काय जरूर? भाषापंडित तीं खुशाल पढोत. अलीकडील शास्त्रीय वाङ्मय नीट समजण्यास लागू पडणारे हक्सले, टिंडल, स्पेन्सर वगैरेंचे निबंध व ग्रंथ आम्हांस पाहिजेत. खुद्द स्पेन्सरनें हिंदी लोकांवर स्कॉटच्या ग्रंथांच्या अध्ययनापासून कसा जुलूम होतो व त्यांत अप्रयोजकपणा कसा आहे हें आपल्या समाज-शास्त्राच्या अध्ययनाच्या पुस्तकांत दाखविलेलें आहे. आम्हीं जुना बुरा आलेल्या इंग्रजी भाकऱ्या खाऊन आपल्या राष्ट्रशरीराची पुष्टि होण्याची अपेक्षा करतों. गणित, भौतिक शास्त्रें, अर्थशास्त्र, व्यापारी कायदा, हिशोबांच्या पद्धती, संस्था-चालन—कौशल्य वगैरे विषय शिकणें जरूर आहे. हें शिक्षण उच्च मानून तें हल्लींच्या युनिव्हर्सिटीक्रमानंतर घ्यावें म्हटलें तर (आणि तो रोंख प्रो. कानिटकर यांचा आहे) केवढी द्रव्यहानि व केवढी शरीरसंपत्तिहानी होईल याचें गणित करून पाहिलें पाहिजे. युनिव्हर्सिटीचीं चार वर्षे किती पालकांस कशीं कष्टमय जातात याची कल्पना कोणी करतो काय? ९५३ पालकांपैकीं[2] ५४१ पालक सालिना ५०० रुपये प्राप्तीच्या खालचे आहेत; ते आपल्या पोषणासाठीं ३०० रु. दरसाल कसे खर्च करतात याची कल्पना करा. आपल्या पोटच्या गोळ्यास किंवा तत्तुल्य संबंध्यांस पुढें सोन्याचे दिवस यावेत म्हणून या पालकांनीं आपल्या पोटास किती टाके घातले असतील, याची कल्पना खुद्द कॉलेजांतील विद्यार्थ्यांसही नसते. असो, हें लिहिणें

१ शास्त्रीय शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचा इंटरमिजिएटपर्यंत तरी अभ्यास झालाच पाहिजे असें प्रि. कानिटकरांचें म्हणणें होतें.

२ हे पालक फर्ग्युसन कॉलेजांतील विद्यार्थ्यांचे असावेत.

विकाराच्या सदरांत घालूं नका, इतकीच प्रार्थना करून मी विचारतों कीं, 'कॉलेज कोर्स' घेणारे घेवोत; ते सरकारी कामास येतील. पण इतर सुबुद्ध विद्यार्थ्यांस या पेचांत न पडतां केवळ आपल्या हुकमतीखालीं चालविलेल्या संस्थेंत पढविण्याची व स्वतंत्र रीतीनें आपलें व राष्ट्राचें नांव काढण्याची सोय करणें जरूर नाहीं काय? अशा संस्थेंतून दहा पांच विद्यार्थी दर वर्षी परदेशीं जातील तर ते तेथें स्थिरबुद्धीनें व चौकस वृत्तीनें शिकून कार्यकर्ते बनतील. हें काम चालू युनिव्हर्सिटीनें होणार नाहीं. तिच्याविषयीं माझी तुच्छ बुद्धि नाहीं. ज्या शिडीवरून चढल्यानें उंच स्थलावरून जगाचा देखावा दिसला, तिला कोण निंदील? परंतु जो देखावा इतक्या उशीरां आपल्यास दिसला तो आपल्या तरुण बांधवांस आपणच त्यांच्यांत मिसळून थोडक्या खर्चांत दाखवावा व त्या शिडीचा त्यांना उपयोग करण्याचें कारण पडूं नये. त्यायोगें वांचलेला काल, द्रव्य आणि परिश्रम यांचा आपल्या हातून जें कार्य झालें नाहीं तें करवून घेण्याकडे उपयोग करावा हेंच उचित आहे. जगांतील शास्त्रीय शोध आपलेसे करतील, नवे आपण लावतील असे शोधक व शोधांचा व्यावहारिक उपयोग करणारे कारखानदार व व्यापारी आमच्यांत उत्पन्न होतील काय? अशा आशेनें आशापूर्ण नयनांनीं ज्या संस्थेकडे सर्व जनांनीं पहावें अशी संस्था निर्माण झाली पाहिजे. सरकारी काम सरकारापेक्षां उत्तम करणारें फर्ग्युसन कॉलेज आहे; परंतु त्यांतील शिक्षकांच्या बिनमोल स्वार्थत्यागाच्या योग्यतेचें कार्य तेथें होण्याची आशा नाहीं. त्या संस्थेला जोडून नवीन संस्था काढा किंवा रानडे एकॉनॉमिक इन्स्टिटयूटला जोडून काढा. संस्था निराळी पाहिजे एवढें खरें. कामासाठीं प्रचंड फंड उभा राहील. **स्वार्थत्यागी, दीर्घोद्योगी पुरुष हाच खरा प्रचंड फंड.** प्रि. परांजपे हेच डे. ए. सोसायटीच्या फंडांतील तीन लाख रुपये आहेत. सोसायटीची स्थावर जिनगी ५॥। लाखांची आणि जंगम जिनगी १॥। लाखांची. अनेक संस्था सोडून दिल्या तरी फर्ग्युसन कॉलेजांत काम करणारे शिक्षक सरकारास ठेवावयाचे तर किती मुशाहिरा द्यावा लागला असता, त्या मानानें पहातां एकट्या प्रि. परांजपे यांच्याबद्दल निदान तीन लाख फंड हवा होता. असेच इतर हिशेब केले तर काम करणारीं माणसें हीच दौलत! हाच फंड! तेव्हां संस्था म्हणजे काम करणारीं माणसें; इतर अडचणी फोल आहेत."

हा वाद पुढें थांबला व त्याबरोबरच स्वतंत्र उद्योगशाळा स्थापन करण्याचे बेतही कुठल्याकुठेंच विरून गेले. महाराष्ट्रांत जी भयंकर निरक्षरता भरून राहिली

आहे ती नाहींशी करून साक्षरतेचा प्रसार करण्यासाठीं आपण आपणास सर्वस्वी वाहवून घ्यावें असें त्यांस वाटूं लागलें. ना. गोपाळराव गोखले यांचें मत तसेंच पडलें. 'सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा प्रसार' हा विषय गोखल्यांच्या जिव्हाळ्याचा होता. या कार्यासाठीं सरकारकडून सहाय्य मिळावें म्हणून त्यांनीं १९१० सालीं इंपीरियल कौन्सिलापुढें बिलही आणलें होतें. त्यांत त्यांनीं "प्राथमिक शिक्षण हळूहळू सर्व देशभर सक्तीचें व मोफत करावें; आणि या गोष्टीचा खल करून निश्चित योजना तयार करण्यासाठीं सरकारी व बिनसरकारी लोकांचें मिश्र मंडळ ( कमिशन ) नेमावें," असें सुचविलें होतें. पुन्हां १९११ सालीं त्यांनीं इंपीरियल कौन्सिलपुढें एक 'शिक्षणविषयक बिल' आणलें व त्यावर केलेल्या भाषणांत सक्तीच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नांवर जोर देऊन, त्यासंबंधींच्या अत्यावश्यकतेची जाणीव त्यांनीं आंकड्यांनिशीं सरकारास करून देण्याचा प्रयत्न झाला. हें भाषण अतिशय महत्वाचें झालें.* या भाषणामुळेंच विजापूर-

---

* ना. गोखल्यांच्या या भाषणांतील खालील महत्त्वाच्या भागावरून त्यांची एतद्विषयींची तळमळ किती तीव्र होती हें दिसून येईलः—

"माझ्या योजनेपैकीं अत्यंत महत्त्वाचा भाग म्हटला म्हणजे देशांत प्राथमिक शिक्षणाच्या व्यवस्थेमध्यें क्रमाक्रमानें सक्तीचें तत्त्व निविष्ट करावें हाच होता. तो भाग मी विशेष महत्वाचा समजतों म्हणून आपल्यापुढें जें बिल मी मांडीत आहें त्यांतच त्याचा समावेश करण्यांत आला आहे. मि. लॉर्ड, पन्नास वर्षांपूर्वी आपल्या देशबांधवांस उद्देशून एका अमेरिकन कानूनकारानें उद्गार काढले ते असे, 'महादेवदूताच्या हातचा एक कर्णा जर मला प्राप्त झाला असता, कीं ज्याच्या आवाजानें पृथ्वीतलावरील सर्व राष्ट्रांत जिवंत म्हणून जे असतील ते दचकतील, तर त्या कर्ण्याच्या साहाय्यानें त्यांच्या कानांत मी असें दुमदुमवीन कीं, बाबांनो, आपल्या मुलांस शिक्षण द्या, आपल्या सर्व मुलांस शिक्षण द्या, आपल्या मुलांपैकीं प्रत्येकास शिक्षण द्या!' या आकांक्षेंतील मार्मिक शहाणपणा व सोत्कंठ मानवहितबुद्धि आतां बहुतेक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांस बहुतांशीं पटली आहे. सर्व ठिकाणीं सरकार मुलांचें शिक्षण हें आपलें आद्यकर्तव्य आहे असें कबूल करीत आहे. ही जबाबदारी आपल्या माथ्यावर आहे असें त्यांस मान्य आहे. प्राथमिक शिक्षणापासून होणारे फायदे लोकांस लिहितां वाचतां येईल याहून कांहीं

करांना आपली ‘ सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणप्रसाराची ’ चळवळ सुरू करण्याची स्फूर्ती झाली. आपल्या चळवळीच्या माहितीपत्रकाबरोबरच ना. गोखल्यांच्या

---

अधिक नाहींत असें जरी म्हटलें तरीसुद्धां त्याचा सार्वत्रिक प्रसार ही पहिल्या प्रतीच्या महत्त्वाची गोष्ट आहे. केव्हांही झालें तरी निरक्षरतेपेक्षां साक्षरता श्रेष्ठ आहे आणि कोणत्याही एका राष्ट्रांतून निरक्षरता हद्दपार केली तर ती कांहीं लहानसान कामगिरी नव्हे. परंतु लोकांतील बहुजनसमाजाचें प्राथमिक शिक्षण म्हणजे लिहितांवाचतां येण्याच्या निव्वळ सामर्थ्याहून कांहीं अधिक आहे. त्याचा अर्थ व्यक्तीचा नैतिक व सांपत्तिक उत्कर्ष आणि तो साधण्यास लागणारी कर्तृत्व-शक्ति अंगीं येणें असा आहे. एकंदरीनें सर्व समाजाच्या बुद्धिदृष्टया वाढता दर्जा हा त्या प्राथमिक शिक्षणाचा सहज परिणाम आहे. ज्या कोणाच्या खिसगणतींत हे फायदे येत नाहींत त्याला मानवी आरोग्यास प्रकाश व स्वच्छ हवा किती उपयोगी आहे याविषयींसुद्धां संशय घ्यावासा वाटेल. कोणत्याही सरकारच्या मनांत आपल्या प्रजाजनांच्या खऱ्या कल्याणाबद्दल किती तळमळ आहे हें पहाणें झाल्यास त्या सरकारनें बहुजनशिक्षणाच्या प्रसारासंबंधानें व तो कोणत्या पद्धतीनें होत आहे त्यासंबंधानें आपलें कर्तव्य कितपत बजावलें आहे हें पहावें. हा महत्त्वाचा कस लावणें बिलकूल अन्यायाचें होणार नाहीं असें मला वाटतें. हा कस जर या देशांतील सरकारास लावला तर आजवर आपण जी दक्षता या कामीं दाखविली ती पुरे नाहीं व यापेक्षां जागृती दाखविली पाहिजे, असेंच आमच्या सरकारास वाटलें पाहिजे. अशा प्रकारची आपली जबाबदारी ओळखावी आणि मग पृथ्वीवरील सुधारलेल्या सरकारांमध्यें आपली योग्य जागा मिळविण्याची आशा करावी अशी आजची हिंदुस्थानसरकारची स्थिति आहे. लोकसंख्येच्या मानानें साक्षरतेचा विचार करा; साक्षात् शाळेंत जाणाऱ्या लोकांचें प्रमाण पहा; शिक्षणाची व्यवस्था अंमलांत आहे तिकडे लक्ष पुरवा; किंवा प्राथमिक शिक्षणावर खर्चिलेला पैसा किती आहे हें ध्यानांत आणा; कोणत्याही दृष्टीनें या प्रश्नाचें निरीक्षण करा, हिंदुस्थान इतर सुधारलेल्या राष्ट्रांच्या फार फार मागें आहे............आपल्या देशापुढें जीं राष्ट्रीय कार्यें आहेत आणि उभयतांच्या कल्याणासाठीं ज्यांच्या सिद्धयर्थ सरकार व प्रजा यांना सहवीर्य प्रकट करणें शक्य आहे त्यांमध्यें या भूमींत शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारास साहाय्य करण्याच्या या कार्याहून अधिक महत्त्वाचें कार्य

या बिलावरील भाषणाच्या शेंकडों मराठी प्रती त्यांनीं स्वखर्चानें वांटल्या. गोपाळराव गोखल्यांच्या या बिलाचा व त्यावरील आंतडें तोडून केलेल्या भाषणाचा इंपीरियल कौन्सिलमध्यें जरी कांहीं उपयोग झाला नाहीं तरी त्या भाषणाचा उपयोग जनमनावर परिणाम घडवून आणण्याचे कामीं करावा याच हेतूनें त्यांनीं त्यांचें हें भाषण भाषांतरित करून वांटलें. गोखल्यांचें मागणें जरी सरकारनें मान्य केलें नाहीं तरी लोक तें मान्य करतील या आशेनें, विजापूरकरांनीं तें गोखल्यांच्याच भाषेंत 'हात जोडून' थोडक्यांत पुनः सर्वांपुढें मांडिलें. गोपाळराव गोखल्यांनीं आपलें बिल पास व्हावें म्हणून जीवापाड खटपट केली होती व पुढें बील नापास झाल्यावरही निराश न होतां जुलै १९१५ पासून त्याच कामासाठीं कांहीं दिवस आपणास सर्वस्वी वाहून घेण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. परंतु त्यांचें अकालीं निधन जाहल्यामुळें तो त्यांचा जीवींचा हेतू तसाच अपुरा राहिला. गोपाळरावजींचा हा अपुरा हेतू पूर्ण करणें हेंच त्यांचें खरें स्मारक असें

---

दुसरें कोणचेंच नाहीं. या योगानें ज्या लोकांच्या आयुष्यक्रमांत अंधकार भरून गेला आहे त्यांत प्रकाशाचे किरण पडतील, ग्राम्यता व्यापून राहिली आहे त्यांत नागरिकत्वाचा प्रवेश होईल, घनघोर निराशा पसरली आहे तेथें आशेची ज्योत प्रकट होईल, असें हें कार्य आहे. मी अगोदरच बोलून चुकलों आहें कीं हें कार्य मंदगतीनेंच होईल. त्याचा अर्थ हाच कीं आतां तें एकदम हातीं घेतलें पाहिजे. यापुढें विलंब न करितां या कार्यास प्रारंभ केला तर आणि सरकार व लोक यांनीं योग्य हिंमत धरून त्याचा पिच्छा पुरविला तर आमच्या जागीं दुसरी पिढी येण्यापूर्वींच हा सर्व प्रश्न सुटण्याचा संभव आहे. हें घडून आल्यास पुढील पिढीस आपली विशिष्ट कामगिरी हातीं घेतां येईल व ती हातीं घेतांना जें सामर्थ्य त्यांच्या अंगीं येईल तेंच त्यांना हटकून यशाची जोड देईल. आपणा स्वतःकरितां विचार करावयाचा तर इतकेंच बस्स आहे कीं आपण त्या यशःसिद्धीसाठीं परिश्रम केले, यशःसिद्धि डोळ्यांपुढें नसतां परिश्रम केले. कारण, मि लॉर्ड, पूर्ण लीनताच नव्हे तर पूर्ण शहाणपणा त्याच प्रत्ययांत आहे. त्याच्याच जोरावर पुढील उद्धार निघूं शकतात.

पहाण्याची नसे इच्छा। होईल जें पुढें बरें।
माझ्या पुरें पुरे आहे । टाकणें एक पाउल ॥"

समजून, विजापूरकर ते आरंभूं इच्छीत असलेल्या उद्योगास लागले. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणप्रसाराची योजना त्यांनीं निश्चित केली व ती पार पाडण्यासाठीं आपणास मदत करावी म्हणून वृत्तपत्रांतून तरुण लोकांस त्यांनीं आवेदन केलें. आपल्या कार्याचा प्रसार करूं इच्छिणाऱ्या तरुणांस '**सरस्वतीदास**' * या नांवानें ते संबोधीत. या 'सरस्वतीदासा'चें लक्षण त्यांनीं खालीलप्रमाणें ठरविलें होतें:—

" सरस्वतीदासचमू सैनिको वीर्यवान्महान् ।
निःस्वार्थी निरहंकारो गुरुभक्तिपरायणः ॥
अनिकेत समाधानो महीमटति नित्यशः ।
शेते क्वापि किमप्यत्ति ' संतुष्टो येन केनचित् ' ॥ "

---

* ' सरस्वतीदासां ' संबंधीं त्यांनीं खालीलप्रमाणें नियम केले होते:—

( १ ) सोळा वर्षें पूर्ण वय असलें पाहिजे.

( २ ) अविवाहित असलें पाहिजे.

( ३ ) पूर्व शिक्षण व्हर्न्याक्युलर स्कूल फायनल, किंवा मॅट्रीकपर्यंत निदान झालेलें असलें पाहिजे. [ या किंवा याहून वरच्या परीक्षा पसार झाल्या असल्यास उत्तम. तसें नसल्यास त्याच परीक्षांस घातलेलीं प्रश्नपत्रकें सोडवितां आलीं पाहिजेत. ]

( ४ ) सशक्त व सुशील असल्याबद्दल—पहिल्यासंबंधानें डॉक्टर, वैद्य किंवा हकीम यांचा व दुसऱ्या बाबीसंबंधानें कोणाही सभ्य गृहस्थाचा—दाखला दिला पाहिजे.

( ५ ) जरूर वाटेल त्याप्रमाणें तीन वर्षांहून अधिक नाहीं इतक्या कालपर्यंत दिलें जाईल तें शिक्षण मराठी, संस्कृत व इंग्रजी या विषयांत घेण्याची तयारी असली पाहिजे.

( ६ ) सांगण्यांत येईल त्या ठिकाणीं राहण्याची बिनतक्रार तयारी असली पाहिजे.

( ७ ) इच्छा असल्यास चोवीस वर्षें वयास पूर्ण झाल्यावर सर्वस्थितीचा विचार करून विवाह करण्यास परवानगी मिळेल.

( ८ ) ' सरस्वतीदास ' होते वेळीं आपल्या पदरची कांहीं चीजवस्त आणण्याची जरूरी नाहीं.

वरील प्रकारच्या लक्षणांनीं युक्त अशा तरुणांची एक चमू जमवून त्यांना खेडोपाडीं पाठवावयाचें, व त्यांच्याकडून निरक्षर लोकांत साक्षरतेचा प्रसार करवावयाचा असा हेतु होता. या सरस्वतीदासांनीं खेडोखेडीं जाऊन देवळांत, पाराखालीं, आंबराईत जेथें जागा मिळेल तेथें पाटीपेन्सिलीसह आपलें ठाण मांडून बसावयाचें व साळी, माळी, कोळी, तांबोळी, शेतकरी यांस त्यांचें मन आपल्याकडे आकर्षून त्यांच्या सवडीप्रमाणें धडे द्यावयाचे. या कामगिरीबद्दल शिष्यांनीं खूष होऊन जर कांहीं दिलें तर त्यावर निर्वाह करावयाचा नाहीं तर, 'भिक्षावृत्ती'चा स्वीकार करावयाचा. उदरंभरण हें गौण मानून साक्षरतेचा प्रसार करणें हेंच मुख्य साध्य असें समजून अनलसपणें त्याप्रीत्यर्थ त्यांनीं झटलें पाहिजे, असा त्यांचा मुख्य नियम होता. या 'सरस्वतीदासांनीं' किंवा त्यांच्यासारखें काम—आपला दैनिक व्यवसाय संभाळून—करूं इच्छिणाऱ्यांनीं काय काय शिकवावें याचा खुलासा त्यांनीं एका खेडेगांवांतील शिक्षकास लिहिलेल्या एका पत्रांत केला आहे. ते लिहितात—" ज्यांना शाळेंत दिवसा जातां येत नाहीं अशा मुलांमुलींस व ज्या

---

(९) अन्नवस्त्र व रहाण्याची व्यवस्था जी करण्यांत येईल तींत संतोष मानून राहिलें पाहिजे.

(१०) 'सरस्वतीदास' होऊं इच्छिणारास जातीचा किंवा धर्माचा प्रतिबंध नाहीं.

(११) आचार, विचार, अभ्यास व वर्तन यांसंबंधीं जी शिस्त घालून दिली जाईल ती बिनतक्रार पाळण्याची तयारी असली पाहिजे.

(१२) स्वतःचें मत म्हणून कसलाही आग्रह न धरितां केलेली आज्ञा शिरसा मान्य केली पाहिजे.

(१३) वरील नियमांत वाटेल त्या वेळीं फरक करण्यांत येईल. त्या वेळीं विचारल्याशिवाय कोणासही अभिप्राय देण्याचा अधिकार नाहीं.

(१४) 'सरस्वतीदास' होण्याची इच्छा प्रदर्शित करण्याचे अगोदर पुढें आपल्यास कोणत्याही प्रकारचें स्वातंत्र्य राहणार नाहीं याबद्दल वाटेल तितका विचार करावा व खुलासा करून घ्यावा; परंतु तशी इच्छा प्रदर्शित केल्यानंतर एक महिन्याचे आंत त्यास 'सरस्वतीदास' करण्याचें मुक्रर करून तसें कळविल्यावर ८ दिवसांचे आंत हजर झालें पाहिजे.

प्रौढ लोकांस कामामुळें दिवसा फावत नाहीं व वयही झालें अशांस लिहितां वाचतां येण्यापासून फार उपयोग आहे, असें कळवून ज्यांस शिकावेंसें वाटेल त्यांस रात्रीं शिकवावें. चित्रें काढणें, उगीच रेघा ओढीत बसणें हा नाद मुलांस सहज असतो; त्याला वळण देऊन ड्रॉईंग शिकवावें. धडा घालून देऊन गिरवीत बसण्यास लावण्यापेक्षां अक्षरें छापील असतील तीं पाहून काढवावीं. प्रथमपासूनच प्रमाणबद्ध लिहिण्यास शिकविलें म्हणजे वळण चांगलें लागेल. महिन्यांचीं नांवें, मराठी व इंग्रजी वारांचीं नांवें, नक्षत्रांचीं नांवें, संध्येचीं चोवीस नांवें, सूर्य साष्टांग नमस्कारांचीं नांवें लिहवावीं व पाठ करवावीं. लहान स्तोत्रें शिकवावीं, वामनाचे, समर्थांचे श्लोक लिहवावे व पाठ करवावे. एकनाथी भागवत वाचवावें. व्यवहारांतील पत्रें, अर्ज वगैरेंचे नमुने शिकवावे. हिशोब लिहिण्यास शिकवावें. गांवची माहिती देऊन, तालुक्याची व जिल्ह्याची माहिती विशेष द्यावी. कोठें काय जिन्नस होतो त्याचा शोध करण्याची संवय करवावी. शेतकरी लोकांस सरकार फार फार मदत करण्यास तयार आहे; त्याजकडोन शक्य ती माहिती आणून द्यावी. डॉ. मॅन—शेतकी कॉलेजचे प्रिन्सिपॉल—ह्या कामीं फार झटतात. त्यांना शेतकऱ्यांस काय शिकवूं, काय माहिती देऊं, त्यांना कळविण्याजोग्या माहितीचे कांहीं कागद असल्यास कळवावें, असें लिहावें. पतपेढ्या काढून लोकांची जमात करावी. परस्परांत सहानुभूति वाढेल असें करावें. हरएक प्रकारें शिक्षण दिल्यास ते आपल्या मुलांबाळांची काळजी करतील. आरोग्यरक्षणाचे साधे नियम दाखवून घरांत व बाजूस स्वच्छता राहील व रोगांचें बीज नाहींसें होईल असें करावें. त्यांस नित्य कपडे धुण्याची व एकंदरीनें ठाकठीकपणानें वागण्याची संवय लागली म्हणजे आयुष्य सुखावह होईल. स्वतः निर्व्यसनी राहिल्यास लोकांस तेंच वळण लागेल. लहानसा पुस्तकसंग्रह करावा.”

विजापूरकरांनीं आरंभिलेल्या उद्योगास बऱ्याच जणांनीं साहाय्य करण्याचें कबूल केलें. कांहीं तरुण माणसांनींही त्यांना येऊन मिळण्याची इच्छा दर्शविली. परंतु यांत पोटार्थ्यांचीच संख्या जास्त होती. सरकारला भिणाऱ्या कांहीं लोकांनीं ‘असला उद्योग आरंभून अकारण सरकारच्या रोषातिरेकास कारण होत आहां’ अशी स्वतःच्या स्वभावास अनुसरून त्यांस भीति घातली. विजापूरकरांच्या हितशत्रूंनींही ‘सरकार यांच्या कोणच्याही चळवळीला दडपून टाकल्याशिवाय केव्हांही राहणार नाहीं. पुन्हां एकदां हे गरीब बिचाऱ्या

तरुणांच्या आयुष्याची राखरांगोळी करणार,' अशा तऱ्हेचे उद्गार—त्यांच्या कानावर जातील अशा रीतीनें—काढण्यास सुरवात केली. याला विजापूरकरांनीं ज्ञानप्रकाशांतून पुढीलप्रमाणें स्पष्ट उत्तर दिलें. "पदरच्या पैशास खार लावून व आपला वेळ व परिश्रम खर्च घालून परमपूज्य पंचमजार्ज यांची आपल्या प्रजेंत ज्ञानप्रसार व्हावा या सदिच्छेस साफल्य आणूं पाहाणाऱ्या गृहस्थास त्याच्या पूर्वेतिहासाच्या दुराग्रहावरूनच सरकार सदासर्वदा विघ्न करीत राहील असा माझाही कित्येक भ्याड लोकांप्रमाणें समज असता तर **मीं केव्हांच देशत्याग केला असता.** आपल्या लोकांची शक्य तितकी सेवा करावी याहून येथें राहण्याचा मला दुसऱ्या कोणाचाच पाश नाहीं हें ज्यांना माहीत आहे ते गैरसमज करून घेणार नाहींत व वेळीं अवेळीं मजवर आग पाखडणार नाहींत. सत्य, परमेश्वर व मातृभूमि यांची पूजा करावी हा हेतु पुढें ठेवणारास परमेश्वरापेक्षां पुष्कळ कमी पण तुम्हां आम्हांपेक्षां सत्य जाणण्याचीं साधनें ज्याच्याजवळ पुष्कळ आहेत अशा सरकारची मला भीति वाटत नाहीं."

विजापूरकरांनीं आपला हा नवा उद्योग तळेगांवासच विद्यालयाच्या इमारतींत राहून आरंभावयाचें ठरविलें. तळेगांवासभोंवतीं असलेल्या दहापांच खेड्यांत पहिल्यानें प्रयोग करून पहावयाचा व त्यांत यश आल्यावर मग अधिक विस्तृत क्षेत्र घ्यावयाचें, असें ठरलें. या चळवळीला सरकारच्या सहानुभूतीची जरुरी होती. ती मिळेल अशी विजापूरकरांस खात्री वाटत होती. पण ही खात्री चुकीची ठरली. सरकारनें खडखडीत जबाब दिला कीं, "तुम्ही कोणतीही शिक्षणसंस्था काढली किंवा शैक्षणिक चळवळ सुरू केली तरी ती 'अनिष्टकारक' समजली जाईल." यावर विजापूरकरांनीं मुलाखत देण्याची मेहेरबानी करण्याबद्दल गव्हर्नरसाहेबांस विनंति केली. पण ती त्यांजकडून झिडकारून लावण्यांत आली व 'मागें एकदां जो निकाल दिला आहे तो कायम समजावा' असें स्पष्टपणें बजावण्यांत आलें. सरकारनें स्वीकारलेल्या या वृत्तीनें विजापूरकर वैतागून गेले. आपण कितीही शुद्धांतःकरणानें कोणतीही चळवळ सुरू केली तरी ती अनिष्ट आहे, दुष्ट हेतूंनीं भरलेली आहे अशी सरकार आपली समजूत करून घेतें, याला उपाय तरी काय करावा हेंच त्यांना समजेनासें झालें. त्यांच्या ऐवजीं दुसरा कोणी असता तर या दारुण निराशेनें वेडा झाला असता किंवा त्यानें आत्महत्त्या करून घेतली असती.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

विजापूरकरांनीं शेवटीं कंटाळून ता. २२-९-१५ रोजीं गव्हर्नरसाहेबांस लिहिलें कीं, " मी करूं इच्छीत असलेला कोणताही सदुद्योग मला करूं द्यावयाचा नाहीं च मला सारखी पीडा देत राहावयाचें हें जें सरकारचें धोरण तें पाहिलें म्हणजे मला सरकारकडे एक नम्र विनंति करावीशी वाटते ती ही कीं, **सरकारनें मला सार्वजनिक रीत्या फांसावर चढवून माझा प्राण घ्यावा.** माझ्या विचारपूर्वक केलेल्या विनंतीनुसारच ही गोष्ट व्हावयाची असल्यामुळें सरकारला त्या बाबतींत पाप लागणार नाहीं. सरकारकडून सर्वतोपरी सतावला जात असलेल्या नागरिकाचा ( जिवंत असून ) उपयोग तरी काय ?...मेहेरबानांना मी आश्वासनपूर्वक सांगतों कीं मी वेडा माणूस नाहीं; मी ही विनंति अंतःकरणपूर्वक करीत आहें........सध्यांचें निष्क्रिय, निरुपयोगी जीवन कंठीत बसण्यापेक्षां त्याचा शेवट करून नवा सदुद्योग आरंभिण्याकरितां नवा जन्म घेऊन नवें शरीर धारण करावें, असें मला अंतःकरणपूर्वक वाटतें. "

सरकारनें स्वीकारलेल्या निष्ठुर धोरणामुळें विजापूरकरांचे ' निरक्षरतेवरील मोहिमेचे ' सर्व बेत जेथल्या तेथें गारद झाले. ' ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान ॥ ' असें म्हणून स्वस्थ बसण्यापलीकडे त्यांस अन्य मार्ग राहिला नाहीं.

---

मराठी ... अनुक्रम ... वि:

# ३ अनपेक्षित आपत्तींचे नवे ढग

सरकारनें स्वीकारलेल्या धोरणामुळें निर्माण झालेल्या प्रतिकूल परिस्थितींत गटंगळ्या खात असतां, त्यांच्या जीवनाकाशांत अनपेक्षित असे आपत्तींचे नवे ढग आलेले दिसूं लागले. ज्या दिशेनें हे ढग येत होते त्या दिशेनें ते येतील असें त्यांना कधींही वाटलें नाहीं. ते स्तिमितच झाले. आपण पाहतों आहों तें सत्य नाहीं असें त्यांना कांहीं वेळपर्यंत वाटलें. त्यांनीं आपली खात्री करून घेण्याकरितां डोळे ताणताणून त्या दिशेकडे पाहिलें. तें सत्यच होतें; त्यांच्या डोळ्यांना जें दिसत होतें तें सत्यच होतें. खरोखरीचे ढगच हळुहळू त्यांच्यावर आक्रमण करूं लागले होते. त्या दृश्यानें विजापूरकरांची कंबरच खचली. आतांपर्यंत एकट्या सरकारशींच त्यांना दोन हात करावे लागत होते; यापुढें त्याबरोबरच स्वकीयांशींही करावे लागण्याचा प्रसंग ओढवत होता. ज्या एका आशेच्या धाग्यावर ते कसें तरी जीवन कंठीत होते तो धागाच तुटून जाण्याचा प्रसंग आतां आला होता. सरकार विद्यालयाच्या बाबतींत आपला दुराग्रह—काय वाटेल त्या मार्गानीं गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला तरी—

सोडण्यास तयार नाहीं असें पाहून कै. ओक प्रभृतींनीं महाराष्ट्र विद्याप्रसारक मंडळ कायमचें बरखास्त करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें ता. २६ जुलै १९१५ रोजीं मुंबईस कै. डॉक्टर नानासाहेब देशमुख यांचे घरीं मंडळाच्या सभासदांची एक तांतडीची सभा बोलविली. या सभेंत खालीं लिहिल्याप्रमाणें ठराव पास करण्यांत आलेः—

( १ ) समितीच्या कायद्याचीं कलमें व संस्थेंतील लोकांना आलेली नोटीस यांचा विचार करितां मंडळांतील सभासदांना यापुढें कोणतेंच शिक्षणसंस्थावजा कार्य करतां येणार नाहीं असा कायद्याच्या दृष्टीनें अभिप्राय ठरला. तेव्हां मंडळानें जमीन वगैरे सर्व मालमत्ता पैसाफंडास देऊन टाकावी व मंडळ विराम पावलें असें जाहीर करावें.

( २ ) चॅरिटेबल एंडाउमेंटसूसंबंधीं नवीन कायदा घाटत आहे तत्पूर्वी याची व्यवस्था लागावी म्हणून हें काम लवकर उरकून टाकावें.

( ३ ) प्रो. विजापूरकर यांचीं पुस्तकें व इतर खासगी सामान संस्थेंत सामील झालें असेल तें त्यांनीं निराळें काढून घ्यावें व त्याप्रमाणें त्यांस कळवावें.

( ४ ) इतर कामें वरील कलम १ मुळें शिल्लक रहात नाहींत सबब त्यांचा निराळा निकाल करण्याचें रहात नाहीं.

मंडळाच्या या सभेस विजापूरकर हजर नव्हते. त्यांस या ठरावांची नक्कल ओक यांनीं पाठवून दिली. मंडळ अशा तऱ्हेचे ठराव पास करील असें विजापूरकरांना वाटलें नव्हतें. ओकांनीं पाठविलेले हे ठराव पहातांच, आपल्या स्नेह्यांप्रमाणेंच आपल्या पायांखालची पृथ्वीही उलट दिशेनें गरगर फिरूं लागली कीं काय असा त्यांना भास झाला. मंडळाच्या—विशेषतः ओकांच्या—या कृत्यामुळें त्यांचें मन विषण्ण झालें व त्या भरांत त्यांनीं खालीलप्रमाणें ओकांस उद्देशून जाहीर नोटीस लिहिलीः—

" आपलें पत्र मला मिळालें. मंडळाची सभा रविवारीं भरणार असें मला आपलें पत्र गेल्या शनिवारीं आलें. सेक्रेटरीचें काम मी एकट्यानेंच अधिकारपत्र देऊन २० आगष्ट १९०८ रोजीं आपल्याकडे सोंपविलें, तें आपण तळेगांवीं रहाण्याचें सोडल्यानें मी परत घेतल्याचें जाहीर केलें. तत्पूर्वी आपणासही लिहिलें त्यास

ग्रं. क्र. ३६००



आज बरेच दिवस झाले. तेव्हां आपणाकडे चिटणीसपणा राहिला नाहीं म्हणून वरील पत्र पाहून* विस्मय वाटला. मंडळाची सभा नसून केवळ सल्ला घेण्यासाठीं त्यांत नसलेल्या गृहस्थांसही बोलावून आपण जमणार व बहुतेक प्रश्न कायद्याचे आहेत म्हणून मी येण्याची दगदग करीत नाहीं. पुण्यास मंडळी जमती तर कदाचित् आलों असतों. सर्व निकाल लावण्याची आजच घाई नाहीं. मी सवडीप्रमाणें आपणास भेटेन अशा अर्थाचें डॉ. नानासाहेबांस शनिवारीं कार्ड लिहिलें. आपण मला शुक्रवारीं पत्र लिहिलें त्याखालीं चिटणीस अशी सही नव्हती. असो. या बाबी जुजबी आहेत. कलम १ मध्यें म्हटल्याप्रमाणें माझीही निराशा झाली असती तर मी अखेर याच मार्गावर आलों असतों. परंतु मिळालेली नोटीस रद्द करून घेणें शक्य आहे व माझे इलाज सुरू आहेत. शिक्षणासंबंधीं मी एक काम हातीं घेतलें आहे. त्याची व्यवस्था लावून मग तें मंडळाच्या हवालीं करण्याचा माझा विचार होता. समितीचा कायदा समर्थविद्यालयास सरकारनें लागू केला; मंडळास केला नाहीं. तेव्हां मंडळ अबाधित आहे, असा माझा आग्रह आहे. समर्थविद्यालय तरी मंडळानें स्थापिलें नव्हतें. जून १९०६ त तें मी स्थापून पुढें आगष्टांत स्थापिलेल्या मंडळाचे हवालीं केलें. समर्थविद्यालयाचें कार्य मी बाहेर मोकळा होतों तोंपर्यंत सरकारास नापसंत नव्हतें. आपण माझ्या पश्चात् मे. गव्हर्नरसाहेबांची मुलाखत घेतली तेव्हां हें निश्चित झालें आहे. समर्थविद्यालयाची प्राणप्रतिष्ठा माझे हातून झाली व आपण सर्वांनीं माझ्या पश्चात् तें उत्तम चालविलें. परंतु सभोंवारची परिस्थिति जरा चमत्कारिक झाली व मी बाहेर असतों तर जे उपाय योजिले असते त्याची आपणास शक्यता नव्हती. कसेंही असो अनिष्ट कोसळलें खरें. परंतु माझा जीवमात्र असेपर्यंत वर आपण ( ठरावांच्या पत्रांत ) कलम १ मध्यें लिहिल्याप्रमाणें पाट्या उधळण्यापूर्वी तार करून मला बोलवावयाचें होतें. तसें झालें नाहीं म्हणून मला आपण लिहिलेलें पत्र मान्य नाहीं, हें जाहीर करीत आहें."

"कलम ३ मध्यें लिहिलेल्याप्रमाणें माझें सर्वस्वच संस्थेंत असल्यानें त्याचा हिशोब ( किंवा ) मोजदाद अशक्य आहे."

---

* ओक यांनीं आपल्या पत्राखालील सहीखालीं 'चिटणीस, महाराष्ट्रविद्याप्रसारक मंडळ' असें लिहिलें होतें.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

"आपल्या संस्थेचें असें हंसें व्हावें ह्याबद्दल मला अत्यंत खेद वाटत आहे. परंतु मंडळाची आजवर कधींच सभा भरली नाहीं; जी एक भरली ती अशी बेरीतशीर व घाईनें भरावी व **माझ्या सर्व आयुष्यकार्यावर विरजण** पडावें अशा प्रकारची व्हावी यामुळें खेदापेक्षां उद्वेग अधिक होत आहे. तुमचें माझ्यावर प्रेम असून अशा भरीस पडून या विचित्र मार्गांत तुम्ही ओढलां गेलां याबद्दल मात्र अकृत्रिम विषाद वाटतो. मजवर इतकीं संकटें आलीं त्यांपैकीं हें एक समजतों."

ही नोटीस 'ज्ञानप्रकाशांत' छापण्याकरितां पाठविली होती. परंतु ती ज्या समयाला प्रकाशली जाणार होती तो समय अतीशय चमत्कारिक होता. गोखले-टिळक वादांत* (१९१५ चे प्रारंभीं) विजापूरकरांनीं गोखल्यांची बाजू घेतल्या-मुळें ते राष्ट्रीय पक्षाच्या—किंबहुना टिळकपक्षाच्या रोषास कारण झाले होते. एका बाजूस सरकारचा रोष तर दुसरे बाजूस स्वपक्षाकडून अवमान व अवहेलना+ अशी स्थिति होती. अशा वेळीं असली नोटीस प्रसिद्ध होणें खुद्द

---

* कॉंग्रेसचें धोरण कसें असावें, राष्ट्रीय पक्षाला आंत घ्यावें कीं नाहीं, घेतल्यास कोणत्या अटींवर घ्यावें, यासंबंधींचा १९१५ त मोठाच वाद माजला होता. पुढाऱ्यांत पत्रव्यवहार व खलबतें जोरानें सुरू होतीं. अशावेळीं बिझांटबाई मध्यस्ती करण्याच्या हेतूनें गोखल्यांकडे आली. त्या वेळीं गोखले आजारी होते. त्यांस भेटण्यास त्याच वेळीं टिळक आले होते. त्रिवर्गाच्या एकत्र गांठी पडल्यावर अर्थातच या वादासंबंधीं परस्परांशीं बोलणें झालें. विजापूरकर या भेटीच्या वेळीं तेथें हजर होते; त्यांनीं हें बोलणें ऐकलें होतें. पुढें या भेटीसंबंधीं जाहीर रीतीनें चर्चा सुरू झाली. टिळकांनीं 'मी अमुक अमुक वाक्य उच्चारलें नाहीं' असें जाहीर केलें व गोखल्यांवर बेसुमार टीका केली. त्यामुळें विजापूरकरांस 'मला सर्व गोष्टी माहिती आहेत. मी त्या वेळीं हजर होतों,' असें सांगून गोखल्यांची कड घेणें भाग पडलें.

+ विजापूरकरांनीं ना. गोखल्यांची कड घेतल्यामुळें टिळकांच्या केसरीनें त्यांस अहेर केलेलें खालील शेलापागोटें—टिळकांचा व टिळकपक्षाच्या मनोरचनेचा एक मासला म्हणून—पाहाण्याजोगें आहे. " गेल्या अंकांतील '**चोराच्या उलट्या बोंबा**' या अग्रलेखांत जो मजकूर आला आहे त्यासंबं-

विजापूरकरांनाच अहितकारी होईल असें ज्ञानप्रकाशकर्त्यांस व ज्यांनीं ती नोटीस खासगीरित्या पाहिली त्यांस वाटल्यामुळें ती न प्रसिद्ध करण्याबद्दल त्यांनीं त्यांस विनंती केली. एका राष्ट्रीयपक्षाच्या गृहस्थानें मात्र—त्या पक्षाच्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें—' ना. खरे व टिळक या अट्टल कायदेबाजांशीं आपली गांठ आहे हें नीट समजा ' असा धाक घालण्यास कमी केलें नाहीं. शेवटीं, ' सर्वांच्या मनास येत नाहीं तर राहूं दे, ' असें ज्ञानप्रकाशकर्त्यांस कळवून विजापूरकरांनीं ही नोटीस प्रसिद्ध करण्याचा बेत रद्द केला. हा बेत जरी रद्द झाला तरी टिळक-पक्षाच्या लोकांकडून—व खुद्द ओकांकडून—जो हेतुविपर्यास व्हावयाचा तो झालाच. विजापूरकर व टिळक व त्यांचे कट्टे अनुयायी नाना ओक यांच्यांत कायमची तेढ उत्पन्न झाली. या तेढीमुळें टिळकांच्या अनुयायांना, ' विजापूरकर मवाळांच्या गोटांत शिरले;' 'जोहुकूम पक्षांत शिरले,' 'सरकारच्या आराधनेच्या मार्गाला ते आतां लागले,' अशी हुल्लड उठवून द्यावयाला नामी संधी मिळाली. शंकराच्या गणाप्रमाणें, ज्याच्यावर आपल्या स्वामीची स्निग्ध दृष्टि असेल त्याला ऐरावतावर चढवावयाचें—मग त्याची तेवढी लायकी असो वा नसो—व ज्यावर रुष्ट असेल त्याला गर्दभावर बसवून ' फाल्गुन ' साजरा करावयाचा असा यांचा

---

धानें दोनहि पक्षांतर्फें दोन तीन पत्रें आमच्याकडे आलीं असून त्यांत प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर यांनीं रा. गोखले यांच्या सद्बुद्धीबद्दल त्यांस एक सर्टिफिकिट दिलें असून, त्याबद्दल कोणास शंका असल्यास त्यानें आपणास भांबुर्ड्यावरील आंबराईत समक्ष किंवा पत्रमित्रद्वारा भेटावें म्हणजे त्याची आपण खात्री करून देऊं असें त्यांचें म्हणणें आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या वादांत साक्षीदार घेण्याची वेळ अद्याप आली नाहीं. ना. गोखले व टिळक हे स्वतः होऊन आपल्या नांवानेंच जर आतां पुढें आले आहेत तर त्यांच्या सहीनेंच हा वाद चालूं देणें हें बरें. ना. गोखले यांनीं टिळकांवर जे आरोप केले त्यांचा टिळकांनीं इन्कार केला आहे. पण ना. गोखल्यांची लेखी पुराव्याची पुरशीस जरी प्रसिद्ध झाली आहे, तरी मूळ फिर्यादच अद्याप प्रसिद्ध होणें असून त्यावरची टिळकांची कैफीयतही अद्याप यावयाची आहे. या गोष्टी झाल्यावर साक्षीदारांस जेव्हां समन्सें निघतील तेव्हां त्यांनीं हजर व्हावें; मध्येंच " **बीचमें मेरा चांदभाई** " करण्याची जरूरी नाहीं. "

सांप्रदायच होता—आहेही. या सांप्रदायला हे गण अशा वेळीं जागले नाहींत तर तो सांप्रदाय तरी कसला व ते गण तरी कसले ! !

आभाळांत संकटांचे ढगावर ढग जमत आहेत, खालीं समुद्र खवळला आहे व भोंवतालीं भीषण असे वादळी वारे वाहात आहेत, अशा परिस्थितींतून विजापूरकरांना आपली नौका हांकावयाची होती. ध्येयावरील दृष्टी चळून किंचित् जरी तोल सुटला तरी नौकेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडून कायमची समाधी मिळेल अशी स्थिति उत्पन्न झाली होती.

---

# परिशिष्ट १

## प्रो. विजापूरकरांना आलेलीं निवडक पत्रें.

[ १९१४—१५ ]

## १ अनंत महादेव गुर्जर यांचें अमेरिकेहून पत्र.

आपलें फार दिवसांचें पत्र पोंहोंचलें. माझी आठवण करून माझा परामर्ष पत्रद्वारें आपण घेतला याबद्दल मला मोठा गर्व ( अभिमान ) वाटतो व आपल्यासारख्याची सहानुभूति हीच माझे अनंत जयाची ध्वजा असें मी समजतों. आज सात वर्षांमध्यें मी स्वतःची जी उत्क्रांती करून घेतली तिचें श्रेय ज्या तीन चार गृहस्थांकडे आहे त्यांपैकीं आपण एक असल्यामुळें आपणाजवळ मला केव्हांही चरणारविंदच होणें योग्य आहे. आपलें मजवरील गुरूचें प्रेम व माझी आपणावरील शिष्यश्रद्धा हीं नेहमीं वृद्धिंगत होवोत, अशी माझी त्या सर्वसाक्षी दीनानाथाकडे प्रार्थना आहे. आतां माझी थोडक्यांत हकिगत अशीः—

मी आज दीड वर्षांपूर्वी कॅलिफोर्नियांत केवळ अवलोकनार्थ आलों व अनपेक्षित रीतीनें मजवर दोन तीन जबाबदाऱ्या आल्या. यामुळें स्वतःचें कार्य पुष्कळ अंशीं सोडून देशबंधूंचे सेवेंत मी स्वतःला वाहिलें. पहिली गोष्ट म्हणजे आज चार पांच वर्षें प्रयत्नांत असलेलें मध्यवर्ती संस्थेचें स्थापन होय. हिंदुस्थान ॲसोसिएशन थोड्याशा रंगारूपाला आलें आहे व त्याचा पाया मजबूत करणेंकडे अजूनही मला बरेच श्रम करावे लागत आहेत. मजवरील दुसरी जबाबदारी म्हणजे येथील आमचे मजूर देशबांधवांना निराळ्या प्रकारचें चैतन्य देणें. या दिशेंतील प्रयत्नांचें मला असें फळ आलें आहे कीं आज इकडे एक चार हजार डॉलरांचे हिंदी भांडवलावर पांचशें एकराचा एक मळा स्थापन केला आहे. हा मळा दहा वर्षांचे भाड्यानें घेतला आहे.........या मळ्यासंबंधीं विशेष गोष्ट म्हणजे हिंदी विद्यार्थ्यांला प्रॅक्टिकल शिक्षण मिळण्याची सोय होय.........हिंदी लोकांनीं इकडे येणें अवश्य आहे. परंतु दिवसेंदिवस हें फार कठीण होत चाललें आहे. एमिग्रेशन लॉज फार कडक रीतीनें हिंदी लोकांना लागू केले जात आहेत. आपण ज्या जमिनींसंबंधीं उल्लेख केला आहे त्या जमिनी फार खराब आहेत.

तथापि चांगल्या हिंदी लोकांनीं मनांत आणलें तर इकडे वस्ती करण्याकरितां ओसाड जमिनी पुष्कळ आहेत. परंतु अमेरिकन लोक अशी वस्ती कधींही करूं देणार नाहींत.......हिंदुस्थानांतील शिक्षणाची दिशा बदलणें आहेच, परंतु तरुणांना पोट भरण्याच्या युक्त्याही नव्या सुचविणें जरूर आहे. यापैकीं मोठी व अजब युक्ती म्हणजे शिक्षित लोकांनीं शेतकीचे धंद्यांत जाणें हीच होय. तसेंच आमच्या तरुणांना व्यापारी कावा साधला पाहिजे. धंद्यांची व व्यापाराची गोडी लागली पाहिजे. मला वाटतें कीं तीन चार वर्षांत महाराष्ट्रांत, अमेरिकेंत तयार झालेल्या शेतकी शास्त्रज्ञांचा छोटासा घोळका जमेल व पांच दहा वर्षांत शेतकीच्या धंद्याचें उज्ज्वल स्वरूप महाराष्ट्राला दिसूं लागेल. लोकशिक्षणांत ' दीर्घायुष्य ' लेख लिहिणारे माझे मित्र खानखोजे हे एक अचाट संत आहेत. वर्ष दीड वर्षांत ते परत येणार आहेत. ......माझी एक अशी इच्छा आहे कीं गुरुवर्यांनीं ( विजापूरकरांनीं ) अमेरिकेंत येऊन पांच सहा महिने लेक्चरें द्यावींत. यांत फारच मोठा फायदा आहे. आम्हांला अमेरिकन लोकांची सहानुभूती मिळविणेची आहे. आपणाकरितां मी पुष्कळ तजवीज करूं शकेन, एवढेंच नव्हे तर मी आपल्या खर्चाकरितां शंभर डॉलरपर्यंत वर्गणी देणेस तयार आहें. इकडे आल्यानंतर एखाद्या युनिव्हर्सिटींत आपला सहज शिरकाव होईल असें मला वाटतें. हिंदुस्थानांत राहून कुजण्यांत काय फायदा ? आमचें पाणी काय आहे हें अमेरिकन लोकांना सांगणें आहे व तें तरुण बांडांपेक्षां आपल्यासारख्या वयोवृद्धांनींच केलें तर लांब पल्ल्यावर जाईल.

---

## २ गिरराव अण्णा जहागिरदार ( गुलबर्गा ) यांचें पत्र.

पौष वद्य ११ चें पत्र आज १८ दिवसांनीं पहाण्यास मिळालें. पत्रावरून आपल्या थोर अंतःकरणाची परीक्षा होते. देशस्थितीबद्दल अहोरात्र मनांत चाललेले विचारच अशावेळीं विवश होत्साते बाहेर पडतात. आपलें पत्र शाळेच्या कमेटीपुढें मांडून योग्य असतील त्या सुधारणा अमलांत येतीलच. परमेश्वरापाशीं प्रार्थना एवढीच कीं आपल्यासारख्या माणसाची कर्तबगारी देशाला उपयोगी पडण्यासारखी परिस्थिती उत्पन्न होवो.

## ३ प्रो. दत्तो वामन पोतदार यांचें पत्र

आजच 'लोकशिक्षणाचा' ताजा अंक हातीं आला. आपला दुसरा लेख वाचून गहिंवरून गेलों. असा कळवळीचा, स्पष्ट, निर्भीड व कळवळ्याचा लेख आज बहुत दिवसांनीं वाचावयास मिळाल्यामुळें जो आनंद मनास वाटला तो पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. त्यांतील सर्वच विचार अजून मनास पटले नाहींत तथापि ते सोडून कित्येक जे इतर उद्गार आंतील तळमळीमुळें बाहेर पडले त्यांचें कोडकौतुक करण्यास मजजवळ शब्द नाहींत. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची मंडळी हे लेख वाचतील तर त्यांना काय वाटेल कोण जाणे ? एकदां असेंही वाटलें कीं असा लेख जाहीर रीतीनें प्रसिद्ध करण्यापूर्वी त्याच मंडळीकडे अगोदर पाठविला असता व गोपाळराव गोखले यांचे समक्ष त्याची शहानिशा करून घेतली असती तर अधिक इष्ट झालें असतें. काय, 'महाराष्ट्रविद्याप्रसारक मंडळ' व 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' यांनीं एकत्र मिळून काम करण्याची उदात्त कल्पना आपणच लिहिलीत ? आपण तर हात पुढें केलाच आहे. पहावें आतां तो झिडकारला जातो कां अभिमानानें व प्रेमानें शिरीं स्थापन केला जातो ! त्यावरून राष्ट्राच्या अभ्युदयाचीं भविष्यें करण्यास सुलभ जाईल. आपण तर आपलें कर्तव्य बजाविल्याबद्दल अनंत धन्यवादांस पात्र आहांत ! !

---

## ४ डॉ. बा. शि. मुंजे यांचें पत्र

बरेच दिवसांपासून आपणास पत्र लिहावें असें वाटत होतें. परंतु कांहींतरी कारणामुळें आजपर्यंत तसें करतां आलें नाहीं.

एका विशिष्ट पद्धतीनें करण्यायोग्य अशा एका पुढील कार्यासंबंधीं जे माझे मनांत बरेच दिवसांपासून विचार घोळत आहेत ते आपणांसमोर थोडक्यांत या पत्रद्वारें ठेवतों, त्यावर आपलें जें मत होईल तें स्पष्टपणें कळविण्याची कृपा करावी.

आजपर्यंत आपलें सर्व आयुष्य आपण राष्ट्रांतील तरुण मुलांस राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेस परिपोषक होईल असें शिक्षण देण्यांत घालविलें किंवा व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें असतां या कार्यांतच आपण आयुष्याचें मातेरें करून घेतलें यांत शंका नाहीं व पुढेंही शक्य असल्यास हें धोरण आपण सोडणार नाहीं, अशी राष्ट्रास

आपण खात्री पटवून दिली आहे. तरी सध्यांच्या राजकीय वातावरणांत ज्या रीतीनें आपण आतांपर्यंत शिक्षण देत आलां आहांत त्या रीतीनें हें कार्य शेवटास नेणें आपल्या सामर्थ्यांच्या बाहेर आहे हें आपल्यासही दिसून आलें आहेच. परंतु तें शिक्षणाचें कार्य सध्यांच्या परिस्थितींत निराळ्या मार्गानें करणें शक्य आहे असें मला वाटतें व तें कसें हें मीं खालीं लिहितों.

आजपर्यंत आपण शिक्षणपद्धतीस व्यवहाराचें स्वरूप दिलें होतें, परंतु इंग्रज सरकारास महाराष्ट्रांतील कोणतेंही व्यावहारिक शिक्षण राष्ट्रीय पद्धतीनें देणें त्यांच्या हिंदुस्थानांतील अस्तित्वास बाधक आहे असें वाटत असलेमुळें ते हे प्रयत्न नेहमीं हाणून पाडीत असतात. म्हणून या प्रयत्नास आतां धर्माचें स्वरूप देणें अवश्य आहे असें मला वाटतें. शक्य असल्यास याच धोरणानें निदान कांहीं काळपर्यंत तरी आपण काम चालवूं शकूं असें मला वाटतें. नुकतेंच मी पाहून आलेल्या गुरुकुल संस्थेंत ३५० विद्यार्थी असून देखील सरकारच्या डोळयांत ती संस्था खुपत नाहीं आणि अगदीं दरिद्रावस्थेंत असलेली पांच पन्नास ( ? ) विद्यार्थ्यांची लहानशी संस्था (समर्थ विद्यालय) त्यांच्या काळजास तेव्हांच बोचूं लागली याचेंही वर्म यांतच आहे असें मला वाटतें. तेव्हां धर्माचें साह्य घेतल्याशिवाय शिक्षणविषयक चळवळ महाराष्ट्रांत करणें शक्य नाहीं हें उघड आहे........ नागपूर येथें धर्मशास्त्रावर '**मानवधर्मशास्त्र**' या नांवाचें एक मासिक पुस्तक काढण्याचा माझा विचार आहे. मासिकांत हिंदुधर्मशास्त्राचें जगांतील इतर समाजशास्त्रांशीं तुलनात्मक दृष्टीनें विवेचन करणें आहे. आणि केवळ सत्यान्वेषणाकरितां आपल्या धर्मशास्त्राचें रहस्य लोकांपुढें मांडून जगांतील इतर समाजशास्त्रांपेक्षां सर्वांशीं कसें श्रेष्ठ आहे हें लोकांस उघड करून दाखविण्याचा या मासिकाचा उद्देश आहे.........हा उद्देश सफल होण्याकरितां माझे वडिलांनीं चार हजार रुपये अलग काढून दरमहा दरशेंकडा आठ आणे व्याजाप्रमाणें ती रक्कम येथील एका प्रसिद्ध सावकाराकडे ठेविली आहे. आणि छापखाना वगैरे इतर साधनांकरितां जें द्रव्य लागेल तें मी देण्याचा विचार केला आहे. एकंदरींत अशी व्यवस्था करण्याची माझी सध्यांची योजना आहे. परंतु हें कार्य माझे स्वतःचे योग्यतेच्या पलीकडचें असलेमुळें आपले सारखे विद्वानांनीं हें कार्य स्वतःचें आहे असें समजून केल्यास आपलाही उद्देश सफल होईल व माझेही कल्पनेला मूर्तस्वरूप प्राप्त होईल. या कामास सर्व प्रकारची मदत करण्यास

मी तयार आहें. आपणांस ही कल्पना पसंत पडल्यास व या धोरणानें पुढचें कार्य करणें आपणांस योग्य वाटत असल्यास आपण तसें मला स्पष्ट लिहून कळविण्याची कृपा करावी. म्हणजे पुढें यासंबंधीं सविस्तर समक्ष चर्चा करण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

## ५ महात्मा गांधींचें साबरमतीहून पत्र

सुज्ञ भाई विजापूरकर आपका कुछ पताबी हालमें तो नहिं है। यह आश्रमकी ( सत्याग्रहाश्रम ) कच्चि नियमावली भेजता हुं पढकर आपके अभिप्राय भेज दोगे तो मैं कृतार्थ हुंगा। मोहनदास गांधीका वन्दे मातरम्।

## ६ महात्मा गांधींचें अमदाबादेहून पत्र

सुज्ञभाई—आपका खत मीला है। आप अगर यही आकर विद्यार्थीओंको संस्कृत भाषाका शिक्षण दे दो तो मैं कृतार्थ हुंगा। आपको इस आश्रमके व्रत मान्य है। इसलिये मैं उपर्युक्त प्रार्थना करता हूं।

## ७ दिनानाथ विष्णु माडगांवकर यांचें पत्र

सरकारी काय व म्युनिसिपल व लोकलफंड बोर्ड्स यांच्या काय प्राथमिक शाळांत वेतन भिकार असतें ( निदान खेड्यापाड्यांतील शाळांत मुंबईत शिपायाला मिळतो त्यापेक्षांही कमी पगार असतो असें मी ऐकतों ), आणि त्यासाठीं सरकारच्या तोंडाकडे पाहात राहाण्यापेक्षां व लहान मोठ्या अंमलदारांची खुशामत करण्यांत जन्म घालविण्यापेक्षां आपण योजिलेल्या कामास व देशसेवेस वाहून घेण्याचें आदरणीय काम करण्याचें लोकांच्या मनास येत नाहीं ही खरोखर अत्यंत शोचनीय स्थिती आहे. सात आठ तर काय पण दहा वर्षें सरकारी व सावकारी हपिसांत उमेदवारीची तपश्चर्या करीत बसणारे मॅट्रिक व त्याच्या पुढचीही विश्व-विद्यालयाची परीक्षा उतरलेले लोक तसेच रखडत राहतात, आणि ओळख वशि-ल्यानें भलताच वर येऊन पंधरा वीस रुपये वेतनाची जागा पटकावतो, हें प्रत्यक्ष पाहत असतां पुढील आशेवर उमेदवारीस चिकटून बसणारे तरुण लोक आज थोडेथोडके नाहींत. अशी जीवनकलहाची भयंकर स्थिती असतां थोडी झीज खावी लागली, तरी ती सोसून प्राथमिक शिक्षणाच्या कामीं देशसेवा करण्यास मुंबई

इलाख्यांत आपणास दहा माणसेंही मिळूं नयेत, हें खरोखरच अत्यंत निराशाजनक व साधारण मनुष्याचा उत्साह भंग करणारें आहे. तथापि आपण हिंमत न सोडतां गांवोगांव स्वतःच्या कामासाठीं फिरून काय होतें तें पाहिल्याशिवाय हात पाय गाळून बसणारे नाहीं हें आपणास भूषणास्पद आहे, देशमातेचें हें भाग्यच आहे; आणि श्रीहरिकृपेनें आपणास अल्प प्रमाणावर या अत्यंत आवश्यक देश-हिताच्या कामास प्रारंभ करण्यांत तरी यश मिळेल अशी मी आशा बाळगितों. माझ्या सांपत्तिक सामर्थ्याविषयीं मी आपणास प्रांजलपणें लिहून पाठविलेंच आहे. मी माझ्या माहितीच्या लोकहितकारी संस्थांस वर्षाचे दहा पासून बारा रुपये तुलसीदल या समजुतीनें देत असतों, त्याप्रमाणें आपण योजिलेल्या कामास प्रारंभ झाला म्हणजे देईन; अधिक देण्याची ऐपत नाहीं ही दिलगिरीची गोष्ट आहे.

धर्मसंबंधानें आपले व माझे विचार बरेच भिन्न आहेत, हें आपलें पत्र वाचून मला समजून आलें. वाणी शुद्ध असली पहिजे; नसली तर करण्यास नेटाचा प्रयत्न झाला पाहिजे, तसाच शुचिर्भूतपणा आवश्यक आहे हें मला मान्य आहे. परंतु तदर्थ संध्या, पुरुषसूक्त व पूजा यांची जरुरी काय तें मला समजत नाहीं. स्नान म्हणजे सांबाच्या पिंडीवरील अभिषेक आणि सोंवळें वस्त्र म्हणजे ज्याला उदक महिनेचे महिने लागत नाहीं असा मुगटा हीच ज्यांची शुचिर्भूतपणाची कल्पना अशी संध्या, पूजा इत्यादि करणारीं माणसें थोडीं आढ-ळतात काय ? जातीच्या संबंधानें आपण खरोखरच अटक ठेवणार नाहीं असें आपल्या पत्रावरून मी समजतों. ही आपली स्वतःची इच्छा असणें ठीक व प्रशंसनीय आहे. पण मी कांहीं वर्षांमागें पंढरपुरास गेलों होतों तेथें महारांच्या शिक्षकाचें काम फार चांगल्या रीतीनें करणारे व कोणी सांगितलें नाहीं, तर स्वच्छ-तेच्या व पोषाखाच्या संबंधानें ते महार होते असें कोणास वाटणार नाहीं, असेही ते होते. पण ते आपणास कसे चालतील म्हणजे आपण ज्या लोकांसाठीं अस्वार्थ-परतेनें हें काम करणार, त्यांस कसे खपतील याची मला शंकाच आहे. आपला अनुभव कसा काय असेल नकळे. माझ्या अल्प समजुतीप्रमाणें जातिनिर्बंधापेक्षां धर्मविचारांस मोकळीक देणें कमी गैरसोईचें होईल. धर्मशिक्षण आपण योजिलेल्या शाळांत द्यावयाचें असेल, तर सर्वसाधारण धर्मतत्त्वें व नीतितत्त्वें यांविषयींच देणें बरें होणार नाहीं काय ?

## ८ डॉ. हरिभाऊ देव, ( सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी ) यांचें पत्र*

वामनरावांना ( पटवर्धन ) आपण पाठविलेलीं दोन पत्रें मी पाहिलीं. आपल्याला जो सध्यां ताप होत आहे तो पाहून खरोखरच वाईट वाटतें. रा. ओक यांना या लोकांनीं आपणाकडे कसें ओढून घेतलें तेंच कळत नाहीं. ज्या लोकांवर तुमचा सर्व विश्वास तेच जर विरुद्ध वागूं लागले तर तुम्हांला त्यांच्याशीं एकहातीं लढणें किती त्रासाचें होईल ! म्हणूनच कोणतीही गोष्ट घाईनें आपण करूं नये अशी विनंती आहे. रा. केळकर आपल्याशीं केव्हांहि न्यायानें वागतील. कोणत्याही व्यावहारिक बाबतींत त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास मुळींच हरकत नाहीं.

---

* कै. ओक यांस विजापूरकरांनीं दिलेल्या नोटिसीला अनुलक्षून सदर पत्र लिहिलेलें आहे.

# प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

## तृतीय खण्ड.

# १ विद्यालयाच्या पुनरुज्जीवनार्थ पुनः एकदां प्रयत्न.

रत्नैर्महार्घैस्तुतुषुर्न देवाः
न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।
सुधांविना न प्रयुयुर्विरामम् ।
न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः ॥

—भर्तृहरी.

प्रयत्नवादी पुरुष संकटांना भीत नाहींत, प्रतिकूल टीकांनीं धीर खचूं देत नाहींत, श्रमांना कंटाळत नाहींत. जितकीं जितकीं अधिकाधिक संकटें त्यांच्यावर येतात तितकी तितकी अधिकाधिक शक्ति त्यांच्या मनगटांत येत असते. अड-चणींच्या दुर्भेद्य ( साधारण माणसांना ) खडकांवर त्यांच्या प्रयत्नरूपी घणांचे प्रहार सारखे बसत असतात. एक दिवस याच खडकांतून त्यांच्या ध्येयाची मूर्ती बाहेर पडते. या मूर्तीला पाहून लोक स्तिमित होतात; त्यांची वृत्ती बदलते. निंदेच्या वर्षावाचें स्तुतिपुष्पांच्या वर्षावांत रूपांतर होतें. एके काळीं धिःकाराचा ध्वनी काढणारीं तोंडें ‘ जय, जय ’ म्हणून ओरडूं लागतात.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

विजापूरकर, त्यांचे सहकारी व स्नेही विद्यालयाच्या बाबतींत पूर्णपणें निराश झाले असतांही, निराश झाले नाहींत. ‘ निराशा ’ हा शब्दच त्यांच्या कोशांत नव्हता. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. आपण जो उद्योग शुद्धांतःकरणानें व निःस्वार्थबुद्धीनें हातीं घेतला तो असा मध्येंच बुडणार नाहीं, अशी त्यांना खात्री वाटत होती.

मुंबई सरकारकडे अर्ज, विनंत्या करून कांहीं उपयोग होत नाहीं, तर वरिष्ठ सरकारकडे तरी कांहीं प्रयत्न करून पहावा असें योजून मद्रासेस सर शंकरन् नाय्यर यांस १९१६ च्या आक्टोबरांत ते भेटण्यास गेले. सरसाहेबांचें वरिष्ठ सरकाराकडे बरेंच वजन असल्यामुळें, त्यांस सर्व हकिकत मोकळ्या मनानें निवेदन केल्यास, सरकारच्या मनांतील गैरसमज थोड्या अंशानें तरी ते दूर करूं शकतील असें त्यांस वाटलें व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस इत्थंभूत हकिगत निवेदन केली. विजापूरकरांची कार्यनिष्ठा, कळकळ, निःस्वार्थी वृत्ती व खुलें दील हीं पाहून सरसाहेबांचें त्यांजविषयीं अनुकूल मत झालें. त्यांनीं सरकारच्या मनांतील गैरसमज दूर करण्याचे शक्य ते प्रयत्न करीन असें त्यांस आश्वासन दिलें. या आश्वासनाप्रमाणें सरसाहेबांनीं आपणाकडून होतील तेवढे प्रयत्न केले. विजापूरकरांच्या संबंधींची सरकारच्या मनांतील अढी अल्पांशानें का होईना कमी झाली. ‘ समर्थ विद्यालय हें, गुप्तपणें बॉंब तयार करून, ब्रिटीश साम्राज्य उलथून पाडूं इच्छिणाऱ्या संस्थेपैकीं एक आहे ’ अशी जी सरकारनें आपली समजूत करून घेतली होती ती बऱ्याच अंशानें दूर झाली. ‘ विजापूरकर हे एक अत्याचारी क्रांतिकारक आहेत, ’ असा जो सरकारचा अभिप्राय होता, तो सरसाहेबांनीं रद्द करावयाला लावला असें म्हणतात. या आरोपांतून मुक्त होतांच सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे रा. गोपाळराव देवधर व त्या वेळचे मुंबई सरकारचे एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर सर महादेव चौबळ यांना हाताशीं धरून मुंबई सरकारचा गैरसमज दूर करण्याचा त्यांनीं पुनः एकदां प्रयत्न केला. सरकारचा ज्यांच्यावर पूर्ण विश्वास असे नगरचे रा. ब. चितळे, सोलापूरचे रा. ब. साठे यांचें त्यांनीं साहाय्य घेतलें. या सर्वांनीं, राजकीय पक्षभेद क्षणभर एका बाजूस ठेवून, विजापूरकरांसंबंधींचे मुंबई सरकारचे गैरसमज दूर करून समर्थ विद्यालय पुनः जीवंत करण्यासाठीं आटोकाट प्रयत्न केले. वेळीं आपल्या गैरसोयींकडेही त्यांनीं पाहिलें नाहीं. या वेळीं मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन हे होते. विजापूरकरांचें शैक्षणिक ध्येय त्यांना मान्य

होतें, परंतु त्यांतील अन्तर्याम (Spirit) त्यांना मान्य नव्हतें. 'समर्थ विद्यालया'चा इतिहास पहातां हिंदुस्थान सरकारनें सोडलेला हुकूम रद्द होणें शक्य नाहीं असा त्यांनीं अभिप्राय प्रगट केला. सरकारची मनधरणी करण्यांत दोन वर्षें (१९१७–१८) खर्च झालीं. एवढया काळांत निष्पन्न असें कांहींच झालें नाहीं.

पुढें सर महादेव चौबळांच्या डोक्यांत, स्वतंत्रपणें जर एखादी शिक्षणसंस्था काढली तर एखादे वेळीं सरकारकडून मान्यता मिळण्याचा संभव आहे, असा विचार आला. या विचाराप्रमाणें नव्या शिक्षणसंस्थेची एक योजना त्यांनीं विजापूरकरांस तयार करण्यास सांगितलें व ती तयार झाल्यावर प्रि. कॉव्हर्नंटन् (एलिफन्स्टन कॉलेजचे त्या वेळचे प्रिन्सिपॉल), मुंबई इलाख्याच्या शिक्षणखात्याचे अधिकारी मि. शार्प* वगैरेंकडून त्यावर सूचना व अभिप्राय मागवून ती पक्की केली. नवी संस्था डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या धर्तीवर चालवावी असें या योजनेचें धोरण होतें. अभ्यासक्रम अर्थातच विजापूरकरांच्या शैक्षणिक ध्येयाला अनुसरूनच आंखला गेला होता.

नव्या शिक्षणसंस्थेची नवी योजना पक्की होतांच सर महादेवांच्या अभिप्रायानुसार लोकांची सहानुभूति मिळविण्याच्या खटपटीला ते लागले. मध्यप्रांत, वऱ्हाड व मुंबई इलाखा यांत दूरपर्यंत प्रवास करून विजापूरकरांनीं, नवी शिक्षणसंस्था अस्तित्वांत आल्यास, दरवर्षाला साठ रुपयेप्रमाणें पांच वर्षेंपर्यंत मदत करूं, असें आश्वासन देणारे १२५ सहाय्यक जमविले. या सहाय्यकांत मवाळ, जहाल, अर्धजहाल,

---

* मि. शार्प यांनीं सदर योजनेवर खालीलप्रमाणें मासलेवाईक अभिप्राय दिला होता:—

"I do not see any objection to the educational curriculum which you propose being tried as an experiment, it being understood that the school will always be open to inspcetion by Government officers. But everything depends on the **staff** and the **spirit** in which the curriculum is worked by them; and this is a matter which concerns the political department more than the educational."

पेन्शनर, व्यापारी, जमीनदार, सरकारी नोकर अशीं सर्व पक्षांचीं व पेशाचीं माणसें होतीं. एवढी तयारी झाल्यावर सर महादेव, कंबर कसून, सरकारची सहानुभूति संपादण्याच्या खटपटीस पुन्हां एकदां लागले. सर महादेव पुढें सरसावल्यामुळें मुंबई कौन्सिलांतील सभासद व वरिष्ठ सरकारी नोकर यांनीं त्यांस मदत करण्याचे कामीं कांकूं केलें नाहीं. नवी शिक्षण संस्था, सरकारचा ज्यांच्यासंबंधीं कधींही गैरसमज होणार नाहीं अशा खुद्द सर चौबळ व रा. ब. साठे, चितळे, डॉ. नाडगीर यांच्या देखरेखीखालीं चालवयाची असल्यामुळें, सरकारानें फारसे आढेवेढे न घेतां ता. २५ आक्टोबर १९१८ रोजीं तीस संमति दिली. * सरकारची ही संमति हातांत पडतांच, ही नवीन शिक्षण संस्था, '**नवीन समर्थ विद्यालय**' या नांवानें कार्तिकी पौर्णिमेच्या दिवशीं (ता. १८ नोव्हेंबर १९१८) सुरू करणार असल्याचें वृत्त, विजापूरकरांनीं प्रसिद्ध केलें. विजापूरकरांना, त्यांच्या

---

* मुंबई सरकारचें संमतिदर्शक पत्र खालीलप्रमाणें होतें:—

Sir,

I am directed to refer to your representation dated the 9th Sept. 1918 on the subject of the establishment at Talegaon-Dabhada in the Poona District, of a new type of secondary school to be known as the "Navin Samarth Vidyalaya" under the management of a new Education Society to be called the "Nutan Maharashtra Vidya Prasarak Mandala."

In reply, I am to say that Government hopes that the aims of the Society will be fulfilled and will watch the progress of the school with sympathetic interest. I am to request that you will be so good as to furnish Government in due course with a list of the teaching staff of the proposed school.

(Sd.) G. A. THOMAS,
*Secretary to Government*

अविश्रांत खटपटीनंतर मिळालेल्या यशाबद्दल त्यांचें सर्व वृत्तपत्रांकडून व पुढाऱ्यांकडून अभिनंदन केलें गेलें. प्रत्येकजण त्यांच्या दीर्घोद्योगाची, चिकाटीची, जबर आशावादित्वाची स्तुती करूं लागला. पुनः शिक्षणसंस्था स्थापन करण्याचे चाललेले प्रयत्न हें, खडकांतून मार्ग काढण्याकरितां त्यावर डोकें आपटण्यासारखें आहे असें म्हणणारे लोक आतां त्यांची 'वाहवा,' करूं लागले. जग ही कांहीं और चीज आहे! तुच्छतेनें हंसावयालाही तें तयार आणि गळ्यांत सुमनमालाही घालावयाला तयार!

विजापूरकरांना जुनें विद्यालय जरी सुरू करतां आलें नाहीं, तरी नवें विद्यालय सुरू करून आपलें शैक्षणिक ध्येय साध्य करून घेण्यास वाव मिळाला याबद्दल समाधान वाटलें. रानावनांतून हिंडत असलेल्या प्रवाश्याला दीर्घ कृष्णरात्रीनंतर प्रभातकालीन सुवर्णप्रभा दृष्टीस पडल्यामुळें जसा आनंद व्हावा, तशा तऱ्हेचा आनंद विजापूरकरांना झाला. परंतु या आनंदाच्या सुवर्णरंगांत मधून मधून खेदाची कृष्ण छटा उमटे. हा खेद कसला बरें? त्यांची जी एक मोठी इच्छा कीं, विद्यालय सुरू झालें तर पूर्वीच्या आपल्या सव सहकाऱ्यांनीं पुनः एकत्र जमून पूर्वीप्रमाणेंच कार्याला लागावें, ती इच्छा सफळ होणें शक्य नाहीं, हें पाहून होणारा खेद होय.

---

## २ नवीन समर्थविद्यालयाची प्राणप्रतिष्ठा

ज्या सुवर्णदिनाची विजापूरकर उत्कंठेनें वाट पाहात होते तो दिन उजाडला. आपणास आपलें इच्छित कार्य करावयास सांपडणार या विचारांनीं त्यांच्यांत अमित उत्साह संचारला. विद्यालयाच्या त्या ओसाड माळावर आतां नवचैतन्य संचार करूं लागलें. दहा वर्षांच्या काळझोपेनंतर समर्थविद्यालय नवें शरीर धारण करून पूर्वीच्या आपल्या कार्यक्षेत्रांत आतां उतरूं पहात होतें.

विद्यालयाची प्राणप्रतिष्ठा ता. १३ जानेवारी १९१९ रोजीं सर महादेव चौबळ यांचे हस्तें करण्यांत आली. हा समारंभ या आधींच त्रिपुरीपौर्णिमेला ( ता० १८ नोव्हेंबर १९१८) व्हावयाचा; परंतु सर्व जुळवाजुळव होण्यास वेळ लागल्यामुळें हा बेत दीड महिना पुढें ढकलण्यांत आला. समारंभाला पुण्यांतील बहुतेक बडी मंडळी हजर होती. समारंभाचे वेळीं विजापूरकर व सर महादेव यांचीं हृदयस्पर्शी भाषणें झालीं. विजापूरकर बोलावयाला उठले त्या वेळीं त्यांचा कंठ भरून आला. दहा वर्षांचा आपत्तीचा काल आणि त्यांतील चमत्कारिक प्रसंग हीं त्यांच्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं. त्यांचें भाषण खालीलप्रमाणें होतें:—

" आजचा प्रसंग माझ्या आयुष्यांत अत्यंत महत्वाचा आहे. सत्य संकल्पाचा दाता जो भगवान् त्याच्या कृपेनेंच हा योग घडून आला. तरी पण जगरहाटी-प्रमाणें, ज्यांनीं या संबंधांत परिश्रम केले त्यांचा उल्लेख करणें जरूरच आहे. ह्या संस्थेविषयीं महाराष्ट्रांतील लोकांना प्रथम थोडी शंका वाटत असली तरी तिची आवश्यकता सर्वांस मान्यच आहे. ही संस्था पुन्हां स्थापन होण्याचें श्रेय प्रमुख-त्वानें सर महादेव चौबळ यांच्याकडेच आहे. आम्हीं कितीही खटपट केली असती तरी अध्यक्षांच्या ( चौबळांच्या ) मदतीशिवाय या कामीं यश मिळालें नसतें. हल्लींच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा होणें अवश्य आहे, हें मला तिचा अनुभव असल्यामुळें विशेषेंकरून भासत असून सरकारास देखील ही गोष्ट कबूल होत चालली आहे. ज्या वेळीं पूर्वीचें समर्थविद्यालय अस्तित्वांत आलें तेव्हां शिक्षणसुधारणेची लाट अमेरिका वगैरे देशांत उसळली होती; तिच्या संबंधींच्या हकिगती वाचून येथें तसा उपक्रम करण्यांत आला. या काळांत अनेक मतें प्रचलित होतीं. स्वदेशी चळवळ म्हणजे परक्यांशीं संबंध नको, परकीयांचा माल घेऊं नये, इत्यादि विचार प्रतिपादण्यांत येत असत. पण माझें मत तसें नाहीं. या देशांत उद्योगधंदे वाढवून आपल्या सर्व गरजा आपण भागवाव्या ह्या मताचा मी आहें. त्याकरितां परदेशांत जाऊन शिक्षण मिळवावें असें मला पूर्वीपासूनच वाटत आहे. स्वदेशी म्हणजे बहिष्कार नव्हे. ह्या विद्यालयाचा शिक्षणक्रम आम्हीं आंखला आहे. तो हें धोरण पुढें ठेवूनच तयार केला आहे. पूर्वीच्या समर्थविद्या-लयाचे देखील हेच उद्देश होते. पण कांहीं चालकांच्या चुका झाल्यामुळें म्हणा, तें बंद झालें. पुढें मुंबई सरकारच्या कार्यकारी कौन्सिलांत आजच्या अध्यक्षांची नेमणूक झाली, तेव्हां रा. ब. भाऊसाहेब गोडबोले यांचे मार्फत त्यांची भेट घेऊन अशा संस्थेची आवश्यकता अध्यक्षांच्या निदर्शनास मी आणली व त्यांनाही हल्लींच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा होणें अवश्य आहे ही गोष्ट पटली. यानंतर या संस्थेची पुन्हां स्थापना करण्याचें ठरलें. चालक मंडळीची पुनर्व्यवस्था करण्यांत आली; व तदनुसारच विद्यालय सुरू करण्यासाठीं आज आपण जमलों आहों. समाजसेवेकरितां तरुण माणसें तयार व्हावीं यासाठीं लहान वयापासून मुलें संस्थेंत घेण्यास सुरवात केली आहे. हें विद्यालय गुरुकुलपद्धतीप्रमाणें चालणार आहे. यांत खऱ्या ज्ञानाचा लाभ होईल. निरुपयोगी गोष्टी वगळण्यांत येतील. अभ्यासक्रमांत शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणास प्रमुख स्थान दिलें आहे.

वाङ्मयात्मक शिक्षणाची त्यास जोड देऊन पुढें या संस्थेंतून शास्त्रीय संशोधक निर्माण व्हावे असें आमचें ध्येय आहे. या कार्यास माझ्या पूर्वीच्या सहकारी मंडळीसारखीं माणसें मिळालीं पाहिजेत. **धर्म, पंथ किंवा जात यांचा अभिमान सोडून आम्हीं येथें शिक्षण देणार आहों. जगांतील सुधारणेप्रमाणें वागल्याशिवाय आपला तरणोपाय नाहीं. अंधपरंपरेनें वागून सध्यां आपलें कांहीं चालणार नाहीं. पण सुधारणा करतांना न्या. मू. रानडे म्हणत असत त्याप्रमाणें आपण समाजाविरुद्ध बंड करतां उपयोगी नाहीं. समाजाला न दुखवितां आपण भेदभाव कमी केले पाहिजेत.** कोणत्याही जातीच्या माणसांनीं या शाळेबद्दल शंका बाळगूं नये. या शाळेंतील शिक्षकांचें ध्येय शिक्षणच असलें पाहिजे. इतर चळवळींत त्यांनीं पडतां कामा नये. रामासाठीं इतर सर्व गोष्टी सोडा, असें समर्थ रामदास म्हणत असत. उत्तररामचरित्रांत रामांनीं म्हटलें आहे कीं, " स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि । आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥" राजकीय चळवळींत पक्षभेद करावे लागतात, तसे या शिक्षणाच्या चळवळींत असतां कामा नयेत. देशांतील उद्योगधंदे वाढले तर या संस्थेचें सार्थक झालें असें मी म्हणेन. डॉ. भांडारकर यांच्यासारखे दिगंत कीर्ति मिळविणारे संशोधक केवळ वाङ्मयांतच नव्हे, तर मुख्यत्वेंकरून शास्त्रीय ज्ञानांत येथून निर्माण झाले पाहिजेत, व तसे ते होतील अशी मला आशा आहे." विजापूरकरांनंतर सर महादेव चौबळांचें पुढील आशयाचें इंग्रजींत भाषण झालें:—" ही संस्था पुन्हां सुरू व्हावी एतदर्थ प्रो. विजापूरकर यांचे आज दहा वर्षें सतत प्रयत्न चालले आहेत. या संस्थेच्या उद्देशास माझी पूर्ण सहानुभूति आहे. या संस्थेच्या भावी स्थितीसंबंधानें मी स्वप्नसृष्टींत न शिरतां केवळ शक्य कोटींतील कल्पना मनांत आणूनच बोलत आहें. प्रो. विजापूरकर यांनीं सांगितल्याप्रमाणें हल्लींची दुय्यम शाळांतील शिक्षणपद्धति खरोखरच एकांगी आहे. तींत औद्योगिक व शास्त्रीय शिक्षणाचा मुख्यत्वेंकरून अंतर्भाव झाला पाहिजे......देशी भाषेच्या द्वारें सर्व विषयांचें शिक्षण द्यावें हें या शाळेंतील अभ्यासक्रमाचें विशेष स्वरूप आहे. गतवर्षीं सिमला येथें व्हाइसरॉयांनीं बोलाविलेल्या शिक्षणपरिषदेवरून या गोष्टीकडे सरकारचें लक्ष गेलें असल्याचें दिसून येईल. येथें इंग्रजी भाषा दुय्यम म्हणून शिकविली जाईल. या संबंधीं कै. गोपाळराव गोखले यांच्याशीं माझें संभाषण झालें होतें. त्यावेळीं ते म्हणाले कीं, मुलांना एखादा

विषय देशी भाषेंतून शिकविल्यास त्याचें त्यांना सहज आकलन होतें अशी तीन वर्षांच्या प्रयोगावरून आमची खात्री झाली आहे........आम्ही बनविलेल्या या अभ्यासक्रमाला कै. वा. गोखल्यांच्या अनुभवाचें पाठबळ आहे. शिवाय सरकार व विद्याखात्याचे मुख्य अधिकारी यांचीही या प्रयोगाशीं सहानुभूति आहे. कांहीं युरोपियन अधिकाऱ्यांशीं माझा संवाद झाला असतां त्यांना मीं विचारलें कीं तुम्हांला शिकावयाचें ते फ्रेंच किंवा जर्मन भाषेंतून शिकविल्यास तुम्हांला कसें वाटेल? यावर त्यांनीं देखील मातृभाषेंतून शिक्षण देण्याची आवश्यकता मान्य केली. हा प्रयोग केवळ नवीन आहे. तो साध्य झाल्यास हल्लींच्या दुय्यम प्रतीच्या शिक्षणपद्धतींत त्यामुळें क्रांति घडून येऊन सरकारी व निमसरकारी शाळांना या पद्धतीचाच अंगीकार करावा लागेल. असा सुदिन केव्हां येईल हें पहाण्यास मी किंवा प्रो. विजापूरकर कदाचित् हयात असणार नाहीं, यासाठीं हल्लींच्या तरुण पिढीनेंच हें कार्य अंगावर घ्यावें......धार्मिक शिक्षणासंबंधानें मीं येथें जास्त कांहीं सांगत नाहीं. **धर्माचरणाचा मूर्तिमंत पुतळा म्हणून प्रो. विजापूरकर हे आपणासमोर उभेच आहेत. साधी रहाणी व थोर विचारसरणी या गोष्टींचे ते प्रत्यक्ष उदाहरण आहेत.** ”

विद्यालयाच्या सुरुवातीस चार-पांचच विद्यार्थी होते. पुढें ही संख्या वाढत वाढत शंभरांपर्यंत गेली; द्रव्याचेंही सहाय्य हलु हलु मिळत गेलें. एकट्या चौबळांनींच जवळ जवळ पन्नास हजार रुपयांचा निधी संस्थेस जमवून दिला. विद्यालयाची औद्योगिक शाखा—विज्ञान, कृषि, सुतारी, घडकाम व ओतकामाची शाळा ( workshop ), छापखाना—समर्थ बनविण्याकरितां त्यांनीं अतीशय श्रम घेतले. नवीन समर्थ विद्यालय, या दृष्टीनें अद्वितीय व्हावें अशी त्यांची फार इच्छा होती.

विद्यालय स्थापन झाल्यावर एक दोन वर्षें थोड्याशा अस्वस्थतेंतच गेलीं. ज्या आवारांत नवें विद्यालय स्थापन झालें होतें तें आवार जुन्या समर्थविद्यालयाचें. हें विद्यालय पुनः स्थापन होण्याची आशा न दिसल्यामुळें सदर आवार व त्यांतील इमारती शेजारींच असलेल्या पैसाफंड कांचकारखान्यास द्याव्या असा ट्रस्टींचा विचार होता व मुंबईस कै. ओकांनीं बोलाविलेल्या म. वि. प्र. मंडळाच्या प्रशासक मंडळाच्या सभेंत तसा ठरावही पास झाला होता. परंतु विजापूरकरांनीं हरकत घेतल्यामुळें तो बेत अर्धवटच राहिला. तरीपण नवें विद्यालय स्थापन होईपर्यंत

कांचकारखान्याची मंडळी विद्यालयाच्या कांहीं इमारतीचा व आवाराच्या कांहीं भागाचा उपयोग करीतच असे. १९१९ त नवें विद्यालय सुरू होतांच विजापूरकरांनीं कारखान्यास विद्यालयाच्या इमारती व आवार वापरण्याची मनाई केली. कारखान्याचे तरुण चालक ही मनाई जुमानीनात; कारखान्याच्या मालकीच्याच त्या इमारती आहेत असें समजून आपला वापर त्यांनीं चालू ठेविला. येथून भांडणाला सुरुवात झाली. जवळ जवळ दोन वर्षें हें भांडण चाललें होतें. जुन्या मंडळानें केलेल्या ठरावानुसार विद्यालयाचें ६४ एकरांचें आवार व त्यांतील इमारती ही आमच्या मालकींचीं झालीं आहेत असें कारखान्याची मंडळी म्हणे तर विजापूरकर म्हणत कीं, 'ती सभा बेकायदेशीर असल्यामुळें त्यांत पास झालेले ठराव आम्हांस मुळींच बंधनकारक नाहींत.' पुढें, या मालमत्तेचें ट्रान्सफरडीड जुन्या मंडळानें नव्या मंडळाला (ना. चौबळांच्या अध्यक्षत्वाखालीं सुरू झालेल्या) करून द्यावें असें ठरलें व त्याप्रमाणें मसुदाही तयार झाला पण मध्येंच कांहीं कलहप्रिय व्यक्ति टिळकांचे कानांस लागल्यामुळें टिळक, डीडवर सही केली असूनही, तें रजिष्टर करणेचे वेळीं आपण नाकबुली दर्शविणार, विजापूरकरांनीं माझेकडून फसवून सही घेतली, असें म्हणू लागले. डॉ. नानासाहेब देशमुख सही करीत असतील तरच मी कबुली देईन असा त्यांनीं आग्रह धरिला. या आग्रहाला मान देऊन विजापूरकरांनीं डॉ. नानासाहेबांची मुंबईस येऊन भेट घेतली परंतु पैसाफंडाच्या चालकांनीं त्यांचेविरुद्ध त्यांचें मन कलुषित केलें असल्यामुळें ते सही करण्यास तयार होईनात. नामदार चौबळांना हें कळतांच त्यांनीं टिळकांना सर्व हकिगतीचें एक विस्तृत पत्र लिहिलें. त्यांत त्यांनीं सामोपचारानें आपण या गोष्टी मिटवूंया व दुर्दैवानें तसें घडून आलें नाहीं तर मला नाइलाजानें कोर्टाची पायरी चढावी लागेल असें निर्वाणीनें लिहिलें. या पत्रानें टिळकांचे गैरसमज बऱ्याच प्रमाणांत दूर झाले. त्यांनीं या गोष्टीचा कायम निकाल करण्याकरितां कारखानामंडळाची एक सभा बोलाविली. या सभेंत कारखानामंडळाचा विरोध तीव्र स्वरूपाचाच होता. तो पहातांच टिळकांनीं रौद्ररूप धारण केलें. त्यांनीं जमलेल्या मंडळीस, 'तळेगांवची जागा वगैरे ही मूळ राष्ट्रीय शिक्षणाचे कार्याकरितां घेतलेली आहे. ती दुसऱ्या कामास देण्यास मी तयार नाहीं. तिचा उपयोग शिक्षणाकडेच होत आहे. सबब मूळ हेतूच्या विरुद्ध त्यांतील वाटेल तितकी जागा इतरांस देणें योग्य नाहीं. याविषयीं कोर्टांत जबानी देण्याचा प्रसंग आला तरी मी असेंच सांगेन;' असें

निक्षून सांगितलें. टिळकांच्या बोलण्याला विरोध करण्याचें धाडस जमलेल्या लोकांपैकीं कोणांतच अर्थात् नव्हतें. त्यांचें तें बोलणें ऐकून डॉ. नानासाहेब देशमुखांनींही आपलें म्हणणें मागें घेतलें. ते जमलेल्या मंडळीस उद्देशून म्हणाले, 'लोकमान्यांनीं जर असे निर्वाणीचे उद्गार काढले तर आतां मी कारखान्याची तरफदारी करणार नाहीं व तुम्हींही तो नाद सोडून द्या.' अशा रीतीनें, कोर्टांत जाऊं पहाणारें हें प्रकरण समाधानकारक रीतीनें मिटलें. ट्रान्सफरडीडवर सर्व ट्रस्टींच्या सह्या होऊन तें रजिस्टरही झालें. हें प्रकरण मिटल्यामुळें नवें विद्यालय बहुतेक सर्व व्यावहारिक अडचणींतून मुक्त झालें. विजापूरकरांना आपलें चित्तसर्वस्व निर्वेधपणें विद्यालयाचे कार्जी लावण्यास मिळालें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम.......... वि: ...
क्रमांक ...१५२२३... नों. दि. २५।६।५०

# ३ नवीन समर्थ विद्यालयांतील सात वर्षांची कारकीर्द

## ( १९१९—२६ )

विजापूरकरांनीं महत्प्रयासांनीं नव्या विद्यालयाची प्राणप्रतिष्ठा करविली, सर महादेव चौबळांसारख्या प्रागतिक विचाराच्या माणसाला हाताशीं धरून त्याच्या व्यावहारिक नडी स्वत्व न सोडतां दूर करविल्या, रुष्ट झालेल्या टिळकांना—मत-भेद स्पष्ट असूनही—राजी राखून आपलें कार्य साधून घेतलें. एवढें सर्व त्यांनीं साधलें, पण एक गोष्ट मात्र त्यांना साधतां आली नाहीं आणि ती म्हणजे स्वतःच्या माणसांवर दाब ठेवून त्यांच्याकडून आपलें नियोजित कार्य बिनबोभाट घडवून आणणें ही होय. या दोषामुळेंच मनांत योजिलेले शैक्षणिक हेतू अल्पांशानेंही त्यांना साधतां आले नाहींत. ध्येयसिद्धीकरितां ते अखेरपर्यंत धडपडले, तळमळले! नवें विद्यालय स्थापन केलें तेव्हां त्यांनीं केवढे मनोरथ रचले होते! आपलें विद्यालय एक अद्वितीय विद्यालय बनवूं, त्याच्या शाखा जिल्ह्याजिल्ह्याला काढूं, त्या सर्वांना एकत्र आणणारें महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन करूं आणि यायोगें सर्व हिंदुस्थानचें लक्ष आपल्याकडे खेंचूं, सरकारी वळणावर जाणाऱ्या विद्यालयांना शिक्षणाचे नवे धडे देण्याकरितां आपल्याकडे ओढूं! केवढी जबर आकांक्षा!

केवढा आत्मविश्वास! पण ही आकांक्षा सफळ झाली नाहीं. ही आकांक्षा कां बरें सफळ झाली नाहीं? ती आटोक्याबाहेरची होती काय? अव्यवहार्य होती काय? दुःसाध्य होती काय? असें कसें म्हणतां येईल? जी आकांक्षा पं. मालवीयांना, श्रद्धानंदजींना, डॉ. रवींद्रनाथ टागोरांना, प्रो. कर्व्यांना साध्य करून घेतां आली ती आकांक्षा अव्यवहार्य व दुःसाध्य होती असें कसें म्हणवेल? मग ती कां साध्य झाली नाहीं? त्याचीच चर्चा आम्हांला येथें करावयाची आहे. पण ती करण्याआधीं विद्यालयाचा सात वर्षांचा—विजापूरकरांच्या निधनकालापर्यंतचा—इतिहास कथन करणें भाग आहे.

विद्यालयाचीं पहिलीं तीन वर्षें ( १९१९–२०–२१ ) अंतःकलह व बहिःकलह मिटविण्यांतच गेलीं. या वर्षांत शैक्षणिक कार्य असें जवळ जवळ झालेंच नाहीं म्हटलें तरी चालेल. द्रव्याचा व कालाचा प्रमाणाबाहेर व्यय मात्र झाला. याला पहिलें कारण म्हणजे ज्या ठिकाणीं विद्यालय स्थापन झालें ती जागा व त्या जागेंतील इमारती स्वतःच्या असूनही पूर्णपणें हस्तगत होण्यास अडीच वर्षें लागलीं. त्यासाठीं अनेक खटपटी, अनेक चळवळी कराव्या लागल्या. ज्या शेजाऱ्यांना विद्यालय ( जुनें ) अनेकदां उपयोगीं पडलें त्याच शेजाऱ्यांनीं नव्या विद्यालयाच्या अडचणीचे वेळीं—मदत बाजूलाच राहिली—नानातऱ्हेचे अडथळे उपस्थित केले. या अडथळ्यांमुळें औद्योगिक शिक्षणाची व्यवस्था, शिक्षक व उपकरणें यांची जुळवाजुळव केली असतांही, करतां आली नाहीं. रसायनशाला व कार्यालय ( लॅबोरेटरी अँड वर्कशॉप ) स्थापण्याच्या तयारीनें दोन शास्त्रज्ञांशीं पत्रव्यवहार करून त्यांच्या अटीप्रमाणें सर्व सिद्धता केली होती. त्यांची दरमहा रुपये दोनशेंवर नेमणूक झाली होती. परंतु इमारत ताब्यांत न आल्यामुळें कांहीं महिने त्यांना स्वस्थ बसवून ठेवणें भाग पडलें. त्यांना द्यावा लागणारा पगार विद्यालयाला त्यांचेकडून कांहीं करून न घेतां अंगावर सोसावा लागला. पुढें जमिनी व इमारतींसंबंधींचें भांडण मिटल्यावर रसायनशाळा व कार्यालय यांची उभारणी करण्यांत आली व त्याकरितां जवळ जवळ पंधरा हजार रुपये खर्च करण्यांत आले. सर महादेव चौबळ या शाखेबद्दल विशेष आस्था बाळगीत असल्यामुळें त्यांनीं त्याकरितां निधी जमविण्याचे बाबतींत अतीशय श्रम घेतले. मुंबईतील अनेक धनाढ्य व्यापाऱ्यांकडे आपलें वजन खर्चून एक हजार किंवा त्याहून अधिक रकमा देणारे बरेच आश्रयदाते त्यांनीं मिळविले. विशेषतः मरहूम सर शापूरजी भरुचा यांजकडून

मिळविलेलें सहाय्य तर स्पृहणीय होतें. यानीं दोन शास्त्रज्ञांचे पगार व इतर खर्च मिळून दरमहा पांचशें रुपये तीन वर्षेपर्यंत देण्याचें पतकरलें. औद्योगिक शाखा सुरू करण्यांत ' विद्यार्थ्यांना शेती, विणकाम, सुतारी, घडकाम, शिवणकाम, वेतकाम छापखानी काम, पुस्तकबांधणी, मातकाम ( मूर्ती, चित्रें तयार करणें वगैरे ), चितारकाम वगैरे शिक्षण मिळावें; रसायनशास्त्राच्या साहाय्यानें साबण, रंग, औषधें तऱ्हेतऱ्हेचे कागद, तेलें वगैरे तयार करतां यावीं, सर्व प्रकारच्या यंत्रांची व हत्यारांची माहिती व्हावी; व्यापारी घडामोडीची माहिती झाल्यानें सर्व जगभर प्रवास करणें म्हणजे हातचा मळ वाटावा; वाटेल तें काम हातीं घेऊन पार पाडण्याची धमक अंगीं यावी, आणि सर्व गोष्टी जुळवून आणून, तें पार पाडण्याचें चातुर्य व धाडस उत्पन्न व्हावें, हा तर हेतू होताच, पण त्याबरोबरच विद्यालयही द्रव्यदृष्ट्या स्वावलंबी करण्याचाही दुसरा हेतू होता. ज्या दोन शास्त्रज्ञांना, विद्यालयाची सांपत्तिक स्थिती चांगली नसतांही, त्यांच्या सर्व अटी कबूल करून विद्यालयांत घेतलें होतें त्यांनीं या बाबतींत पूर्ण आश्वासन दिल्यामुळें अतीशय खर्चाची अशी ही शाखा—विशेषतः रसायनशाला व कार्यालय—सुरू करण्यांत आली. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, या दोन शास्त्रज्ञांचें विद्यालयांतील लोकांशीं न पटल्यामुळें लवकरच त्यांनीं राजिनामे दिले. या राजिनाम्यांमुळें विद्यालयाचें अतीशय नुकसान झालें. या शास्त्रज्ञांना नुकसान भरपाईदाखल प्रत्येकीं दीड हजार रुपये द्यावे लागले. पैसे गेले ते गेलेच पण त्यांबरोबर ही शाखाही जवळ जवळ बंद पडल्यासारखी झाली. शिवाय शिक्षकांत क्षुद्र गोष्टींवर रणें माजून कलह सुरू होते ते निराळेच. त्यांतील कांहीं शिक्षक विद्यालय सोडून गेले व एक दोघांस नोटीसा देऊन काढून टाकणें भाग पडलें. एवढयावरच ही आपत्ती थांबली नाहीं. संस्थेचे आधारस्तंभ असलेले सर महादेव चौबळ व त्यांचे स्नेही रा. ब. साठे यांनीं यानंतर लवकरच विद्यालयाशीं असलेला संबंध आपण कायमचा तोडणार असें बोलणें सुरू केलें. या वेळीं 'असहकारितेच्या' चळवळीची लाट जोरानें उसळली होती. बारा वर्षांपूर्वींचीं 'बहिष्कार,' 'स्वदेशी,' 'राष्ट्रीय शिक्षण' यांसंबंधींचीं तत्वें प्रत्येक व्यासपीठांवरून पुन्हां एकदां जोरजोरानें उपदेशिलीं जाऊं लागलीं. 'खादी' आणि 'राष्ट्रीय शाळा' हीं या चळवळीचें प्रमुख अंगें समजलीं गेल्यामुळें त्यांचा सर्व देशभर झपाट्यानें प्रसार सुरू झाला. या चळवळीमुळें विजापूरकरांना आनंद झाला. राजकीय हेतूंनीं स्थापन झालेल्या

या शाळांबद्दल जरी त्यांची साशंकवृत्ती होती, तरी आपल्या तत्वाचा प्रसार होत आहे हें पाहून त्यांस एक प्रकारचें समाधानच वाटलें. गुजराथेंत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार फारच झपाट्यानें सुरू होता. त्या मानानें महाराष्ट्रांत बरेंच शैथिल्य दिसत होतें. याचें कारण महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं स्वीकारलेलें धरसोडीचें धोरण होय. विजापूरकरांना एक वेळ वाटलें कीं आपण या चळवळीचा पुढाकार घेऊन महाराष्ट्राच्या एका टोंकापसून दुसऱ्या टोंकापर्यंत राष्ट्रीय शिक्षणाचें हें लोण पोंचवावें. परंतु त्यांचे हात ना. चौबळांच्या गव्हर्निंग बॉडीनें बांधले होते. त्यांना या राजकीय म्हणून समजल्या गेलेल्या चळवळींत प्रत्यक्ष भाग घेतां येणें शक्य नव्हतें. त्यांना हें बंधन असह्य झालें होतें. नव्या रणांगणांत उडी घ्यावी असें वाटे, परंतु बंधनांनीं जखडलेल्या पायांकडे पाहून त्यांना मनांतल्या मनांत ही इच्छा दडपून टाकावी लागे. नवीन समर्थ विद्यालयाचे प्रमुख (१९२१) रा. रा. सदाशिव रामचंद्र सरदेसाई यांना त्यांनीं ता. २९ । १ । २१ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत ते म्हणतातः—"सर्व ठिकाणीं चळवळ चालली आहे अशा वेळीं पुण्यास चांगलीच चळवळ नाहीं हें वाईट आहे. आमच्या गव्हर्निंग बॉडीसाठीं आपले हातपाय जखडून बसावें किंवा आपण पुष्कळ लहान मोठा शिष्यसंघ करून महाराष्ट्रविद्याप्रसारकपणा प्रकट करावा हें बरें, याचा विचार राहून राहून मनांत येतो. यावेळीं आपण धडाडीनें काम केलें तर आपल्या कल्पनांचा प्रसार तरी जोरानें सुरू होईल. लोक बाहेर पडत आहेत याचा अर्थ त्यांना ते आहेत तेथलें शिक्षण नको. निराळ्या संस्था पाहिजेत. त्या आपण पुरविण्याची हमी घेऊं नये काय ? हल्लीं लॉ क्लासचे विद्यार्थी कॉलेज सोडीत आहेत त्याचा अर्थ त्यांतले लोक शिक्षकाच्या कामाला उपयोगी पडतील. **रा. नरसोपंतांच्या केसरींतील धरसोडीमुळें विद्यार्थ्यांचा विश्वास बसत नसेल तर त्यांना आपण सहाय्य करावें, असें वाटत आहे. यासाठीं गव्हर्निंग बॉडीची मर्जी राजी राखण्याचा विचार बाजूस ठेऊन धडाडीनें सर्वांनीं झेंडा उभारण्याचें काम करावें काय ?** समर्थविद्यालयांत आतां सामर्थ्य उरलें नाहीं असा लोकांचा ग्रह झाला आहे.*

---

* नवीन समर्थ विद्यालयाचें मंडळ रजिस्टर केलें गेल्यामुळें व ना. चौबळ, रा. ब. साठे, रा. ब. चितळे यांसारखे सरकारपक्षीय म्हणून समजले गेलेले लोक चालकांपैकीं असल्यामुळें लोकांत 'नवीन समर्थ विद्यालय' ही संस्था सरकारच्या आश्रयाखालीं चालली आहे, असा बरेच दिवसपर्यंत गैरसमज पसरला होता.

कारण या वेळीं एका लहानशा, शंभराहून (विद्यार्थी) कमी अशा शाळेवर तेथील लोक संतुष्ट होऊन तिला चिकटून बसले आहेत (असें त्यांचें म्हणणें आहे.) पुण्याच्या कॉलेजला (टिळक महाविद्यालयाला) मिळून आठवड्यांतून एक तास शिकविण्याचें कबुल करणें हें पाप केलें हें कबुल करण्याची भाषा कशी असावी, सबबी कोणत्या देणेंचा (गव्हर्नींग बॉडीस) विचार करावा ? कां उघडमाथ्यानें सर्व विद्यार्थ्यांस पुण्याच्या कॉलेजांत या, पडेल तें काम करूं असें म्हणून त्यांच्यांत स्फूर्ती आणण्याचा प्रयत्न करावा ? यापैकीं दुसरा मार्ग केला नाहीं तर महाराष्ट्र इतर भागांच्या मागें पडतो कीं काय अशी भीति वाटते, ती दूर करण्यास आपला हातभार लावावा असें वाटतें. तरी याचा नीट विचार करून सर्व मंडळी एकत्र जमून तिकडची हकीकत कळवा व तुम्हां तरुण मंडळीची संमती असेल तर पुणें मुंबई या दोन्ही ठिकाणीं–विशेषतः पुणें, सातारा, सोलापुर या ठिकाणीं व्याख्यानें देण्यास मी परत येईन. आपणा सर्वांच्या मनांत तीव्रता असेल तर तारही करा. Consent to the proposal एवढी पुरे." विजापूरकरांच्या मनाला अशी तळमळ लागली होती. 'विजापूरकरांनीं संस्कृत विषयाच्या अध्यापकाचें काम करण्याचें अभिवचन दिलें आहे,' अशी नुस्ती बातमी टिळक महाविद्यालयानें प्रसिद्ध करतांच ज्या सर महादेवांनीं रुद्राचा अवतार धारण केला व 'गव्हर्निंग बॉडींत ठरल्याप्रमाणें आपलें नांव टिळक महाविद्यालयाच्या शिक्षकवर्गांतून काढून घेतल्याचें जाहीर रीतीनें प्रसिद्ध करा; तसें केलें नाहींत तर मी राजीनामा देईन, फंड जमा करण्याचें बंद करीन' अशी धमकी दिली व "तसें पत्र जाहीर रीतीनें प्रसिद्ध केलें तर आपलें नांव बद्दु होईल, आपल्या चळवळी गोठतील, आपल्या तरुण सहकाऱ्यांना खालीं मान घालण्याचा प्रसंग येईल, तरी तसा आग्रह धरूं नका, आपण किंवा आपले सहकारी टि. म. विद्यालयाच्या शिक्षणकार्यांत यापुढें भाग घेणार नाहीं, असें आपणास वचन देतों; आपण पत्र जाहीर रीतीनें प्रसिद्ध करण्याचा आग्रह धरूं नका" असें परोपरीनें विनवूनही ज्यांनीं तें मनावर घेतलें नाहीं, उलट अधिक चिडून जाऊन 'माझा संस्थेशीं असलेला संबंध सोडतों, मग तुम्ही खुशाल **नाचा** (You can then freely have your *dance*) असले उपमर्दकारक उद्गार काढण्यासही ज्यांनीं कमी केलें नाहीं, ते चौबळ विजापूरकरांना या चळवळींत पडूं देणेंच शक्य नव्हतें. परंतु ही स्थिती फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. विजापूरकरांना हीं बंधनें तोडणेंच

प्राप्त होतें. सर महादेव व रा. ब. साठे यांनीं रागारागानें लिहिलेल्या पत्रांचा ज्या वेळीं त्यांच्यावर अग्नितुल्य वर्षाव होऊं लागला तेव्हां त्यांना, 'आपले माझेवर अनंत उपकार झाले आहेत, ते मी कधींही विसरणार नाहीं; माझीं जीं तत्वें निश्चित झालीं आहेत त्यांना अनुसरून होणाऱ्या चळवळींपासून मला अलिप्त राहणें शक्य नाहीं. शिक्षण हेंच माझें ध्येय असल्यामुळें तें माझ्या तत्वांप्रमाणें मला जेथें जेथें देतां येणें शक्य असेल तेथें तेथें मी तें देईन,' असें निर्वाणीचें उत्तर देणें भाग पडलें. सर महादेवांसारख्या एकतंत्री माणसाला हें उत्तर खपावें कसें ? त्यांनीं मंडळांतून आपलें अंग काढून घेण्याचें ठरविलें. रा. ब. साठे यांनीं त्यांस तसा उपदेश यापूर्वीच केला होता.*

---

* रा. ब. साठे यांनीं सर महादेवांना ता. ५ मार्च १९२१ रोजीं लिहिलेलें खालील पत्र पहाः—

Sir,

I am sorry it became impossible for me to attend tomorrow's meeting. We have spent nearly three years to see if the old Samarth Vidyalaya could be restored and put on sound basis. The school commenced its work in January 1919. During the last two years no substantial progress was made as we members of the Governing body could not see eye to eye with Prof. Bijapurkar and as there appears to be difference of opinion as to the manner the school should be conducted. I personally consider it desirable for us to retire and to give full scope to Prof. Bijapurkar to work out his programme in the direction of importing national education. If we decide to retire it will be our duty to inform Government of the step we take. Though I have high respect for Prof. Bijapurkar

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

ता. १८ नवंबर १९२१ रोजीं सर महादेवांच्या अध्यक्षत्वाखालच्या प्रशासक मंडळाची (गव्हर्निंग बॉडी) तीन वर्षांची मुदत पुरी होऊन, घटनेंतील नियम कलमक्रम १२ प्रमाणें मंडळाच्या कौन्सिलची व त्यांतून प्रशासक मंडळाची नवी निवडणूक झाली. या नव्या प्रशासक मंडळांत कै. साने (बार्शीचे), रा. न. चिं. केळकर, रा. सदाशिव खंडो आळतेकर वगैरे राष्ट्रीय पक्षाच्या लोकांची निवडणूक करून घेण्यांत आली. शिवाय तीन शिक्षकांना तहाहयात सभासद करून घेऊन त्यांस या प्रशासक मंडळांत निवडून देण्यांत आलें. सर महादेव व त्यांचे स्नेही यांचा संस्थेशीं असलेला संबंध आतां कायमचा तुटला. याचा परिणाम आर्थिक-दृष्ट्या संस्थेवर बराच झाला. परंतु विजापूरकर अर्थापेक्षां तत्वाला जास्त किंमत देणारे असल्यामुळें व स्वतःचें मतस्वातंत्र्य अर्थासाठीं पायीं तुडवूं देण्यास तयार नसल्यामुळें सर महादेव व त्यांचे स्नेही यांचा संबंध तोडणेंच त्यांना प्राप्त होतें.

नव्या प्रशासक मंडळीच्या निवडणूकीपासून व पांच शिक्षकांना तहाहयात सभासद करून घेतल्यापासून विद्यालयाच्या कारभारामध्यें एक प्रकारचा जबाबदारपणा आला व शैक्षणिक कार्यही कांहीं अंशीं सुरळीत चालूं लागलें. असहकार-युग सुरू असल्यामुळें विद्यार्थ्यांच्या बाबतींतही तुटवडा पडला नाहीं. शिवाय सर महादेवांचा संबंध सुटल्यामुळें विद्यालयाच्या राष्ट्रीयत्वाबद्दलची लोकांची साशंक वृत्तीही हळु हळु नाहींशी होऊं लागली होती. द्रव्याचा ओघ मात्र हळु हळु क्षीण होत चालला होता. विजापूरकरांनीं १९२१ त खानदेश व वऱ्हाड या प्रांतांत हिंडून जो कांहीं निधी जमा केला तेवढाच. पुढें अकोल्यास असतां थंडी फार लागल्यामुळें त्यांना कायमचा कफाचा विकार जडला. त्यामुळें प्रकृति दिवसेंदिवस

---

and his selfless work I have come to the conclusion that harmonious work is not possible and that work under such high tension would pay none in the end. We shall have to pass some resolution about the money you have collected.

Yours truly,
G. K. SATHE,
Vice- Chairman.

खालावत जाऊन त्यांस पुढें प्रवासास निघणें अशक्य झालें. विजापूरकरांनीं प्रकृतिच्या अस्वस्थतेमुळें सर्व कामांतून आपलें अंग काढून घेऊन, शक्य होईल त्या वेळीं ते अध्यापनाचें काम करूं लागले. आपली प्रकृति इतक्या लवकर खालावेल अशी त्यांना कल्पना नव्हती. विजापूरकरांच्या हातून प्रत्यक्ष चालकत्व सुटल्यामुळें त्यांचा रहावा तसा दाब राहीनासा झाला. त्यामुळें १९२३-२४ सालांत सर्व शाखांतील शिक्षण व्यवस्थित चालत असलेलें पाहून, आपलें जरी आतां कांहीं बरें वाईट झालें, तरी संस्था यापुढें सुरळीत चालेल अशी जी त्यांना आशा वाटूं लागली होती, ती फोल ठरते कीं काय अशी त्यांस भीति वाटूं लागली. तहाहयात सभासदांत दोन वर्षें जो एकोपा दिसत होता तो नाहींसा होऊन पुनः कलह सुरू झाले व त्यांचे परिणाम घोरतर होतील असें वाटूं लागलें. अधिकाराची फाजील हांव, ब्रिटीश नोकरशाहीलाही खालीं मान घालावयाला लावील असें अरेरावीचें वर्तन, तहाहयात नसलेल्या, पण तहाहयात सभासदांइतकाच स्वार्थत्याग केलेल्या, शिक्षकांना गुलाम समजून त्यांचा जेथें तेथें पाणउतारा करून, आम्हीं धनी आहोंत, आम्ही मालक आहोंत, ही जाणीव क्षणाक्षणाला करून देण्याकडे वळलेली क्षुद्र वृत्ती, यामुळें इतर शिक्षकांतही धुसफुशीला सुरुवात झाली. दोन वर्षांत विजापूरकरांनीं महत्प्रयासानें जुळवून आणलेला एकसूत्रीपणा नाहींसा झाला. शिक्षणाचें कार्य एका बाजूला पडून एकमेकांविरुद्ध खलबतें करण्यांतच वेळ जाऊं लागला. ज्यांना या भांडणांत आपल्या कालाचा अपव्यय होऊं नये असें वाटलें, ते संस्थेशीं असलेला आपला संबंध तोडून निघून गेले. या यादवीला वेळींच आळा बसावा म्हणून विद्यालयाच्या चिटणीसानें ' चुकतें आहे कोठें ' हें दाखविण्याकरितां एक खासगी पत्र मंडळाच्या अध्यक्षांना* उद्देशून काढलें व त्यासंबंधीं सर्व शिक्षकांचीं मतें मागविलीं. हें पत्रक बऱ्याच अंशीं एकतर्फी व कांहीं तहाहयात सभासदांचीं मनें अकारण दुखविणारें होतें; तरी त्यांत मांडलेल्या कित्येक बाबी अतिशय महत्वाच्या होत्या. त्यावर प्रशासक मंडळानें आपलें निश्चित मत ठरविणें अत्यावश्यक होतें. हें पत्रक ' अगदीं खासगी ' स्वरूपाचें असल्यामुळें तें येथें

---

* या वेळीं साने, केळकर प्रभृतींचें प्रशासक मंडळ बरखास्त होऊन नवें मंडळ निवडलें गेलें होतें. या मंडळाचे कल्याणचे रा. सखाराम गणेश ऊर्फ बापूसाहेब फडके हे अध्यक्ष होते.

उद्धृत करतां येणें शक्य नाहीं, तरी पण या पत्रकांतील बाबींवर चिटणिसाच्या विनंतीनुसार विद्यालयांतील तहाहयात नसलेल्या शिक्षकांनीं जें विस्तृत मत—सूचनांसह—कलमवार सादर केलें होतें, तें आम्हीं खालीं देत आहों. त्यावरून विद्यालयाचें ' चुकत होतें कोठें ' या प्रश्नावर नीट प्रकाश पडण्याजोगा आहे.

" आम्हीं खालीं सह्या करणारे तहाहयात-सभासदेतर शिक्षक, विद्यालयीन परिस्थितीविषयीं आपणापुढें पुढील विचार मांडीत आहोंत त्याविषयीं योग्य विचार व्हावा अशी नम्र विनंती आहे. "

## " शिक्षणाची हेळसांड व कारणें:—

(अ) या गेल्या पांच सहा वर्षांत विद्यालयांतून बरेच शिक्षक त्यांचें येथील कार्यकारी मंडळाशीं न पटल्यामुळें निघून गेले व त्यामुळें शैक्षणिक कार्यांत जो एकसूत्रीपणा यावयाचा तो न येतां विद्यार्थ्यांच्या अभ्यासांत मात्र उणेपणा आला व एकंदर बरेंच नुकसान झालें.

(आ) इतर शाळांत शिक्षकांवर फक्त शिक्षणाचीच जबाबदारी असते परंतु येथें तशा प्रकारची व्यवस्था नसून शिक्षकांवर शिक्षणाच्या जबाबदारीबरोबरच इतर भोजनगृह, शेती वगैरेसारख्या खात्यांची व्यवस्था सोंपविलेली असते. यामुळें शिक्षकाला आपल्या शैक्षणिक भागाकडे लक्ष देण्यास भरपूर वेळ मिळत नाहीं; व त्याचा परिणाम असा होतो कीं, कोणतेंही काम नीटपणें पार पाडणें त्याला अशक्य होतें. याविषयीं हल्लीं असलेली खातेविभागणी व त्यापासून उत्पन्न होणारी अव्यवस्था खालीं देत आहोंत:—

**प्रमुख** (Principal):—यांचेकडे हल्लीं वसतिगृह, कार्यालय, व्यायाम, भोजनगृह वगैरे खातीं असून वर्गशिक्षणही आहेच. एकट्या मनुष्यास हीं सर्व कामें करणें किती अशक्य आहे हें कोणीही सांगूं शकेल. यामुळें प्रमुखांचें जें मुख्य काम तें होत नाहीं.

**रेखाशिक्षक** ( Drawing Teacher ):—यांचेकडे रेखाशिक्षणाचें काम असून शिवाय इमारतदुरुस्ती व प्रामुख्यानें भोजनगृहाची प्रत्यक्ष व्यवस्था हीं कामें सोंपविण्यांत आलीं आहेत. खरोखर पाहिलें असतां या शिक्षकांस रेखाकलेचे सर्वच तास घ्यावे लागतात, इतर कामांकडे

त्यांस लक्ष देण्यास मुळींच फुरसत सांपडत नाहीं. परंतु वरील खात्यांच्या जबाबदारीमुळें रेखाशिक्षकांस आठवड्यांतून पुण्यास व गांवांत सामान खरेदीसाठीं तीन चार वेळां जावें लागतें. यामुळें रेखाचा वर्ग शिक्षकरहित झाल्यामुळें शिक्षणांत व शिस्तींत अव्यवस्था होते.

**शास्त्रीय शिक्षक** (Science Teacher):—यांचेकडे हल्लीं शेती, गोशाळा, गवत या खात्यांची व्यवस्था सोंपविण्यांत आलेली आहे. या वरील खात्याच्या व्यवस्थेसाठीं यांना वेळीं अवेळीं वर्ग सोडूनसुद्धां बाहेर जावें लागतें. यामुळें शिक्षणाचें व कामाचें दोन्हीकडून नुकसान होतें. शिवाय शिक्षकास विषयाचे तयारीस वेळ मिळत नाहीं हें निराळेंच.

(इ) शिक्षणप्रगतीच्या बाबतींत वरील अडचणी तर आहेतच, परंतु दुसरी एक अडचण प्रामुख्यानें कळवावीशी वाटते ती ही कीं, विद्यार्थ्यांकडून शारीरिक कष्टाचीं, मजुरीचीं कामें, म्हणजे जमीन करणें, मुरुम खणून वाहणें, रस्ते व वऱ्हांडे सारवणें, बागेकरितां कावडीनें लांबीवरून पाणी आणणें, व बागेसंबंधीं इतर कामें हीं करून घेतल्यामुळें आहाराबाहेर श्रम पडतात. औद्योगिक शाखेतर्फे सर्व कामें हातानें करावयाचीं असलेमुळें जे श्रम होतात ते निराळेच. या सर्व गोष्टींचा परिणाम असा होतो कीं वाङ्मयिक अभ्यास करण्यास विद्यार्थ्यांस हुरूप रहात नाहीं. याशिवाय अभ्यासास जो कांहीं थोडा वेळ मिळतो त्यापैकीं कांहीं वेळ वसतिगृहांतील कार्यक्रमांतच जातो.

(ई) आतां खातेअधिकाराच्या विभागणींत मूलतः एक दोष आहे, तो नजरेस आणले शिवाय रहावत नाहीं. येथें शिक्षकाची जी नेमणूक केली जाते ती त्याच्या केवळ शैक्षणिक गुणांवरूनच केली जाते. तो इतर खातीं चालविण्यास लायक आहे किंवा नाहीं हें पाहून केलेली नसते. त्याचें मुख्य काम शिक्षणाचेंच असतें. एखादें खातें त्याचेकडे सोंपविल्यानंतर तें खातें तो चालविण्याचा शक्य तितका प्रयत्न करतो. परंतु संपूर्णपणें जबाबदारी पार पाडणें त्याला अशक्य असल्यामुळें खात्यासंबंधीं अव्यवस्था होते. येथें अशा प्रकारची पद्धती आहे कीं कांहीं तहाहयात सभासदांच्या मताप्रमाणें त्यानें खातें चालविलें नाहीं तर त्यांची गैरमर्जी होऊन तें खातें

त्याजकडून काढून घेतलें जातें, व त्यामुळें खाते अधिकारी आपला अपमान जाहला असें वाटून विद्यालय सोडून जातो. तो खाते अधिकारी उत्तम शिक्षक असून देखील, खात्याची व्यवस्था कार्यबाहुल्यामुळें, व अननुभवामुळें ठेवतां न येऊन तहाहयात सभासद मंडळीची गैरमर्जी संपादन करून विद्यालय सोडून जातो. यामुळें शिक्षणाचे कार्यांत मध्येंच अडथळा उत्पन्न होतो...... व ...... असे दोन शिक्षक वरील कारणानें विद्यालय सोडून गेले. त्यामुळें छापखाना व शेती या खात्यांचें नुकसान झालें.

(उ) येथें रा. रा. वासुदेव गोविंद विजापूरकर, * M. A., LL. B. हे आपला अमोलिक वेळ खर्च करून भोजनगृहाचें काम विनामूल्य व हौसेनें करीत होते त्यांचेकडून तें काम तहाहयात सभासदांच्या दुराग्रहामुळें काढून घेणेंत आलें व तें काम, शिकविण्याचें काम भरपूर असलेल्या शिक्षकावर लादण्यांत आलें, अशा तऱ्हेनें शिक्षणाच्या अडचणी द्विगुणीत झाल्या.

## ( २ ) संस्थेंतील व्यवस्था व दोषः—

(अ) विद्यालयाच्या अंतर्व्यवस्थेकरितां म्हणून प्रशासक मंडळानें एक तहाहयात सभासदमंडळ नेमिलें आहे. यांत एकंदर सहा सभासद होते परंतु हल्लीं चारच राहिलेले आहेत. या चारींपैकीं तहाहयात सभासद रा. * * * * यांचेबद्दल अविश्वासाचा ठराव बाकीचे समासदांनीं केलेला आहे. राहिलेले

---

* हे प्रो. विजापूरकरांचे धाकटे बंधु. प्रोफेसरसाहेबांच्या अखेरच्या दिवसांत त्यांचे जवळ असावें म्हणून हे येऊन राहिले होते. हे अतिशय स्पष्ट भाषी व कडक शिस्तीचे गृहस्थ असल्यामुळें तहाहयात सभासदांना चार चौघांसमोर फैलावर घेण्यासही ते कमी करीत नसत. या त्यांच्या सडेतोड वर्तनामुळें कांहीं तहाहयात सभासदांना ते आपल्या हिताच्या आड येत आहेत असें वाटून, त्यांस "असें वागल्यास आम्हीं अण्णांचीही पर्वा न बाळगतां त्यांस ६४ एकरांच्या ( विद्यालयाचें आवार ६४ एकर आहे ) बाहेर हांकलून देऊं" असे उद्गार काढण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं.

तीन सभासदांपैकीं दोन सभासद राजीनामे देणेस तयार जाहले आहेत. अशातऱ्हेचें हें मंडळ—कीं ज्यांतील प्रत्येक सभासद स्वेच्छानुवर्ती आहे—व्यवस्था पहातें. या सभासदांची बैठक आठवड्यांतून एकदां होत असे. परंतु हल्लीं ती वेळचे वेळीं भरत असल्याचें दिसून येत नाहीं. या मंडळानें 'शनिवार सभा' नांवाची दुसरी एक सर्व शिक्षकांची सभा निर्माण केली आहे. या सभेंत बहुतेक विद्यालयवृत्तच कळतें व ठराववजा अशी कोणतीही सूचना घेण्यांत व विचार करण्यांत येत नाहीं हें अनेक वेळां प्रमुखांचे ( Principal ) तोंडून व वर्तनावरून सिद्ध झालें आहे. यावरून ही सभा जवळ जवळ असून नसल्यासारखीच आहे. तहाहयात सभासदांच्या मंडळांत जाहलेले ठराव व चर्चा बाकीचे शिक्षक मंडळींना कळवीत नाहींत. जमाखर्च व संस्थेची सांपत्तिक स्थिती इतर शिक्षकांना कळूं देत नाहींत. यामुळें तहाहयात सभासद व इतर शिक्षक यांमध्यें दुफळी होऊन शिक्षण-कार्यांत दोन्ही पक्षांचें लक्ष लागत नाहीं.

(आ) तहाहयात सभासदांचीं मुख्य कामें म्हणजे कार्यालय व्यवस्था; छापखाना-शेती, यावरील देखरेख वगैरे होत नाहींत. कार्यालयांत सुमारें दहा हजार रुपये भांडवल गुंतून पडलें आहे. कार्यालयांतील भाताची गिरणी, पिठाची चक्की, पाण्याचा पंप, लेथ, भाते, हातरहाट वगैरे सामान निरुपयोगी होत चाललें आहे.* हें विद्यालयाचें दळण तळेगांवाहून दळून आणावें लागतें यावरून दिसून येईल.

(इ) संस्थेकरितां प्रचारकाचें काम कोणीही ( त. स. ) करीत नाहीं व पूर्वींच्या देणग्यांचा पैसाही काळजीपूर्वक वसूल करीत नाहींत. यावरून आपल्या

---

* पहिले दोन शास्त्रज्ञ निघून गेल्यानंतर एका इंजिनियरच्या देखरेखीखालीं हें कार्यालय कांहीं दिवस नीट चाललें होतें परंतु त्याचेंही पटेना तेव्हां तोही निघून गेला. कार्यालय बंद झालें. भाताची भरडण्याची व दळण्याची चक्की कांहीं दिवस चालली होती परंतु ज्या माणसास त्यांनीं नेमलें होतें त्यास दुसरीकडे फायदा आढळतांच तोही निघून गेला. अशा स्थितींत बिचाऱ्या यंत्रांनीं गंजून निरुपयोगी होऊं नये तर काय व्हावें ?

निदर्शनास येईल कीं हल्लींचें तहाह्यात-सभासद-मंडळ विद्यालयाची व्यवस्था पहाण्यास अगदींच असमर्थ आहे.

विद्यालयाची व्यवस्था कशा प्रकारची असावी याबद्दल एक योजनापत्रक आम्हीं तयार केलेलें सोबत जोडलें आहे त्याबद्दल योग्य विचार व्हावा. हें विनंतीपत्रक विद्यालयाचा कारभार सुरळीत चालावा व विद्यालयाची भरभराट व्हावी या उद्देशानें आपणापुढें सादर करीत आहोंत. ”

विद्यालयांत अशा तऱ्हेची उद्वेगजनक परिस्थिती निर्माण झाली होती. विजापूरकरांनीं याला आळा घालण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. त्यांच्या मतांची व विचारांची हेटाळणीच उघड उघड होऊं लागली. ज्यांना ते आपला 'डोळा' म्हणून समजत असत व ज्यांना आपल्या ऐवजीं त्यांनीं प्रशासक मंडळांत निवडून घेतलें त्या त्यांच्या कनिष्ठ बंधूंवर तहाह्यात सभासदांचा डोळा असल्यामुळें, त्यांना मंडळावरून उडवून लावण्याचा चंग बांधण्यांत आला. आणि एक दिवस 'त्यांची निवडणूक बेकायदेशीर आहे' असा ठराव करून त्यांस उडवूनही लावलें. या वेळचें प्रशासकमंडळ तहाह्यात सभासदांच्या—विशेषतः एका आपमतलबी, कारस्थानी, पाताळयंत्री व चेहरेपालटी करण्यांत कुशल अशा माणसाच्या हातांतलें बाहुलें बनलें होतें. या प्रशासक मंडळाचें मन इतकें दुबळें झालें होतें कीं, कोणी कांहीं दुसरी बाजू म्हणून सांगूं गेल्यास त्यांस ' They ( life-members ) are not only your *masters* but our *masters* also ' असें सांगण्यापर्यंत त्याची मजल गेली होती. अशा तऱ्हेचे उद्गार काढून, आपण आपल्याच तोंडानें संस्थेला योग्य वळण लावण्याच्या बाबतींत आपण नालायक आहोंत असें सिद्ध करतों, याची यांना कल्पनाही नसावी असें दिसतें.

विजापूरकरांना ही उद्वेगकारक परिस्थिति पाहून अतीशय खेद होई. आपण केलें काय व झालें काय, असें वाटून त्यांचा जीव होरपळूं लागे. त्यांच्या मनाची या वेळीं कोणत्या प्रकारची स्थिति होती, त्यांना संस्थेबद्दल व संस्थेंतील माणसांबद्दल काय वाटत होतें, त्यांचा आयुष्यक्रम कसा चालला होता तें त्यांनीं चांदा येथील वकील रा. नारायण लक्ष्मण पुराणिक यांस ता. २७।७।२६ रोजीं लिहिलेल्या खालील पत्रावरून कळून येईलः—

“ येथील संस्थेवरील अकृत्रिम प्रेमामुळें मन मोकळें करून सरळपणानें आपण लिहिलेलें २४ तारखेचें पत्र काल सायंकाळीं हातीं आलें. १९२२ साल अखेर वऱ्हाड नागपूरकडे प्रवासाचे इरायानें अकोल्यापर्यंत आलों. तेथें ८।१० दिवस मुक्काम केला. त्या वेळीं थंडी होऊन खोकला जडला म्हणून परत आलों व मुंबईस तपासून घेऊन परत येथें आलों. जवळच उष्ण हवेंत यवत मुक्कामीं कांहीं दिवस राहिलों. थोडें बरें वाटलें, परंतु अशक्तता आली व उजव्या बाजूवर खोकला बराच परिणाम करून राहिला आहे. आतां प्रवास सोडला आहे. इतकेंच नाहीं तर आवाराबाहेर व हल्लींच्या पावसाळ्याच्या दिवसांत तर इमारतीबाहेरही पडत नाहीं. पडवीवर हिंडणें, पोथी पुस्तक वाचणें व कांहीं पाठांतर म्हणणें व ईशचिंतन करणें हीं परमेश्वरकृपें होत आहेत. विद्यालयाच्या कामांत भाग घेणें शक्य नाहीं. परंतु मजजवळ माझे बंधु नेहमीं राहिले आहेत. त्यांनीं आपला धंदा तूर्त सोडला आहे व मला सोबत देतात. सर्वतोपरी काम करण्यास ते लायक असल्यानें गव्हर्निंग बॉडीवरील माझ्या जागेचा मीं राजीनामा देऊन टाकला. २१।५।२५ रोजीं त्यांची नेमणूक केली.”

“ एवढी वैयक्तिक स्वरूपाची हकीकत कळविल्यावर येथील भानगडीसंबंधानें लिहितों. कोणत्याही तत्त्वाबद्दल मतभेद होऊन येथें भांडणें चाललीं नाहींत. **तहाहयात शिक्षक चार आहेत. ते तरुण व अननुभवी आहेत. अधिकाराच्या तोऱ्यावर इतर शिक्षकांस नोकरांप्रमाणें राबवावें व त्यांच्या सूचनांस मान देऊं नये असा प्रकार झाला.** ती तक्रार गव्हर्निंग बॉडी (प्रशासक मंडळी ) पुढें शिक्षकांनीं मांडली. प्रशासक मंडळाचे सभासद सभेशिवाय येथें येऊं शकत नाहींत. सभेच्या वेळीं घाई व परत पुणें मुंबईस जाण्याची त्वरा. येथें अधिकारी तहाहयात शिक्षक आहे; ते करतात तें ठीक म्हणून सर्वथा पाठिंबा देण्याचा प्रघात प्रशासक मंडळानें ठेविला आहे. शिक्षकांपैकीं आपल्या तक्रारी मांडणाऱ्या, अंमळ स्पष्टपणें खणखणीत बोलणाऱ्या माणसाच्या बोलण्याचा परिणाम होऊन कांहीं करावें तें न करितां तहाहयात शिक्षकांचेंच बरोबर आहे, त्यांचें तुम्हीं ऐकलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर काम चालावें म्हणून त्यांचें म्हणणें आम्हांसही सर्वथा मान्य करणें भाग आहे, असा एकदां पाठिंबा आहे म्हणून कळल्यावर मग तहाहयात शिक्षकांस स्वर्ग अर्धें बोट राहिला व त्यामुळें सदर तक्रारी मांडल्या त्या शिक्षकावर दावा धरल्याप्रमाणें वर्तन सुरू झालें. त्यानें आपली सोय दुसरीकडे केली व

१७।६।२६ रोजीं निघोन गेला. जाते वेळीं त्याच्यावर संतुष्ट झालेल्या विद्यार्थ्यांनीं सभा करून त्यास निरोप दिला. याबद्दल विद्यार्थ्यांचा छळ, आपली चूक कबूल करा म्हणून लेख मागणें वगैरे सुमारें एक महिना झालें. यांतील खडान्‌खडा वृत्तांत लिहिण्याचें कारण नाहीं. तहाहयात मंडळी थोडी, कामें फार. तीं नीट होत नाहींत. भोजनगृह, छापखाना, वर्कशॉप, शेती, दुभतेंखातें वगैरेंवर नजर नसल्यानें नुकसान होतें. **या गोष्टीचा पूर्ण माहीतगार मार्गदर्शकसुद्धां नको होतो. यामुळें माझे बंधूही येथें नसावेत असें त्यांना वाटलें व त्याप्रमाणें गव्हर्निंग बॉडीकडे यत्नही सुरू केले आहेत.** मी काम पहात होतों त्या वेळीं भोजनगृहाची व्यवस्था ज्या तहाहयात शिक्षकाकडे होती ते बेफिकीरीनें वागून सर्व अव्यवस्था झाली. ते स्वतः आपले बिऱ्हाडीं जेवीत असल्यामुळें तेथें जेवणारे प्रमुख ( Principal ) रा.—यांकडे व्यवस्था द्यावी असें ठरवून एक स्वतंत्र मदतगार नेमिला. ही व्यवस्था गव्हर्निंग बॉडीकडून करून घेतली. प्रमुखांस कामें फार. त्यांनीं माझे वंधूस विनंति केल्यावरून ते ७।८ महिने काम करीत होते. परंतु काढलेल्या माणसास पुढें झालेली नीट व्यवस्था पाहवली नाहीं आणि सारखी धुसफुस सुरू ठेवून एक साथीदार घेऊन धमकी घातली कीं वासूनानाकडोन व्यवस्था काढून घेतली तरच आम्ही राहूं नाहीं तर संस्था सोडूं.* वासूनानांचें काय ? त्यांनीं प्रमुखांस कळविलें कीं तुमची गैरसोय करूं नका, मी आनंदानें सोडीन. पुढें ड्रॉइंग मास्तरकडे काम दिलें. त्यामुळें कुचंबणा होऊन, त्यांना व्यवस्थेंत स्वातंत्र्य नसल्यामुळें व्यवस्था नीट होणें कठीण पडलें आहे. तसेंच चाललें आहे, सारांश अशा या कर्मकटकटींत तहाहयात सभासदांपैकीं भोजनगृह काढून घेतल्यामुळें चिडलेल्या गृहस्थाच्या कारस्थानानें व एकंदरींत उद्दामपणाच्या वर्तनानें घोटाळा माजला आहे. हळुहळू गव्हर्निंग बॉडी मन घालील अशी व्यवस्था करून घेऊन सर्व ठीक जुळवूं. आज गव्हर्निंग बॉडी माझे बंधूंचेंही ऐकण्याचे तयारींत नाहीं. यावरून **संस्थेच्या गगनावर आभाळ आलें आहे.** तें

---

* हे गृहस्थ संस्थेचे आजीव सभासद झाले होते ते भोजनगृहाचें काम करण्यासाठीं कीं शिक्षणाचें काम करण्यासाठीं ? निष्कामकर्म, स्वार्थत्याग, ध्येयनिष्ठा या गोष्टी बोलण्यांतच राहावयाच्या, कृतींत आणण्याची मुळींच जरूर नाहीं असें यांचें कदाचित् स्वतंत्र मत असावें, असें दिसतें ! —लेखक.

वितळून जाईल. लोभांत कमी करूं नये. आपण लिहिल्यानें जरा कष्ट सोसून मी हें सविस्तर लिहिलें आहे. "

विजापूरकरांनीं पत्रांत लिहिल्याप्रमाणें संस्थेच्या गगनावर खरोखरच आभाळ आलें होतें. 'तें वितळून जाईल' अशी त्यांस आशा वाटत होती. परंतु ही आशा त्यांच्या हयातीपर्यंत तरी सफल झाली नाहीं.

नवीन समर्थ विद्यालयाच्या सात वर्षांचा इतिहास हा असा आहे. तो लक्षांत घेतल्यानंतर विजापूरकरांच्या आकांक्षा सफळ कां झाल्या नाहींत याचें निराळें उत्तर देण्याची आवश्यकताच रहात नाहीं. पंडित मालवीय, डॉ. टागोर, श्रद्धानंद किंवा प्रो. कर्वे यांना जी आकांक्षा साध्य करून घेतां आली ती प्रो. विजापूरकरांना साध्य करून घेतां आली नाहीं याचीं कारणें आम्हांला या इतिहासावरून पुढील-प्रमाणें वाटतातः–( १ ) विजापूरकरांच्या ध्येयाचें पूर्णपणें ज्याला आकलन झालें असा एकही सहकारी त्यांना मिळाला नाहीं. (२) जे सहकारी मिळाले त्यांच्यामध्यें पूर्वीच्या समर्थविद्यालयांतील प्रो. वामन मल्हार जोशी, प्रो. जनार्दन विनायक ओक, जनार्दन सखाराम करंदीकर, राजारामपंत देसाई, 'मुलांचा महाराष्ट्रकर्ते' मोडक यांसारख्या ध्येयनिष्ठ, कर्तबगार, बुद्धिमान शिक्षकांच्या तोडीचा एकही नव्हता. ( ३ ) बहुजनसमाजावर छाप बसवून त्यांची सहानुभूति आपल्याकडे ओढण्याचें सामर्थ्य त्यांच्या एकाही सहकाऱ्यांत नव्हतें. ( ४ ) त्यांच्या सहकाऱ्यांना व्यापक विचारांचें वावडें होतें ( ५ ) सर्वांना राजी राखून त्यांच्यांत असलेल्या गुणांचा उपयोग करून घेण्याचें कौशल्य एकाही सहकाऱ्यांत नव्हतें. ( ६ ) आपण ज्या युगांत वावरत आहोंत त्या युगांत विचारांचे प्रवाह कोणत्या दिशेनें वाहात आहेत हें समजून घेण्याकडे व त्याप्रमाणें आपल्या विचारांत व आचारांत इष्ट तो फरक करण्याकडे त्यांपैकीं एकाचीही प्रवृत्ति नव्हती. थोडक्यांत प्रो. विजापूरकरांना, त्यांच्या आकांक्षा पुऱ्या होण्यास जशा तऱ्हेचीं माणसें मिळावयास पाहिजे होतीं तशीं त्यांस मिळालीं नाहींत व जीं मिळालीं त्यांवर दाब ठेवून त्यांजकडून आप-णास हवें असलेलें काम त्यांस करून घेतां आलें नाहीं. याचें कारण, त्यांची खालावत जाणारी प्रकृति, हेंही बऱ्हंशीं असेल. जुन्या समर्थविद्यालयानें जें कार्य चार वर्षांत करून दाखविलें व सर्व लोकांकडून 'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः न च धूमायितं चिरम्' असें वदविलें, तें कार्य तर राहोच, पण त्याच्या शतांशानेंही

नवीन समर्थ विद्यालयाला कार्य करून दाखवितां आलें नाहीं. विजापूरकरांना या सर्व गोष्टी कळत होत्या. पण आतां त्यांचा नाइलाज होता. 'वेळ आली तर कार्यक्षम असें नवें तहाहयात सभासद मंडळ निर्माण करून मी काय करूं शकतों तें महाराष्ट्राला दाखवीन,' असे उद्गार ते कित्येकदां संतापून काढीत. परंतु त्यांच्यांत आतां पूर्वीचा जोम राहिला नव्हता. उद्यांची शाश्वती त्यांना सांगतां येत नव्हती.

---

## ४ अखेर

अण्णांना आयुष्याचा आतां वीट येत चालला होता. आपल्या ध्येयाची होणारी विटंबना, कार्यांचा होत असलेला चुथडा उघड्या डोळयांनीं पहाण्यापेक्षां ते डोळे कायमचे मिटले तर बरें होईल असें त्यांस वाटूं लागलें. 'परमेश्वरा, माझ्या अनुयायांपासून माझें रक्षण कर' अशी प्रार्थना करण्याची त्यांजवर पाळी आली होती. अखेरी अखेरीस त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल त्यांच्यांत इतका तिटकारा उत्पन्न झाला होता कीं, ते त्यांचें मुखावलोकनही करण्यास तयार नसत. एकदां तर त्यांनीं त्यांना स्पष्ट सांगून टाकलें कीं 'माझे दरवाजे यापुढें तुम्हांला बंद आहेत. मी एक भिंत आहें असें समजा. मजकडे आतां येत जाऊं नका.' ( My doors are shut against you. I am a wall. Don't come to me. ) त्यांच्या सहकाऱ्यांशीं हें त्यांचें शेवटचेंच बोलणें होतें. यानंतर त्यांच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाहीं. खोलीचीं बंद झालेलीं दारें कायमचीं बंद झालीं.

द्रुतगतीनें खंगत चाललेल्या शरीराला मानसिक आघात मिळाल्यानंतर तें किती दिवस तग धरणार. दिवसेंदिवस अंधुक अंधुक होत चाललेली त्यांची प्राणज्योत ता. १ आगष्ट १९२६ रोजीं दुपारीं १२-१ वाजण्याचे सुमारास कायमची

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

मालवली. ज्यानें आपलें सर्वस्व राष्ट्रसेवेप्रीत्यर्थ खर्च केलें अशी एक थोर त्याग-मूर्ती महाराष्ट्राला कायमची अंतरली. राष्ट्रीय शिक्षणक्षेत्रांत योग्य मार्ग दाखविणारा एक तेजस्वी तारा निखळून पडला.

त्यांची अखेर एका दृष्टीनें निराशामय वातावरणांत झालेली दिसली, तरी तत्व-विजयाच्या दृष्टीनें ती पूर्ण आशामय वातावरणांत झाली असें म्हणावें लागेल. त्यांचीं शैक्षणिक ध्येयें बहुजनसमाजालाच काय पण सरकारलाही आतां पटूं लागलीं होतीं. ते समर्थ विद्यालयाच्या रूपानें घालून देऊं इच्छित असलेलें वळण इतर विद्यालयांकडून हळु हळु आतां वळविलें जात होतें. त्यांच्या ध्येयाचा प्रसार आज, अल्प प्रमाणांत कां होईना, होत आहे व तो पुढें अधिकाधिक होत जाईल यांत मुळींच संदेह नाहीं. शिक्षणप्रदेशांत क्रांतीचा पहिला झेंडा उभारणारी व्यक्ति प्रो. विजापूरकर हीच होय. या झेंड्याखालीं गोळा होऊन नवें शिक्षणयुग निर्माण करूं या, असें त्यांनीं बिगुल फुंकून सर्वांना सांगितलें. या बिगुलाचे ध्वनी फार थोड्यांचे कानांत शिरले. ज्यांच्या कानांत ते शिरले ते खडबडून जागे झाले; त्यांनीं आपल्या कंबरा भावी युद्धाकरितां कसल्या.

या बिगुलाचे ध्वनी अमर आहेत. ते ध्वनी काढणारा पुरुष जरी दृष्टीआड झाला असला तरी ते ध्वनी हवेंतल्या हवेंत विरून गेलेले नाहींत. त्यांचा प्रवास जोरानें सुरू आहे. तो थांबणें आतां शक्य नाहीं. आज ना उद्यां ते इच्छित क्रांति घडवून आणतीलच आणतील.

---

# परिशिष्ट

## प्रो. विजापूरकरांस आलेलीं निवडक पत्रें

(१९१६–२६)

### १ रा. ब. लठ्ठे यांचें पत्र *

आपलें प्रतिपदेचें पत्र पोंचलें. अपेक्षित नसलें तरी किंबहुना अपेक्षित नसल्यामुळेंच तें वाचून अत्यंत आनंद झाला आणि अनेक विचारांनीं मन भरून गेलें. असो. वास्तविक पाहिलें तर अभिनंदन करून घेण्यासारखें काम कांहींच झालेलें नाहीं. कॉलेज मागल्याप्रकारें चाललें—अर्थातच सुरू झाल्यावर त्याचा कर्नाटकास फायदा झाला आणि अभिमान वाटण्यासारखे विद्वान त्यांतून बाहेर पडले, म्हणजे केलेल्या कामांतील आपल्या अल्पस्वल्प हिश्शाबद्दल अभिनंदन स्वीकारण्यास आनंद होईल.

अद्याप तें कांहींच नाहीं. तथापि आपल्या प्रेमळ अभिनंदनाबद्दल मी मनःपूर्वक आभारी आहें.

ग्रंथमालेंतील लेखाची दिलेली आठवण मला नेहमीं होत आहे. इतकेंच नव्हे तर ही हल्लींची कॉलेजाची योजना नक्की करण्यापूर्वी शक्य असेल तर देशी म्हणजे मराठी भाषेंतून उच्च शिक्षण देणारें विद्यालय काढण्याचाच विचार मनांत होता. पण अशा विचारास सहाय्य करणारे पदवीधर माझ्याजवळ उपलब्ध नव्हते व तसे विद्यार्थीही कोठें दिसले नाहींत. म्हणून कर्नाटकांत आज जरूर असलेलें कॉलेज काढून विद्यार्थीवर्ग जमवावा, लोकांचा व विशेषतः पालकांचा विश्वास मिळवावा, या कार्यास वाहून घेणाऱ्यांतही आत्मप्रत्यय आणावा, आणि मराठींतून उच्च शिक्षण देणारे वर्ग या कॉलेजास जोडूनच काढावे, असें रा. कोठारी व मी मिळून ठरविलें.

---

* बेळगांवास कॉलेज काढण्याचे रा. ब. लठ्ठेप्रभृतींचे प्रयत्न १९१६ चे सुमारास सुरू होते, त्या वेळीं प्रो. विजापूरकरांनीं रा. ब. लठ्ठे यांस उत्तेजनपर लिहिलेल्या पत्रास उत्तर.

काढलेल्या असोसिएशनच्या उद्देशपत्रकांत कॉलेज काढण्याशिवाय उच्च शिक्षणाचा प्रसार करणें असें मोघम एक कलम याचकरितां घातलें आहे. नक्की घालून आतांच कानडी मराठीचा वाद उपस्थित करूं नये असें वाटलें. हीच गोष्ट मी कालच्या प्रतिपदेसच निघालेल्या 'प्रगती'च्या अंकांत पांचव्या पृष्ठावर "आणखी एका दिशेनें विचार" या सदराखालीं लिहिली आहे. आपलें पत्र व तो लेख एकाच दिवशीं बाहेर पडले, हा एक योगायोग चमत्कारिक म्हणावयाचा !

या सगळया तूर्त कल्पना आहेत. त्यांना मूर्त स्वरूप लवकर येईल, अशी उमेद आहे. तें आल्यास कांहीं अंशीं आपणासारख्यांची सदिच्छा त्याला कारण झाली असें मीं खास समजेन.

---

## २ प्रो. दत्तो वामन पोतदार यांचें पत्र

आपलें पत्र पावलें. कारभारीमंडळापुढें मांडतों. आपण तळेगांवीं आलांत हें फार चांगलें झालें. आपले पत्राचे शेवटीं जो मजकुर लिहिला त्यांत जी इच्छा दर्शविली आहे, ती सर्वथैव योग्य अशीच आहे. सांप्रत विसुभाऊ[1] तळेगांवीं आहेत त्यांनीं अलीकडच्या कित्येक महिन्यांची मंडळाची हकिगत सांगितली असेल. यंदां धुळेकर मित्रमंडळी व कदाचित् विसुभाऊही मंडळाचे[2] संमेलन प्रसंगीं हजर राहतीलसें वाटत नाहीं. त्यांच्या तक्रारी जरी कितीही खऱ्या मानल्या तरी या प्रसंगीं त्यांनीं निदान विसुभाऊंनीं तरी संमेलनास आलेंच पाहिजे. ते फार रागावले आहेत असें दिसतें. व्यक्तिशः मजवरही त्यांचा राग बहूत जाहला असल्याचें ऐकतों. आपणास सविनय एवढेंच कळवावयाचें कीं तो राग सर्वस्वी न्याय्य नाहीं असें माझ्या अल्पबुद्धीस वाटतें. आणि यद्यपि असला तरी आज कित्येक महिने नानाप्रकारें खटपटी करून मी त्यांच्या सर्व तक्रारी मिटविल्या आहेत. आतां विसुभाऊंनीं न येण्याला कोणतेंही योग्य कारण उरलें नाहीं. तरी आपणाला माझी हात जोडून एकच प्रार्थना आहे कीं यंदांचे संमेलनाकरितां विसुभाऊंना घेऊन येण्याचें काम आपण केलेंच पाहिजे. त्यांचेकडे जाऊन वाटल्यास सर्व मजकूर त्यांस कळवून त्यांचा राग शांत करून, त्यांस परोपरीनें गळ घालून ते येतील

---

[1] कै. वि. का. राजवाडे; [2] भारत-इतिहास-संशोधक मंडळ.

असें केलें पाहिजे. ते न आल्यास मंडळाची शोभा नाहीं.........संमेलनास आपण यंदां तरी अवश्य हजर राहिलें पाहिजे व विठुभाऊंस आणलें पाहिजे.

---

## ३ गजानन त्र्यंबक माडखोलकर यांचें पत्र

मायन्यासंबंधीं आपण केलेला खुलासा मला मान्य आहे. पत्रव्यवहारांतील त्या बाजूची अद्यापि मला मुळींच माहिती नव्हती. इंग्रजी धर्तीचें अर्थांतच अनुकरण होत होतें.

गुरुस्थानासंबंधीं आतां थोडें लिहित आहें. मी विद्यार्थी आहें; मराठ्यांच्या इतिहासाचा अलीकडे अभ्यास करीत आहें. त्या अभ्यासाला लागणाऱ्या साधनांचें ज्ञान मला नाहींच म्हटलें तरी चालेल. अर्थातच मला त्या बाबतींत मार्गदर्शकांची जरूर आहे. महाराष्ट्रांतील विद्वान व इतिहाससंशोधक अशा एकाच गृहस्थांशीं माझी ओळख, कांहीं वाङ्मयिक साधनानें झाली आहे. ही ओळख अगदीं नवीन परंतु दृढमूल आहे. परंतु मला आणीकहि मदत हवी आहे म्हणून मी आपणांस तसें लिहिलें. विद्यार्थ्यांची उन्नति हेंच आपलें ध्येय समजून त्या कार्याला ज्यांनीं आपलें सर्वस्व वाहिलें असे समाजसेवक ह्या देशांत विरळा; त्या विरळ पुरुषांतले आपण एक आहां. म्हणून मी शिष्यभावानें आपणाकडे आलों आहें व आपणहि मला निराश करणार नाहीं असें वाटतें. हा पाल्हाळ झाला, परंतु त्याबद्दल आपण राग मानूं नये. शब्दांकडे न पाहतां आपण त्यांत प्रतिबिंबित होणाऱ्या अंतःकरणाकडे पहा अशी विनंती आहे. साधक भावें नमस्कार घाली। त्याची चिंता साधूस लागली। ह्या प्रेमळ उक्तीवर माझा विश्वास आहे.

---

## ४ डॉ. हरिभाऊ देव यांचें पत्र

...आपल्या प्रयत्नांची प्रगति मंदगतीनें होत आहे असें आपण म्हणतां. तशीच ती व्हायची. आपल्या इतकी कळकळ कोणांत आहे? या कार्यांत आपल्या इतकें अंतःकरण कोणी ओतलेलें आहे? येत्या बैठकीचे वेळीं (मुंबईसरकारच्या) तरी तुम्हांला यश येईल अशी आशा आहे. या बाबतींत जर कांहीं व्हावयाचें असलें, तर तें नामदार चौबळ अधिकारावर असेपर्यंतच होईल. सरकार पुण्यांत असेल

त्या वेळीं आपण येथें येऊन जाऊन असालच. मि. गांधी एक राष्ट्रीय शाळा काढण्याचे विचारांत आहेत हें वृत्त आपणास कळलेंच असेल. त्यासंबंधींची अधिक माहिती मला मिळालेली नाहीं. संमेलनानंतर अमदाबादेस जाण्याचा माझा विचार आहे.

---

## ५ केशव त्रिंबक गुप्ते यांचें पत्र

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या चौथ्या संमेलन वृत्तांतांत रा. राजवाडे यांनीं ' शिवराज प्रशस्ति व कायस्थधर्मदीप ' नांवाचा लेख लिहून चां. का. प्रभू समाजाचा धार्मिक, सामाजिक व राजकीय दर्जा कमी करण्याचा यत्न केला आहे. हा लेख अगदीं अनैतिहासिक आहे व अनेक असत्य विधानांनीं भरलेला आहे. सदरहु लेखाला प्रत्युत्तर म्हणून चां. का. प्रभू संस्थेनें ' राजवाड्यांची गागा-भट्टी ' हें उत्तर लिहिलें आहे. तें आपण काळजीपूर्वक वाचून पहावें अशी आपणास सप्रेम विनंति आहे. आपल्यासारखे विद्वान व निःपक्षपाती सभासद भा. इ. सं. मंडळांत असतांना त्या मंडळानें असत्य विधानांनीं भरलेले, दुसऱ्या समाजाच्या मनोवृत्ति दुखविणारे लेख निष्कारण प्रसिद्ध करावे हें त्या संस्थेचें दुर्दैव होय. आपण या मंडळाचे सभासद या नात्यानें मंडळाच्या लेखानें झालेला गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न कराल अशी आशा आहे.

---

## ६ रामकृष्ण रघुनाथ मोरमकर ( विविधज्ञान-विस्तारकर्ते ) यांचें पत्र

गतासु झालेल्या चांगल्या मासिकांचें चरित्र थोडक्यांत विस्तारांत देण्याचा विचार केला आहे. निबंधमालेबद्दल रा. देव यांच्या लेखांत बरीच माहिती येऊन गेली आहे. 'निबंधचंद्रिके'बद्दल रा. रामभाऊ जोशी यांनीं थोडक्यांत लेख लिहिला आहे. 'ज्ञानसंग्रहा'बद्दल रा. ब. महाजनि हे लिहिणार आहेत. आपल्या 'ग्रंथमाले' बद्दल आणि 'विश्ववृत्ता'बद्दल आपण लेख लिहावा अशी इच्छा आहे. आरंभ कसा झाला, महत्वाचे लेख कोणते आणि कोणाचे, विशेष प्रसंग, बंद होण्याचीं कारणें वगैरे वगैरे माहिती लोकांस आणि भावी संपादकांस उपयोगी पडेल अशी द्यावी.

'विश्ववृत्ता'बद्दल रा. वामन मल्हार यांनीं लेख लिहावा असें वाटल्यास तसें कळवावें. त्यांस विनंती करीन. हे लेख संबंधी जनांनीं लिहावे अशी इच्छा आहे. या निमित्तानें तरी विस्तारास आपला हात लागेल.

---

## ७ प्रो. धोंडो केशव कर्वे यांचें पत्र

आपण पाठविलेलें पत्र मला पंजाबांत योग्य वेळीं मिळालें. हा महिना अखेर सिंधप्रांतीं जाण्याचा विचार केला आहे. झेंपतील तेवढेच कष्ट करावे अधिक करूं नये यासाठीं मी जरूर जपेन. 'उत्साहापेक्षां दूरदर्शीपणा (मी) अधिक दाखविला पाहिजे' हें आपलें म्हणणें मला मान्य आहे. मला वाटतें भेटीचा योग जून महिन्यांत सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या संमेलनाच्या प्रसंगीं येईलच.

---

## ८ हरि गणेश फाटक यांचें पत्र

आपला माझा विशेष परिचय नाहीं तरी आपण एक शिक्षणप्रसाराचे कैवारी व ब्राह्मणांच्या आवश्यक कर्तव्यांपैकीं 'अध्यापन' हा भाग आहे असें मानणारे असल्यामुळें शिक्षणासंबंधीं माझ्या एका मित्रानें सुचविलेली कल्पना आपणापुढें मांडतों.

पुण्यांतील अनेक लोकांना स्त्रीशिक्षणाची जरूरी भासूं लागली आहे, पण सध्यां शाळांतून किंवा इतर खासगी संस्थांतून जें शिक्षण स्त्रियांस देण्यांत येतें तें बरेच अंशीं स्त्रियांस उपयोगी पडणारें नसतें, निदान समाजाच्या सद्यःस्थितींत तरी तें तसें दिसत नाहीं अशी साधारण समजूत आहे.

मुलींनीं किंवा स्त्रियांनीं पाठशाळेंत जाऊन शिक्षणाबरोबर पाश्चिमात्य संस्कृतीही नकळत अंगिकृत करावी ही गोष्ट बरी नव्हे असें पुष्कळांना वाटतें. या अडचणीस उपाय म्हणून आपण जर एक स्त्रियांकरितां व मुलींकरितां विद्यालय काढण्याची खटपट कराल व त्यांत अर्वाचीन कालास अनुसरून व आपल्या संस्कृतीस न सोडतां शिक्षण देण्याची सोय केली जाईल तर वीरमाता व तेजस्विनी कुमारिका तयार करण्याचें महत्पुण्य आपणास लागेल. आपल्याइतका लायक व अंतर्बाह्य

पवित्र मनुष्य हा विषय हातीं घेण्यास महाराष्ट्रांत पुष्कळांना दिसत नाहीं. मुलांना कांहींतरी राष्ट्रीय वळण लागण्याच्या सोई आहेत पण आमच्या देशांतील स्त्रियांना राष्ट्रीय वळण लागण्याच्या सोई नाहींत. त्या आपण पुरविण्याची खटपट केल्यास एक महत्सेवा झाली असें होणार आहे.

---

## ९ द. पु. आघारकर, प्रिन्सिपॉल आर्यन एज्युकेशन सोसायटीचें हायस्कुल, यांचें पत्र.

आपली आमची ओळख नाहीं. परंतु आमची संस्था आपणास नांवानें माहीत असण्याचा संभव आहे. आमचे संस्थेला स्थापन होऊन आज सुमारें २२ वर्षे झालीं. या संस्थेचा विशेष म्हटला म्हणजे या संस्थेनें नैतिक व धार्मिक शिक्षण देण्याचा उपक्रम मुंबई शहरांत पहिल्यानें केला. संस्थेचे उत्पादकांचा हेतू त्यावेळीं प्रचलित असलेल्या शिक्षणास दुसऱ्या गोष्टींची जोड देऊन त्यांचे समजुतीप्रमाणें खरें राष्ट्रीय शिक्षण द्यावें असा होता. आरंभीं हा हेतू थोडासा सफल झाला तरी पुढें पुष्कळ अडचणींमुळें चालकांचे उद्देश फारसे सफल झाले असें वाटत नाहीं. असो.

आतां चालकांचे मनांत जोराचा प्रयत्न करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे व त्या कामानिमित्त संस्थेचे तहाहयात सभासद, कायमचे शिक्षक वगैरे मिळविण्याचे उद्योगाला ते लागले आहेत. शिक्षणाचें ध्येय काय असावें, तें कसें द्यावें, तें संस्थेचे उद्देशांस पोषक कसें होईल इत्यादि प्रश्नांचा विचार करण्याकरितां आमची शिक्षक मंडळी एकत्र जमत असते. आपण शिक्षणाविषयीं स्वतंत्र विचार केलेले असा आपला लौकिक आहे; एवढेंच नव्हे तर आपण आपल्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याकरितां आपणास वाहून घेतलें आहे हें सर्वांस माहीत आहे. तरी आपण मुंबईस याल तेव्हां आमचे शाळेस एकदां भेट द्यावी व आमचे शिक्षक वर्गांस शिक्षणासंबंधीं आपले मतांची माहिती द्यावी अशी शाळेच्या चालकांची इच्छा आहे. तरी या विनंतीचा आपण आदर कराल अशी आशा आहे.

---

# प्रो. विजापूरकरांचें, अखेरच्या दिवसांतील, एक महत्वाचें राष्ट्रीय शिक्षणविषयक पत्र. *

राष्ट्रीय शिक्षणाचे कळकळीचे भक्त जमले असतां त्या ठिकाणीं शरीरानें उपस्थित होतां आलें नाहीं तरी पत्रद्वारा भेट ध्यावी व त्यांना शक्य तितकें प्रोत्साहन द्यावें म्हणून मुद्दाम चार ओळी लिहीत आहें. आपण जमलां आहां त्याहून राष्ट्रीय शिक्षणाचे कैवारी आणि उत्साही प्रतिपादक त्याचप्रमाणें आशापूर्ण अंतःकरणानें तत्प्रीत्यर्थ परिश्रम करणारे दुसरे कोण असणार ? आपण सर्व शिक्षण प्रांतांत क्रांति घडवून आणण्यास कंबर बांधली आहे. ज्या प्रकारचें शिक्षण परकीय सरकारच्या हुकमतींतील आपलेच देशबांधव देऊं शकत नाहींत तें देण्याचा आपण उपक्रम केला आहे. परमपूज्य स्मृतीविषय दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखालीं (१९०६) एकमुखानें आपल्या राष्ट्रानें या शिक्षणाचा दुंदुभी वाजवला. इतका स्पष्ट ठराव कधींही पुढें पसार झाला नाहीं. सर्व राष्ट्रभर राष्ट्रीय शिक्षणाचें कार्य स्वतंत्र रीतीनें हातीं घेतलें पाहिजे अशी वेळ आली आहे म्हणून त्या वेळीं नगारा वाजला तरी राष्ट्र जागें झालें नाहीं. तुरळक प्रयत्न होऊन कार्य बंद पडलें. पुढें असहकारितेच्या चळवळीनें या प्रश्नास पुनः उज्जीवित केलें तरी अजून मोठमोठ्या लोकांत घोर औदासिन्य आहे व कित्येक तर विरोधी बनत आहेत. यासाठीं या कामांत पडलेल्या लोकांनीं अत्यंत स्थैर्य दाखविलें पाहिजे. कार्यकर्त्यांनीं बारीक सारीक गैरसमज व वैयक्तिक अहंकाराच्या व मानापमानाच्या गोष्टीला बळी पडून आपली ध्येयच्युती होऊं देऊं नये. जागोजागीं राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा होत्या त्यांपैकीं कांहीं बुडाल्या तरी कामास वाहून घेणारे लोक स्थिरतेनें घरोघर जाऊन या प्रश्नाची चर्चा करून किंवा अवशिष्ट विद्यालयास निरपेक्ष बुद्धीनें साहाय्य करून त्यांतच राहिले असते तर त्यांच्या आत्महोमाची दाद श्रीहरीनें घेतली असती अशी माझी दृढ समजूत आहे. आमच्या कार्यास प्रचलित शिक्षणाचें पूरक कार्य म्हणावें म्हणजे कित्येक लोक विशेषतः नेमस्त मंडळी खुष रहातात. तसें म्हणण्यासही आम्हीं तयार होऊं परंतु त्या पूरक शब्दाचा अर्थ आम्हीं सांगितला म्हणजे त्यांना पटत नाहीं. सरकार ज्या तऱ्हेचें शिक्षण देऊं

* खामगांव येथें भरलेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेच्या अध्यक्षांस ता. २३-१-२६ रोजीं लिहिलेलें पत्र.

इच्छितें त्या तऱ्हेचें देण्यासही पैसा खर्च करण्याची अर्थात पुरेल इतका खर्च करण्याची तयारी सरकारची नाहीं, म्हणून तसल्या शाळा आपल्या हुकमती खालीं लोकांनीं काढाव्या, त्यांना मदतीच्या देणग्या आपण द्याव्या म्हणजे आपलेंच काम त्यांनीं करावें अशी सरकारची इच्छा आहे. हा पूरक प्रयत्न आमचा नाहीं. सरकार करीत नाहीं, करूं शकत नाहीं, करण्याची बुद्धीही नाहीं असें शिक्षण देण्यानें होणारी पूरकता आमची आहे. "शहाणे करावे जन । पतित करावे पावन । सृष्टीमध्यें भगवद्भजन। वाढवावें॥" हा आमचा हेतु. जनमनोजागृती करावी, जनसेवा करावी, जनांचा संसारही सुखानें थाटवावा आणि त्यांना आपण उगीचच बद्ध आहों असें वाटतें त्या स्थितींतून सुटण्यासाठीं पुऱ्या जाणीवेचे व रोकड्या प्रबोध शक्तीचे तरुण तयार करावे, नैष्ठिक ब्रह्मचारी यासाठीं रहातील तितके इष्ट वाटून झटावें, असें शिक्षण देण्यासाठीं व दुय्यम विद्यार्थ्यांस पोटासाठीं हुन्नर शिकवून देशाभिमानी, विषयासक्त न होतां संसारसुख घेणारे बनवावें हें सरकारच्या स्वप्नीं तरी आहे काय ? यांतच आहे हें ओळखणारे लोक सरकारी व निमसरकारी शाळांवर बहिष्कार घालतील आणि "ज्या ज्या प्रकारचें शिक्षण देण्याची सोय राष्ट्रीय शाळांतून होऊं शकते तसल्या प्रकारच्या सरकारी शिक्षणावर बहिष्कार पुकारणें व्यवहार्य होईल........जें शिक्षण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें आवश्यक असून राष्ट्रीय संस्थेंतून मिळूं शकत नाहीं त्यावर बहिष्कार पुकारणें हें आत्मघातकीपणाचें लक्षण आहे" असा कोणी बुद्धिभेद करील तर त्यास राष्ट्रीय शिक्षणाचा शत्रु म्हणावें कीं कैवारी म्हणावें याचा नीट विचार करतील. असल्या राष्ट्रहिताचें शिक्षण सरकार देतें किंवा देऊं शकतें असें मत असणारें राष्ट्र १९०६ चा ठराव पसार कशासाठीं करील ? व कोणीतरी राष्ट्रीय शिक्षणाचा कष्टमय मार्ग कशाला धरील ? सरकार देतें तें शिक्षण मान्य नाहीं, निराळ्या प्रकारचें पाहिजे म्हणून राष्ट्रीय शिक्षणाचा खटाटोप आहे. **सरकारचा पदर लागला कीं शिक्षणाचा घात झाला. म्हणून मान्यता किंवा चार्टर यापासून जितकें दूर रहावें तितकें चांगलें, हें राष्ट्रीय शिक्षणाच्या चहात्यांनीं पुरें पुरें जाणलें पाहिजे.** सल्ला मसलत पाहिजे त्यांची घ्यावी. व्यक्तींचा द्वेष किंवा तिटकारा करूं नये. सरकारी हुकमतींतले लोकही भीष्मद्रोणादि मंडळी पांडवांचें हित चिंतीत तसें हित चिंतणाऱ्यांचा आशीर्वाद व उपदेश राष्ट्रीय शिक्षणास वाहिलेल्या लोकांनीं घ्यावा. परोक्षतया

पुष्कळ सहाय्य मिळेल तें मिळवावें पण सरकारी हुकमतींतील शाळांचा किंवा परीक्षांचा स्पर्श दुरूनही टाकावा अशीं ज्यांचीं मतें झालीं आहेत त्यांना आपल्या परम स्नेह्यांनीं चालविलेल्या 'केसरी'सारख्या पत्रांत वर उतरलेलीं वाक्यें अग्र-लेखांत* पाहून खेद झाल्याशिवाय रहात नाहीं. दुसऱ्या एका लेखांत फंड उभारून सरकारी शाळेंत गरीब मुलें घालावीं हें हिंदूंचें कर्तव्य आहे असें प्रतिपादिलें आहे. तो लेख खुद्द संपादकांचा नव्हे असें कळल्यानें खेदाची तीव्रता कमी झाली. त्याप्रमाणें वरील अवतरणांचा लेखही आवेशांत लिहिला आहे, शांत मनानें लिहिला नाहीं असें समजण्याची माझी व्यक्तिशः तयारी आहे. परंतु याचा जनतेवर परिणाम नीट होत नाहीं व सामान्य लोक, राष्ट्रीय शिक्षणाचे विरुद्ध एवढे जाडे लोक आहेत असें मानूं लागतात. सारांश कार्य प्रचंड आहे. प्रयत्न प्रचंड पाहिजेत. खुद्द सुशिक्षितांच्या डोळ्यांत अंजन घालणें जरूर आहे. त्यांची पाय-धरणी करूनही मनधरणी व कानउघडणी करावयास पाहिजे. यासाठीं कार्यकर्ते पुष्कळ पाहिजेत व खंबीर पाहिजेत. ब्रह्मचारी मिळाले तर उत्तम. नीट माहिती मिळवून प्रचलित शिक्षणानें घात कसा झाला, उत्तमोत्तम विद्यार्थी मृत्युमुखीं अकालीं कसे पडले, राहिले आहेत त्यांचें जीवित कसें कष्टमय आहे या गोष्टी स्पष्ट, शक्य तर नांवनिशीवार मांडणें जरूर आहे. यासाठीं तूर्त शाळा कमी असल्या तरी लोकमतजागृतीसाठीं प्रचारक जरूर आहेत, निरनिराळ्या उपयुक्त विषयांचें अध्ययन करून लोकांस शहाणे करणारे व्याख्याते पाहिजेत, भगवद्भजन वाढविणारे हरिदास पुराणिक पैदा होतील तितकें इष्ट आहे. लिहावें तितकें थोडें, आपण जाणते आहां. अधिक लिहिणें हाही एक प्रकारें आपला अपमानच; पण कर्तव्य वाटलें तें केलें. गोड करून घ्यावें. संमेलन व परिषद आनंदरूप होऊन यशस्वी झाल्याचें ऐकून संतोष होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ दि: ........
क्रमांक ........................ बौं: ........

* अहमदाबाद ऑल इंडिआ कॉंग्रेस कमिटीनंतरचा अग्रलेख.

# प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

## चतुर्थ खण्ड.

## १ सामाजिक मतें

" आपल्या सर्व राजकीय चळवळी कालांतरानें फलद्रूप होणाऱ्या आहेत आणि त्या फलद्रूप होण्यास राष्ट्रीय सभेचा जितका उपयोग होणारा आहे, त्याहून सहस्र-पट उपयोग सामाजिक चळवळीचा होणार आहे. दोनीही चळवळी सारख्या आस्थेनें व सारख्या राष्ट्रहित बुद्धीनें चालविल्या पाहिजेत."

विजापूरकर राजकीय बाबतींत जसे पुढारलेल्या, स्वतंत्र पण समतोल विचार-सरणीचे पुरस्कर्ते होते तसेच ते सामाजिक बाबतींतही होते. 'आधीं सामाजिक कीं राजकीय' या प्रश्नाला ते 'दोन्ही' असें उत्तर देत. किंबहुना सामाजिक चळवळ राजकीय चळवळीपेक्षां अधिक निकरानें, अधिक दृढनिश्चयानें चालविली पाहिजे असें त्यांचें मत होतें. राष्ट्रीय पक्षाची सुधारकांशीं असलेली वागणूक त्यांना पसंत नसे. सामाजिक परिषदेंत किंवा ती चालविणाऱ्या सुधारकांत अनेक दोष अस-तील म्हणून सामाजिक परिषदेला किंवा सुधारकांना नांवें ठेवून वेळीं अवेळीं त्यांची टवाळकी करणें हें त्यांना नामर्दपणाचें वाटे. ते म्हणत सामाजिक परिषदेंत व्यंगें असतील; व्यंगें नाहींत कोणत्या परिषदेंत ? तुम्हीं सुधारकांना बोलघेवडे म्हणतां, त्यांच्या परिषदेला मजलस म्हणतां, मग तुमची राजकीय परिषद, राष्ट्रीय सभा किंवा तुमचे राजकीय पुढारी हीं तरी काय आहेत. राजकीय परिषदेंत किंवा

राष्ट्रीय सभेंत बोलघेवडेपणा करण्यापलीकडे तुमचे पुढारी काय करीत आहेत. सामाजिक सुधारक जसे क्रियाशून्य तसेच राजकीय सुधारकही आहेत. जे दोष सामाजिक सुधारकांत तेच राजकीय सुधारकांत. दोघेही एकाच माळेचे मणि. आज दोघांनींही आपल्यांतील दोष काढून टाकून कृतिवीर बनलें पाहिजे. राष्ट्राचा उत्कर्ष दोघांच्याही चळवळींच्या गाढतेवर अवलंबून आहे. ग्रंथमालेंतील 'सार-संग्रह' या सदरांत त्यांनीं प्रगट केलेले खालील विचार त्यांची एतद्विषयींची वृत्ति अधिक स्पष्ट करतील. ते म्हणतातः—

"राजकीय, व्यापारीय, धार्मिक व नैतिक स्वातंत्र्याचें बीज सामाजिक सुधारणेंत आहे. यासाठीं जेथें तिचा विचार चालतो त्या परिषदेचें महात्म्य लोकांस अझून कळलें नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ज्यांना कळलें आहेसें दिसतें, त्यांची संख्या फारच थोडी आहे व त्यांच्या हातून योग्य यत्न होत नाहींत. राष्ट्रीय चळवळींचीं सर्व व्यंगें ह्याही चळवळींत आहेत व स्वतःच्या समाजाचा कमीपणा बोलून दाखविण्यानें लोकप्रियता कमी होईल अशा भीतीनें शाहाणे लोक मुद्दाम आडरानांत शिरत आहेत, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. सामाजिक सुधारणेच्या तत्त्वांचें महत्त्व ज्यांस उत्तम रीतीनें कळलें आहे किंवा तें न कळणें अशक्य आहे ते लोकच पुराणप्रियत्वाचें कपटकंचुक धारण करून केवळ दावा साधल्याप्रमाणें सामाजिक सुधारणेच्या चळवळीच्या लेच्यापेच्या प्रमुखांची विटंबना करण्यांत पुरुषार्थ मानीत आहेत. या प्रमुखांच्या बाह्य दोषांमुळें सामाजिक सुधारणेच्या खऱ्या तत्त्वांस कमीपणा येतो व सामान्य जनसमूहांत त्यांच्याविषयीं गैरसमज होतो, असें ओळखणाऱ्यांनीं त्या चळवळींत शिरून त्यांचें वजन फिकें पाडावें कीं बाहेर राहून, त्यांची निंदा करून समाजाच्या मनीं त्या तत्त्वाविषयीं तिटकारा उत्पन्न करावा ? आपल्याच पैकीं थोर झालेल्या व्यक्तींची विटंबना करून एकंदर समाजास आपण कमीपणा आणतों हें आमच्या जाणत्या लोकांस कसें उमजत नाहीं कोण जाणे ? जेथें पद्धतवार काम करण्याची राजरोस रीति आहे तेथें पद्धत सोडून कां वागावें ? सरळ रस्ता टाकून आडमार्गानें, खांचखळग्यांतून, आपण जाऊन लोकांसही कां पाडावें ? बहुमताची नवी पद्धति किंवा गुरुमताची प्राचीन पद्धति या दोन पद्धति आपल्यापुढें आहेत. **गुरुमताच्या पद्धतीचे दिवस गेले. एकास गुरु मानून, तो म्हणेल तें निमूटपणें करावयाचें, त्याचा शब्द तो कायदा असें वर्तन या विद्याप्रसाराच्या कालांत चालावयाचें**

नाहीं. दोनही पद्धतींची भेसळ हल्लींच्या आमच्या सर्व चळवळींत चालू असते, त्यामुळें बरेच घोंटाळे माजतात. भेसळ म्हणजे अशी. सर्वांनीं ज्याचा शब्द मानावा असा मान्य गुरु एक राहिला नाहीं. निरनिराळ्या गुरूंचा शिष्यसंप्रदाय होऊन तितके वर्ग झाले आहेत. त्या सर्वांची एकवाक्यता व्हावयाची म्हटली म्हणजे सर्व गुरूंची सभा भरून झाली पाहिजे; तरच हें सामाजिक सुधारणेचें गाडें खडकावर आदळणार नाहीं. एकत्र जमून विचार करण्याची सर्वांस मोकळीक असतांना, कांहींनीं जमावें व इतरांनीं बाहेर राहून नुसती टीका करावी असा हल्लींचा प्रकार चालला आहे. हा बंद होईल तर हल्लींच्या सामाजिक परिषदेंत जीं व्यंगें दिसून येत आहेत तीं भराभर नाहींशी होतील. येथें दुसऱ्याचा संबंध नाहीं. वाटेल तो ठराव पास करून अमलांत आणणें आपल्या हातीं आहे. पुष्कळ ठराव करून कोणताच अमलांत न आणण्यापेक्षां शक्य व संभवनीय असे थोडेच किंवा एकच ठराव करून तेवढा अमलांत आणणें शक्य आहे. परंतु यांत प्रत्येकानें आस्थेनें काम केलें पाहिजे... ... ... सर्व गोष्टी सिद्ध होण्यास सर्वांनीं मत्सरभाव बिलकुल सोडला पाहिजे. एवढीशी तेवढीशी गोष्ट घेऊन हमरीतुमरीवर यावें किंवा उखाळ्यापाखाळ्या काढून एकमेकांविषयीं किंवा वृद्ध व अनुभविकांविषयीं उणेपणाचीं भाषणें करावीं अगर लेख लिहावे हें अगदीं लाजिरवाणें आहे. आपल्या सर्व संस्था बाल्यावस्थेंत आहेत. ही सर्व तऱ्हाच अगोदर परदेशी रोप आहे. त्याचें बीज आपल्या देशांत रुजलें नाहीं. अमका नुसता प्रेक्षक होता त्यास बोलण्यास अधिकार नाहीं असें म्हणत बसूं नये. जेथें सगळेंच काम गोडीगुलाबीचें व सवलतीचें, तेथें इतका काटेकोरपणा कशाला ?......सुधारणा सावकाश होते. अमका नियम मोडला तमका मोडला, हे सर्व प्रकार विकारवश न होतां विचार करणाऱ्यास हास्यास्पद वाटतात. **केवढे गूढ व राष्ट्राच्या जीविताचे व विनाशाचे प्रश्न राक्षसासारखे खाऊं का गिळूं म्हणून पुढें उभे आहेत, आणि आम्हीं पोराप्रमाणें डाव, डाव करीत बसलों आहों; याला लोक काय म्हणतील याचा तरी निदान विचार करावा.** सुधारक पाटीभर कॆंस ठेवितात, सोंवळें ओंवळें मानीत नाहींत, दारू पितात, मांस खातात, अशा लांब लांब गप्पा मारणारांनीं आपण व आपले निकट स्नेही तेंच करून कर्मठ ब्राह्मणपणाचा आव आणितों कीं नाहीं याचें निरीक्षण करावें. दोन्ही पक्षांवर सारखेच आक्षेप आले असतां एकानें दुसऱ्याचें नांव काढूं नये, ही साधी व सभ्य

रीति तरी पाळावी. वस्तुतः सर्वांनींच सुधारण्याचा यत्न करावा हें चांगलें; पण तें बाजूस राहून ‘ चहाच्या पेल्यांतील वादळांत’च नाशाप्रत पावावें ह्याहून दुःखकर गोष्ट कोणची आहे ? सर्वांस आमचें शेवटचें सांगणें इतकेंच आहे कीं, हल्लींचे सेक्रेटरी वाईट असले तर दुसरे नेमा. हल्लीं उघडपणें किंवा झांकून काम करणारीं माणसें तुम्हांस आवडत नसलीं, तर त्यांच्या जागीं दुसऱ्यांची योजना करा किंवा तुम्हींच कारभार करूं लागा. कांहींही करा; पण एकत्र जमून सामाजिक व नैतिक बाबतींत राष्ट्राची उन्नति होईल, असे आपल्या स्वतःचे हातीं असलेले सर्व प्रयत्न करण्यांत कसूर करूं नका. ”

सामाजिक चळवळीच्या बाबतींत केसरीकर्त्यांनीं स्वीकारलेलें धोरण त्यांच्या-सारख्या विचारी बुद्धिमान माणसाला न शोभणारें आहे, असें ते स्पष्टपणें म्हणत. ते दाखवीत असलेली पुराणप्रियता हें केवळ ढोंग असून, राजकीय क्षेत्रांतील प्रति-पक्षाला बहुजनसमाजाच्या मनांतून उतरविण्याचा व स्वतःकडे त्याला ( समाजाला ) ओढून घेण्याचा तो डाव आहे असें त्यांना वाटे. ‘प्रासाद शिखरस्थोपि काको न गरुडायते’ असल्या अवतरणाखालीं लिहिलेले लेख व त्यांत केलेलें अकांडतांडव त्यांना हीन मनोवृत्तीचें वाटे. ज्यांना जें प्रामाणिकपणानें वाटतें त्यांना तें बोलून दाखविण्याचा पूर्ण अधिकार आहे; तुम्हांला त्यांचें बोलणें पटत नसेल तर दुसरी बाजू मांडून शास्त्रशुद्ध रीतीनें तें खोडून टाका, त्यासाठीं शिमगा कांडण्याची मुळींच जरुरी नाहीं, असें त्यांचें म्हणणें असे.

विजापूरकरांची सामाजिक विचारसरणी न्यायमूर्ती रानड्यांच्या वळणाची होती. विजापूरकरांच्या ऐन उमेदीच्या काळांत स्त्रीशिक्षण पुनर्विवाह, प्रौढविवाह या प्रश्नां-वर केवढीं तरी रणें माजलेलीं होतीं. या प्रश्नांवर अनुकूल मतें देणाऱ्यांवर शिव्यांचा वर्षाव होई, त्यांची निर्भर्त्सना होई, त्यांचेवर नाहीं नाहीं तीं कुभांडें रचिलीं जात. अशा काळीं—विशेषतः कोल्हापूरसारख्या पुण्याच्या खालोखाल असलेल्या कर्मठ ब्राह्मणांच्या बालेकिल्ल्यांत असूनही—विजापूरकरांनीं या प्रश्नांवर आपलें अनुकूल मत प्रगट करून त्याचा प्रसार लेखांच्या द्वारा शक्य तेवढा अधिक करण्याचा छाति-ठोकपणें प्रयत्न केला. बालविवाहपद्धतीचें निर्मूलन करून समाजांत प्रौढविवाह रूढ केला पाहिजे; तो रूढ झाला तर पुनर्विवाहाच्या प्रश्नांवर आज जेवढा जोर द्यावा लागत आहे तेवढा लागणार नाहीं; प्रौढविवाह रूढ झाला म्हणजे त्याबरो-बरच स्त्रीशिक्षणाचाही प्रश्न हातीं घ्यावा लागेल; प्रौढ कुमारांप्रमाणेंच प्रौढ कुमा-

रींनाहीं शिक्षण द्यावें लागेल; अर्थात्च हें शिक्षण पुरुषी पद्धतीचें न देतां त्यांना सुमाता व सुगृहिणी करणारें, त्यांस सुविचारी व सुसंस्कृत करणारें असें द्यावें, असं त्यांचें मत होतें. सामाजिक परिषदेंत किंवा सार्वजनिक व्यासपीठावर स्त्रीशिक्षणावर लांब लांब व्याख्यानें देणारे सुधारक या बाबतींत घालावें तसें लक्ष घालीत नाहींत अशी त्यांची तक्रार असे. यासंबंधीं सारसंग्रहांत ते एके ठिकाणीं लिहितातः—

" परिषदेपुढें ( सामाजिक ) चर्चेस आलेले विषय नवीन नव्हते. तथापि ज्यांवर अगदीं मतभेद होण्याचें कारण नाहीं व ज्यांची अंमलबजावणी होण्यास धर्मबंधनें तोडावीं लागत नाहींत किंवा समाजबाह्य अगर बहिष्कृत व्हावें लागत नाहीं अशा विषयांसंबंधानें खुद्द शिक्षित लोकांचें वर्तन प्रशंसनीय होत असतें असें नजरेस येत नाहीं. सामाजिक परिषदेस येणारे लोक गप्पा मारीत असतांना जीं विधानें बेधडक करितात त्यांस आचरणाचें स्वरूप देण्याचा प्रसंग आला म्हणजे जणूं काय ते अगदीं निराळेच बनतात. असे लोक स्वतःस सुशिक्षित म्हणवितात; पण त्यांस दुःशिक्षित म्हणावें, किंवा दुर्विग्ध हें भर्तृहरीनें दिलेलें विशेषण त्यांस लावावें हें बरें. साध्या गोष्टींत सुद्धां निरर्गल प्रलाप करून जाणारे हजारों लोक सभेस यावे, त्यापेक्षां कोणत्याही एका गोष्टीचें दृढनिश्चयानें आचरण करणारे—मग ती गोष्ट परिमित प्रमाणामध्यें असली तरी फिकीर नाहीं—असे लोक सामाजिक चळवळीस पाहिजेत. जेथें स्वातंत्र्य पूर्ण आहे त्या गोष्टींत आपली कर्तबगारी ज्या लोकांस दाखवितां येत नाहीं त्यांस सरकारापुढें किंवा जगद्गुरूपुढें अमके हक्क द्या किंवा अमकी रूढि अमलांत आणण्यास अनुज्ञा असावी असें म्हणण्यास तोंडच रहात नाहीं. **आपल्या स्त्रियांस चांगलें वागवून त्यांना जगांतील हल्लींच्या चळवळी, जुना इतिहास व आमच्या पुराणऋषींचे सर्व व्यवहार व त्यांचीं चरित्रें, तशींच त्यांनीं रचिलेलीं कथापुराणें यांची माहिती करून देण्यास कोणता प्रतिबंध आहे ? साधारण भाकडकथा हजारों बोलत बसणाऱ्या किती शिक्षित मंडळींनीं आपल्या घरच्या बायकांस सर हेन्री कॉटन व वेडरबर्न हे मुंबईस आले होते कशास, दादाभाई नौरोजी विलायतेंत काय काय करीत आहेत, नामदार गोखले यांची राष्ट्रांत वाहवा कां होत आहे, सुरेंद्रनाथ बानर्जी, मदनमोहन मालवीय, लाला लजपतराय इत्यादि मंडळीचीं भाषणें काय झालीं वगैरे गोष्टी**

**सांगितल्या असतील ? स्त्रीशिक्षणाचा प्रसार न होण्यास आमच्या मतें सुशिक्षित पुरुषवर्गासच या गोष्टींची पुरी उमज पडलेली नाहीं. स्त्रीशिक्षण पाहिजे असें वाटत असेल परंतु त्याबद्दल करावी तशी मेहनत करण्याची तीव्र उत्कंठा उत्पन्न झालेली नाहीं."**

पुरुषांप्रमाणेंच विद्याभ्यासाचीं सर्व क्षेत्रें स्त्रियांनां मोकळीं असलीं पाहिजेत; ज्या स्त्रियांना अत्युच्च विद्या संपादन करावयाच्या असतील त्यांनीं त्या जरूर कराव्या; परंतु सर्वसाधारण स्त्रियांना मात्र व्यवहारोपयोगीच शिक्षण द्यावें, उगाच भाराभर विषय शिकवून वित्ताचा, शक्तीचा व कालाचा अपव्यय करूं नये, तसा अपव्यय करणें हें राष्ट्रहितविघातक आहे, असें त्यांचें म्हणणें होतें.

वरील दोन तीन प्रश्नाचे बाबतींत विजापूरकरांचीं मतें जितकीं पुढारलेलीं होतीं तितकीं तीं स्पृश्यास्पृश्यभेद, जातिभेद या बाबतींत पुढारलेलीं नव्हतीं असें दिसतें. पोटजातींत रोटी बेटी व्यवहार व्हावे या मताचे ते होते, परंतु जातिभेद अजिबात नष्ट व्हावा हें तत्त्व त्यांना पसंत नव्हतें. ते चातुर्वर्ण्याचे व त्याला अनुसरून असलेल्या आचारधर्माचे कट्टे पुरस्कर्ते होते. रानडे आगरकरांचे ते सामाजिक बाबतींत निःसीम भक्त होते खरे, पण या बाबतींतील त्यांचीं मतें त्यांस कधींच पटलीं नाहींत. कदाचित् अतीशय कर्मठ वातावरणांत वाढल्याचाही तो परिणाम असावा.

## २ धर्मविषयक मतें.

विजापूरकर हे कट्टर सनातनी होते. सनातनधर्माचें जें संकुचित लक्षण कांहीं ' सनातनी ' लोकांकडून केलें जातें तें मात्र त्यांना मान्य नव्हतें. ते सनातन धर्माचें लक्षण " **भूतेषु समदृष्टित्वमीश्वरे शरणंगतिः । तद्विभूतिषु पूज्यत्वमेष धर्मः सनातनः ॥** " असें करीत. जगांत अनेक धर्म नाहींत, एकच धर्म आहे आणि तो म्हणजे सनातन धर्म होय; आज ज्यांना ज्यांना आम्हीं धर्म म्हणून समजतों ते सारे या सनातन धर्मातील पंथ आहेत; ख्रिस्त, महंमद, बुद्ध, महावीर हे धर्मस्थापक नसून एका विशिष्ट विचारप्रणालीचा पुरस्कार करणाऱ्या पंथाचे स्थापक आहेत. सनातन धर्माची ही व्यापक कल्पना बाळगल्यानंतर भिन्न आचारांनीं, भिन्न उपासनामार्गांनीं, भिन्न समाजव्यवस्थांनीं धर्मभिन्नता होण्याचें कारण राहणार नाहीं; द्वेषभाव वाढण्याचें किंवा अमकाच मुक्ति मिळविणार व दुसरा अधोगतीप्रत जाणार अशा उच्चनीच भावास थारा मिळणार नाहीं, असें त्यांचें मत होतें. जगांतील सर्व धर्मपंथांत ऋषिप्रणित आर्यधर्म ( पंथ ) अधिक पूर्ण असल्यामुळें आत्मिक उन्नतीसाठीं इतर पंथांकडे धांव घेण्याची हिंदुस्थानांतील माणसांना मुळींच जरुरी नाहीं. ऋषींनीं किंवा

हिंदुस्थानांतील भिन्न भिन्न प्रांतांतील साधुसंतांनीं किंवा तत्त्ववेत्त्यांनीं निर्माण केलेलें वाङ्मय लोक जर काळजीपूर्वक वाचतील तर त्यांना जें हवें तें त्यांना त्यांत मिळेल. परंतु आमचे लोकांची वृत्ति 'घरीं कामधेनु असतांना परक्याच्या दारीं ताकाची भिक्षा मागत हिंडणाऱ्या हतभाग्याप्रमाणें' आहे. ख्रिस्ताचें 'पर्वतावरील प्रवचन' (Sermon on the Mount) किंवा थॉमस ए. केंपिसचें 'ख्रिस्ताचें अनुकरण' (Imitation of Christ) वाचून 'किती साधें, सरळ तत्वज्ञान!' म्हणून हुरळून जाणाऱ्या लोकांना आमच्या 'तुकाराम बोवांची' किंवा 'नामदेवांची' कांहीं आठवण होत नाहीं. आणि ख्रिस्तापेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ अशा 'समर्थ रामदासांची' आठवण तर मुळींच होत नाहीं. याचा दोष ते धर्मसंस्थांचे चालकांना देत. ते म्हणत—'इंग्रजी राज्यानें व शिक्षणानें नवीन विचाराचा प्रसार केला. त्या विचाराचा गंधही पुराणधर्मसंस्थांस लागला नाहीं, यामुळें त्या जागच्या जागीं थंड राहिल्या. त्यांच्या हातून शिक्षित जनांचें प्रेम व आदर आपल्या ठिकाणीं जखडून ठेवणें झालें नाहीं. दीर्घकालपर्यंत अशिक्षित व स्वार्थपरायण लोकांच्या ताब्यांत या संस्था असल्यानें कालक्रमागत पूज्यत्व नवीन पिढीच्या मनांत बिंबण्यास मार्ग राहिला नाहीं. पुराणधर्मसंस्था व नवीन पिढी यांत बंध नाहींसा झाला......आजकाल ज्या मठाधीश, पुरोहित, उपाध्याय, पुराणिक, हरिदास, गुरव पुजारी, सेवेकरी, भगत, भजनी इत्यादि मंडळीच्या हातीं लोकांतील पुराण धर्मसंस्था आहेत, त्यांच्यांत शुद्ध आचार व विचार यांचें बीं पेरण्याचा व रुजविण्याचा उपाय सुरू आहे असें दिसत नाहीं. विरुद्ध पक्ष (ख्रिस्ती मिशनरी, प्रार्थनासमाजी, ब्राह्मोसमाजी, ) नसते दोष समाजाच्या माथीं मारतो याचा सूड उगविण्यासाठींच कीं काय नकळे, आपल्या समाजांतील व्यंगां-वर पांघरून घालण्याचा व दुसऱ्यांचे दोष बाहेर काढण्याचा क्रम सुरू आहे. वेदाचा अर्थ बिलकूल न समजतां वैदिक म्हणविणें गौण आहे. वेदपठणाबरो-बर वेदार्थज्ञान करून देणें हें आपलें कर्तव्य आहे. भलता दुराग्रह व मिथ्या अभिमान सोडून सत्य पक्षाचा सभ्य रीतीनें पाठराखीपणा करणारा सुधारक आचार्य अद्यापि निपजावयाचा आहे.''

प्रत्येक प्रांताची विशिष्ट अशी एक संस्कृति आहे, प्रत्येक प्रांताचा विशिष्ट असा एक धार्मिक पंथ आहे; या संस्कृतीप्रमाणें व या पंथाप्रमाणेंच त्या प्रांतानें चाललें पाहिजे असें त्यांचें मत होतें. महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं विशेषतः श्री समर्थ

रामदासस्वामींनीं महाराष्ट्रांतील लोकांकरितां असा एक पंथ किंवा धर्म निर्माण केला आहे. या धर्माला 'महाराष्ट्र धर्म' असें म्हणतात. या धर्माप्रमाणें महाराष्ट्र चालल्यास त्याचा अभ्युदय होईल असा विजापूरकरांना विश्वास वाटत असे. महाराष्ट्राचे गुरु एकच आहेत आणि ते समर्थ रामदास होत, असें त्यांचें ठाम मत होतें. समर्थांना ते 'पूर्ण' समजत, त्यांचा उपदेश ते 'पूर्ण' समजत, त्यांनीं घालून दिलेलें वळण 'पूर्ण' समजत. श्री समर्थ हेच महाराष्ट्राचें आराध्यदैवत असें ते समजत. समर्थांचा 'दासबोध' वाचल्यानंतर दुसरा कोणताही ग्रंथ वाचण्याची जरुरी नाहीं अशी त्यांची भावना होती. समर्थांना ते धर्मसंचालक व राष्ट्रसंचालक समजत. यामुळेंच त्यांनीं आपल्या विद्यालयाला 'समर्थांचें' नांव दिलें होतें. समर्थांप्रमाणेंच आपलें विद्यालय धर्मसंचालक व राष्ट्रसंचालक व्हावें अशी त्यांची इच्छा होती.

# ३ राजकीय मतें.

विजापूरकर हे स्वातंत्र्यवादी होते. इंग्रजांच्या छत्राखालीं आपणास कांहीं उणें पडणार नाहीं असा त्यांचा एके काळीं विश्वास होता; परंतु तो कर्झनची कारकीर्द सुरू होतांच समूळ नाहींसा झाला. ब्रिटिश सरकार हळुहळू 'साम्राज्यांतर्गत स्वराज्याकडे' हिंदुस्तानाला नेणार आहे ही कल्पना त्यांना फोल वाटे. 'वर्णभेदाचा पगडा इंग्रजी साम्राज्यांतच नव्हे तर सर्व गोऱ्या सृष्टींत केवढा बसला आहे हें ज्यांना माहीत आहे ते हिंदुस्तानाला गोऱ्या वसाहतीप्रमाणें ब्रिटिशसरकार स्वराज्य देईल असें म्हणूं शकणार नाहींत. बाभळ गुलाब होईल, लिंबुण्यांना द्राक्षाची गोडी येईल, कोळशाचा हिरा होईल, पण गोरे लोक काळ्या लोकांस बरोबरीनें कधीं वागविणार नाहींत,' असें म्हणण्यापर्यंत त्यांचा ब्रिटीश सरकारवरचा विश्वास उडाला होता. आपला देश सुखी व्हावा, व मनूनें 'अस्मद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः । स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वे मानवाः ॥' असें म्हटल्याप्रमाणें देशाला महनीय स्थिती प्राप्त व्हावी अशी आकांक्षा बाळगणाऱ्यांनीं 'साम्राज्यांतर्गत स्वराज्याचा' भिक्षेचा मार्ग

न स्वीकारतां स्वावलंबी बनलें पाहिजे. स्वावलंबी बनण्याचा एकच मार्ग म्हणजे 'बहिष्कार योगाचें' साधन हा होय. बहिष्कार नुसता परकी कपड्यावर, किंवा परकी खाण्याच्या वस्तूंवरच नव्हे तर जेवढें जेवढें म्हणून परकी असेल—निदान ब्रिटिशांचें असेल—तेवढया तेवढयावर कडकडीत बहिष्कार घातला पाहिजे. आमच्या देशांत परकी वस्तु नको, परकी संस्था नको, परका माणूस नको. स्वतःच्या पायांवर उभें राहून आम्ही आमच्या सर्व गरजा भागविण्यास शिकलें पाहिजे. तोंड वेंगाडीत राहिल्यानें, किंवा इंग्लंडांत शिष्टमंडळें नेण्यानें कांहींही होणार नाहीं. ज्या राज्यकर्त्यांनीं आमची, आपले राजकीय हेतू साध्य करण्याकरितां, सर्व बाजूंनीं खची केली, ते राज्यकर्ते आम्हांस नामर्दांचे मर्द करणार आहेत, दरिद्र्यांचे श्रीमंत करणार आहेत, अशक्तांचे सशक्त करणार आहेत हीं मनोराज्यें खुळ्या भोळ्यांनीं रचावीं. सरकार यांपैकीं कांहींही करूं शकणार नाहीं. या सर्व गोष्टी आमच्या आम्हींच घडवून आणल्या पाहिजेत, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. मोर्ले-मिंटो सुधारणेचें किंवा मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणेचें मधाचें बोट जिभेला लागतांच ब्रिटीशसरकारनें स्वातंत्र्यरूपी अमृताचे कलशचे कलश आपल्या ओंठाला लावले आहेत अशी कल्पना करून आनंदानें नृत्य करणाऱ्यांची ते कींव करीत. एवढेंसें कांहींतरी मिळतांच सरकारवर फिदा होणाऱ्या माणसास पाहून त्यांना 'अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्।' असें म्हणावेंसें वाटे.

अण्णा विजापूरकर आमरण कडकडीत बहिष्कारवादी होते. 'स्वदेशी' हें स्वराज्यप्राप्तीच्या साधनांपैकीं एक मुख्य साधन आहे, हें तत्व पटल्यापासून तें त्यांनीं अखेरपर्यंत आचरणांत आणलें. कापड व इतर वस्तु स्वदेशी असावयाच्याच; पण डोक्यावर सावलीकरितां, किंवा पर्जन्याकरितां धरावयाची छत्री देखील पूर्ण स्वदेशी असली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. तशी पूर्ण स्वदेशी छत्री मिळत नसल्यामुळें ते कांहीं दिवस इरलें* व पुढें अखेरपर्यंत घोंगडी वापरीत.

---

* मुंबईत ट्रॅममध्यें चढतांना ट्रॅमकंडक्टर हें इरलें आंत आणूं देईना; आगगाडींतही तोच प्रकार होऊं लागला, त्यामुळें त्याचा–तें गैरसोईचें असें समजून—यांना त्याग करावा लागला.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

विजापूरकरांचीं राजकीय मतें स्वतंत्र असल्यामुळें व ' आधीं केलें मग सांगितलें' अशा बाण्याचे ते असल्यामुळें, ते कधींही कोणत्याही राजकीय पक्षाला जाऊन मिळाले नाहींत. शरीरांत त्राण होतें तोंपर्यंत ते काँग्रेसला नियमानें जात पण तिच्या ध्येयपत्रिकेवर त्यांनीं कधींही सही केली नाहीं.

' स्वदेशी, ' ' बहिष्कार, ' व ' राष्ट्रीयशिक्षण ' हींच देशाला स्वातंत्र्य मिळवून देतील. निःशस्त्र हिंदुस्थानाला या तीन शस्त्रांच्या सहाय्यानेंच स्वातंत्र्याचा लढा लढावा लागेल; या शस्त्रांचा पूर्णपणें जोंपर्यंत उपयोग करून घेतला जाणार नाहीं, तोंपर्यंत स्वातंत्र्यासाठीं इतर कोणत्याही धडपडी केल्या तरी त्या व्यर्थ ठरतील, असें त्यांचें म्हणणें होतें.

वरील तीन शस्त्रांपैकीं एका शस्त्राचा—राष्ट्रीय शिक्षणाचा—उपयोग स्वातंत्र्यप्राप्त्यर्थ कसा करून घेतां येईल हें दाखविण्यासाठीं त्यांनीं आपलें सारें आयुष्य खर्चीं घातलें. राष्ट्रीय विद्यामंदिरें हीं स्वातंत्र्यमंदिरें असून सरकारी किंवा सरकारच्या आश्रयानें चाललेल्या शाळा गुलाम तयार करण्याचे कारखाने आहेत असें त्यांना वाटे. या त्यांच्या स्पष्ट मताबद्दल पुण्यांतील बऱ्याच शिक्षणसंस्थाधिकाऱ्यांस वाईट वाटे व ते चिडून आपल्या संस्थांचें समर्थन करण्यास पुढें सरसावत. अशा चिडणाऱ्यांपैकीं प्रो. दत्तो वामन पोतदार हे होत. यांची अण्णांशीं या त्यांच्या मतासंबंधीं वृत्तपत्रांतून व खासगी भेटींत अनेकदां खडाजंगी उडे. असाच एक खडाजंगीचा प्रसंग आमचे एका स्नेह्यांचे देखत घडून आला. हा प्रसंग बराच महत्वाचा असल्यामुळें येथें नमूद करीत आहों.

कोणत्या प्रसंगानें तें निश्चित सांगतां येत नाहीं, प्रो. पोतदार ( समर्थ ) विद्यालयांत आले होते. या वेळीं पुण्यांत एक युनिव्हर्सिटी स्थापन व्हावी म्हणून जोराची चळवळ व सार्वत्रिक चर्चा चालू होती. रात्रींच्या वेळीं विद्यालयांतील शिक्षकमंडळी अण्णांच्या खोलींत जमून प्रो. पोतदारांशीं वादविवाद सुरू झाला. होऊं घातलेल्या युनिव्हर्सिटीविषयीं बराच वेळ विचार-विनिमय झाल्यानंतर परकी सरकाराला राष्ट्रीय शिक्षणानुकूल करून घेतां येणें शक्य आहे काय ? नसल्यास काय करावें ? आजच्या स्थितींत कोणता पंथ स्वीकारावा ? या सारखे खऱ्या महत्त्वाचे प्रश्न पुढें आले. प्रो. पोतदारांच्या मतें ज्या अर्थी राष्ट्रीय शिक्षणास सध्यां लोकमत अनुकूल नाहीं, त्या अर्थी प्रचलित सरकार व निमसरकारी शाळा, महाविद्यालयें व विश्वविद्यालयें यांत शक्य त्या मार्गांनीं सुधारणा घडवून

आणण्याची सर्व शक्ती एकवटून खटपट करावी. मुळींच कांहीं न होण्यापेक्षां थोडें साधेल तेवढें हळू हळू करीत रहावें. लोकमत वळविण्याचा प्रयत्न करावा. हा सोन्यासारखा मधला मार्ग सोडून दिल्यास हित साधणार नाहीं. प्रोफेसरमजकुरांचें हें म्हणणें अर्थातच विजापूरकरांना पटणें शक्य नव्हतें. ते म्हणाले, " हिंदुस्थानांत शिक्षणसंस्था स्थापन करण्यांत सरकारचें धोरण आर्यावर्त-हित-विरोधी आहे. राष्ट्र जिंकल्याबरोबर लोकांमधील स्वत्वाविषयींची जाणीव नष्ट करावी, स्वराष्ट्र, स्वसंस्कृती, स्वधर्म, परंपरा, स्वभाषा इत्यादि अनेकविध स्वरूपांत गोचर होणारा व स्वातंत्र्याची प्रखर भावना ज्वलत् स्थितींत ठेवणारा ' स्वातंत्र्य नाहींतर मृत्यु ' ( Give me liberty or death ) असें वदविणारा स्वाभिमान नष्ट करावा हें मॅकिआव्हॅलीनें आपल्या राजपुत्रास पढविलेलें सूत्र आमच्या राज्य-कर्त्यांना अवगत आहे. आमच्या तरुणांची दृष्टि जगाच्या शेवटच्या मर्यादेपर्यंत पोहोंचावी, आधुनिक शास्त्रांच्या अभ्यासानें व संशोधनानें हिंदुस्थानचा अभ्युदय व्हावा अशी इच्छा आम्हांप्रमाणें परकी राज्यकर्त्यांत असणें निसर्गविरुद्ध आहे. हिंदुस्थानचे हितसंबंध लक्षांत घेऊन शिक्षणांत अवश्य ते फेरफार करावेत हा सद्विचार स्वार्थी नोकरशाहीच्या मनांत येणें सर्वथा असंभवनीय असून त्या दिशेनें केलेले प्रयत्न हटकून विफल ठरतीलच ठरतील. ' Yours is to administer, ours to exploit' हें कर्झन साहेबांचें वाक्य काय दर्शवितें ? **साम्राज्य-सत्तेचें दृढीकरण व जितांचें बौद्धिक, मानसिक, शारीरिक व आर्थिक दुर्बलीकरण हें इंग्रजी राज्याचें ध्येय आहे.** तात्पर्य राज्यकर्त्यांनीं स्थापिलेल्या किंवा आश्रय दिलेल्या संस्था सुधारण्याचा विफल होणारा प्रयत्न करण्यापेक्षां स्वावलंबनाचा आश्रय करणें हाच शहाणपणाचा मार्ग ठरतो. " हा युक्तिवाद करूनही प्रोफेसरमजकूर आपला मुद्दा सोडण्यास तयार नाहींत, इतकेंच नव्हे तर तो ते अधिकाधिक सिद्ध करूं पहात आहेत, हें पहातांच त्यांना त्वेष आला आणि ते म्हणाले **"Everything that tends to perpetuate foriegn domination is abhorrent to us." परकीय सत्तेला शाश्वति आणणारी प्रत्येक गोष्ट आम्हांस** अप्रिय आहे. तुम्हांसारख्या स्वदेशाभि-मान्यांनीं चालविलेल्या संस्था व सरकारी शाळा, कॉलेजें पारतंत्र्यशृंखला ठोकून बळकट करणारीं व ब्रिटीश नोकरशाहीचें आयुष्य वाढविणारीं असल्यामुळें आम्हांस त्यांचा तिटकारा वाटतो. "

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

वरील उद्गारांवरून ब्रिटिशांबद्दल व त्यांच्या धोरणाबद्दल विजापूरकरांना किती तिटकारा वाटत असे याची स्पष्ट कल्पना येईल. हाच तिटकारा प्रत्येक तरुण हृदयांत उत्पन्न होऊन, त्यांनीं सरकारापासून किंवा सरकाराशीं संबंध असलेल्या संस्था किंवा व्यक्ती यांपासून जितकें दूर राहतां येईल तितकें रहावें व स्वावलंबी बनून देशाचा उत्कर्षकाल शक्य तेवढया लवकर घडवून आणावा, अशी त्यांची आत्यंतिक इच्छा होती. ही इच्छा साध्य करून घेण्याकरितां त्यांनीं सर्वस्वाचा त्याग करून अखेरपर्यंत आपला देह त्याप्रीत्यर्थ झिजविला.

# ४ वाङ्मयविषयक विचार

विजापूरकरांना सामान्य लोक एकमार्गी समजतात. राष्ट्रीय शिक्षण हाच तो एक मार्ग होय. लोकांच्या या म्हणण्यांत बरेंचसें सत्य असलें, तरी त्याचा अर्थ त्यांना वाटतो तसा नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाव्यतिरिक्त ते हिंदुस्थानांतील किंवा हिंदुस्थानाबाहेरील जगांतील नानाविध चळवळींकडे लक्ष देत नव्हते किंवा त्यांवर त्यांचे विचार चालत नसत, पाश्चात्य राष्ट्रांत जे निरनिराळे विचारांचे प्रवाह सुरू होते किंवा आहेत त्यांचें ज्ञान त्यांना नव्हतें किंवा त्यांवर त्यांनीं आपलीं मतें बनविलीं नव्हतीं असा जर या म्हणण्याचा अर्थ असेल तर तें म्हणणें चुकीचें होईल; राष्ट्रोत्कर्षसाधनाचीं जेवढीं जेवढीं म्हणून अंगें आहेत त्या त्या अंगांचा व त्यांचे अभिवृद्धीकरितां चाललेल्या प्रयत्नांचा त्यांच्याइतका सूक्ष्म अभ्यास फारच थोडे करीत असतील. त्यांचीं प्रत्येक बाबींवर निश्चित अशीं मतें होतीं. वाङ्मय हा तर त्यांचा आवडीचा प्रांत. या आवडत्या प्रांतांत प्रवेश करून, त्यांनीं झीज सोसून जवळ जवळ दीड तप मराठी भाषेची निःस्वार्थपूर्वक सेवा केली. विलक्षण योगायोगांमुळें त्यांच्या आयुष्यांत घडून आलेलीं स्थित्यंतरें जर घडलीं नसतीं तर ही त्यांची वाङ्मयसेवा आमरण अखंड चालली असती. या सेवेच्याद्वारा, खऱ्या

कळकळीचा व दृढनिश्चयाचा एकच पुरुष वाङ्मयक्षेत्रांत काय कार्य करूं शकतो हें त्यांनीं दाखविलें असतें. अशा या पुरुषाचे मराठी वाङ्मयाची सद्यःकालीन व भावी परिस्थिती याविषयींचे विचार समजून घेणें अत्यावश्यक आहे.

अण्णा विजापूरकर हे जाज्वल्य स्वभाषाभिमानी होते. महाराष्ट्रांतील सर्व व्यवहार महाराष्ट्राच्या भाषेंतच झाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह असे. इंग्रजी भाषेचें दिवसेंदिवस वाढत असलेलें स्तोम त्यांना पसंत नव्हतें. इंग्रजी नाइलाज म्हणून व्यवहारापुरती शिकावी. ती शिकण्याकरितां व तिच्यांत प्रावीण्य मिळविण्याकरितां दहादहा बाराबारा वर्षे घालविणें हें केवळ कालाची उधळपट्टी करण्यासारखें आहे असें ते म्हणत. इंग्रजी भाषेंत प्राविण्य मिळविलेले थोडे लोक महाराष्ट्राला पुरे आहेत. या थोड्या लोकांनीं आपण मिळविलेल्या आंग्लभाषेंतील किंवा इतर युरोपीय भाषांतील प्राविण्याचा उपयोग त्या भाषांतील निरनिराळ्या शाखांतील उत्तमोत्तम ग्रंथांचीं भाषांतरें करण्याचे कामीं केल्यास राष्ट्रांतील कितीतरी तरुणांच्या कालाचा, वित्ताचा व शक्तीचा होणारा व्यय वांचेल. 'एव्हरी मॅन्स लायब्ररी,' किंवा 'होम युनिव्हर्सिटी सिरीज' यांसारख्या ग्रंथमाला सुरू करून त्यांत जगांतील प्राचीन व अर्वाचीन उत्तमोत्तम ग्रंथकारांचे ग्रंथ भाषाकोविदांकडून भाषांतरित करून घेऊन व निरनिराळ्या शाखांतील व्यासंगी लोकांकडून स्वतंत्र ग्रंथ लिहून घेऊन प्रसिद्ध करावे. असे ग्रंथ प्रसिद्ध झाल्यास ज्ञानाभिवृद्धिकरितां म्हणून परकी भाषा शिकण्याचा कष्टाचा व खर्चाचा प्रसंग सामान्य जनांवर ओढवणार नाहीं. शिवाय वाङ्मयाची सर्वांगीण वाढ होईल ती वेगळीच. 'ग्रंथमाला' सुरू करण्यांत त्यांचा हाच हेतु होता. "मराठी ग्रंथकर्तृत्वाची योग्य दिशा" या आपल्या एका लेखांत ते म्हणतात:—"मराठी भाषेंत ग्रंथ करावयाचे कशासाठीं हा पहिला प्रश्न आहे. ग्रंथ करावयाचे ते लोकांनीं वाचावेत म्हणून; परंतु आमच्या लोकांची स्थिति अशी आहे कीं, ज्यांना वाचनाची निव्वळ निष्काम अभिरुचि आहे असे लोक फार थोडे. पदवीधर लोक खासगी धंद्यांत किंवा नोकरींत शिरल्यावर सामान्य वाङ्मयाचे ग्रंथ क्वचितच वाचतात. वर्तमानपत्रें म्हणजे बहुशः इंग्रजांनीं चालविलेलीं रोजचीं पत्रें व कांहीं इंग्रजी कादंबऱ्या यांशिवाय त्यांचें फारसें वाचन असतच नाहीं. मराठींत तयार झालेल्या ग्रंथांबद्दल त्यांना प्रायः तिरस्कार नसला तरी अनादर असतो. इंग्रजी भाषेच्या द्वारा आपण ज्या गोष्टी शिकलों त्या आपल्या देशबांधवांस कळून त्यांतील सुविचारांचा

फैलाव समाजांत व्हावा हें तात्विकरीत्या ते कबूल करितात; परंतु त्यांच्यापैकीं फारच थोडे लोक या कामास स्वतःला वाहून घेण्यास तयार असतात. तितकें केलें नाहीं तर वर्षांतून पांच पंचवीस पृष्ठें आपण लिहून काढावींत या बुद्धीनें कांहीं मननपूर्वक वाचन करावें अशीसुद्धां बुद्धि क्वचितच होते. त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट ही आहे कीं अलीकडे कांहीं लोकांचें लक्ष्य या विषया-कडे थोडें अधिक लागलें आहे. पुढील कालीं हें प्रमाण वाढत जाणार आहे अशीं चिन्हें दिसत आहेत व याबद्दल समाधान वाटणें साहजिक आहे. अशी आशा नसती तर आज ज्या विषयावर प्रस्तुत लेख लिहिण्यास आम्ही प्रवृत्त झालों आहों तो विषय हातीं घेण्यापर्यंत मजल आलीच नसती. पदवीधरांच्या औदासिन्यांत म्हणण्याजोगा फेरफार झाला आहे असें नाहीं, परंतु त्यांच्याजवळ आज ही मराठी वाङ्मयाची गोष्ट काढली तर पूर्वी-प्रमाणें नाकें मुरडून पूर्ण धिक्कार प्रकट करीत नाहींत. आम्हा अल्पसंतुष्टांस एवढेंसुद्धां तूर्त पुरे आहे. पुढचा पाय आहे यांत आनंद आहे. लहानपणापासून मराठी भाषेंतील प्रासादिक ग्रंथांकडे आपलें लक्ष वेधणारा कोणी गुरु भेटला नाहीं हें आपलें दुर्दैव आहे असें म्हणणारे मामलेदार मुन्सफ आढळतात. तेव्हां पुढील पिढीला जुन्या पिढीहून कांहीं निराळें वळण खचित लागेल असा भरंवसा वाटत आहे. अशा स्थितींत ग्रंथकारांनीं चांगले गुण प्रकट केले तर त्यांचें चीज होईल. एका प्रसिद्ध व अनुभविक ग्रंथकारानें आमच्याजवळ असे उद्गार काढले कीं आतां मराठी वाचकांची चार सहा आण्यापर्यंतच्या किंमतीचीं पुस्तकें विकत घेऊन वाच-ण्याइतकी भूक वाढली आहे. याहून अधिक पुस्तकें फार खपत नाहींत असा त्यांचा अभिप्राय आहे."

"सामान्य लोकांच्या करमणुकीसाठीं किंवा शिक्षणासाठीं हा हेतुच कायतो मुख्यत्वेंकरून मराठी ग्रंथकारांपुढें आहे. इतर देशभाषांचीही गोष्ट तीच आहे. शिक्षणासाठीं पुस्तकें लिहिलेलीं असतात त्यांना उत्तेजन अति थोडें मिळतें, म्हणजे ग्रंथकाराचा पुस्तक छपाईचा देखील खर्च भागत नाहीं. तेव्हां या कामीं ग्रंथकर्तृ-त्वाची दिशा केवळ निर्लोभतेची नव्हे तर स्वार्थत्यागाचीच पाहिजे. अर्थात् हें म्हणणें द्रव्यदृष्टीनेंच आहे. बाकी ग्रंथ करण्यासाठीं जो बुद्धीचा व श्रमाचा व्यय होतो त्याचा आत्मसुधारणेच्या रूपानें मोबदला मिळतोच. पण लक्ष्मीपूजनाच्या दिवसांत केवळ सरस्वतीचा वरदहस्त आपल्या मस्तकावर असावा एवढी इच्छा असणारे

थोडे, म्हणून थोड्यांवरच हें लोकशिक्षणाचें काम पडत आहे. कायम महत्वाच्या ग्रंथांची रचना सरकारी नोकरींत असलेल्या लोकांनीं आस्ते आस्ते केली तर बरेंच कार्य होईल. हल्लींच्या दिवसांत सरकारी नोकरावर हरएक प्रकारें सरकारची करडी नजर असल्यानें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार लोकांत व्हावा या हेतूनें फावल्यावेळीं शास्त्रीय विषयांचें अध्ययन करून, लहान मोठीं पुस्तकें लिहिल्यास लोकांस त्यांचा मोठा उपयोग होण्यासारखा आहे. खेड्यापाड्यांत व्याख्यानें देऊन व शास्त्रीय प्रयोग दाखवून अगदीं सुगम लेख कसा वठतो हें पाहून मग पुस्तकें लिहिण्याच्या कामास हात घातला तर त्या पुस्तकांची योग्यताही वाढेल. सामान्य जनांच्या शिक्षणाच्या दृष्टीनें हा विचार झाला. परंतु राष्ट्रांतील उच्च प्रकारचे बुद्धिमान् लोक ज्यांच्याकडे राष्ट्राच्या कल्याणाची कामगिरी मुख्यतः असते म्हणजे जे लोकाग्रणी व्हावयाचे त्यांच्यासाठीं मेंदूला जरा त्रास होऊन तत्त्वचिंतनाची कटकट पडेल असे ग्रंथ उत्पन्न झाले पाहिजेत. त्यास व्यापक दृष्टीनें विचार करणारे विद्वान् लोकच पाहिजे आहेत. ज्यांनीं नानाप्रकारचा जगाचा अनुभव घेतला आहे, निरनिराळ्या ठिकाणीं समाजरचना कशी आहे, लोकव्यवहाराचें धोरण कोठें कसें आहे, देशी विदेशी लोकांचे आचारविचार कोणत्या प्रमाणांत आपल्या लोकांच्या आचारविचारांशीं मिळतात, त्यांचा त्या त्या समाजावर एकंदर परिणाम कसा झाला आहे हें सर्व ज्ञान मिळविलें आहे, अशा प्रकारच्या अभियुक्त लोकांचे हातून निर्माण होणारे ग्रंथ प्रायः परवश राष्ट्रांत दृष्टीस पडत नाहींत. राज्याधिकार भोगलेले किंवा अगदीं सूक्ष्मरीत्या लोकांवर नजर ठेऊन राहिलेले लोकच असे ग्रंथ रचूं शकतात. भीष्माचार्यांनीं व रामदासांनीं राजधर्मानुशासनाचा मक्ता घ्यावा; इतरांचें बोलणें लिहिणें अंधारांत चांचपडण्याप्रमाणेंच समजलें पाहिजे. हल्लीं पाश्चात्य राष्ट्रांत स्वतः मुत्सद्दी नसलेल्या लोकांनीं राजनीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिले आहेत; परंतु तिकडे राज्यकारभाराचा विचार करणारे लोक अनेक असतात व त्यांच्या राज्यसंस्थाच अशा प्रकारच्या आहेत कीं, त्यांपैकीं पुष्कळांना राज्ययंत्रघटनेची व राज्ययंत्रचालनाची माहिती असते. सारांश राष्ट्राची राजकीय प्रगति होऊन त्यास परावलंबी होण्याचा प्रसंग न यावा हा विचार ज्यांचे मनांत घोळत असतो तेच लोक ऐतिहासिक तत्त्वज्ञानाचे व राजनीतीचे ग्रंथ रचीत असतात. अशा प्रकारची व्यापक व दूरदर्शक नजर आमच्या ग्रंथकारवर्गाची अजून झाली नाहीं. पांच वर्षांपूर्वी एका कसलेल्या विद्वान् ग्रंथकारानें मला पत्र लिहून कळविलें कीं फ्रीमननें

इंग्रजींत जसे ऐतिहासिक निबंध लिहिले आहेत तसे आपण मराठी भाषेंत लिहिणार आहों. परतु संकल्पापलीकडे त्यांची मर्यादा गेली नाहीं. त्यांना अनेक नडी आल्या असतील. कदाचित् मराठी इतिहासावर अद्याप जितका प्रकाश पडावयास पाहिजे तितका पडला नाहीं, ही गोष्ट ध्यानांत घेऊन आपला बेत त्यांनीं बुद्धिपुरःसर तहकूब केला असेल. ”

“ राजनीतिशास्त्र व राजनीतिकला यांच्या अध्ययनास आजवर आमच्या राष्ट्रांत जी अलीकडे मदत झाली आहे ती सर्व इंग्रजी भाषेच्या द्वाराच झाली आहे आणि ती सरकाराच्या नजरेस आपलीं गाऱ्हाणीं यावीं म्हणून लिहिलेल्या अर्जांच्या रूपानें व कांहीं स्वतंत्र लेखांच्या व भाषणांच्या रूपानें झाली आहे. सार्वजनिक सभेच्या त्रैमासिक पुस्तकाचे अंक पाहिले असतां आम्हीं म्हणतों त्याची प्रतीति येईल. राजकीय चळवळीबद्दल परिश्रम कसे करावे, माहिती कशी मिळवावी, लोकसंग्रह करून संघटना कशी करावी या गोष्टीस प्रारंभ केल्याचें स्पष्ट दिसत आहे. मराठींतून लोकांस ज्ञान देण्यासाठीं इंग्रजी पुस्तकांचें रूपांतरही कांहीं दिवस प्रसिद्ध होत होतें, परंतु त्याचा फैलावा विशेष झाला नाहीं. मराठी ग्रंथकारांवर ही जबाबदारी महत्वाची आहे. राज्यांतील घटकावयव कोणकोणचे, परस्परांशीं त्यांचा संबंध काय, स्वराज्यांत कायदेकानु कसे करतात, ते पाळण्यांत यावे यासाठीं काय काय योजना असतात, लोकांतील चालीरीति व अनादि संप्रदायांचें राज्ययंत्रास साहाय्य किंवा विघ्न कितपत होतें, लोकशिक्षण, पोलिस, अबकारी, व्यापार, शेतकी इत्यादि खात्यांची यशस्वी सरकार कशी व्यवस्था लावतें हे शास्त्र व कलेचे प्रश्न उच्च प्रकारच्या शिक्षणाच्या व सरकारी कामाचा अनुभव घेतलेल्या कायदेपंडित ग्रंथकारांनीं करण्याजोगें काम आहे. गुलामगिरींत गुंतवून टाकल्यामुळें अनेक सुबुद्ध पदवीधरांचीं आयुष्यें फुकट गेलीं हें पाहून माझें अंतःकरण तिळतिळ तुटतें. तितक्या बुद्धिसंपत्तीवर दरवडा पडला व राष्ट्रांतून ती नाहींशी झालीच असें म्हणावें. कॉलेजांत असतांना ज्यांच्या बुद्धीचा प्रभाव पाहून गुरुजन व सहचारिगण थक्क होत असत, त्यांनीं ‘ ऑन हिज् मॅजेस्टीज् सर्विस ओनली ’ हा पाकीटावरील शेरा आपल्या हृत्पटलावर मारून घ्यावा यासारखें दुर्दैव नाहीं. ज्या विषयाबद्दल कॉलेजांत आपला कीर्तिदुंदुभि गाजत असे त्याचें अध्ययन करून त्यावर ग्रंथरचना करण्यास सरकारनें कोणास बंदी केली नाहीं. परंतु थकून भागून म्हणा, कुटुंबचिंतेमुळें म्हणा अशा लोकांचा राष्ट्रास उपयोग झाला नाहीं हें खरें. त्याचा परिणाम

आज दिसत आहे. " आतां तरी पुढें हाची उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥ "

मराठी भाषेंत उच्च प्रकारचें वाङ्मय निर्माण होण्यासाठीं महाराष्ट्रांतील विद्वान ग्रंथकारांनीं आपलें अवलोकनक्षेत्र वाढविलें पाहिजे. जे ग्रंथकार या आपल्या अवलोकनाचा फायदा आपल्या बांधवांस देतील ते राष्ट्राचे उपकर्ते होतील. राष्ट्रांतील सांपत्तिक द्रव्याचा उपयोग आपला आपण करून देश द्रव्यसंपन्न करण्याच्या इच्छेप्रमाणेंच राष्ट्रांतील लोकांच्या मनास योग्य शिक्षण देऊन त्यांना ज्ञानसंपन्न करण्याची इच्छाही उदात्त आहे. सामान्य धनाची वृद्धी करणारे व्यापारी जसे राष्ट्रास उत्कर्ष आणून देतील तसेच ज्ञानधनाची अभिवृद्धि करणारे व्यापारी म्हणजे ग्रंथकार हेही राष्ट्रोदयास सहायभूत होणार आहेत. आपल्या राष्ट्रास कोणत्या मालाची जरूर आहे, याबद्दल दोघांनींही सारखेंच जपलें पाहिजे, असें ते म्हणत.

कै. नी. बा. रानडे यांचा ' बृहत् इंग्रजी मराठी कोश; ' डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं संपादिलेला ' महाराष्ट्रीय ज्ञानकोश; ' कै. खरे, कै. राजवाडे, कै. पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेले ऐतिहासिक ग्रंथ; धुळ्याच्या देवांनीं मोठ्या प्रमाणावर आरंभिलेलें रामदासी वाङ्मयाचें प्रकाशन, हीं सर्व कामें पाहून त्यांना समाधान वाटे व त्यांची ते मुक्त कंठानें प्रशंसा करीत. आजच्या तरुण पिढींतून या लोकांसारखींच चिकाटीचीं, दृढनिश्चयाचीं व दीर्घोद्योगी माणसें बाहेर पडावीं व त्यांनीं ' शब्दकोश ', ' धातुकोश ', वाङ्मयकोश ', ' शास्त्रीयकोश ' यासारखीं मराठी वाङ्मयाचा अभ्यास सुलभ पण व्यापक करण्यास सहाय्यभूत होणारीं कामें हातीं घ्यावीं व ' संघशक्तीच्या ' जोरावर तीं पूर्णतेला न्यावीं अशी इच्छा ते अनेक विद्वान तरुणांकडे वारंवार प्रदर्शित करीत.

## ५ व्यक्तिविषयक

" जातयां अभ्रासवें । जैसें आकाश न धांवे । भ्रमणचक्रीं न भवे । ध्रुव जैसा ॥ दैन्य दुःखीं न तपे । भयशोकीं न कंपे । देहमृत्यू न वासिपे । पातलेनि ॥ तैशा आल्या गेल्या उर्मी । नव्हे गजबज मनोधर्मी । किंबहुना धीरु क्षमी । कल्पांतीही ॥

—श्रीज्ञानेश्वर महाराज.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं थोर पुरुषाचें केलेलें वरील वर्णन विजापूरकरांना तंतोतंत लागू पडतें. विजापूरकरांतील वैशिष्ट्य जर कोणतें असेल तर तें हेंच. निश्चयरूपी वज्राच्या जोरावर ज्यानें विघ्नांचे मोठमोठे पर्वत धुळीला मिळविले, भय-शोकादि आघात आपल्या ध्येयाची ढाल पुढें करून ज्यानें लीलेनें परतविले, ज्यानें सर्वस्वाचा त्याग करून देशसेवेचें असिधाराव्रत आमरण पाळलें, स्वतःचा संसार मोडून ज्यानें राष्ट्राचा संसार नेटका करण्याकरितां जिवापाड मेहनत केली, नाना संकटांचीं वादळें ज्याच्यावरून अनेकदां वाहून गेलीं पण जो पथभ्रष्ट झाला नाहीं, ध्रुवासारखा अचल राहिला, त्या पुरुषाचें कितीही वर्णन केलें तरी तें तोकडेंच पडेल. महर्षि रानड्यांनंतर अशा तऱ्हेचा धीर, गंभीर, संयमी, साधुशील पुरुष महाराष्ट्रांत दुसरा निपजला नाहीं. अशा या थोर पुरुषाचा इतिहास वाचल्यानंतर त्याचें खासगी जीवन समजून घेण्याची आतुरता कोणास उत्पन्न झाल्यास नवल नाहीं.

## प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर

'साधी रहाणी व उच्च विचारसरणी' यांचे विजापूरकर हे एक आदर्श होते. त्यांची ती निगर्वी, निःस्वार्थ, शांत, प्रेमळ, त्यागी अशी मूर्ति पाहिली म्हणजे अनोळखी माणसाच्या हृदयांत देखील आदर उत्पन्न होई, आपलें मस्तक पूज्य-भावानें त्यांच्यापुढें वांकवावें असें वाटे. त्यांची ती अधोदृष्टि, त्यांचें तें गोड, मृदु भाषण, वादविवादांत दुसऱ्याचें मन न दुखवितां आपलें म्हणणें त्याचे गळीं उतरविण्याची ती तऱ्हा, हीं सारींच कोणाच्याही मनावर एकदम छाप पाडीत. ते उत्तम वक्ते नव्हते पण त्यांचीं खासगी संभाषणें इतकीं आकर्षक असत कीं, तासचे तास त्यांचे-पासून ढळूं नये असें वाटे. त्यांचीं सार्वजनिक व्याख्यानें किंवा लेख हीं विद्वत्ताप्रचुर असत पण तीं तेवढीं आकर्षक नसत; त्यांतून विनोद किंवा कोटी क्वचितच झळके. त्यांचे लेख वाचून किंवा व्याख्यानें ऐकून 'ते अतिशय अरसिक असले पाहिजेत' असा पुष्कळांचा ग्रह होई. पण तो ग्रह चुकीचा होता. त्यांचें संभाषण मार्मिक, विनोदी पण खोंचांनीं भरलेलें असे. संभाषणांत अल्पाक्षरी परंतु बव्हर्थी शब्द योजून श्रोत्यांचें मन गुंगविण्यांत त्यांचा हातखंडा असे. प्रस्तुत लेखकाला आठवतें कीं, एकदां टिळक महाविद्यालयांतील आचार्य वि. प्र. लिमये अण्णांना भेटावयाला आले होते. ते भेटून गेल्यावर बोलतां बोलतां त्यांचेसंबंधीं विषय निघाला व ते कशावरूनसे म्हणाले, 'पण हें तुम्हांला माहीत नाहीं, आचार्यांना रागरंग पाहून वागावें लागतें.' हें वाक्य बोलून विशेषतः रागरंग या शब्दावर जोर देऊन ते मोठमोठ्यानें हंसले. अण्णा कां हंसले हें आमच्या कांहीं ध्यानांत येईना. आम्ही किंचित् बुचकळ्यांत पडलों आहों असें पाहतांच ते पुनः मोठ्यानें हंसले व म्हणाले, 'अहो, आचार्यांना रागरंग पाहून वागावें लागतें म्हणजे त्यांचे जे सहकारी रा. ग. हर्षे व रं. ग. रबडे त्यांना पाहून म्हणजे त्यांचा कल पाहून वागावें लागतें,' या स्पष्टीकरणानें जो हंशा पिकला तो विचारूंच नये. असाच किंवा याहून अधिक गमतीचा प्रसंग एकदां घडला. अण्णांचे बंधु व आम्ही कांहींजण संध्याकाळचे वेळीं फिरावयास गेलों होतों ते परत येत होतों. अण्णा पडवींत हिंडत होते. आम्ही खोलींत येऊन बसतों न बसतों इतक्यांत ते आले व आपले बंधूस उद्देशून म्हणतात, 'वासुनाना, तुमच्या खोलींत आज इन्स्पेक्टर येऊन खोलीची तपासणी करून गेले.' आम्हांला कांहीं वेळ त्याचा उलगडा होईना. तेव्हां ते स्मित करीत व खोलींतील एका उघड्या खिडकीकडे बोट दाखवीत म्हणतात, 'तें पहा, तिकडे काय तें.' बघतों तों काय, वासुनानांनीं संध्याकाळीं फिरून

आल्यावर भूक लागते म्हणून दुपारच्या फराळाच्या दशम्या ज्यांत जतन करून ठेविल्या होत्या तो डबा अस्ताव्यस्त पडला असून, दशम्यांचा फन्ना उडालेला. वासुनानांच्या गैरहजेरींत उघड्या खिडकीवाटे कुठल्यातरी 'बोकोबानें' खोलींत प्रवेश करून या दशम्यांवर यथेच्छ ताव मारला होता. तें दृश्य पाहून आमच्या पोटाला हंसून हंसून त्या संध्याकाळीं किती जोराचा व्यायाम घडला असेल, याची कल्पनाच करावी.

अण्णांची विद्यालयांत सर्वांशीं सारखी वागणूक असे. विद्यालयांतील सर्व माणसें हीं आपल्या कुटुंबांतील माणसें असें समजून ते त्यांच्याशीं वागत. अमका भाऊ, मेव्हणा, भाचा म्हणून त्यावर त्यांनीं विशेष प्रेम दाखविलें असें कधीं झालें नाहीं. अण्णांची मूळपासूनचीच अशी वृत्ती होती. मासिक मनोरंजनांत 'आजन्म जिज्ञासु' या लेखकानें अण्णांचें आपल्या आप्तेष्टांसंबंधीं कसें वर्तन असे त्याचें मार्मिकपणें खालीलप्रमाणें वर्णन केलें आहे. "जवळच्या आप्तेष्टांसंबंधीं त्यांचें वर्तन कसें होतें हें पाहूं गेलें असतां 'विवेकपूर्ण प्रेमळपणा' जिकडे तिकडे दिसून येईल. आईबाप, आत्या, बायको, बहीण, भाऊ, मुलगा, पुतण्या, सून इत्यादिकांवरचा त्यांचा अनुराग भडक रंगांत विशेष कधीं दिसला नाहीं; वाचेच्या द्वारें त्यानें आपल्या अस्तित्वाची टिमकी वाजविली नाहीं; नाचरेपणाच्या येरझाऱ्यांनीं किंवा खटाटोपांनीं लोकांचें लक्ष आपल्याकडे वेधण्याचाही त्यानें प्रयत्न केला नाहीं; तथापि डोळ्यांतील तेजाप्रमाणें, किंवा शरीरांतील आरोग्याप्रमाणें किंवा मनाच्या समाधानवृत्तीप्रमाणें किंवा आत्म्याच्या शांतीप्रमाणें त्या अनुरागाचें अस्तित्व गाजावाजाशिवाय पहाणाऱ्याच्या प्रत्ययाला येत असे. त्यांचा मुलगा माधव (बंडू) हा समर्थ विद्यालयांत असतां त्याच्याकडे त्यांचें विशेष लक्ष होतें असें कधीं दिसलें नाहीं. इतर मुलांबद्दल ते हजार चौकशा करीत, पण बंडू हा त्यांचा मुलगा हें समर्थ विद्यालयांत महिना महिना रहाणाऱ्यांच्या देखील ध्यानांत येणें कठीण पडे, इतका तो बंडू इतर मुलांमध्यें मिळून जाई व अण्णाहि इतके त्याविषयीं 'अविशेषानें' वागत. प्रत्यक्ष बायकोवरचें प्रेमही लोकांमध्यें विशेष उत्कट तऱ्हेनें दिसून आलें नाहीं. कोल्हापुरास राजाराम कॉलेजांत प्रोफेसर असतांना हे विद्याव्यासंगी गृहस्थ एक दोन वर्षें सकाळीं, दुपारीं, रात्रीं, कॉलेजमध्येंच अध्ययन-अध्यापनाकरितां रहावयाचे, जेवणखाणाकरितां वगैरे फार थोडा वेळ घरीं रहावयाचे, म्हणून कांहीं जणांना त्यांच्या पश्चात् त्यांची कुचेष्टा देखील करावीशी वाटे. ते घराबद्दल बेफिकीर

दिसत. त्यांची आत्या, बहीण, मेव्हणा, भाचा इत्यादि सर्वांवर त्यांचें प्रेम असे, पण तें दृष्टीच्या द्वारें, 'मिताक्षरी' वाचेच्या द्वारें व त्या त्या व्यक्तीचें कल्याण व्हावें अशा सदिच्छेनें प्रेरित झालेल्या कृतींच्या द्वारें व्यक्त होईल तेवढेंच. त्यांची एक आत्या होती, ती जरा स्वभावानें कठोर किंबहुना कर्कश असे,—किंवा दिसे; पण अण्णा मोठेपणीं देखील तिला लागेल असें कठोर भाषण करीत नसत, तर सौम्यपणानें हो हो करून वेळ मारून नेत. त्यांचे बंधु वासुनाना यांच्या संबंधानेंही असेंच. हे प्रथम प्रथम अण्णांच्या ध्येयैकदर्शी अव्यावहारिक दृष्टीची कुचेष्टा प्रेमबुद्धीनें, किंबहुना आदरपूर्ण कौतुकानेंच, अण्णांच्या तोंडावर करीत असत. पण अण्णांची शांतवृत्ती कधीं ढळली नाहीं व वासुनानांवरच्या प्रेमांत कधीं अंतर पडलें नाहीं. विनायकराव जोशीराव हे त्यांचे नातलग नव्हेत, पण अनेक वर्षें दोघांचा संबंध जडलेला होता म्हणून त्यांच्याविषयींही येथें जी गोष्ट आठवली आहे ती देण्यास हरकत नाहीं. असें सांगतात कीं कोल्हापुरास 'फौजी पहाऱ्या'खालीं अण्णा, विनायकराव व वामनराव जोशी हे कैदी असतां, विनायकराव अण्णांशीं वाद करून समर्थ विद्यालय काढण्यांत अण्णांनीं मोठी चूक केली व फसलेल्या मुलांचें, अण्णांनीं आपल्या स्वतःचें, विनायकरावांचें व वामनरावांचें जन्माचें नुकसान केलें, असें सिद्ध करूं पहात. अण्णा हरतऱ्हेचे युक्तिवाद करून आपलें समर्थन करीत, पण विनायकराव वादांत कांहीं कमी कुशल नव्हते आणि शिवाय थोडीबहुत कुचेष्टा करून व अण्णांना थोडेंसें चिडवून कसा तरी कैदेंतला वेळ कंठावयाचा या हेतूनें ते हार न जातां अधिकच कुचेष्टा करीत. मास्तरांशीं उगाच वाद करणाऱ्या वितंडवादी शिष्यांसारखाच हा प्रकार होता. (विनायकराव हे अण्णांचे शिष्य होतेच.) पण अण्णांना उगाच कांहीं तरी बोलून वंद्य वस्तु अवंद्य ठरविणें, पूज्य वस्तूची टवाळी करणें, हें खपत नसे. असें सांगतात कीं, अण्णांनीं अखेर विनायकरावांशीं वाद करण्याचें सोडून दिलें, पण त्यांना कठोर शब्द बोलून दटावलें किंवा दाबलें नाहीं. विनायकराव काय, मग वामनरावांशीं वाद घालूं लागले. दोघेही कुणीकडून तरी वेळ घालवावयाचा म्हणून वाद करूं लागले. एकमेकांना पेंच घालून, कोंडींत पकडून, विनोदी गोष्टींनीं एकमेकांचा युक्तिवाद हास्यास्पद ठरवून, ते कालक्रमणा करीत असत. अण्णांना ही पूज्य वस्तूबद्दलची अपूज्यबुद्धीची चर्चा आवडली नाहीं, पण ते कांहीं विनायकरावांना किंवा वामनरावांनाही कठोर-पणें बोलले नाहींत. विनायकरावांना तर समर्थ विद्यालयाची कुचेष्टा करण्याचा चेव

आल्यासारखें होऊन ते भलभलते आरोप अण्णांवर व त्या विद्यालयाच्या चालकांवर करूं लागले. अण्णांना हे कांहीं ऐकवेनात म्हणतात. पण एकाच खोलींत तिघांना कोंडलेले, तेव्हां करतात काय ? ऐकल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. तरी पण अखेर कुचेष्टेचा हा प्रकार त्यांच्या कानांना ऐकवेना व डोळ्यांना पहावेना, म्हणून त्यांनीं घोंगडी डोकीवर घेऊन तोंड झांकून टाकलें व कानांवर शब्द येऊंच नयेत अशी योजना करण्याचा प्रयत्न केला, पण तो साध्य कसा होणार ? विनायकरावांच्या अंगांत त्या वेळीं कलि शिरला होता कीं काय कोणास ठाऊक, त्यांनीं अण्णांच्या या प्रयत्नांसंबंधीं एक हास्यकारक व अश्लील परंतु अगदीं लागू पडणारी व मर्मभेदक अशी गोष्ट सांगितली. विनायकराव का वामनराव, यांपैकीं कोणाकडून तरी ही गोष्ट या लेखकानें ऐकिली आहे; व एकंदर हा प्रकार त्यांच्याकडूनच कळलेला आहे. या प्रसंगीं अण्णांवरतीं अत्यंत मर्मभेदक अशा रीतीनें विनायकरावांनीं बाजू उलटविली असतां अण्णांची जी अवस्था झाली ती विनायकराव व वामनराव यांच्याकडूनच ऐकावी. तथापि सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, या प्रसंगीं देखील, रागाचें इतकें प्रबळ कारण असतांना देखील, अण्णांनीं आपली शांति ढळूं दिली नाहीं, व याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विनायकरावांवरचें प्रेम कमी होऊं दिलें नाहीं. तिसरी गोष्ट येथें सांगितली पाहिजे कीं विनायकरावांचा अण्णांबद्दल आदर कमी नव्हताच, पण या प्रसंगानंतर तो अधिकच वाढला. अंगांत संचारलेल्या कलीनें प्रयाण केल्यानंतर हा आदर उचित प्रसंगीं उचित रीतीनें व्यक्त होऊं लागलाच."

वरील हकिगतीवरून अण्णांचा स्वभाव किती परमावधीचा सहनशील होता तें दिसून येईल. या सहनशीलपणाला प्रेमळपणा व कळकळ यांची जोड मिळाल्यामुळें कोणत्याही परिस्थितींतील व कोणत्याही स्वभावाचा मनुष्य असला तरी त्याला ते तत्काळ वश करून घेत. या गुणांमुळें जहाल, मवाळ किंवा सरकारपक्षीय लोकांत ते आपलें वजन कायम राखूं शकले.

समर्थांचा दासबोध हा अण्णांचा ध्येयभूत ग्रंथ होता. त्यांची प्रत्येक कृती या ग्रंथांतील वचनांनुसार होत असे. दररोज झोंपीं जावयाच्या आधीं कांहीं तास त्याच्यांतील दशक ते नियमानें वाचीत असत. दासबोधाला ते वेदग्रंथांएवढा पूज्य मानीत. महाराष्ट्रांतील लोकांना मार्गदर्शकांसाठीं बाहेर हिंडावयाला नको; ते हा

ग्रंथ जर मननपूर्वक वाचतील तर त्यांना जें हवें असेल तें यांत सांपडेल; संशयात्म्यांचे सर्व संशय नाहींसे करण्यास समर्थ असा हा एकच ग्रंथ आहे, असें त्यांचें म्हणणें असे.

अण्णांचा नियमीतपणा व टापटीपपणा वाखणण्याजोगा असे. घड्याळ्याच्या कांट्याप्रमाणें त्यांचीं सर्व दैनिक कामें चालत. अमुक काम अमुक वेळेला करावयाचें म्हणजे करावयाचेंच. सकाळीं व संध्याकाळीं अमुक वाजतां अमुक अंतरापर्यंत फिरावयाला जावयाचें म्हणजे जावयाचेंच. मग थंडी, वारा कांहींही असो. आपला किंवा इतरांचा वेळ व्यर्थ दवडूं न देण्याचे बाबतींत ते फार काळजी घेत. त्यांच्या खोलींत केव्हांही पाऊल टाका ते लिहीत, वाचीत किंवा दुसरें कांहीं तरी काम करीत बसलेले असावयाचे. त्यांची खोली म्हणजे स्वच्छतेचा व टापटीपीचा एक आदर्श असे.

अण्णांचा पत्रव्यवहार फार मोठा असे. आपणास आलेल्या पत्रांना वेळचे वेळेवर उत्तरें धाडण्यांत ते अतिशय दक्ष असत. पत्राचें उत्तर टपालाच्या पेटींत पडेपर्यंत त्यांना स्वस्थता वाटत नसे. पेटींत पत्रें टाकूनही पुनः विचारावयाचेच कीं, 'टपालाचा शिपाई पेटींतून सारीं पत्रें घेऊन गेला का हो ?'

स्वतःच्या पाठीवर केवढेही मोठे उद्योग असले तरी शरीराची आबाळ ते सहसा होऊं देत नसत. आपल्या आरोग्यास ते अतिशय जपत. शेवटपर्यंत त्यांनीं कधीं वैद्याची मदत घेतली नाहीं. "अण्णा, एखाद्या चांगल्या वैद्याकडून प्रकृति तपासून घ्याना" असें कोणी म्हटलें म्हणजे म्हणावयाचे, "अहो माझा वैद्य मीच आहें. माझ्या खोलींत काय बिघडलें आहे, हें तपासायला जशी परक्या माणसाची आवश्यकता नाहीं, तसेंच माझें शरीरही तपासायला परकें माणूस बोलावण्याची आवश्यकता नाहीं. मला काय होतें हें मला समजतेंच आहे. तें सांगायला दुसरें माणूस कशाला ?"

अण्णांचा देवावर विलक्षण भरंवसा असे. '**रामं गृणन्नेति नरोऽखिलार्थान् ।**' हें वाक्य त्यांचे सर्व वह्यांवर अग्रभागीं असे. पैशांची टंचाई असली, माणसांची वाण पडलेली असली तरी भगवान् देईल असें म्हणत. या भरंवशाप्रमाणें ऐन अडचणीच्या वेळीं मदत दत्त म्हणून पुढें उभी राहिली, असे अनेक प्रसंग घडत. एकादी गोष्ट करण्याला सुरवात कां करीत नाहीं असें विचारलें तर 'आदेश

ग्रंथ .... ............ वि: ........
अंक ...१५२... व्यक्तिविषयक

झाल्यावर करीन ' असें म्हणत असत. देवावर असा विश्वास असला तरी ते जबर प्रयत्नवादी होते. ' दैवांत असेल तर होईल ' असें वाक्य त्यांच्या तोंडून कधींही बाहेर पडलें नाहीं. दैवावरच काय पण इतर माणसांवर किंवा आपल्या सहकाऱ्यांवर ते कधींही विसंबून राहिले नाहींत. ' बुद्धिस्तु मागान्मम ' हें मुद्राराक्षसांतील वाक्य मोठ्या विश्वासानें अनेकांचे समोर ते म्हणत असत.

व्यक्तीकरितां कांहीं करूं नका हा त्यांचा नेहमींचा दंडक असे. स्वतःकरितां तर कोणीच कांहीं करितां कामा नये. त्यांना कोणीं बागेंतील सुंदर फूल दिलें तर ' मारुतीला घाला ' असें सांगत. कोणी उत्तम खाद्य दिलें तर त्यांत निकटवर्तिजनांचा भाग असावयाचाच. त्यांचा वाढदिवस करण्याचें विद्यालयानें ठरविलें तेव्हां ते बरेच रागावले म्हणतात. या वाढदिवसाचे दिवशीं विद्यार्थ्यांनीं हातसुताची खादी अर्पण करण्याचा बेत केला. त्याला ' आपण सर्वांपुरती खादी तयार करूं आणि सर्वांनींच घालूं, ' असें उत्तर मिळालें. पहिल्या वाढदिवसाचे दिवशीं भाषण केलें तें तरी किती लीनपणाचें. प्रचाराकरितां बाहेर गांवीं गेले असतां कोणीं भोजनाला बोलावीत त्याला ' माझे व्यक्तिनिष्ठेकरितां हें झालें. यांत मला समाधान नाहीं. माझे संस्थेला काय तें द्या, ' असें म्हणत.

विजापूरकरांच्या जीवाभावाच्या स्नेह्यांत कै. गोपाळराव गोखल्यांची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. परस्परांचें परस्परांवरील प्रेम अपूर्व व अकृत्रिम असें होतें व तें अखेरपर्यंत अढळ होतें. गोखल्यांशीं राजकीय व सामाजिक प्रश्नांच्या बाबतींत बरेच मतभेद असूनही ते परस्परांच्या स्नेहाच्या आड कधीं आले नाहींत. विजापूरकर पुण्यांत केव्हांही आले तरी—खुद्द गोखल्यांच्या कारकीर्दीत आणि पुढेंही—' सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत 'च उतरत. गोखल्यांवर असलेल्या प्रेमामुळें त्यांचें या संस्थेवर व संस्थेंत काम करणाऱ्या सभासदांवरही विलक्षण प्रेम होतें. सामान्य जनांना विजापूरकरांची ही वागणूक चमत्कारिक वाटे. विशेषतः त्या काळांत—जहाल मवाळ हे एकमेकांचे हाडवैरी आहेत असें समजलें जाणाऱ्या त्या काळांत—तसें वाटणें साहजिक होतें. सार्वजनिक मतभेदामुळें स्नेह तोडण्याचें कारण नसतें, हें तत्व त्यांना काय ठाऊक? विचारी लोकांना मात्र विजापूरकरांच्या या वागणुकीमुळें त्यांजबद्दल अधिकच आदर वाटूं लागे.

अण्णा व्यक्तीच्या आचरणाकडे किंवा त्याच्या भूतकालीन कृतीकडे दुर्लक्ष करून त्याच्या चांगल्या हेतूंकडे लक्ष देत. इतकेंच काय पण त्याची एखादी कृती

खुद्द स्वतःला एके काळीं जाचक झाली असली तरी ती मनांत न आणतां त्यास साहाय्य करण्यास पुढें होत. रा. ब. लट्ठे,—कीं ज्यांनीं कोल्हापूरच्या खटल्यांत विजापूरकरांविरुद्ध साक्ष दिली,—त्यांनीं देशी भाषांस प्राधान्य देण्याच्या हेतूनें बेळगांवास कॉलेज काढण्याची खटपट चालवितांच, त्यांनीं त्यांचें खासगी अभिनंदन तर केलेंच, पण वृत्तपत्रांतून त्यांच्या चळवळींस पाठिंबा दिला. अशाच एका पत्रास परिशिष्टांत छापलेलें पत्र आभारप्रदर्शक म्हणून रा. ब. लठ्ठे यांनीं लिहिलें आहे. यावरून अण्णा व्यक्तीपेक्षां तत्वाला किती महत्व देत असत तें कळून येईल.

अण्णा हे जबर व्यासंगी पुरुष होते. कितीही कामें असलीं तरी वेळांत वेळ काढून ग्रंथांतील कांहीं भाग दररोज वाचल्याशिवाय त्यांच्या मनाला स्वस्थता वाटत नसे. नवीन ग्रंथ मिळाला तर ठीकच, नाहींतर त्यांचे आवडीचे कांहीं ग्रंथ असत, त्यांतील मधलेंच एखादें प्रकरण काढून ते वाचीत. ना. गोखल्यांचे 'लेख व भाषणें,' बर्कचें ' फ्रेंच रेव्होल्युशन, ' इमर्सनचा ' निबंधसंग्रह ' हे त्यांचे अत्यंत आवडीचे ग्रंथ होते. बर्कच्या ' फ्रेंच रेव्होल्युशन'चीं त्यांचीं किती तरी पारायणें झालीं असतील.

अण्णांची वृत्ती जशी साधी तसाच त्यांचा पोशाखही साधा असे. साधा कोट, आंत बंडी, बिनजरीचा सफेत रुमाल,* साधें धोतर, अंगावर उपरणें व हातांत सोटा असा त्यांचा पेहराव असे. स्वतःचीं वस्त्रें ते स्वतःच धूत. अखेरी अखेरीस नाइलाजच म्हणून गव्यास सांगणें भाग पडे. व्यसन कसलें तें त्यांना जन्मांत ठाऊक नाहीं. कार्यप्रयोजनांत देखील त्यांनीं सुपारी तोंडांत टाकली नसेल.

अण्णांना दुसऱ्यांना शिकविण्याची फार हौस असे. फिरावयाला गेले तरी गुराख्यांचीं मुलें गोळा करून, रस्त्यावरील धुळींत आपल्या हातांतील काठीनें अक्षरें काढून त्यांची त्यांना ओळख करून देण्यांत ते गुंग होऊन गेलेले असावयाचे. नवीन समर्थ विद्यालय स्थापन होण्यापूर्वी ते अनेकदां आपल्या बहिणीचे गांवीं महिने दोन महिने जाऊन रहात. या ठिकाणींही त्यांनीं बराच छात्रवृंद गोळा केला होता. त्यांचे बहिणीचे घरापासून बऱ्याच अंतरावर एक ओढा आहे. या ओढ्या-

* पुढें पुढें ते चादरच डोक्याला गुंडाळीत. हेतु असा कीं, प्रवासांत तिचा पांघरुणासारखा उपयोग व्हावा.

वर ते स्नान-संध्येकरितां म्हणून जात. या ओढयाभोंवतीं शेतकऱ्यांचे बरेच मळे आहेत. हे तेथें गेले म्हणजे शेतकरी त्यांचे भोंवतीं जमा व्हावयाचे व त्यांच्याशीं यांच्या अनेक गोष्टी चालावयाच्या. मोठ्या दगडावर लहान दगडानें अक्षरें काढून शिकविण्याचें कामही मधून मधून सुरू असावयाचें. तेथें असतां त्यांनीं बऱ्याच शेतकऱ्यांना साक्षर केलें होतें. अण्णांच्या घडलेल्या या सहवासाची आठवण म्हणून तेथील शेतकऱ्यांनीं या ओढयाला ' विजापूरकरांचा ओढा ' म्हणून नांव ठेवलें आहे. त्या गांवांत हा ओढा हल्लीं ' विजापूरकरांचा ओढा ' म्हणून ओळखला जातो. अण्णांनीं आपल्या अखेर अखेरच्या दिवसांत पत्रद्वारें ' संस्कृत ' सुलभ-रीतीनें शिकविण्याचा आरंभिलेला उद्योग सर्वश्रुतच आहे.

अण्णांमध्यें असलेल्या अनेक गुणांप्रमाणें कांहीं दोषही होते. ते कदाचित् सद्गुणातिरेकही असतील. या दोषांपैकीं महत्वाचा दोष म्हणजे, ज्याच्याबद्दल एकदां विश्वास वाटूं लागला त्यावर प्रमाणाच्या बाहेर विश्वास टाकणें हा होय. अशा माणसाचे दोष त्यांना गुणासारखे वाटत. याचे परिणाम त्यांना अखेरी अखेरीस अतीशय भोगावे लागले. ज्या लोकांना स्वतः अर्धपोटीं राहून, दुसऱ्यांचे रोष सहन करून, स्वखर्चानें दूध पाजलें तेच लोक त्यांचें शरीर दुर्बळ होतांच, त्यांनीं अधिकारसंन्यास घेतांच सापासारखे त्यांचेवर उलटून त्यांचे संबंधीं निंदेचें गरळ ओकण्यास पुढें सरसावले. अण्णांना मनुष्यस्वभावाची तितकीशी पारख नव्हती. हा दोष पुढें पुढें त्यांना कळूं लागला. ज्या एक दोन व्यक्तींना ते आपल्या पुत्रा-प्रमाणें वागवीत त्यांच्या अंतरंगाची ओळख होतांच त्यांना ते ' कृतघ्न, ' ' कलि-पुरुष ' या नांवानें संबोधूं लागले. या आपल्या दोषाची जाणीव त्यांना फार उशिरां झाली. ती योग्यवेळीं झाली असती तर ज्या कित्येक खेदजनक गोष्टी त्यांच्या अखेरीच्या काळांत घडल्या त्या घडल्या नसत्या. असो. दोष कोणांत नाहींत ? पूर्ण असा जगांत कोण आहे ? आम्ही सामान्य जनांनीं पाहा-वयाचें तें त्यांच्या कार्याकडे, त्यांच्या गुणांकडे, व त्यांच्या संदेशाकडे. ' आजन्मजिज्ञासु ' या लेखकानें म्हटल्याप्रमाणें, "अण्णांसारख्यांचे गुण हे कित्येक वेळां दोषस्वरूप होत हें म्हणणें व्यर्थ आहे. जगांत ज्यानें त्यानें आपलें ध्येय निश्चित करून तन्निष्ट राहावें व यथामति यथाशक्ति तत्सिद्ध्यर्थ कार्य करीत रहावें, हाच धर्मशास्त्राचा अंतिम सिद्धांत आहे. अण्णासारख्यांचें स्मरण आपणांस पुनीत करतें, त्यांचीं चरित्रें आपणांस ' दुःखांना भिऊं काय ? दुःखें

येतील आणि जातील, प्राण देखील जावयाचे आहेत, मग सुखदुःखांचें काय ? जगांत कोठें चिरंतनत्व असेल तर तें सद्बुद्धींत व सत्कार्यांत आहे' असें सांगतात व आपलें अंगीकृत कार्य उत्साहानें, नेटानें, चिकाटीनें, संकटांना धैर्यानें तोंड देऊन, नैराश्याला कधीं बळी न पडतां, शांतपणें, धिम्मेपणानें, निरभिमानपूर्वक चंद्रसूर्यांप्रमाणें 'Without haste, without rest' करीत रहावें असें बजावतात." महाराष्ट्रांतील ध्येयवाद्यांनीं त्यांचें चरित्र वाचावें, त्यांच्या कार्यांचें आंतर रहस्य समजून घ्यावें व त्यांनीं चोखाळलेल्या वाटेनें, त्यांनीं दाखवून दिलेल्या दिशेनें पुढें, पुढें, सारखें पुढेंच जात रहावें, मागें वळून पाहूं नये,—पाहिल्यास आपली प्रगति किती झाली तें पाहून वाढत्या आशावादित्वानें पुढें जाण्यासाठींच पहावें—मागें पाऊल टाकूं नये; याहून अधिक काय सांगणार, काय बोलणार, काय लिहिणार ?

REFBK-0003600

ग्रंथालय
दा. क्र. ३६०